

# छात्र प्रबोधन

वर्ष १३ । अंक २ • सौर कार्तिक । शके १९३४

मूल्य ₹ ६०



दिवाळी विशेषांक २०१२

ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी,
कृतिशीलता जोपासणारे मासिक !



# सांधेदुखी, कंबरदुखी, डोकेदुखी, सर्दी खोकला, स्नायुचे आखडणे

ह्या सर्वांवर उत्तर आहे निसर्गाजवळ...






चोळा, जिरवा, अनुभवा...

चुरचुर नाही, आगही नाही आणि वेदनाही गायब

## विको® नारायणी क्रीम

## वेदनांवर नैसर्गिक उपाय

आयुर्वेदक औषधी

Customer care cell no.: 0712 - 2420890

# संवाद

**स्वत:ला समृद्ध करू इच्छिणाऱ्या, लाडक्या, प्रबोधक मुलामुलींनो,**

वीस वर्षांची वर्धिष्णू वाटचाल पूर्ण करून एकविसाव्या वर्षाचे 'छात्र प्रबोधन'चे सहा दिवाळी अंक पन्नास हजार घरांमधल्या लाखभर मुलामुलींपर्यंत पोहोचवताना मनापासून आनंद होतोय. मला खात्री आहे, या दिवाळी अंकांची आतुरतेने वाट पाहाणाऱ्या तुम्हा सर्वांची दिवाळी; या अंकाच्या वाचनातून अधिक आनंददायी होईल. पण त्यासाठी तुम्ही पुरेसा वेळ काढायला हवा, बरं का !

अंक वाचता वाचता त्यातल्या आवडलेल्या गोष्टी अनेकांना सांगून पाहा, त्यांच्या लेखकांना, चित्रकारांना पत्र लिहून तसे कळवा; त्यांना प्रतिसाद द्या. काही कृती करून बघा. काही लेखांवर घरात–शाळेत –मित्रांमध्ये चर्चा करा तर काहींवर चिंतनही करा. काही लेखांच्या आधारे संकल्प करा तर काहींच्या वाचनातून स्वत:मध्ये चांगले बदल घडवून आणायला सुरुवात करा. असं सगळं तुम्ही मनापासून आणि डोळसपणे केलंत तर खऱ्या अर्थाने 'मोठ्ठं' व्हायला या अंकाची तुम्हाला मदत होईल ! हे जसं तुम्हाला या दिवाळी अंकाबाबत सुचवलं; तसंच तुम्ही जे जे ऐकाल, पाहाल, वाचाल, अनुभवाल त्या प्रत्येकाच्या बाबतीत तुम्ही वर सुचवलेल्या गोष्टी करून पाहायला लागलात, हळूहळू तशी सवयच तुम्हाला लागली तर तुमच्या विकासाचा मार्ग तुम्हालाच सापडेल. आपण थोडं 'मोठ्ठं' झाल्याची जाणीव आणि 'मोठ्ठं' होत जाण्याच्या प्रक्रियेतला आनंद तुम्हाला अधिक समृद्ध करेल. यात तुम्हाला मदत करण्यासाठीच तर 'छात्र प्रबोधन' आहे !

दिवाळी अंकात पहिल्यांदाच आपण एका महत्त्वाच्या विषयासाठी (निर्णयातील स्वावलंबन) २५ पानांचा स्वतंत्र विभाग केला आहे. तुम्ही जसजसे मोठे होत जाल तसतसे वेगवेगळ्या गोष्टींबाबत तुम्ही अधिकाधिक स्वावलंबी व्हायला हवंय. पण त्यातही महत्त्वाचं म्हणजे निर्णय घेण्याबाबत तुम्ही स्वावलंबी व्हायला हवं. स्वत:चे निर्णय स्वत: घेणं यापासून त्यांची जबाबदारी स्वीकारणं इथपर्यंत विविध क्षमता कशा मिळवायच्या हे तुम्हाला या विभागातील विविध लेखांमधून उलगडत जाईल. पुढे वर्षभर या विषयाबद्दलची लेखमाला आपण आपल्या मासिक अंकातून प्रकाशित करणार आहोत. त्याचा तुम्हाला नक्कीच उपयोग होईल. (तेव्हा फक्त दिवाळी अंक घेतलेल्यांनी जरूर वार्षिक सभासद व्हावं !)

हे मासिक ज्या संस्थेतर्फे प्रकाशित केलं जातं, त्या आपल्या ज्ञान प्रबोधिनीला यंदा पन्नास वर्षे पूर्ण होत आहेत. शिक्षण, ग्रामविकसन, संशोधन, आरोग्य, नेतृत्व विकसन, राष्ट्रीय एकात्मता, स्त्रीशक्ती प्रबोधन अशा विविध क्षेत्रांमध्ये प्रबोधिनीचं काम विस्तारलं आहे. त्याबद्‌दल अधिक तपशील जाणून घेण्यासाठी या अंकातील लेखाची तुम्हाला मदत होईलच. शिवाय नोव्हेंबर–डिसेंबरमध्ये पुणे–निगडी–सोलापूर–मुंबई येथे भव्य प्रदर्शन मांडलं जाणार आहे, तेही तुम्ही आवर्जून पाहा. तपशिलासाठी छात्र प्रबोधनच्या कार्यालयात संपर्क करा.

ज्ञान प्रबोधिनीचं काम प्रामुख्याने ज्यांच्या विचारांवर आधारित आहे अशा चार द्रष्ट्या महापुरुषांपैकी एक आहेत स्वामी विवेकानंद ! त्यांची दीडशेवी जयंती याचवर्षी आहे. 'यापुढे आपले राष्ट्र, आपली मातृभूमी हेच आपल्या सर्वांचे दैवत असू दे', हे त्यांचे आवाहन आपण समजून घेऊया आणि त्याप्रमाणे आचरण करायचा प्रयत्न करूया. या दिवाळी अंकातली भेट तुम्हाला या विचारांची सतत आठवण देत राहील.

या दिवाळीत तुमच्या मनामध्ये आनंदाचे, प्रसन्नतेचे, समृद्धीचे, लक्ष लक्ष दिवे उजळावेत आणि त्याचा प्रकाश सर्वदूर पसरावा यासाठी भरभरून शुभेच्छा !

**सस्नेह तुमचा,**

**(महेन्द्र सेठिया)**

# दिवाळी विशेषांक २०१२

# छात्र प्रबोधन

वर्ष १३ । अंक २
सौर कार्तिक । शके १९३४

## निर्णयातील स्वावलंबन (१२९-१५५)

१३०. निर्णय घेण्याच्या वाटेवर... – वाच. वनिता पटवर्धन
१३४. निर्णय घेताना... – मनीषा मिरजकर
१३७. तूच ठरव (कविता) – आश्लेषा महाजन
१३८. माझे निर्णय : किती महत्त्वाचे? कोण घेते? – मनीषा मिरजकर
१४०. छापा का काटा – वाच. अनघा लवळेकर
१४३. छत्रपतींची अद्भुत निर्णयक्षमता – मोहन शेटे
१४९. निर्णयाचा क्षण... – हृषिकेश रानडे, उमेश झिरपे, मुक्ता पुणतांबेकर

इवली शल्ये रुपती खुपती
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात



## ललित

१८. शाल – रा. ग. जाधव
७९. पाखराचं चित्र काढताना (रसास्वाद) – जयश्री काटीकर
३९. बेबा भवानी अर्थात 'मी न्हायी त्यातली' – वाच. स्वर्णलता भिशीकर
९९. एक दिवस – रेणू पाचपोर
१०९. द बॉय इन द स्ट्राइप्ड पायजमाज् (चित्रपट रसास्वाद) – शैलजा देशमुख

## मुलांचे साहित्य

६७. बुद्धी दे देवा – कु. प्राची खैरे
६८. हिरवंगार मन – चि. सिद्धार्थ साने
७१. नकळता काही घडले – कु. वैष्णवी कुलकर्णी
७३. मधली सुट्टी – चि. निखिल भालेकर
७५. माझी आजी, माझी मैत्रीण – कु. अवंती उंडे

छात्र प्रबोधनची २० वर्षांची वाटचाल गुणवत्तापूर्ण ! वर्धिष्णू !!

**संपादक, प्रकाशक, मुद्रक**
महेन्द्र सेठिया
**संपादक मंडळ**
शैलजा देशमुख, नीलिमा करमरकर, वाच. कांचनगंगा गंधे, आश्लेषा महाजन
**कार्यकारी संपादक**
जयश्री काटीकर

दिवाळी अंक भेट
अंकाच्या शेवटी पाहा



**वर्गणी - वार्षिक** : ₹ १८०, **द्वैवार्षिक** : ₹ ३४०,
**त्रैवार्षिक** : ₹ ५००, **दशवार्षिक** : ₹ १५००
**या अंकाची किंमत** : ₹ ६०
**प्रकाशन दिनांक - ९ कार्तिक १९३४, ३१ ऑक्टोबर २०१२**
**नोंदणी क्र** (RNINO.) MAHMAR/2000/5636
**संपर्क पत्ता -** छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी,
५१० सदाशिव पेठ, पुणे 411 030.
दूरभाष क्र. : (०२०) २४२०७१७४/१७९
ई-मेल : chhatraprabodhan@jnanaprabodhini.org
संकेतस्थळ : www.chhatraprabodhan.org

५. राजेसाहेबांचे भूत – भारत सासणे
२९. आकर्षण – स्वैर अनुवाद –मीना वांगीकर
४७. मायाजाल – जयंत नारळीकर
६३. मॉंटुकले दिवस – संदेश कुलकर्णी


## ज्ञान-विज्ञान


१३. गमतीचा मार्गशोध – मंगला नारळीकर
५५. नकाशाच्या दुनियेतील जादूगार – वाच. राहुल मुंगीकर
८९. देवकण आणि सत्येंद्रनाथ बोस – विनोदिनी अळवणी




## कविता


१२. नळाला पाण्याची धार बघून... – दुर्गेश सोनार
३४. घर अमुचे – अरुण म्हात्रे
३५. माझ्या अंगणात गाणे – सुनील शिनखेडे,
व्रत – विनय अपसिंगकर
४५. चिंब भिजल्या रानात – सदानंद देशमुख
७६. पाखराचं चित्र काढताना – स्वैर अनुवाद – माधुरी पुरंदरे
८०. गुरुजी, माझ्यावर एक कविता लिवा ना – एकनाथ आव्हाड
८८. हवे काळीज संतजनांचे– संजीवनी बोकील


## संकीर्ण


१. संवाद – महेन्द्र सेठिया
२१. थोडीशी गंमत – वैजनाथ दुलंगे, पी. मधू
१६०. 'तुम्हीच संपादक व्हा !' स्पर्धा निवेदन
याशिवाय – १५, ८५, ८७, १२४ वर स्फुटके


## कृतिपर


१६. घडीचा सुबक पेनस्टॅंड – मधुकर पालकर
३७. नारळातील गणपती मंदिर – विजयानंद शेबेकर
६१. स्केचपेनचा पेनस्टॅंड – हेमा धोत्रे
९५. हातपंप – प्रा. उल्हास टुमणे
९६. छोटेखानी शिल्प – सुनंदा अभ्यंकर


## विशेष लेख


२३. स्वामी विवेकानंदांची भारत परिक्रमा – यशवंतराव लेले
१०४. गोष्ट माझ्या शाळेची, शाळेपलीकडल्या प्रबोधिनीची – तनुजा रहाणे, विक्रम वाळिंबे
१५८. छात्र प्रबोधन – २० वर्षांची वर्धिष्णू वाटचाल
१५९. माझ्या नजरेतून छात्र प्रबोधन



**चित्रकार**
पुंडलिक वझे,
सचिन जोशी,
गिरीश सहस्रबुद्धे,
निलेश जाधव,
राहुल देशपांडे,
गोपाळ नांदुरकर,
निखिल टकले,
ऋजुता घाटे,
ओंकार इनामदार.

**विद्यार्थी चित्रकार**
चि. चैतन्य मुद्गल,
चि. आदित्य घाटोळ,
कु. अनुष्का जोशी,
चि. अजिंक्य घाटोळ,
कु. ईशानी बर्वे.

**छात्र प्रबोधनचे अन्य ५ दिवाळी अंक**
**ग्रामीण, इंग्रजी, बोलका, युवोन्मेष, संगणकीय**

**मुखपृष्ठ**
संदेश जोशी
**मांडणी/सजावट**
संदेश जोशी
**शीर्षक लेखन**
प्रभाकर भोसले,
बाबू उडुपी
**मुद्रित शोधन साहाय्य**
उदय हर्षे

**अक्षर जुळणी**
माधवी दाते
**जाहिरात संकलन**
वेदा भागवत,
शुभांगी सोलापूरकर
**अंक वितरण**
रवींद्र भोसले

# ज्ञान प्रबोधिनी

**स्वामी विवेकानंदांच्या विचारांना मूर्तरूप देणारी अभिनव संस्था देशातील सुप्त मनुष्यशक्तीचा आत्मसन्मान वाढवणारी गतिशील संघटना प्रत्येकाच्या बुद्धिमत्तेला विकासाची, नेतृत्वाची व सामाजिक परिवर्तनाची प्रेरणा देणारी चळवळ**

## कार्यपद्धतीची वैशिष्ट्ये – समग्रता, सर्जनशीलता, सहविचार, स्वावलंबन

**स्वत:च्या शक्तीवर विश्वास, स्वत:च्या हेतूंची खात्री, स्वत:च्या स्वभावातील वैशिष्ट्यांची जाणीव आणि दीर्घकालीन ध्येयाचा पाठपुरावा यातून निर्माण होणारी 'स्वत:वरच अवलंबून राहण्याची क्षमता' वापरणे म्हणजे**

# स्वावलंबन !



शालेय विद्यार्थ्यांपासून विविध वयोगटातील कार्यकर्त्यांपर्यंत, कल्पना सुचण्यापासून निर्णय व कार्यवाहीपर्यंत व्यक्तिगत, सामूहिक व सार्वजनिक जीवनात अधिकाधिक प्रमाणात स्वावलंबी व्हावे असा ज्ञान प्रबोधिनीचा सततचा प्रयत्न असतो. त्याचे काही पैलू

- **अभ्यासातील स्वावलंबन –** विविध अभ्यासतंत्रे व कौशल्ये शिकून स्वत:चा अभ्यास स्वत: करण्यावर व प्रकल्पातून स्वयंशिक्षणावर भर.
- **उपक्रमांबाबत स्वावलंबन –** प्रबोधिनीच्या विविध केंद्रांवरील कार्यकर्त्यांनी स्थानिक गरजा व उपलब्ध साधनसामग्रीचा वापर करून, स्वत:च्या हिंमतीवर उपक्रम राबवावेत असा आग्रह.
- **निर्णयांबाबत स्वावलंबन –** प्रबोधिनीच्या विविध केंद्रांवरील सहविचार समित्या, गावोगावच्या पाणीसमित्या, बचतगट, इत्यादींनी स्थानिक निर्णय घ्यावेत यासाठी प्रोत्साहन.
- **आर्थिक स्वावलंबन –** प्रयोगशील राष्ट्रीय शिक्षण स्वत:च्या आर्थिक पायावर उभे असावे म्हणून प्रबोधिनीद्वारा १९६९ पासून विविध उद्योग-व्यवसायांची निर्मिती. सध्या याच हेतूने अनेक माजी विद्यार्थी कार्यरत.
  विक्री उपक्रम, प्रकाशन, प्रशिक्षण, सेवा-सुविधा पुरवणे, फळशेती यांद्वारा बहुतांश विभाग व केंद्रे आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी.
  केवळ शासकीय अनुदानांवर पूर्ण अवलंबून न राहता, जनता-जनार्दनाचा आर्थिक आधार हेही संस्थात्मक आर्थिक स्वावलंबन !
- **कार्यकर्त्यांबाबत स्वावलंबन –** स्वत:च्या किंवा आपल्या गटाच्या वाढत्या कामासाठी आणि कामाच्या वाढत्या गुणवत्तेसाठी स्वत: नवे सहकारी मिळवणे, त्यांचे प्रशिक्षण करणे. त्यांच्यावर जबाबदारी टाकणे आणि त्यांना गटाचे एकजीव घटक बनवणे ही प्रक्रिया सुरू होण्याबाबत आग्रह.

**'आयुष्यभर देशासाठी झटून काम करेन'**, या प्रेरणेबाबत इतरांचे प्रोत्साहन अथवा सामाजिक वाहवा यावर अवलंबून न राहता काम करीत राहणे हे कार्यकर्त्यांच्या **प्रेरणेचे स्वावलंबन !**

## संस्थात्मक व संघटनात्मक कामाची क्षेत्रे

**शिक्षण । संशोधन । ग्रामविकसन । आरोग्य । नेतृत्व विकसन । स्त्री शक्ती प्रबोधन । राष्ट्रीय एकात्मता**

मुख्य कार्यालय : ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०, ☎ ०२०-२४२०७००० www.jnanaprabodhini.org

कथा

# राजेसाहेबांचं भूत

भारत सासणे



## १ नवी मोहीम !

याच वर्षी मला 'ब्लॅकबेल्ट' मिळाला होता आणि श्यामनेसुद्धा संगणकाची एक परीक्षा नुकतीच दिली होती. माझी कराटेची प्रॅक्टिस नेहमीप्रमाणे सुरू असताना आणि तिकडे श्यामचा गणिताचा सराव सुरू असताना काहीतरी घडावं, डॉ. गरुडांबरोबर नवी मोहीम हाताशी यावी, असं आम्हाला वाटायला लागलं होतं आणि काय योगायोग आमच्या अपेक्षेप्रमाणे डॉ. गरुडांचा निरोप आला आणि आम्ही आनंदाने ओरडलोच.

***

**''ते चौघं' त्यांच्या डावीकडे म्हणजे आमच्या विरुद्ध दिशेला पाहू लागले. चेहरा भयचकित, डोळे विस्फारलेले, जणू त्यांचा विश्वासच नव्हता त्यांच्या डोळ्यांवर आणि समोरच्या दृश्यावर !!'' काय होतं पलीकडच्या बाजूला? डॉ. गरुड, राम, श्याम काहीशा विश्रांतीनंतर ताज्या दमाने, तल्लख बुद्धीने अधिक गहिरी रहस्ये उलगडायला येत आहेत. राम आणि श्याम या जोडगोळीचे साहस जाणून घ्यायला, त्यांच्याबरोबर भैरवगडची ही गूढ, रहस्यमय सफर करायला तुम्हाला निश्चित आवडेल, हो ना?**

## २. भैरवगड !

डॉ. गरुड दिवाणखान्यात अस्वस्थपणे चकरा मारत होते. मी आणि श्याम त्यांच्यासमोर मुकाट्याने बसून त्यांच्याकडे पाहत राहिलो होतो. डॉ. गरुड स्वत:शीच बोलत होते. नकारार्थी मान हलवीत होते, आणि हातवारे करीत होते. कसली तरी समस्या त्यांना

घट्ट बिजागऱ्या, करकरे दार ।
कोंदट मनाला, संशयाचा भार ।।

सतावत असणार. मग अचानक चालताना थांबून, आमच्याकडे रोखून पाहत डॉ. गरुड म्हणाले,

''मग यंग सोल्जर्स? या वेळेला तुम्हाला भुताशी सामना करायला आवडेल?''

माझ्या अंगावर काटा उभा राहिला. आम्ही दोघेही ताडकन उठून उभे राहिलो. आमच्यावर परिणामच तसा झाला होता. या वेळेस भूत? पण श्याम गणिती डोक्याचा आणि लॉजिकल विचार करणारा होता. तो म्हणाला,

''पण भुतं नसतात!''

डॉ. गरुडांनी त्याच्याकडे थोडं कौतुकानं व थोडं रागानं पाहिलं. ते म्हणाले,

''खरा वैज्ञानिक सर्व शक्यता तपासून पाहतो! कोणतीही शक्यता एकदम बाद ठरवीत नाही !''

पण श्यामला वाद घालायचा होता. तो पुढे सरकून म्हणाला,

''पण डॉक्टर अंकल! भुतं नसतात!''

मी श्यामला आवरलं आणि डॉ. गरुडांना विचारलं, ''पण आपल्याला जायचंय तरी कुठे?''

''आपल्याला भैरवगडावर जायचं आहे!''

''भैरवगड?''

''ही विचित्र हकिकत मी आधी तुम्हाला सांगतो! पुढे काय करायचं ते ठरवू!'' डॉ. गरुड.

***

### ३. विचित्र हकिकत!

''मध्यप्रदेशाच्या सीमेवर भैरवगड नावाचे आता खालसा झालेले संस्थान आहे. पण भैरवगडचा किल्ला अजूनही राजेसाहेबांच्या वारसांच्या ताब्यात आहे. तेथे राजेसाहेबांचे एक वारस महेंद्रप्रतापसिंह अजूनही राहतात. महेंद्रप्रतापसिंह सुरेंद्रप्रतापसिंहांचे चुलतभाऊ आहेत. सुरेंद्रप्रतापसिंह माझे मित्र! स्वत: सुरेंद्रप्रतापसिंह मात्र गडावर राहात नाहीत. गडावर पूर्वजांचा खूप जुना वाडा आहे, खूप दालने व खोल्या असलेला. काहीसा अंधारा व गूढ वाटणारा हा वाडा अजून उभा आहे. महेंद्रप्रतापसिंहाने आपल्या बंधूला–सुरेंद्रप्रतापसिंहाला तातडीचा निरोप पाठवून वाड्यावर बोलावून घेतलं.''

''का? का बोलावून घेतलं?''

''सांगतो ना!'' डॉक्टरसाहेब म्हणाले.

महेंद्रप्रतापसिंहाना एक विचित्र स्वप्न पडलं. त्यांच्या विचित्र स्वप्नात राजेसाहेब स्वत: आले होते. त्यांना काहीतरी सांगायचं होतं आणि चक्क प्रकट व्हायचं होतं! असंच स्वप्न दिवाणजींना पडलं, वाड्यातल्या स्वयंपाक्याला पडलं आणि कारभाऱ्याला पण पडलं. नंतर हे स्वप्न सर्वांना वारंवार पडत राहिलं. मग महेंद्रप्रतापसिंहाने आपल्या भावाला–सुरेंद्रप्रतापसिंहाला – माझ्या मित्राला तातडीने बोलावून घेतलं.

सुरेंद्रचा अशा गोष्टींवर विश्वास नव्हता! …पण महेंद्रचा आग्रह! मग त्याला जावं लागलं! तो गेला, पूर्वजांच्या वाड्यावर राहिला आणि मग त्याने 'ते' पाहिलं!''

''ते? का… काय पाहिलं त्यांनी?''

***

### ४. विचित्र हकिकत – पुढे चालू!

सुरेंद्रप्रतापसिंह आपल्या पूर्वजांच्या वाड्यावर जाऊन पोहोचले व राहू लागले. सगळ्यांनाच पडलेल्या विचित्र स्वप्नांचा अर्थ त्यांना कळेना. मात्र, आपले दिवंगत असलेले राजेसाहेब अचानकपणे प्रकट होऊ इच्छितात, सगळ्यांना दिसू इच्छितात यावर त्यांचा विश्वास बसेना. पण सगळेच त्यांना स्वप्नाबद्दल सांगू लागले.

सुरेंद्रप्रतापसिंहानी पटकन विश्वास ठेवला नाही. मात्र, राजेसाहेबांचं भूत जुन्या वाड्यात भटकत आहे, ही कल्पना त्यांना अतिशय अस्वस्थ करून गेली. नंतर, दिवाणजींनी 'माध्यम' बोलावण्याची कल्पना सांगितली.

''माध्यम म्हणजे काय?'' मी विचारलं.

पिशाच्चांना विशेष असं बोलता येत नाही! त्यामुळे एखाद्या संवेदनशील माणसाच्या

जागे व्हा, जागे व्हा, भ्रम करा दूर।
खोट्या खोट्या आभासांचा, नको वेडा सूर।।

माध्यमातून भुतं संपर्क साधतात आणि आपलं म्हणणं सांगतात!

माध्यम कुठून आणायचं हा प्रश्न आपोआपच सुटला. घराण्याचे पुरोहित व गडावरच्या पूर्वजांच्या दुर्गादेवीचे पुजारी गंगाधरपंत स्वत:च 'माध्यम' होते. यापूर्वी त्यांच्यामार्फत म्हणे काही पिशाच्चांनी आपला संदेश सांगितला होता. मग त्यांनाच बोलाविण्यात आलं. पूजा मांडली गेली. दिवे घालवून अंधार करून मेणबत्त्या लावून राजेसाहेबांना आवाहन केलं गेलं. आणि अचानक गंगाधरपंत बेशुद्ध झाले. त्यांच्या तोंडाला फेस आला आणि तुटक-तुटक शब्दांतून त्यांनी सांगितलं,

''अमावास्या... मध्यरात्र... दिवाणखान्याच्या वरच्या गॅलरीत!''

***

**५. राजेसाहेब!**

ठरल्याप्रमाणे सगळे जमले. सुरेंद्रप्रतापसिंह, महेंद्रप्रतापसिंह, दिवाणजी, गंगाधरपंत, स्वयंपाकी, माळी, गडावरचे इतर काही रहिवासी, सगळेच दिवाणखान्यात एकत्र जमले. सगळ्यांच्या मनावर विचित्र ताण होता. भीती पण होती. दिवाणखान्याच्या वर गॅलरीत भिंतीला दिवंगत राजेसाहेबांचं भव्य असं चित्र लावलेलं होतं. त्यावर नेहमी एक मोठा मोत्याचा हार लटकत असे. सगळे खालून वरच्या गॅलरीकडे मान उंचावून पाहत राहिले. अमावास्येची रात्र. काळाकुट्ट अंधार. मध्यरात्र. कंदिलाचा मंद प्रकाश. वेळ पुढे सरकते आहे. आणि मग अचानक सगळ्यांना राजेसाहेब दिसले. तशीच लाल रंगाची भव्य पगडी. तसाच लाल रंगाचा पांघरलेला शेला. वैशिष्ट्यपूर्ण मोठमोठ्या मिशा. त्यांच्या हातात बहुधा मेणबत्ती आहे. मेणबत्तीचा प्रकाश त्यांच्या चेहऱ्यावर पडलेला आहे. त्यामुळे ते भेसूर दिसताहेत. त्यांना काहीतरी सांगायचं आहे. ते हातवारे करताहेत आणि अचानक मेणबत्ती विझते. राजेसाहेब दिसेनासे होतात. भूत निघून गेलेलं असतं.

''माझ्या मित्राने - सुरेंद्रप्रतापने स्वत:च्या डोळ्यांनी ते पाहिलं!''

मी आणि श्याम, दोघेही सुन्न बसून राहिलो. आमच्यावर त्या हकिकतीचा मोठाच परिणाम झाला होता. चाचरत आम्ही विचारलं, ''मग?''

''मग काय? चलायचं भैरवगडावर! ...तुम्ही तयार आहात ना?''

''म्हणजे काय?'' आम्ही ओरडलो.

आमच्या नव्या साहसयात्रेची सुरुवात झाली होती; पण पुढे काय घडणार आहे याची आम्हाला कल्पना तरी होती काय?

***

**६. प्राचीन वाड्यावर!**

खडतर प्रवास करून आम्ही एकदाचे वाड्यावर पोहोचलो.

इतक्यात श्याम म्हणाला,

''वरच्या बाजूला खिडक्या आहेत! त्यातून कुणीतरी लक्ष ठेवून आहे! एकदम वर पाहू नकोस!''

आम्ही सामान काढलं आणि प्राचीन वाड्यात प्रवेश केला. आम्हाला आमच्या खोल्या दाखवण्यात आल्या. आम्हाला दिलेली खोली काही फार चांगली नव्हती. खूप मोठी होती आणि भिंतीवर एक मोठं जुनं वाघाचं मुंडकं लटकवून ठेवलं होतं, भीती दाखवणारं! सामान ठेऊन आम्ही वाडा पाहण्यासाठी लगेचच बाहेर पडलो. ठिकठिकाणी तलवार-ढाली, भाले इत्यादी जुनी शस्त्रं भिंतीवर लटकवलेली होती. आम्ही एक-एक खोली पाहात पुढे जात असताना कुणीतरी आपल्यावर लक्ष ठेवून आहे, असं मला उगाचच जाणवायला लागलं. आमच्या सांकेतिक भाषेत मी ते तसं श्यामला सांगितलं. श्याम म्हणाला की, त्याला ते आधीच जाणवलं आहे आणि नक्कीच कोणीतरी आपल्याकडे लपून पाहातं आहे. माझी

चिरेबंदी वाड्यामध्ये, निर्मनुष्य जाग।
थरकाप करणाऱ्या, गूढतेचा माग।।



छाती धडधडू लागली.

तेवढ्यात धिप्पाड दिसणारा वाड्याचा स्वयंपाकी आम्हाला दिसला. तो हसून म्हणाला,

''एकट्याने इकडेतिकडे जाऊ नका, हरवाल ! ...भुताचा वाडा आहे हा !''

श्यामने विचारलं,

''राजेसाहेबांचं भूत तुम्ही पाहिलं होतं का?''

त्यावर स्वयंपाकी दचकला. म्हणाला, ''त्याच्याबद्दल मोठ्याने बोलू नका !''

''ते काही बोलले का?''

''घोगऱ्या आवाजात काहीतरी ओरडले !''

इतकं बोलून स्वयंपाकी घाईघाईने निघून गेला. पुढच्या खोलीत दिवाणजी गडबडीने जाताना दिसले. मी कुजबुजत म्हटलं,

''मुख्य दिवाणखाना आणि जिथं राजेसाहेबांचं भूत दिसलं ती गॅलरी आपल्याला पाहावीच लागेल !''

''ऑफ कोर्स !'' श्यामने म्हटलं.

तेवढ्यात मग पडद्याआडून आमच्याकडे पाहणारा एक मुलगा आम्हाला अचानक दिसला. त्याचा पेहराव गरीब आणि गावठी असला तरी तो मुलगा मला आवडला. संकोचाने तो दूर राहून आमच्याकडे कुतूहलाने पाहत असावा. आमच्यावर लक्ष ठेवणाऱ्या रहस्याचा हा असा उलगडा झाला. श्यामने त्याला जवळ बोलावलं. पहिल्यांदा तो आला नाही. नंतर मात्र हसत हसत, थोड्या संकोचाने तो जवळ आला. माझ्या घड्याळाकडे, मोबाईलकडे आणि आमच्या

खोल खोल जाता जाता, दिसे मज तळ।
त्याला भिडताना, येई मज बळ।।

पेहरावाकडे पाहू लागला. श्यामने विचारलं,

"तुझं नाव काय?"

घोगऱ्या आवाजात मुलाने म्हटलं, "गोपाळ!"

"तू भूत बघितलंस?"

गोपाळने नकारात्मक मान हलवली. श्यामने परत विचारलं,

"म्हणजे तू नव्हतास तेव्हा तिथं?"

गोपाळने परत नकारार्थी मान हलवली. मला आणि श्यामला त्याला बरंच विचारायचं होतं. पण तेवढ्यात घाईघाईने दिवाणजी आले आणि त्यांनी त्या मुलाला तिथून जवळजवळ हाकलून दिलं. रागावून ते म्हणाले,

"कामधंदा सोडून इथं काय करतोस? पाहुण्यांना वाडा पाहू दे, विश्रांती घेऊ दे! जा रे, आपलं काम कर!"

इच्छा नसताना गोपाळ नाईलाजाने गेल्यासारखा कुठंतरी निघून गेला. आम्ही वाडा पाहात पाहात दिवाणजींबरोबर मुख्य दिवाणखान्यात आलो. त्यांनी नाट्यमय पद्धतीने वर बोट करून आम्हाला गॅलरी दाखवली. हलक्या आवाजात कुजबुजत ते म्हणाले,

"तिथे... तिथेच दिसले होते राजेसाहेब! मी इथेच उभा होतो! पण तुम्ही मुलं भिऊ नका! आपल्या खोलीत जाऊन आराम करा!"

आम्ही त्या गॅलरीकडे पाहात राहिलो. नंतर दिवाणजींकडे दुर्लक्ष करून श्यामने जिना चढायला सुरुवात केली. मी ही मागोमाग होतोच. दिवाणजी 'जाऊ नका' असं म्हणत राहिले. पण एव्हाना आम्ही वर पोहोचलो होतो. तेथे जमिनीवर लाल गालिचा होता आणि भिंतीला लागून राजेसाहेबांचं भव्य चित्र. त्यावर मोत्यांचा मोठा हार लटकत होता. भोवताली अंधार व्हायला लागला होता आणि काहीतरी चमत्कारिक भीतीची भावना जाणवायला लागली. दिवाणजी खालून आम्हाला खाली उतरण्याच्या सूचना हातवाऱ्यांनी देत असतानाच खोल विहिरीतून यावा तसा घोगरा आवाज ऐकू आला.

"जा... निघून जा इथून ...सोडा मला!"

मी आणि श्याम दचकलो, घाबरलो, आणि पटकन जिन्यावरून खाली आलो. दिवाणजी म्हणायला लागले,

"तरी मी तुम्हाला वर जाऊ नका म्हणून सांगत होतो!"

***

### ७. गंगाधरपंत!

घाईघाईने आम्ही परतलो. माझ्या अंगावर तर अजूनही काटा आला होता. छाती धडधडत होती. खोलातून येणारा तो आवाज कानात घुमत होता. माझा 'गणिती मित्र' श्याम मात्र विचारात पडला होता. आम्ही डॉ. गरुडांच्या खोलीकडे आलो तेव्हा मोठ्या मंडळींची बैठकच चालली होती. एक गृहस्थ रुद्राक्षमाळा व विभूतीमुळे आम्हाला पटकन ओळखू आले. दुर्गादेवीचे पुजारी आणि घराण्याचे पुरोहित गंगाधरपंत ते हेच. मी श्यामला चिमटा घेऊन म्हटलं,

"माध्यम माध्यम म्हणतात तो हाच का?"



२० वर्षांची वाटचाल

दात मजबूत राखण्यासाठी दातांची नियमित निगा राखा.
**प्रायोजक – डॉ. कीर्ती आपटे, पुणे**

श्यामने मला गप्प बसवलं, कारण सोबत दिवाणजी होते. दिवाणजीसुद्धा घाईघाईने पुढे होऊन सगळ्यांच्या सोबत बैठकीत बसले. आम्हीही जरा दूरच्या एका सोफ्यावर बसून चर्चा ऐकू लागलो. डॉ. गरुडांचे मित्र– सुरेंद्रप्रतापसिंह म्हणत होते,

''मी तुमच्यासारखा वैज्ञानिक नाही, पण बुद्धिवादी आहे! ...स्वत: पाहिलं नसतं तर मीसुद्धा विश्वास ठेवला नसता! पण आम्ही सर्वांनीच ते पाहिलं आहे!''

दिवाणजींनी थरथरत्या आवाजात नुकत्याच ऐकलेल्या आवाजाबद्दल सांगितलं आणि आमच्याकडे बोट दाखवलं. डॉ. गरुड आमच्याकडे साशंकतेने पाहात म्हणाले,

''तुम्ही खरंच भुताचा आवाज ऐकला?... एकदा 'ते' पाहायला मिळालं म्हणजे खात्री होईल!''

त्यावर गंगाधरपंतांनी घसा साफ केला. ते म्हणाले,

''भुताचं-पिशाच्चाचं दिसणं ही इतकी सोपी गोष्ट नसते! मृतात्म्याची स्वत:ची इच्छा असल्याशिवाय ते कधीच दिसत नाही! मात्र माझ्यासारख्याच्या मार्फत इतरांना मृतात्मा संदेश देऊ शकतो! त्यामुळे मला त्रास होतो, ते जाऊ द्या, पण असे संदेश माझ्यासारख्या माध्यमाच्या मार्फत सांगितले गेले आहेत!''

नंतर, अचानक गंगाधरपंत उंच आवाजात काहीतरी श्लोक म्हणू लागले आणि धाडकन खाली पडले. त्यांच्या तोंडातून भयंकर फेस येऊ लागला. ते हातपाय झाडू लागले. सगळ्यांची तारांबळ उडाली. सगळे गंगाधरपंतांच्या भोवती जमा झाले. आम्हीही धावलो. वाकून पाहू लागलो. गंगाधरपंत म्हणत होते,

''उद्या रात्री!... गॅलरीमध्ये आम्ही येणार आहोत! सर्वांनी पाहा...''

आमच्या अंगावर भीतीने सर्रकन काटाच उभा राहिला. म्हणजे मृत राजेसाहेबांनी संदेश दिला? उद्या भूत दिसणार?

***

**८. श्यामचं डोकं चालतं!**

रात्री आम्हाला झोप नीट आलीच नाही. कशी येईल? एक तर नवखा, जुना, रहस्यमय वाडा आणि वाड्यात भूत भटकत आहे अशी अफवा. त्यातून आम्ही ऐकलेलं, खोलातून आलेलं ते भुताचं ओरडणं... सिनेमात दाखवतात तसं, एक पांढरं भूत हात पसरून वाड्यात भटकतं आहे, असंही काहीतरी स्वप्नात दिसत राहिलं. मग पहाटे पहाटे मला झोप लागली.

उठलो, पाहिलं तर श्याम आधीच उठलेला आणि वाचत बसलेला.

मी ओळखलं की त्याचं 'गणिती डोकं' चालायला लागलं आहे, पण तो कुठेतरी अडला-अडखळला आहे. काहीतरी प्रश्न त्याला छळतोय. मी म्हटलं,

''काय झालं? ...काय प्रॉब्लेम आहे?'' त्याने काही टिपणं माझ्या समोर टाकली. एक पुस्तकही होतं.

''काय आहे?''

''वाच हे!''

''तूच सांग! ...काय आहे?'' मी 'कराटे'चा व्यायाम सुरू करीत त्याला विचारलं. श्यामने व्यवस्थित मांडी घातली. तो समजावून सांगू लागला. तो म्हणाला,

''मागच्या शतकातच हे माध्यमाचं-मिडियमचं प्रकरण युरोपात, ब्रिटनमध्ये आणि अमेरिकेतसुद्धा गाजलं होतं-''

''माध्यम?''

''हो! ...तिकडेही लोक माध्यमामार्फत आपल्या दिवंगत नातेवाईकांचे संदेश मिळवीत! ...खूप क्रेझ निर्माण झाली होती त्यावेळेस त्यांच्या समाजात! ...त्याचा इतिहास आहे या पुस्तकात!''

''मग? ...काय सापडलं तुला?''

''दोन बहिणी तर खूप फेमस होत्या त्या वेळेला! ...त्या माध्यमाचं काम करायच्या!

काळोखाच्या वाटेवर डोळ्यांनीच दिवा व्हावं।
उजेडाचं गाव सारं नजरेनंच पिऊन घ्यावं।।

...मंद प्रकाश, वातावरण निर्मिती इत्यादी केल्यानंतर मग मृतात्मे बोलायचे आणि तिथल्या वस्तूसुद्धा आपोआप हलायच्या!...त्या वेळचा समाज अगदी वेडा झाला होता त्या बहिणींमागे''

''मग?''

''त्या बेशुद्ध पडायच्या आणि त्यांच्याही तोंडाला फेस यायचा–''

''फेस!!''

मी अलर्ट झालो, जवळजवळ ओरडलोच.

''एक्झॅक्टली! ...फेस!''

''पण मग आपलं प्रकरण जुळतंय नां! ...दॅट प्रूव्हज् द थिअरी?''

''नॉनसेन्स! ...उलट या बहिणी म्हणजे सगळा फ्रॉड होता, हे नंतर उघड झालं! ...सगळा बनवाबनवीचा प्रकार! ...पुन्हा त्या बहिणींबद्दल कुणी काही ऐकलं नाही! ...त्यांचं बिंग फुटलं होतं!''

मी आश्चर्याने ऐकत राहिलो– तो मागच्या शतकातला परदेशातला इतिहास. श्यामने मग त्याची प्रसिद्ध नोंदवही मला दिली, ''वाच!''

मी नोंदी वाचायला सुरुवात केली. श्यामने सुवाच्य अक्षरात लिहिलं होतं –

१) गोपाळला आमच्याशी का बोलू दिलं नाही?
२) त्याने 'भूत पाहिलं नाही' असं का म्हटलं? त्या वेळेस तो कोठे होता?
३) त्याचा आवाज घोगरा आहे.
४) गालिचा कुंकवासारखा लाल आहे.
५) भुताला मेणबत्ती कशाला लागते?
६) राजेसाहेबांच्या वेळेस 'गॅलरी' हा इंग्रजी शब्द वापरला जायचा का?

मी त्या नोंदी वाचल्या आणि श्यामला म्हटलं, ''आता काय करायचं?''

''तू तयार हो पटकन! दुर्गादेवीचं मंदिर पाहून येऊ!''

पण मंदिर बंदच होतं. पहाराही होता त्यावर. दिवाणखान्यातही आम्हाला जाता आलं नाही. त्यावरही पहारा होता. आज तिथं राजेसाहेबांचं भूत येणार होतं ना! ...पूजेची तयारी पण चालू होती. हार, फुलं, कुंकू, हळद, सुपाऱ्या. श्यामने कुंकवाची एक मोठी पुडी हळूच उचलून खिशात घातलेली मी पाहिली. मी अर्थात, काही बोललो नाही! नंतर आम्ही डॉ. गरुडांच्या खोलीकडे गेलो, तर ते वाचत बसलेले. आम्हाला पाहून म्हणाले.

''माझा मूव्ही कॅमेरा खराब झाला आहे! बघा बरं जरा!''

आम्ही दोघांनी कॅमेरा घेतला आणि तपासला. श्याम म्हणाला, ''काल तर चालू होता! हा बहुधा कोणीतरी खराब केला आहे!''

मी श्यामकडे सूचकपणे पाहात राहिलो.

***

**९. भूत!**

संध्याकाळी आम्ही दिवाणखान्यात पोहोचलो. तिथं आतमध्ये अजूनही पहारा होता. पण पहारेकऱ्याशी मी काहीतरी गप्पा मारत त्याला गुंगवत राहिलो आणि त्याला मोबाईलमधल्या गमती दाखवीत राहिलो. तेवढ्यात, श्याम दोन मिनिटांसाठी कुठेतरी जाऊन आला आणि ते कोणाच्याच लक्षात आलं नाही.

मध्यभागी खुर्चीवर डॉ. गरुड बसले होते. त्यांचं लक्ष वर गॅलरीकडे होतं. त्यांच्या शेजारी सुरेंद्रप्रतापसिंह, महेंद्रप्रतापसिंह, दिवाणजी, कारभारी व आणखी कोण कोण बसले होते. समोर होमहवनाची तयारी होती आणि गंगाधरपंत सगळी तयारी मांडून पूजेला सुरुवात करीत होते. आम्ही थोडेसे मागे आणि जिन्याजवळ कोपऱ्यात खुर्च्यांवर बसून राहिलो. श्याम सर्वांवर लक्ष ठेवून होता आणि मी वर गॅलरीकडे पाहत होतो.

डॉ. गरुडांनी विचारलं,

''राजेसाहेबांचं स्पिरिट तिथेच वर दिसायला लागेल याची काय गॅरंटी आहे?''

त्यावर गंगाधरपंत म्हणाले, ''गॅरंटी काही नाही! ही मृतात्म्यांची इच्छा असते!

**(पान क्र. ११७ वर पुढे सुरू)**

२० वर्षांची वाटचाल

जागे व्हा, जागे व्हा, भ्रम करा दूर।
खोट्या खोट्या आभासांचा, नको वेडा सूर।।

# नळाला पाण्याची धार बघून...





नळाला पाण्याची धार बघून
काय आनंद झालाय मायमाउल्यांना...
पहिल्या पावसात भिजताना
जो होतो ना आनंद, तोच आनंद
आता त्यांच्याही डोळ्यांत...
माळ्यावरून काढावी जुनी छत्री
तशा त्यांनी काढल्यात कळशा, हंडे आणि घागरी...!

इतके दिवस टिपूसही नव्हता नळाला...
आणि डोळ्यांची धार थांबत नव्हती...
नळासमोरची रांग मोठी
काही केल्या हटत नव्हती...

''आता आलंय पाणी तर थोडं थोडं भरून घेऊ
साचलेली धुणीभांडी भराभर उरकून घेऊ...''
पदर खोचून बायाबापुड्या स्वत:शीच पुटपुटतात
पाण्यासाठी रातंदिन कुठे कुठे वणवणतात

बाया असं राहतात राबत
पोरंसोरं खेळत राहतात
हातात घेऊन कागदी नावा
खड्ड्यांमध्ये सोडत राहतात...

नळात नाही, ढगात नाही
कुठेच कसं पाणी नाही
पावशाही व्याकूळला
त्याच्या ओठी गाणी नाही...

कोरड्यास खाऊ कसं
कधी देशील दिलासा?
खोटा झाला पैसा आता
ये रे ये रे पावसा...!

**दुर्गेश सोनार**
सकाळभवन, प्लॉट क्र. ४२ बी,
सेक्टर ११, सीबीडी, बेलापूर, नवी मुंबई

**चित्रकार : राहुल देशपांडे**

पंखामधले बळ वाढावे, साथीला आभाळ ।
परी न विसरू, जिथून उडालो तो गवताचा माळ ।।

# गमतीचा मार्गशोध

मंगला नारळीकर




आकृती १

एक खरोखर घडलेली गोष्ट पाहूया. जर्मनीमध्ये क्योनिग्सबर्ग नावाच्या शहरात ती घडली होती. त्या गावात एक नदी असून, नदीमध्ये दोन बेटे आहेत. त्यांना जोडणारे एकूण सात पूल आहेत, ते आकृती १ मध्ये दाखवले आहेत.

सुटीच्या दिवशी लोक फिरायला जात. व्यायाम व मनोरंजन यासाठी हा महत्त्वाचा उद्योग असे. त्यावेळी कुणाला तरी सुचलं, की असा एखादा फिरण्याचा मार्ग शोधावा, ज्यात आपण प्रत्येक पूल एकदा व एकदाच ओलांडून जायचा. कुठल्याही दिशेने ओलांडला तरी चालेल. तसंच मार्गाची सुरुवात कुठूनही करावी, तो कुठेही संपवावा. अनेक लोकांनी आधी चालून व मग पाय दमल्यावर कागद-पेन्सिल घेऊन त्यावर चित्र काढून असा मार्ग शोधण्याचा प्रयत्न केला. तुम्ही देखील करून पाहा. पुन: पुन्हा गिरवून गोंधळ करण्याऐवजी आपण मार्ग अशा पद्धतीने लिहू-

1 4 6 3 2 7
A → C → B → D → A → C → D
पूल क्र. ५?

2 3 6 4 5
C → A → D → B → C → B →
B चे पूल संपले!

2 3 6 4 7
C → A → D → B → C → D →
D चे पूल संपले !

इथे नमुन्यासाठी तीन मार्ग दिले आहेत. एकूण चार ठिकाणी जमीन आहे, त्या जागांना आपण A,B,C,D ही नावे व पुलांना १ ते ७ असे क्रमांक दिले आहेत. त्यावरून आपण मार्ग चटकन समजेल असे थोडक्यात लिहू शकतो. दिलेली माहिती थोडक्यात, अचूक व चटकन ध्यानात येईल अशी लिहिणे, हे गणितात खूप महत्त्वाचे असते.

आपले दिलेले मार्ग, किंवा तुम्ही बनवलेले त्या

**२०१२ हे वर्ष गणित वर्ष म्हणून सर्वत्र साजरं केलं जात आहे. त्यानिमित्ताने हा विशेष लेख! विज्ञान तंत्रज्ञानाच्या सर्व क्षेत्रात कुठली न कुठली गणिताची शाखा वापरली जाते. त्यामागे गणितज्ञांनी मांडलेल्या तार्किक विचारधारा पायाभूत असतात. कुठलाही प्रश्न सोडवताना दिलेली माहिती थोडक्यात, अचूक व चटकन ध्यानात येईल अशी लिहिणे खूप महत्त्वाचे असते.**
**आज विकसित झालेल्या 'ग्राफ थिअरी' या गणिताच्या शाखेमागे ऑयलयर या गणितज्ञाने मांडलेली तार्किक विचारधार आहे. तिचा मूलभूत परिचय अगदी सोप्या आणि मनोरंजक पद्धतीने मंगला नारळीकर यांनी या लेखात करून दिला आहे.**

प्रकारचे कुठलेही मार्ग पाहिलेत, तर लक्षात येईल, की यातला कोणताही मार्ग आपले नियम पूर्ण करत नाही. कुठलातरी पूल राहतो किंवा दुसऱ्यांदा ओलांडावा लागतो. खूप प्रयत्न करूनही कुणाला हवा तसा मार्ग मिळेना. हा प्रश्न मग ऑयलर (Euler) नावाच्या प्रसिद्ध गणिततज्ञाकडे गेला. त्याने आकृती पाहून विचार केला व सांगितले की, ''या बाबतीत कुणालाच बरोबर मार्ग मिळणार नाही.''

मित्रांनो, एखाद्या प्रश्नाचे उत्तर आपल्याला येत नाही हे सहज सांगता येतं; पण ते कुणालाच येणार नाही हे सांगणे फार धारिष्ट्याचे आहे. ऑयलरने ते कसे सांगितले असेल? तर त्याने प्रश्न गणिती भाषेत मांडला आणि सिद्ध करून दाखवलं, की हा प्रश्न कुणालाच सोडवता येणार नाही. आपण ऑयलरची सिद्धता सोप्या भाषेत पाहूया.

१. कुठल्याही मार्गाची एक सुरुवात व एक अंत हे जमिनीचे दोन भाग असतात.
२. जमिनीचा एखादा भाग मार्गाच्या मध्ये येतो, त्यावेळी त्या भागावर जाण्यासाठी एक पूल व तेथून बाहेर जाताना एक पूल, असे दोन पूल ओलांडावे लागतात. हे नीट लक्षात ठेवा.
३. मार्गाच्या सुरुवातीचा व शेवटचा जमिनीचा भाग सोडल्यास इतर सगळे जमिनीचे भाग मार्गाच्या मध्येच येऊ शकतात, त्यामुळे त्यांतल्या प्रत्येकाला जोडणारे पूल हे सम संख्येत असतात व ते पूल आपण मार्गात ओलांडून जातो. जमिनीचा भाग एकदा मार्गात आल्यास दोन पूल, दोनदा आल्यास चार पूल तर तीनदा आल्यास त्याला जोडणारे सहा पूल ओलांडले जातील.
४. आता आकृतीतले चार जमिनीचे भाग पाहा A,B,C,D व प्रत्येकाला जोडणारे किती पूल आहेत ते मोजा. हे वरवरचं उत्तर झालं. आकृतीचा नीट अभ्यास केला तर असं दिसेल, नदीच्या प्रत्येक काठाला जोडणारे तीन पूल; तर एका बेटाला तीन पूल आणि एका बेटाला पाच पूल जोडतात.
५. जमिनीच्या चार भागांपैकी दोन फक्त मार्गाच्या मध्येच येऊ शकतात. एक सुरुवातीला व एक शेवटी येतो; शिवाय ते मध्येही येऊ शकतात.
६. कुठल्याही मार्गात सुरुवातीचा व शेवटचा भाग सोडला तर इतर भागांचे सम संख्येचे पूलच ओलांडले जाणार, म्हणून दिलेल्या आकृतीत सगळे पूल कुठल्याही मार्गात ओलांडले जाणार नाहीत. मग ही पुढची आकृती पाहा. ही सिद्धता पटते की नाही? पाहिजे तर पुन्हा एकदा आकृती बघून, त्यावर उलटसुलट चालून बघायला हरकत नाही.

आकृती क्र. १ मधील नदी, किनारा, पाणी या अनावश्यक गोष्टी काढल्या व जमिनींचे भाग बिंदूंमध्ये दाखवले, पूल रेषांनी दाखवले तर आकृती क्र. २ तयार होईल. म्हणजेच आकृती क्र. २ व पहिली पुलांची आकृती या गणित सोडवण्यासाठी सममूल्य किंवा 'equivalent' आहेत, हे ध्यानात घ्या. प्रत्येक जमिनीच्या भागाला पूल किती व कसे

शास्त्रज्ञांची शोधकवृत्ती, शोध लावण्या ईशनिर्मिती।
रात्रंदिन ते प्रयोग करिती, शास्त्रांमागुनी शास्त्रे येती।।




आकृती २



आकृती ३



आकृती ४

जोडले आहेत ते चटकन समजते आहे. गणिते सोडवताना अनेकदा प्रश्न असा सममूल्य व सोप्या भाषेत पाहणे महत्त्वाचे असते; त्यामुळे आवश्यक त्या महत्त्वाच्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करणे सोपे होते. आता पुढची आकृती क्र. ३ पाहा.

ही आकृती बहुतेकांनी कोड्याच्या रूपात पाहिलेली असते. पेन्सिल न उचलता व कुठलीही रेष न गिरवता काढायची असते. हा सुद्धा क्योनिग्सबर्गच्या पुलांच्या सारखाच प्रश्न आहे, हे लक्षात आलं का? म्हणून हे कोडं देखील कुणी सोडवू शकत नाही. (फसवाफसवी केल्याशिवाय) आता तुम्ही देखील अशी अनेक कोडी बनवू शकाल. काही सोडवता येणारी, तर काही न येणारी. उदाहरणार्थ आकृती क्र. ४ मध्ये दिलेल्या आकृत्या पेन्सिल न उचलता, रेष न गिरवता काढता येतील.

मित्रांनो, ऑयलरने दिलेली तार्किक विचारधारा ही **Graph Theory** या गणिताच्या शाखेची सुरुवात आहे. यात अनेक प्रश्न सोडवले जातात. वेगवेगळे नियम पाळून बनवलेले graph व तत्सम प्रश्न यात असतात. उदाहरणार्थ, अनेक विमानसेवा, त्यांची विविध ठिकाणी जाणारी उड्डाणे, अंतरे, वैमानिक व इतर कर्मचाऱ्यांचे कामाचे तास, दुसऱ्या प्रवासाची कनेक्शन्स, अशा अनेक गोष्टींचा विचार करत, इंधनाची बचत करत, वेळापत्रक बनवणे किती क्लिष्ट आहे ते सांगायला नको. इलेक्ट्रॉनिक उपकरणांची सर्किट्स बनवताना व तत्सम क्षेत्रातही ही शाखा वापरली जाते. खरं तर गणिताची कुठली ना कुठली शाखा वापरली जात नाही, असं क्षेत्र दिसत नाही. तेव्हा गणिताशी मैत्री कराच !

**– मंगला नारळीकर**
६ खगोल, पंचवटी, पाषाण, पुणे – ८

## डेकॅथलॉनमध्ये कोणते खेळ असतात?

खेळ जगत

डेकॅथलॉन म्हणजे दहा क्रीडा प्रकारांचा संच. दोन दिवसांत ही स्पर्धा खेळविली जाते. सर्व दहा प्रकारांत सर्वाधिक गुण मिळविणारा विजेता ठरतो. ही स्पर्धा प्रामुख्याने पुरुषांसाठी घेतली जात असे. महिलांसाठी हॅप्टॅथलॉनची (सात क्रीडाप्रकार) स्पर्धा असे. आता महिलांसाठीही डेकॅथलॉनची स्पर्धा घेतली जाते.

**पुरुष डेकॅथलॉनमधील खेळ : पहिला दिवस –** १) १०० मीटर धावणे २) लांब उडी ३) गोळा मेक ४) उंच उडी ५) ४०० मीटर धावणे, **दुसरा दिवस –** ६) ११० मीटर अडथळ्यांची शर्यत ७) थाळीमेक ८) पोल व्हॉल्ट ९) भालामेक १०) १५०० मीटर धावणे.

**महिला डेकॅथलल़ॉनमधील खेळ : दिवस पहिला** : १) १०० मीटर धावणे २) थाळी मेक ३) पोल व्हॉल्ट ४) भाला मेक ५) ४०० मीटर धावणे **दिवस दुसरा** : ६) १०० मीटर अडथळ्यांची शर्यत ७) लांब उडी ८) गोळा मेक ९) उंच उडी १०) १५०० मीटर धावणे

२० वर्षांची वाटचाल

हवे शोधायला काही, मन सतर्क हे राही।
क्षितिजापर्यंतची वाट मीही, मध्येच सोडणार नाही।।

# घडीचा सुबक 'पेन स्टँड'

कृतिपर

मधुकर पालकर



अभ्यासासाठी किंवा लिखाणासाठी काय लागतं बरं? बसण्याची जागा, पुस्तकं, नोंद करण्यासाठी लागणारे कागद, पुरेसा उजेड इतकेच! याशिवाय जर पेन, पेन्सिल, पट्टी, खोडरबर या गोष्टी व्यवस्थित ठेवण्यासाठीसुद्धा थोडीशी जागा मिळाली तर कामाचा, अभ्यासाचा उत्साह द्विगुणित होईल, बरोबर ना?

काच, रबर यांपासून बनविलेल्या डब्या, खोकी व स्टँड आपल्या पाहण्यात नेहमी येतात व त्या आपण सहजतेने वापरतो. परंतु तीच वस्तू आपण स्वत: हाताने कल्पकता वापरून केली तर त्याचे आकर्षण निराळे असते.

आज आपण घडीकामातून पेनस्टँड करायला शिकणार आहोत. याचा उपयोग तुम्ही पेन स्टँड, दिव्याची शेड किंवा आकाशकंदील म्हणूनसुद्धा करू शकाल. म्हटलं तर सोपं पण म्हटलं तर हे घडीकाम तुमची सहनशक्ती पाहाणारं आहे बरं !

सुरुवातीला २६ सेमी × २६ सेमी असा कागद घ्या. (तुम्हाला ज्या आकाराचा हा स्टँड हवा त्या प्रमाणात चौकोनाची मापं वेगवेगळी असू शकतात.) आता या कागदाला आपल्याला फक्त (आ. ४ प्रमाणे) घड्या घालून घड्यांचा जाळीदार कागद तयार करायचा आहे. हे घड्या घालण्याचं तंत्र तुम्हाला एकदा जमलं की पाच मिनिटांच्या आत तुमचा पेनस्टँड तयार!




आकृती १



आकृती २




आकृती ३

**कृती** – १. आकृतीत दाखवल्याप्रमाणे तुमच्या कागदावर २४ सेंमी. – २४ सेंमी. चौरस आखून घ्या. चिकटवण्यासाठी डावी उजवीकडे १ सेंमी. अंतर राहील. (आ. १)

२. या चौरसात ६–६ सेंमी वर खुणा करून तिथे उभ्या रेषा आखून घ्या. (आ. १)

३. खालच्या आडव्या रेषेपासून ३–३ सेमीच्या अंतरावर आडव्या रेषा आखून घ्या. आता या रेषा जोडल्यावर तुम्हाला ३२ छोटे आयत चौरसावर दिसतात. (आ. १)

४. आता प्रत्येक आयताच्या लांबी–रुंदीचा मध्य काढून घेऊन आयतात शंकरपाळीचा आकार

खूप शिकावे खूप शिकावे, रोजच काही नवे करावे।
नव्या नव्या कृतींमधून, कल्पकतेचे दर्शन व्हावे ।।

२० वर्षांची वाटचाल

तयार करून घ्या. (आ. २)

५.आता या शंकरपाळीच्या पोटातून आडवी रेघ आखून घ्या. (आ. ३)

६.आता आकृती ४ प्रमाणे तुमचा जाळीदार कागद तयार झाला असेल. आता घडीकाम करायला तयार ना?

७.कागदावरील तिरप्या रेषांवर डाव्या बाजूने आधी व नंतर उजव्या बाजूने सुरुवातीला पर्वताची घडी (Mountain Fold) घालून घ्या.

८.आता शंकरपाळीच्या मधल्या आडव्या रेषेवर दरीची घडी (Valley fold)घालून घ्या.

९. घड्या पक्क्या करण्यासाठी रिकाम्या रिफिलचे टोक त्यावर फिरवून त्या पक्क्या करा. उलट बाजूनंही परत अशाच घड्या घालून घ्या.

हुश्श ! आता घड्या घालण्यात तर आपण एकदम एक्स्पर्ट झालो आहोत. या घड्यांच्या आयताकृतीचा दंडगोलाकार केला की तुम्ही त्याचा उपयोग लॅम्पशेड किंवा आकाशकंदील म्हणूनही करू शकाल. पण एवढ्यावरच आपल्याला थांबायचे नाहीये हं ! आपल्याला खाली-वर होणारा, स्प्रिंगप्रमाणे असणारा पेनस्टँड बनवायचा आहे. त्यासाठी तयार ना?

तुमच्या घड्यांच्या कागदाचे निरीक्षण करा. एका पुढे एक सलग तुम्हाला ४ शंकरपाळे दिसतील. पहिली आणि चौथी शंकरपाळी एका पुढे एक येईल, रेषा L वरील बिंदू P व Q एकमेकांवर येतील.अशी कागदाची गुंडाळी करून ती चिकटवून घ्या. (१ सेंमीचा कागदाचा भाग आपण चिकवण्यासाठी ठेवलाच आहे. होना?)

आता या शंकरपाळ्या आपल्याला एकावर एक काळजीपूर्वक खाली बसवायच्या आहेत. आता प्रत्येक शंकरपाळीच्या मध्यबिंदूवर दरीची घडी घालायची आहे. (संदर्भ आकृती ३ व ५) त्याचवेळी शंकरपाळीची बाजू AB वर बाजू AD तर बाजू BC वर बाजू DC येईल अशा तऱ्हेने पर्वताची घडी घालायची आहे. वरपासून खालपर्यंत पर्वताची



आकृती ४


आकृती ५

आणि दरीची घडी घालून या घड्या काळजीपूर्वक दुमडून, दाबून घ्याव्यात. म्हणजे दंडगोल हलके हलके खाली बसत त्यांचा अष्टकोन होत जाईल. सर्व शंकरपाळ्यांच्या आकाराच्या घड्या खाली दाबून झाल्यावर वरचा हात काढून घेतला असता त्या वर येतील.

आता खाली जाड पुठ्ठ्याचा एक अष्टकोन लावून घ्या. वरच्या बाजूलाही अष्टकोन लावायचा असल्यास अष्टकोनाच्या आतला गोल कापून घ्या. आणि तो वर बसवा. झाला तुमचा पेनस्टँड तयार!

वेगवेगळ्या रंगाचा व नक्षी असलेला कागद घेऊन जर कृती केली तर मध्यम आकाराची फुलदाणी किंवा आकाशकंदीलही (खाली झिळमिळ्या लावून) बनवता येईल.


**- मधुकर पालकर**

पालकर चेंबर्स, १०२१-२२, सदाशिव पेठ, पुणे 411030

# शाल

राः ग. जाधव



आई गेल्यानंतर तिची जवळीक लाभावी म्हणून एक वस्तू मी जवळ ठेवली होती. ती होती पिरोजी रंगाची शाल. तो रंगही मला आवडत असे. रात्री झोपताना ती शाल मी उशीखाली ठेवत असे. पण ही गोष्ट लवकरच आमच्या सौं.च्या लक्षात आली. झाले, माझी उलटतपासणी करण्यात आली. मृत व्यक्तीचे काहीही अंगाखांद्याशी घेणे हे अशुभ असते, असा गृहमंत्र्यांचा दावा होता. मला पटला नाही, तरी ती शाल मात्र सौ. ने ताब्यात घेतली. पुढे तिचे काय झाले, हे मला कळलेच नाही. माझे मात्र काय शुभाशुभ व्हायचे ते मात्र होत राहिले.

एकदा मी. पु. ल. देशपांडे यांच्याकडे काही एक निमित्ताने गेलो होतो. काम झाल्यावर मी निघण्याच्या बेतात होतो; तेवढ्यात सुनीताबाईंनी मला थांबवले व विचारले,

''तुम्हाला शाल दिली तर चालेल काय?''

मी एका पायावर 'हो' म्हटले. पु. ल. व सुनीताबाई यांनी मला शाल द्यावी, हा मला मोठा गौरव वाटला. ती शाल मी माझ्या खोलीतल्या सूटकेसमध्ये ठेऊन दिली. वापरली मात्र कधीच नाही.

पुढे वाईला विश्वकोशाचा अध्यक्ष म्हणून मी गेलो. तिथे नदीकाठच्या प्राज्ञ पाठशाळेच्या खोलीत मी राहात असे. खोलीच्या दक्षिणेकडील खिडक्या कृष्णा नदीच्या चिंचोळ्या प्रवाहावर होत्या. थंडीच्या दिवसात बहुधा एक कातकरी बाई; माझ्या खिडकीखालील घाटाच्या छोट्या तटावर तिचे छोटे मूल एका टोपलीत ठेवून; मासे पकडण्याच्या उद्योगात होती. तिचे बाळ कडाक्याच्या थंडीने कुडकुडत रडत होते; पण आई तिकडे बघतही नव्हती. मला मात्र राहवले नाही. मी सूटकेसमधील 'पुलकित'शाल काढली, पाचपन्नास रुपयांच्या नोटा काढल्या व त्या कोळणीला हाक मारून खिडकीतून हे सर्व खाली टाकले. म्हटले,

''त्या बाळाला आधी शालीत गुंडाळ आणि मग मासे मारीत बैस.'' या घटनेची ऊब पुलकित शालीच्या उबेपेक्षा अधिक होती.

कविवर्य नारायण सुर्वे खूप सभा संमेलने गाजवीत. पुढे ते साहित्य संमेलनाचे अध्यक्षही झाले. परिणामत: त्यांच्या कार्यक्रमांना अहोरात्र भरतीच असे. प्रत्येक कार्यक्रमात सन्मानाची शाल व श्रीफळ त्यांना मिळत राही. एकदा ते मला म्हणाले,

''या शाली घेऊन घेऊन मी आता 'शालीन' बनू लागलो आहे.''

त्यांच्या बोलण्यातील उपरोधिक खोच माझ्याच नव्हेतर कोणाच्याही सहजपणे लक्षात येणारी होती. शाल व शालीनता यांचा संबंध काय? खरे तर, खरीखुरी शालीनता शालीविनाच शोभते! सुर्वे मुळातच शालीन. शालींच्या वर्षावाखाली त्यांची

**आईच्या शालीपासून सुरू झालेल्या शाली-संदर्भातल्या हृद्य आठवणी...**

असा काय तुज परिस मिळाला, ज्याने केलेस लोखंडाचे सोने।
काहीही नसता हातात, कसे पडू दिले नाहीस उणे ।।

शालीनता कधी हरवली नाही, कधी क्षीणही झाली नाही.

मी कविवर्यांना म्हटले, ‘‘शालीमुळे शालीनता येत असेल तर मी कर्जबाजारी होईन, भिकेला लागेन; पण शेकडो शाली खरेदी करून सर्व पुढाऱ्यांना, नगरसेवकांना, आमदार-खासदारांना, सरकारी बाबूलोक, अधिकारी या सर्वांना एकेक शाल लगेचच नेऊन देईन. अगदी कचेरीतल्या शिपायालादेखील वगळणार नाही.’’ यावर तो शालीन कवी मनापासून हसला.



शालीमुळे शालीनता येते की जाते? - या सनातन प्रश्नाचे माझे उत्तर ‘जाते’ असेच आहे. सन्मान करण्याच्या रूपाने आपण खरे तर एक शालीन जग गमावून बसण्याचा धोकाच मोठा आहे.

मी २००४ साली मराठी साहित्य संमेलनाचा बिनविरोध अध्यक्ष झालो. तत्कालीन एक-दोन वर्षांत माझ्यावर शालींचा वर्षाव झाला. एवढ्या शाली जमत गेल्या की, माझ्या आठ बाय सहाच्या खोलीत त्यांना ठेवणेच शक्य नव्हते. मग मी सगळ्या शालींचे गाठोडे बांधून ते निकटवर्ती मित्राकडे ठेवले व त्या शाली वापरण्याचे वगैरे त्याला सर्वाधिकार दिले. बिचारा अतिप्रामाणिक! त्याच्याही छोट्या खोलीत त्याने ते सांभाळले.

हळूहळू मी सगळ्या शाली वाटून टाकल्या. गरीब श्रमिकांना!

याच सुमारास मी शनिवार पेठेतील ओंकारेश्वर मंदिराला बहुधा रोज संध्याकाळी जात असे. तेथील कट्ट्यावर बसणे मला आवडे. एक दिवस काय घडले की, कडक थंडीच्या दिवसात एक म्हातारा, अशक्त भिक्षेकरी कट्ट्याला लागूनच चिरगुटे टाकून व पांघरून कुडकुडत बसल्याचे मी पाहिले.

दुसऱ्या दिवशी मी दोन शाली घेऊन ओंकारेश्वराच्या अड्ड्यावर आलो. तो म्हातारा होताच. त्याला दोन्ही शाली दिल्या. त्याने थरथरत्या हातांनी मला नमस्कार केला.

पुढे चार पाच दिवस मला काही कामांमुळे संध्याकाळी ओंकारेश्वराला जाण्यास उसंत लाभली नाही. त्यानंतर मी नेहमीप्रमाणे ये-जा करीत राहिलो. मग एकदम त्या भिक्षेकरी वृद्धाची आठवण आली. तो नेहमीच्या ठिकाणी नव्हताच. तेथील पुलावर चक्कर मारावी म्हणून मी उठलो व पुलावरून चालू लागलो. पुलाच्या जवळपास मध्यावर तो भिक्षेकरी म्हातारा दिसला. मी लगबगीने त्याच्याकडे गेलो. पाहतो तो काय, तीच चिरगुटे आणि अंगाखाली व अंगावर, तेच कुडकुडणे, तेच दीनवाणे जिणे!

मी म्हटले, ‘‘बाबा, तुम्ही मला ओळखले?’’

त्याने नकारार्थी मान हलवली.



मज छळते आणिक करते, व्याकूळ केव्हा।
ही माजघरातील मंद दिव्याची वात।।



मग मीच म्हटले, ''बाबा, पाच-सहा दिवसांपूर्वी मी तुम्हाला दोन शाली दिल्या होत्या. आठवते?''

यावर म्हातारा खुलला व पुन्हा हात जोडून म्हणाला, ''हे देवमाणसा, तू लई मोठा! म्यास्नी शाली दिल्या ! पण बाबा, म्या भिकाऱ्याला शाली कशा शोभतील? त्या शोभेपेक्षा पोटाची आग लई वाईट! मी शाली इकल्या व दोन-तीन दिवस पोटभर जेवून घेतलं बाबा! आमचं कसलं कुत्र्यावाणी जिणं! तुझं लई उपकार हायेत बाबा.''

शालीची शोभा व ऊब आणि पोटाची आग आणि अन्नाची ऊब!

त्या म्हाताऱ्याच्या बोलण्याने मला धक्काही बसला व मी चकितही झालो. मनुष्यजीवन, समाज, दु:ख, दारिद्र्य यातले काही म्हणून काहीही आपल्याला आजवर समजले नाही आणि या अडाणीपणात वयाची सत्तर वर्षे व्यर्थ गेली...

भुकेल्यास अन्न द्यावे, तहानेल्यास पाणी द्यावे आणि हेही जमले नाही, तर अभाग्यांना सन्मानाच्या शाली तरी द्याव्यात!

माझ्या आईची पिरोजी रंगाची शाल नेमकी कुणाची होती? एखाद्या सुनीताबाईंची, एखाद्या नारायण सुर्व्यांची, एखाद्या उपाशी भिक्षेकऱ्याची की...?

**- रा. ग. जाधव**
'अमेय', २१२, शनिवार पेठ,
पुणे 411030
**चित्रकार : गोपाळ नांदुरकर**

डोळ्यांमध्ये जमते पाणी, कशासाठी कळत नाही।
हळव्या दुखऱ्या मनाला, कुठेच वाट मिळत नाही।।

# थोडीशी गंमत



व्यंगचित्रकार :
वैजनाथ दुलंगे,
पी. मधू

नवी उमेद, नवी आकांक्षा नित्य मनात फुलावी ।
दीपावलीच्या दिव्यासंगे समृद्धीची माळ झुलावी ।।

## ज्ञान प्रबोधिनीची कुमारांसाठी उपयुक्त पुस्तके

**समृद्ध आशय, तज्ज्ञ लेखक, आकर्षक छपाई, माफक किंमत!**

**✻ कथासंग्रह**

| | |
|---|---|
| दरवळ | ४०/- |
| मृद्‌गंध, मोहोर (प्रत्येकी) | ६०/- |
| बहर | ५०/- |
| कहाणी दोन भावांची | ३०/- |
| मृदुभाव जागे होता... | ३०/- |
| प्रेरक कथा | ३०/- |

**✻ ललित लेखसंग्रह**

| | |
|---|---|
| अलगुज | ५०/- |
| केवड्याचं पान | ५०/- |
| बकुळफुलं | ६०/- |

**✻ नामवंत कवींच्या काव्याविषयी रसग्रहणात्मक लेखांचा संग्रह**

| | |
|---|---|
| गंध मोहवी काव्याचा – भाग १ व भाग २ प्रत्येकी | ७०/- |

**✻ कृतिपर पुस्तक**

| | |
|---|---|
| त्रिमितीची किमया | ७५/- |
| असे घटते सुंदर अक्षर | १५/- |

**✻ विचार व कृतिप्रवर्तक लेखसंग्रह**

| | |
|---|---|
| स्वीकारशील स्वदेशी | ५०/- |
| हट्टी व्हा, हट्टी ! | ५०/- |
| हरित संदेश | १५/- |

**✻ भावभावनांशी निगडित लेखसंग्रह**

| | |
|---|---|
| तरंग मनाचे | ५०/- |
| जिद्दीची लोभस रूपं | ६०/- |

**✻ व्यक्तिविकासाशी निगडित पुस्तके**

| | |
|---|---|
| प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास | ५०/- |
| व्यक्तिविकासासाठी विद्याव्रत | ७०/- |
| कल्पक बनू या | ८०/- |
| गीता-गीताई | १०/- |

**✻ अनुभवपर, प्रेरणादायी पुस्तके**

| | |
|---|---|
| आयुष्यातील वादळलाटा | ७०/- |
| कथा इस्रोची | ६०/- |
| आम्ही असे घडलो | ८०/- |
| हरिसिंह नलुआ | ६०/- |

**✻ कवितासंग्रह**

| | |
|---|---|
| अक्षरबोली | ३०/- |
| कवितेच्या गावा | ३०/- |
| शब्दांची रत्ने | ६०/- |

**✻ माहितीपर पुस्तके**

| | |
|---|---|
| गिर्यारोहणगाथा | ४०/- |
| छंद आकाशदर्शनाचा | ८०/- |
| आपला पाऊस | ३०/- |

**✻ NTS परीक्षेच्या मानसिक क्षमता कसोट्यांसाठी**

| | |
|---|---|
| प्रज्ञाबोध - भाग ४ | ६०/- |
| प्रज्ञाबोध - भाग ५ | ७०/- |

**OUR ENGLISH EDITIONS**

| | |
|---|---|
| ✻ Enhancement of Intelligence through play | 150/- |
| ✻ Glory of Intelligence | 30/- |
| ✻ 3D Magic | 80/- |
| ✻ Be Creative | 100/- |
| ✻ Green Messages | 20/- |

**छात्र प्रबोधन DVD १२ वर्षांमधील १४४ अंक/७५०० पाने, फक्त १२५ रु.**

वितरण
छात्र प्रबोधन, पुणे - ३०



एक विचार घ्या.
सारे जीवन त्याने भारून टाका.
त्याचेच चिंतन करा; त्याची स्वप्ने पाहा,
रात्रंदिवस त्याचाच ध्यास राहू द्या.
हाच विजयपथ आहे.

– स्वामी विवेकानंद
(दीडशेवी जयंती वर्ष)

**।। शुभ दीपावली ।।**

**विद्यानंद शंकर देवधर**

१७६४, ए-वॉर्ड, ब्रह्मेश्वर पार्क, साकोली, कोल्हापूर- ४१६ ०१२
दूरभाष : ०२३१-२६२५०५०


जलतीर्थे- 'कोयना' धरण (शिवसागर)- कोयनानगर, सातारा.
(महाराष्ट्रातील सर्वात मोठे धरण) बांधणी- १९६२, उंची- १०३.२ मी.

# स्वामी विवेकानंदांची भारत परिक्रमा

प्रा. यशवंत लेले

**'मातृभूमि हे दैवत येथे स्थापियले पूजिले' ही भारतभूमीची पूर्वापार चालत आलेली परंपरा आहे. या दैवताची परिक्रमा करण्यात भारतीयांना आनंद वाटतो. धन्यता वाटते. देशस्थिती जाणून घेण्यासाठी आद्य शंकराचार्य, संत नामदेव, समर्थ रामदास इ. थोर पुरुषांनी तीर्थयात्रा केल्या होत्या. स्वामी विवेकानंदांनीही देशस्थिती जाणून घेण्यासाठी, अभ्यास वाढवण्यासाठी अशी परिक्रमा केली; याची ही थोडक्यात ओळख.**



बंगालमध्ये इंग्रजी राजवटीत शिकून पदवीधर झालेल्या लोकांची संख्या पुष्कळ होती. काही सुशिक्षितांना विज्ञान-तंत्रज्ञानाचे अध्ययन केल्याने शास्त्रीय दृष्टी प्राप्त झाली होती. त्यांपैकी नरेंद्र विश्वनाथ दत्त हा एक बुद्धिमान युवक. प्रा. हस्टी यांच्यासारख्या प्राध्यापकाकडून स्वामी विवेकानंदांना तत्त्वज्ञानाचे धडे मिळाले. त्यांच्याच सांगण्यावरून ते रामकृष्णांनाही भेटले. श्री. रामकृष्णांनी नरेंद्राच्या अनेक शंकांचे निरसन केले. त्याला मूर्तिपूजेचे महत्त्वही ध्यानी आणून दिले. जवळजवळ निरक्षर अशा या गुरुदेवांनी पाश्चात्य विद्याविभूषित नरेंद्रास अध्यात्माची अनुभूती दिली. डोंगरदऱ्यांत ध्यानधारणा करत बसण्यापासून त्याला परावृत्त केले व 'जनता हाच जनार्दन' मानून त्याची पूजा म्हणजेच लोकसेवा करण्यास सांगितले ! नरेंद्राचे मन ध्यानधारणेकडे आणि साक्षात्काराकडेही ओढ घेत होते. त्यामुळे नरेंद्र आणि त्यांच्या गुरुबंधूंनी रीतसर विरजा होम करून सशास्त्र संन्यास घेतला. शिवाय लोकसेवा करण्यासाठी प्रथम लोकजीवनाचे दर्शन घ्यायला हवे होते. समाजात जाऊन लोक जागरणाचे काम करावयाचे तर त्यासाठी बडानगरमध्ये राहून, आपापसांत साधनेसंबंधी चर्चा करून, शास्त्रचर्चा करत राहून काय साधणार? म्हणून १८८८ मध्ये स्वामी विवेकानंद कोलकत्याच्या बाहेर पडले.

ते प्रथम **काशीस** गेले. तिथे साधू-सज्जनांना भेटणे, साधना करणे, तीर्थक्षेत्र पाहणे झाले. त्यावेळी पंडित प्रमदादासांशी ओळख झाली. त्या संस्कृत पंडिताने स्वामीजींच्या शंकांचे निरसन केले. प्रमदादासांचा स्नेह स्वामीजींनी संपादन केला व नंतरच्या प्रवासातही पत्राद्वारे आपल्या शंकांचे निरसन करून घेण्याचा स्वामीजींचा प्रयत्न चालू राहिला.

नंतर **हरिद्वारला** जात असताना वाटेत १८८९ मध्ये स्वामीजी एकाकी प्रवास करून **हाथरस** या छोट्या

'कुणा व्यक्तीसाठी कार्य करू नका, विचारांसाठी कार्य करा'
– स्वामी विवेकानंद.

लोहमार्ग स्थानकावर उतरले. एका बाकड्यावर बसले. भोवताली अंधार वाढत होता. पोटात भुकेची आग पेटली होती. कुठे जायचे ते माहीत नव्हते. इतक्यात कंदील हाती घेऊन शरच्चंद्र गुप्ता हे स्थानकाधिकारी स्वामीजींच्या समोर उभे राहिले. ''आपण कोण? कोठून आलात? थकलेले दिसता,'' त्यांनी चौकशी केली. स्वामीजींना आग्रह करून ते घरी घेऊन गेले. पुढचे काही दिवस स्वामीजी त्यांच्याकडेच राहिले. या तेजस्वी पुरुषाकडून आपले कल्याण होईल, अशा श्रद्धेने शरच्चंद्रांनी त्यांचा उपदेश मिळावा, असा प्रयत्न चालवला होता. स्वामीजी त्याला म्हणाले, ''आपल्या कामाची सुरुवात म्हणून प्रथम वैराग्य अंगी बाणवायला हवे. जा झोळी घेऊन भिक्षा मागून आण.'' स्वामीजींनी त्यांना स्थानकावरील हमाली करणाऱ्यांच्या घरून भिक्षा आणण्यास सांगितले आणि आलेल्या अन्नात दोघे वाटेकरी झाले! स्थानकप्रमुख सामान्य हमालांकडून भिक्षा घेऊन आला ही गोष्ट सामान्य नव्हती; त्यामुळे स्वामीजींनी त्याला दीक्षा दिली. नाव ठेवले सदानंद! स्वामींजींना हा पहिला शिष्य मिळाला!

नोकरीचे त्यागपत्र देऊन 'सदानंद' स्वामींजींच्या पाठोपाठ निघाला. तो स्वामीजींच्या परीक्षेत उत्तीर्ण झाला होता. दोघेही **हृषीकेश** येथे जाऊन कठोर साधना करू लागले. सवय नसल्याने 'सदानंद' आजारी पडला. मग स्वामीजींनी प्रथम आपल्या या शिष्याची सेवा केली, त्याला घेऊन ते कोलकत्यात आले. त्यानंतर बडानगरमधील मुक्कामात वेद-उपनिषदादी ग्रंथांचे अध्ययन, रुढी-लोकाचार यांचा अर्थ लावणे, त्यांचा अभ्यास - विचार - संशोधन करणे चालू होते. त्यानंतर अधिक सखोल अभ्यासासाठी सदानंदाची बडानगरात व्यवस्था लावून पुन्हा स्वामीजींनी भ्रमंती सुरू केली.

**गाझीपूरला** पव्हारी बाबा हे ज्येष्ठ साधू नदीकाठी एका गुहेत राहात होते. त्यांना स्वामीजी भेटले. स्वामीजींना पुन्हा निर्विकल्प समाधीचा ध्यास लागला होता. त्यासाठी पव्हारी बाबांना गुरू करण्याचा विचारही ते करत होते. त्या काळात कठोर साधना करीत असताना दोन स्वतंत्र विचारांचे धागे त्यांच्या मनात होते. आपल्या मातृभूमीची सेवा करावी, हिंदू धर्माचे स्वरूप उज्ज्वल करावे, हा एक विचार; तर कठोर तपश्चर्या करून निर्विकल्प समाधीचा अनुभव मिळवत परमेश्वराशी संपूर्ण एकरूप व्हावे हा दुसरा विचार ! परंतु 'तुला प्रथम खूप मोठे काम करायचे आहे. मग आपोआपच तू समाधिस्थितीत जाशील,' असे रामकृष्णांनी स्वप्नात येऊन त्यांना सांगितले. समाधिप्राप्तीसाठी पव्हारी बाबांचा शिष्य होण्यापासून त्यांनी स्वामींजीना परावृत्त केले.

या सुमारास आपल्या बहिणीने आत्महत्या केल्याचे दु:खद वृत्त स्वामीजींना समजले. पण नुसता शोक करून न थांबता भारतीय स्त्रियांच्या दुरवस्थेने चिंतित झालेले स्वामीजी स्त्रियांच्या उन्नतीचा विचार गंभीरपणे करू लागले. त्यांच्या गुरुबंधूंचे आजारपण, कौटुंबिक समस्या, प्रकृतीच्या तक्रारी इ. कारणाने स्वामीजींचे कोलकत्यास वारंवार जाणे चालू होते. या मायाजालातून बाहेर पडलेच पाहिजे हा विचार स्वामीजींच्या मनी दृढ होऊ लागला. मग आपल्या तीन गुरुबंधूंसमवेत ते अल्मोरा, कर्णप्रयाग, रुद्रप्रयाग, दंडी असा प्रवास करत **श्रीनगरला** गेले. तुरीयानंद योगायोगाने तेथेच होते. मग हे गुरुबंधू जवळजवळ महिनाभर तेथे माधुकरीवर उदरनिर्वाह करत राहिले. स्वामीजींनी त्यांच्या समवेत उपनिषदांचा अभ्यास चालू ठेवला.

नुकताच ख्रिश्चन झालेला एक शिक्षक स्वामीजींना भेटला. स्वामीजींनी त्याला हिंदू धर्माची महती पटवून दिली व परिणामी तो पुन्हा हिंदू झाला. स्वामीजींचे शिष्यत्व त्याने पत्करले. टेहरीत आजारी पडलेल्या अखंडानंदांना **मीरत** येथे डॉ. त्रैलोक्यनाथांकडे ठेवून बाकी गुरुबंधू **हृषीकेश** येथे गेले. खडतर साधना करण्याच्या विचारात असलेले स्वामी स्वत:च तेथे आजारी पडले.

प्रबोधनाचे तुम्ही प्रवर्तक, हिंदुत्वाचे अहो उपासक ।
नवधर्माचे तुम्ही प्रचोदक, मानव्याचे जणु पथदर्शक।।

आसपास डॉक्टर नसल्याने स्वामीजींच्या आजारपणाने गुरुबंधू चिंतित झाले. कोणी एक वैदू योगायोगाने आला. त्याच्या गावठी जडीबुटीने स्वामींना बरे वाटले. मीरत येथील मुक्कामात बडानगरातील वातावरणाची अनुभूती सारे पुन्हा एकदा घेऊ लागले. कालिदासांचा अभ्यास येथे सर्वांनी स्वामीजींच्या मार्गदर्शनाखाली केला. विष्णुपुराणाचे वाचनही पूर्ण केले. विशेष हे की, अखंडानंदांच्या जिज्ञासेमुळे स्वामीजी वाचनाचे जे तंत्र वापरत असत; ते त्यांनी सर्वांना समजावून सांगितले. येथून निघताना मात्र स्वामीजींनी एकट्याने पुढे जाण्याचा निर्धार केला. अखंडानंदांची बरोबर येण्याची खूप इच्छा असूनही त्यांना नकार देऊन स्वामीजी एकटेच **दिल्लीस** गेले. दिल्ली पाहताना या प्राचीन राजधानीची इतिहासगाथा त्यांच्या मनात जागृत होत होती. अशा मन:स्थितीत स्वामीजींनी **राजपुतान्याकडे** प्रयाण केले.

१८९१ च्या फेब्रुवारीत स्वामी **अलवारला** आले. तेथे ते तेथील मान्यवरांशी चर्चा करत. तेथील एक मौलवी स्वामीजींशी कुराणावर चर्चा करायला येत. कुराणाबद्दलचे स्वामीजींचे ज्ञान पाहून त्या मौलवींना आनंद झाला. मग त्या मौलवींसह आणखी लोक यायला लागले. गर्दी बघून प्रवचने करावी लागली. अलवार संस्थानचे शंभूनाथ हे प्रसिद्ध पंडित होते. त्यांच्या निमंत्रणावरून स्वामीजी त्यांच्याकडे वास्तव्यास गेले. तेथे स्वामीजींना भेटण्यासाठी अनेक लोक येऊ लागले. त्यांच्यासाठी धर्मविषयक अनेक विषयांवर स्वामीजी अतिशय रसाळ प्रवचने करीत. या दरम्यान स्वामीजींची कीर्ती ऐकून संस्थानच्या दिवाणांनी – मेजर रामचंद्रांनी, त्यांना आपल्याकडे नेले. दिवाणजी स्वामीजींना मंगलसिंग महाराजांकडे घेऊन गेले. ते स्वामींना म्हणाले, ''तुम्ही चांगले शिकले, सवरलेले दिसता. मग कामधाम करून उपजीविका का नाही चालवत?'' स्वामीजींनी महाराजांना प्रतिप्रश्न केला. ''आपण या संस्थानचे राजे. प्रजेकडे लक्ष देण्याऐवजी आपण लवाजमा



घेऊन शिकारीत का वेळ दवडता?''

महाराज म्हणाले, ''मला ते आवडते,''

''मग मला हे संन्यस्त जीवन आवडते'' स्वामी उत्तरले. महाराज निरुत्तर झाले.

महाराजांना मूर्तिपूजा मान्य नव्हती. दरबारात मूर्तिपूजेमागचे तत्त्व स्वामीजींना विचारले असता स्वामीजी म्हणाले,

''दिवाणजी! हे मोठे तैलचित्र कोणाचे?''

''आमच्या महाराजांचे.''

''ते हातात घ्या व त्यावर थुंका.'' दिवाणजी व दरबारी मंडळी घाबरून गेली.

''स्वामीजी, हे काय आपण बोलता?'' दिवाणजींनी प्रश्न केला.

''मी सांगतो ना! थुंका त्यावर! साधा कागद, रंग, काच यावर थुंकायला काय हरकत आहे? थुंका की !''

सारा दरबार आळीपाळीने स्वामीजींकडे व महाराजांकडे पाहू लागला. यावर हसून स्वामीजी म्हणाले,

''तुम्ही या साध्या कागदावर थुंकायला का घाबरता? पण मला माहिती आहे. तुम्ही हा नुसता कागद मानत नाही. तिथे तुम्हाला तुमचे महाराज दिसतात. त्यामुळे त्या कागदावर थुंकणे तुम्हाला बरोबर वाटत नाही. त्यालाच मूर्तिमंत महाराज समजून तुम्ही त्याला हार घालता. त्याला नमस्कार करता,

हिंदूधर्मात मूर्तिपूजा जी आहे ती यामुळेच.''

हे सारे बोलणे ऐकून 'मूर्तिपूजा म्हणजे मूर्खपणा', असे म्हणणे कसे चुकीचे आहे; हे महाराजांच्या ध्यानी आले. खूप वादविवाद करून जे कदाचित झाले नसते ते स्वामीजींनी कल्पकतेने साधले. महाराजांनी स्वामीजींना आपल्या राजवाड्यात निवासासाठी आमंत्रण दिले. त्यावर स्वामीजी म्हणाले, ''मी येईन, पण एका अटीवर, राज्यातील कोणाही गोरगरिबास वाड्यात येण्यास प्रतिबंध ठेवू नये.''

राजांनी ते मान्य केल्यावर स्वामीजी थोडे दिवस राजवाड्यातही राहिले. तेथे येणाऱ्या सर्वांशी बोलताना समोरच्यांमधील स्फुल्लिंग जागृत करण्यात स्वामीजींचे दिवस जात होते. 'संस्कृतच्या अध्ययनाबरोबरच पाश्चात्य विज्ञानाचा अभ्यास हवा. अभ्यास, परिश्रम यांच्या जोडीला विचारांचा अचूकपणा व रेखीवपणाही महत्त्वाचा आहे. आपला वैभवशाली इतिहास लोकांना योग्य प्रकारे सांगायला हवा.' अशा विचारांनी स्वामीजींचे संभाषण भारलेले असे.

यानंतर स्वामीजी **खेत्रीच्या** महाराजांकडे गेले. महाराजांच्या वाड्यात स्वामीजींबरोबर अनेक विषयांवर चर्चा चालत; त्यामुळे प्रभावित होऊन महाराजांनी स्वामींचे शिष्यत्व स्वीकारले. देशाच्या अभ्युदयात स्वामी काही महत्त्वाचे योगदान करतील, असे महाराजांना वाटत होते. नवीन विज्ञानाचे शोध हिंदूंच्या सृष्टी रचनाशास्त्रातील कल्पनांशी कसे जुळते मिळते आहेत, अशा चर्चा दोघांमध्ये चालत.

**पोरबंदर** म्हणजे सुदाम्याची नगरी. तेथील संस्थानाचे दिवाण श्री. शंकर पांडुरंग पंडित या मराठी माणसाकडे स्वामीजी राहिले. त्यांनी वेदांचा अनुवाद करण्याचे काम घेतले होते. त्या निमित्ताने स्वामीजींशी भरपूर वेदचर्चा होई. दोघेही एकमेकांपासून शिकत होते. जवळजवळ वर्षभराच्या वास्तव्यात पातंजल भाषाभ्यासही दोघांनी केला. **मुंबईहून पुण्यास** आगगाडीने येत असता लोकमान्य टिळकांशी स्वामीजींचा परिचय झाला. पुण्यातील विद्वान मंडळींसमोर स्वामीजींचे भाषणही झाले. पुढे

सुमारे चार वर्षांची ही भारत परिक्रमा! सहस्रावधी किलोमीटरचा हा प्रवास! या काळात स्वामीजी शेकडो किलोमीटर उपाशीतापाशी पायपीट करत गेले. प्रसंगी स्थानकावरील गलिच्छ अभ्यागत कक्षात तर प्रसंगी राजप्रासादातही ते राहिले, मौलवींकडेही त्यांनी जेवण केले.

या परिक्रमेच्या दरम्यान स्वामीजींनी भारतीय समाजाचे जवळून दर्शन घेतले. वेद-पुराणे, संस्कृत काव्ये व नाटके यांचा अभ्यास त्यांनी केला. संस्कृत व्याकरणाचे ज्ञानही त्यांना शंकर पांडुरंग यांच्यासारख्या व्युत्पन्न पंडितांकडून संपादन करता आले. जिथे कोणी पुढच्या प्रवासासाठी त्यांना साहाय्य केले ते त्यांनी स्वीकारले नाही; तर मैलोन्‌मैल पायपीट करून, उपास काढत त्यांनी पुढचे ठिकाण गाठलेले दिसते. म्हैसूरच्या वा रामनंदच्या महाराजांनी देऊ केलेला निधी त्यांनी नाकारला तेही योग्यच! आपल्या अनुयायांची निवड करताना त्यांची पात्रता ठरविण्यासाठी त्यांनी योग्य अशा परीक्षेचा वापरही केलेला दिसतो. नाना प्रश्न विचारून अध्ययन विषयातील वा व्यवहारातील शंकांचे निरसन करून घेत स्वामीजींनी त्या काळात ज्ञान मिळवले. ज्ञानसंपन्न होण्याचे स्वामीजींचे कार्य त्यांना काशीच्या वास्तव्यात सफल झाल्याचे दिसते. यासाठी प्रेमदादास, शंकर पांडुरंग, पव्हारी बाबा अशांच्या चरणाशी बसून नवीन शिकण्याची नम्रता स्वामींनी कायम ठेवली हे स्मरणीय आहे. 'केल्याने देशाटन, पंडित मैत्री, सभेत संचार, शास्त्रग्रंथ विवेचन, मनुजा चातुर्य येतसे फार' या वचनातील काही स्वामीजींनी अनुभवले. सारे भेदाभेद पार करून समदृष्टीने सर्वांशी वागणे हे संन्यास शब्दात गृहीत आहे हे ज्ञान स्वामीजींना होतेच, पण प्रत्यक्ष व्यवहारात आपल्याकडून त्याप्रमाणे आचार झाला नाही अशा प्रसंगी त्यांनी स्वत:ला सुधारण्याची काळजीही घेतली हे ध्यानात घ्यायला हवे.

त्या तेजस्वी डोळ्यांमधली वीज अजुन सांगते ।
उत्तिष्ठत जाग्रत ! बंधूंनो उत्तिष्ठत जाग्रत ! ।।



**कोल्हापुरात** छत्रपतींना भेटून स्वामीजी **बेळगावी** गेले. हरिपाद मित्रांच्या घरी ते राहिले. पुढे **म्हैसूरच्या** महाराजांना स्वामीजींची वाणी ध्वनिमुद्रित करून घ्यावी, असे वाटले. ती तबकडी मात्र आज कुठे उपलब्ध नाही. **बंगलोर, त्रिचूर, कोचीन, त्रावणकोर, मदुरा, रामेश्वर, त्रिवेंद्रम** येथे लोकसंपर्क करून स्वामीजी **कन्याकुमारीस** पोचले.

कन्याकुमारीच्या त्या सुंदर मूर्तीपुढे स्वामींनी साष्टांग प्रणिपात केला. मातृभूमीच्या चरणांशी आपण पोचलो, याची स्वामीजींना जाणीव झाली. एकीकडे गंगासागर, दुसरीकडे सिंधुसागर आणि त्यांना साधणारा हिंदू महासागर अशा सागरत्रयींच्या संगमस्थानी स्वामीजी समोरच्या खडकावर पोहत गेले. भगवान शंकराच्या प्राप्तीसाठी कुमारीने जेथे घोर तपश्चर्या केली होती तेच ते स्थान! हे त्यांच्या भ्रमंतीचे अखेरचे ठिकाण!

**दिशा दर्शन!**

स्वामीजींनी तीन दिवस आणि तीन रात्री या त्रिसागरसंगमस्थानी ध्यानधारणा केली. आपल्या देशाचा भूतकाळ व भविष्यकाळ त्यांच्या नजरेसमोर आला. 'एकेकाळी वैभवाच्या शिखरावर असलेला आपला देश आज अध:पतनाच्या खोल दरीत कसा काय फसला? हा देश पुन्हा वैभवाने, बुद्धिमत्तेने, नीतिसंपन्नतेने ठाम उभा राहायला हवा. त्यासाठी काय



करायला हवे?' या विचारांनी त्यांच्या मनात गर्दी केली. 'आपल्या धर्माची महती, आपल्या धर्माने दिलेला अध्यात्माचा उदारमतवादी संदेश पश्चिमेकडील राष्ट्रांपर्यंत पोहोचवून आपली मातृभूमी पुन्हा एकदा देदीप्यमान झाल्याचे पाहण्यासाठी मी प्रयत्न करीन' असा संकल्प त्यांनी या संगमावर केला. त्या क्षणी स्वामीजींमधील एका राष्ट्रद्रष्ट्याचा जन्म झाला.

अमेरिकेत जाऊन त्या भोगभूमीला वेदान्ताची ओळख करून देण्याचे महत्कार्य स्वामीजींसमोर स्पष्ट होत गेले. नंतर श्री शारदामातांनी या स्वामीजींच्या संकल्पास आपला आशीर्वाद दिला. सर्वसामान्य जनांनी पै-पैसा जमा करून निधी उभारला. त्यातून स्वामींनी शिकागोची ती सर्वधर्मपरिषद हिंदुत्वाचा जयघोष करून गाजवली.

**- प्रा. यशवंत लेले**
ज्ञान प्रबोधिनी, पुणे - ३०

२० वर्षांची वाटचाल

तंत्रज्ञानी नवे सहस्रक केवळ वैभव सांगतसे ।
अध्यात्मासह विज्ञानाची हाक तुझी परि मनी वसे ।।

**PAN INDIA - FULL SERVICE - GLOBAL LOGISTICS**

**A.T.C. (CLEARING & SHIPPING) PVT. LTD.**

**Corporate Office :** 901 Peninsula Towers, Ganpatrao Kadam Marg,
Lower Parel (West), Mumbai-400 013. India,
Tel : 91-22-6651 3000 (1000 Lines) Fax : 91-22-6654 1556 / 57,
Email:atc@atc.co.in/www.atc.co.in

# A.T.C. GROUP AT A GLANCE

**20 Offices In 15 Indian Cities**
**One Overseas Office - Dallas, U.S.A.**
**Group Staff Strength : 300 + Employees**
**Established : 1957**

## SALIENT FEATURES

- Licensed Custom House Agent
- IATA Air Cargo Agent
- ICEGATE Registered
- FMC (USA) Registered NVOCC & OTI
- On the Approved List of Leading Banks
- Licensed Multimodal Transport Operator
- Custom Approved Air & Ocean Consolidator
- Advance Manifest Filing
- Joint Stock Company With All Working Directors
- Illustratious Clientele

## REPERTOIRE OF SERVICES

- Custom House Agent
- International Freight Forwarder
- NVOCC : Service Contracts - Rate Agreements
- Over Dimension Cargo
- Road Transport / Own Trucks
- Forklift & Crane Hire
- Air Cargo Agent
- Groupage / Consolidation : Air - Sea
- MTO : DDP / DDU
- Warehousing & Distribution
- Packing & Palletisation
- FCL Consolidation For Single Supplier

## Branch Offices

**Pune I - City, Pune II - Pimpri, Panvel, Nashik, Aurangabad, Ahmedabad, New Delhi, Chennai, Kolkata, Bengaluru, Indore, Tuticorin & Gandhidham**

AGL ACL ACS

# GLOBAL LOGISTICS SOLUTIONS



**पाहा :** http://www.geetmanjusha.com/marathi
मराठी गाण्यांमागच्या कविता, कवी, संगीतकार, गायकांची ओळख

# आकर्षण

कथा

स्वैर अनुवाद – मीना वांगीकर

कराडच्या हायवेवरच्या नाक्यावर हातात एक छोटीशी पिशवी घेऊन वाट पाहून चंदू कंटाळला. शेवटी एका उसाच्या ट्रकमध्ये तो चढून बसला तेव्हा आकाश नक्षत्रांनी भरून गेलं होतं. सिनेमाला जातो, असं घरी खोटं सांगून बाहेर पडलेला चंदू मुंबईला जाणाऱ्या ट्रकवाल्यांच्या मागे लागला होता. रात्र उलटून गेली होती. हा ट्रकवालाही थांबला नसता तर चंदू आल्या वाटेने घरी परतला असता. केबिनमध्ये जागा नव्हती म्हणून पाठीमागे केबिनचा कठडा धरून उभ्या राहिलेल्या चंदूच्या डोळ्यांत लाल डोळे वटारलेली वाहने धावत होती. दूरवर चंद्र तरंगत चालला होता आणि आतापर्यंत पाहिलीच नाहीत अशी भासणारी असंख्य नक्षत्रं...

***

चंदूच्या डोक्याला दरवाजा लागून झालेल्या जखमेवर पट्टी बांधली तेव्हा चाळीतले लोक त्याला 'अरे, मिथुन चक्रवर्ती' अशी हाक मारायचे; तीच या सर्वांची नांदी. त्याच वेळी मिथुनच्या एका चित्रपटाचे पोस्टर गावभर लागले होते. त्यात मिथुन डोक्याला एक पट्टी बांधून कमरेत जरा वाकून स्टायलिश पोझ देऊन उभा राहिला होता. चंदूने आरशात पाहात केसांचा झुपका डोक्याच्या पट्टीवर आणत 'अरे, हो की !' म्हणत कंबर जरा वाकवली. तेव्हापासून त्याचा चेहरा, वागणे-बोलणे सगळेच बदलले. रात्री उशिरापर्यंत आपले कपडे स्वच्छ धुऊन अंथरुणाखाली ठेवून त्यांना तो इस्त्री करू लागला. दाढी-मिशा यायच्या आधीच सलूनला जाऊन त्या साफ करू लागला. थोडे पैसे गोळा करून कबुतरासारखे दिसणारे बूट त्याने विकत घेतले. कराडमधील उसाच्या गुऱ्हाळासमोर, बस स्टँडसमोर, स्टाईलमध्ये खिशात हात घालून तो फिरू लागला. रोज थिएटरात जाऊन शो सुरू व्हायच्या अगोदरच हजेरी लावू लागला. सारे जग आपल्याला 'तंबाखूचा दुकानदार असलेल्या पंढरीचा मुलगा चंदू' असे ओळखत नसून 'मिथुन चक्रवर्ती' असेच ओळखू लागले आहेत, असा समज त्याच्या मनात पक्का झाला.

हा नवा प्रकार त्याचे वडील पंढरी व त्याची मोठी बहीण बेबी यांच्या लक्षात आल्याखेरीज



**कोण आहेत तुमच्या-समोरची आदर्श रोल मॉडेल्स? ज्यांचं चालणं-वागणं-बोलणं त्यांचे विचार - तुमच्यावर प्रभाव टाकतात? आयुष्यात पुढे जाऊन तुम्हालाही त्यांच्यासारखं बनावंसं वाटतं? तुमच्यासमोरचे आदर्श जेव्हा खरोखरच आदरणीय असतात, कल्पक, विधायक काम करणारे असतात तेव्हा प्रश्न येत नाही. आपल्या पण आदर्शामागे आपण जर डोळे झाकून जात राहिलो तर ? पुढचा सगळा रस्ताच वेडावाकडा होऊन बसतो...**

सुरळीत होते जीवन तेव्हा नाही कळली किंमत ।
संघर्षाच्या वाटेवरती खचू लागली हिम्मत ।।

राहिला नाही. वयात येणाऱ्या मुलाचे हे प्रताप आहेत म्हणून पंढरीने दुर्लक्ष केले. तरी आई नसलेल्या घरी लहान वयातच आई झालेल्या चंदूच्या मोठ्या बहिणीला चंदूचे वागणे जरा अतीच वाटले. तिने एकदा-दोनदा बजावलेही. आता चंदू 'रूपेरी', 'मायापुरी','स्क्रीन' वाचण्यासाठी सलूनमध्ये जाऊन दिवस घालवायला लागला. तेव्हा एका संध्याकाळी रागावून बेबीने चंदूच्या चक्क थोबाडीत मारली. सामान्यपणे असा मार पडल्यावर ताडमाड वाढलेला चंदू लहान मुलासारखा रडायचा, परंतु त्या दिवशी तो रडला नाही. उलट गंभीरपणे गालावरून हात फिरवून सिनेमा नटासारखा बाहेर निघून गेला. बेबीला काही सुचेनासे झाले.

चंदू जवळच्या पेट्रोल पंपावर रोज बसायचा. मुंबईकडे जाणारे ट्रक त्याला कधी शांत करायचे तर कधी दुःख द्यायचे. ट्रकच्या मागे पेरून ठेवलेले सामान मायानगरीच्या रहस्यासारखे त्याला वाटायचे. तंबाखूच्या एका शेठकडे पुड्या बांधणाऱ्या पंढरीचा मुलगा झाल्याबद्दल त्याला वाईट वाटायचे. हुबेहूब मिथुन चक्रवर्तीसारखे दिसणारे आपण, चाळीतील स्टोव्ह रिपेरी करण्यात 'प्रवीण' किंवा 'गावाबाहेरच्या तलावातील वेगाने पोहणारा' किंवा 'लक्ष्मी देवीच्या उत्सवात पळण्यातील विजेता' एवढीच आपली ओळख असावी का? नाही. तो मिथुन चक्रवर्ती आपल्या डोळ्यांच्या पापणीवर शहराला झुलवतो. भिकार खलनायकांना जोरात हाणतो.

गावातील आपल्या बरोबरीच्या मित्रांप्रमाणे साखर कारखान्यात, तेलाच्या घाण्यात किंवा गॅरेजमधे वाट पाहात असलेल्या आपल्या भवितव्यावर चंदू वैतागला. आपले आयुष्य हे कराडच्या दरिद्री गल्ल्यांसाठी, बेबीताईच्या बटाट्याच्या भाजीसाठी, घाबरट मित्रांसाठीच राखून ठेवलेले नाही, याची जाणीव झाल्यापासून त्याने मित्रांबरोबर फिरणेही सोडले. दिवस दिवस तो घरीच राहू लागला. एक दिवस वडिलांनी तंबाखूच्या दुकानात काम करायला सांगितल्याबरोबर मोठ्या मुलासारखा तो चिडला. एका छोट्या पिशवीत थोडे पैसे, कपडे, सिनेमाच्या गाण्याची पुस्तके, कंगवा घेऊन, कबुतरासारखे बूट घालून नाक्यावर येऊन ट्रकचालकांच्या मागे लागला. ट्रकच्या केबिनच्या मागे उभा राहिलेल्या चंदूच्या अंगात ट्रकचा वेग जसा वाढत होता तसा विशेष उत्साह संचारत होता. समोर अंधार होता. चंदू उभ्याउभ्या पेंगत स्वप्न पाहू लागला. हळूहळू पहाट झाली. चंदू जागा झाला.

***

नवा दिवस त्याच्यासमोर भीतीचा गोळा होऊन उभा ठाकला होता. तिकडे बेबीताई विटक्या पांढऱ्या साडीत 'चंदू चंदू' अशा हाका मारत कराडच्या रस्त्यांवर फिरत होती. इकडे चंदू भरून आलेला हुंदका गिळून टाकायचे शतप्रयत्न करत होता. घाटातलं सुंदर दृश्य चंदूला सुखावत होतं. खोपोलीच्या सिग्नलजवळ एक मोठ्ठं पोस्टर पाहून चंदू ताठ उभा राहिला. मिथुन चक्रवर्ती दोन्ही हात उंचावून चंदूला बोलावत होता. निसटलेली साखळी पुन्हा मिळाल्यासारखा चंदू रस्त्याकडे पाहू लागला.

***

मुंबईच्या क्रॉफर्ड मार्केटमध्ये ट्रकमधून रिकामे होत असलेल्या वाणसामान, भाजीपाला, लाकूड, पेट्या इ. बरोबर चंदूलाही उतरवले गेले, तेव्हा दुपारचे ऊन रणरणत होते. हजारो पेट्या, ट्रकचालक, डोक्याला टॉवेल बांधून चेहराच न दाखवणारे कुली, हातगाड्या, पिंजरे, अंगाला अंग घासत चालेला जनसमुद्र ! चंदू कसाबसा त्या गर्दीतून दबल्यासारखा बाहेरच्या रस्त्याला लागला.

Bharat Petroleum

सिद्धी गॅस एजन्सी

शुभ दीपावली

'भारत गॅस'चे पिंपरी परिसरासाठी वितरक

**पत्ता:** प्लॉट नं. एच्-पी-१, एच् ब्लॉक, एम्.आय.डी.सी.,
पिंपरी, पुणे-४११ ०१८. ☎ ०२०- २७४८५९६०



रस्त्याच्या कडेला लागलेले पोस्टर त्याला परिचित वाटत होते. त्याच्याकडे पाहात चंदू तसाच खुरडत चालल्यासारखा चालत मेट्रो थिएटरच्या शेजारच्या भिंतीला टेकून बसला. थोडंसं खाऊन दमल्याने तेथेच झोपून गेला. त्याला जाग आली तेव्हा शो सुटला होता. सकाळ आहे की संध्याकाळ हे न कळण्यासारखा तो प्रकाश होता. दिवसाचा, आपल्या नावाचाही विसर पडण्याची विचित्र वेळ... किंचित दिसणारे आकाशही धुरासारखे होते. एक लाठी त्याच्या बरगड्यांना टोचली 'नाम क्या है?' असे दरडावून विचारल्यावर चंदू 'मिथुन, मिथुन' म्हणत हुंदके देऊ लागला.

चंदूला 'धोबी तलाव' पोलीस चौकीत नेले गेले. मध्यरात्री दोन पोलीस स्टोव्ह लावायला धडपडत होते. 'मी लावून देतो' असे म्हणत चंदूने दोनच मिनिटांत तो स्टोव्ह पेटवून दिला. यामुळे चहाबाज पोलीस भलतेच आनंदित झाले.

सकाळी पुन्हा चंदूकडून स्टोव्ह पेटवून घेऊन केलेला चहा त्यालाही देऊन पोलिसांनी त्याला बाहेर सोडले. रॉकेलचा स्टोव्ह रिपेर करण्यातील चंदूचा हातखंडा पाहून एका पोलिसाने त्याला दादरमध्ये स्टोव्ह रिपेरी करणाऱ्या एका म्हाताऱ्याजवळ नेऊन सोडले. लाटेबरोबर केर येऊन जसा किनाऱ्याला लागतो तसा दादरच्या फुटपाथवरच्या छोट्या दुकानात चंदू आला. हातापायाला काळं लावून त्या दुकानाचा एक भागच बनला. दुकानाचा म्हातारा मालक जास्त बोलत नव्हता. चंदूचे नावगावही त्याने विचारले नाही. तो काम सांगत होता व सल्ला देत होता. त्या दिवशी एक जेवण व दोन रुपये त्याने चंदूला दिले. संध्याकाळी अंधार पडल्यावर चंदू दादरच्या रस्त्यावर फिरला. फुटपाथवर त्याला झोपायची जागा दाखवून म्हातारा मालक झोपला. दादरच्या गर्दीत काहीतरी शोधत असल्यासारखा चंदू फिरत

बनवाबनवी वाटते छान, तीच मग सवय होते ।
झगमगाटात हरवून जाता, धडपडण्याची जिद्दच जाते ।।

राहिला. सगळे लोक घाबरल्यासारखे दिसत होते. कोणीतरी मागे लागल्यासारखे धावत होते. डोळ्याला डोळा लावून कोणीच पाहात नव्हते. रस्त्यावरच्या दहा-बारा सलूनमधून एक निवडून त्यात जाऊन चंदू राजासारखा बसला. 'कराडचा मुलगा' पाहून लोक आपल्याला हसतील अशी त्याची भीती खोटी ठरवत दुकानातील चार-पाच पोऱ्यांपैकी एकजण पुढे आला. त्याला चंदूने 'मिथुन चक्रवर्ती कट्' असे सांगितले. कोणीही हसले नाही. उलट त्याचे केशकर्तन अगदी नीट झाले. पाऊण तासानंतर मिथुन कट् साकारला. सलूनवाल्यानी केलेल्या सलामाला दाद देत तो दुकानासमोरच्या फुटपाथवर आला. ओळीने झोपलेल्या लोकांमध्ये त्याने आपली जागा शोधून काढली.

कापडाचा एक तुकडा टाकून आडवा झाला तो. 'तू नवा का रे?' शेजारच्याने विचारले. 'हो,' असं म्हणून त्याची ओळख सांगेपर्यंत तो झोपी गेला. इतका तो दमला होता. दुसऱ्या बाजूला डोक्याला तेल लावत असलेल्या एकाने विचारले, 'काम काय?' त्यावर मिथुन किंचितही न अडखळता 'सिनेमात जाण्यासाठी आलोय' म्हणाला.

त्याला तो गंभीरपणे 'हो का? समोरच्या फुटपाथवर पोस्टाच्या पेटीजवळ झोपणाऱ्या पक्याने कितीतरी सिनेमांत काम केलं आहे. कितीतरी स्टुडिओत त्याच्या ओळखीचे आहेत.' इतके सांगून तो झोपला.

फुटपाथवरच्या हजारो शरीरांमध्ये एक होऊन 'मिथुन' आता आकाशाच्या खाली जमिनीवर झोपला होता. डोळे उघडले तर नक्षत्रे.. डोळे मिटले तर गाडीचा खडाखडा आवाज. आपल्या साऱ्या साखळ्या तुटलेल्या, विचित्र तरंगल्याचा अनुभव त्याला आला. कार्यकारणसंबंध नसलेल्या कितीतरी जीवांमध्ये आणखी एक जीव संधीची वाट पाहात होता. मिथुनला नेहमीपेक्षा गाढ झोप लागली.

पहाटे दुधाच्या बूथसमोर दुधाचा ट्रक आल्याबरोबर सगळ्यांनी पाऊस आल्यासारखं पटापट उठून फुटपाथ रिकामा केला. 'मिथुन' उठला, तेव्हा म्हाताराही उठून दुकानात आला होता. दुरुस्तीला आलेला स्टोव्ह पेटवायला पंप मारत होता. फुस् असा आवाज करत पेटलेल्या स्टोव्हच्या निळ्या ज्योतीत एक नवा दिवस उगवला. त्या दिवशी मिथुनने समोरच्या फुटपाथवरच्या पक्याला भेटायचा प्रयत्न केला. पण पक्याने त्याच्याकडे पाहिलेसुद्धा नाही. स्टोव्ह रिपेरी करणारा म्हातारा लक्ष देऊन प्रत्येक स्टोव्ह दुरुस्त करायचा. तो म्हातारा होऊनच जन्मला की काय असे वाटायचे.

एक-दोन दिवसांवर आलेल्या गोकुळाष्टमीसाठी दादरच्या मार्केटमध्ये गडबड चालू झाली. गावातल्या तलावात रंगीत पाण्यामध्ये पोहणारा चंदू इथल्या उत्सवाचीही उत्साहाने वाट पाहू लागला. या दादर मार्केटमधील गर्दीत व त्याला हात उंचावून इथवर बोलावलेल्या मिथुनच्या मायानगरीत किती अंतर आहे हे जाणून वाटलेली भीती त्याने मुद्दाम दूर सारली. त्या रात्री फुटपाथवरची तरुण मुलं झोपलीच नाहीत. दहीहंडीच्या 'गोविंदा' संघाची चर्चा चालली होती. स्वत:ला कळायच्या आधीच 'मिथुन' एका संघात सामील झाला. जवळच्या शिवाजी पार्कच्या मैदानात जाऊन एकावर एक चढून मानवी पिरॅमिडची तालीम केली. गोकुळाष्टमीला बाजारात खूप उंचावर दही व पैसे भरलेले मडके बांधतात. ते मडके फोडणाऱ्या संघाला ते पैसे मिळतात, या सगळ्या गोष्टी तो मन लावून ऐकत होता. कराडच्या स्पर्धेचा उत्साह अंगी भिनलेला 'मिथुन' रात्रभर झोपलाच नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळपासून मडके फोडण्याचा खेळ सुरू झाला. काही क्षणांत वेगवेगळ्या संघातील गोविंदांनी मानवी पिरॅमिड करून हार घातलेले आणि त्यात पैसे असलेले

सेंट्रल पेन्शनवर मोफत सल्ला, पुरोहित, ज्ञान प्रबोधिनी
**प्रायोजक - शैलेंद्र केशव म्हसकर ☎ २४४५१३१९**

मडके फोडले. 'प्लाझा'जवळच्या अत्यंत उंच असलेल्या मडक्यावर आता सगळ्यांची नजर खिळली.

चंदू सामील असलेल्या 'दादर फुटपाथ संघा'ने प्रयत्न करायचा ठरवले. पापण्यांची उघडझाप होण्याच्या आत चंदू मडके धरून दोरीवर लोंबकळू लागला. आनंदाने व उत्साहाने जयजयकार करत त्याला संघातील भिडूंनी खाली उतरवले. उचलून नाचवले. नंतर त्या संघातील मुलं रस्त्यावर गुलाल उधळून नाचू लागली. 'सिनेमा में काम करता है' असे सगळे म्हणत असल्याचा भास होऊन 'मिथुन' अगदी बेभान होऊन नाचला. रात्री फुटपाथ शेजारच्या कॅसेट दुकानदाराने 'मिथुन'साठीच 'डान्स् डान्स' कॅसेट मोठ्या आवाजात लावली. चंदू 'मिथुन चक्रवर्ती' अंगात आल्यासारखा नाचत राहिला. मधेच तरंगत आलेल्या पक्याने मिथुनचा हात हलवत 'उद्या फिल्म सिटीला घेऊन जातो ब्रदर.. ब्रदर' अशी बडबड केली. त्या रात्री आकाशाच्या कुशीत मिथुनला झोप मात्र उशिरा लागली. आऽ वासून वर बघत मुंग्यांसारखे उभे राहिलेल्या खालच्या लोकांपेक्षा खूप उंचावर; आपण तरंगतो आहोत, मडक्याला धरून लोंबकळतो आहोत, हे दृश्य त्याला सारखेसारखे आठवत राहिले. किती अप्रतिम आनंदाचा क्षण! आपल्यालाच ठाऊक नसलेल्या आपल्या पराक्रमाची परिसीमा!! या आनंदाच्या बेभान क्षणी दूरचे पोस्टरदेखील त्याला नीरस वाटले.

आता 'मिथुन'चे मित्र वाढले. अनेकदा संध्याकाळी शिवाजी पार्कच्या समुद्रकिनाऱ्यावर ही मित्रमंडळी पोहायला जात असत. 'मिथुन' सर्वांपेक्षा लांब पोहत जायचा. बाकीच्यांना काळजी वाटल्यावर किनाऱ्यावर परतायचा. अशातच एक दिवस पक्या 'मिथुन'ला एक्स्ट्रांच्या युनियनच्या ऑफिसात घेऊन गेला. त्याचे नाव नोंदण्याकरता पन्नास रुपये घेतले. ग्रुप डान्समध्ये 'हु हा' म्हणत हात हलवणाऱ्या किंवा प्रेतयात्रेत भाग घेणाऱ्या नट-नट्यांचा तो संघ होता. 'मिथुन' कशाही प्रकारे इंडस्ट्रीत प्रवेश मिळवण्यासाठी उतावीळ झाला होता. फिल्म सिटीच्या बाहेर रांग लावून लोक बसले होते. सारेजण आपल्या नंबरसाठी, संधीसाठी वाट पाहात असेलेले 'एक्स्ट्रा' लोक... म्हातारा, म्हातारी, तरुण, स्त्रिया, पुरुष... गेटच्या आतून मुकादमाने नाव पुकारल्याबरोबर उठून धावत होते. स्टुडिओतील गरजांप्रमाणे, रोजगाराच्या कामगारांप्रमाणे; मुकादम या कलाकारांना आत बोलवायचा. महिनोन्‌महिने बाहेर वाट पाहात पाहाणारेही त्या भाऊगर्दीत होते. 'आम्हाला इथे काम मिळत नसताना तू काय मोठा इथे मिरवायला आलास?' असेही बोलणे 'मिथुन'ला ऐकू आले. 'मिथुन'ला भीती वाटू लागली. तेवढ्यात कुठूनतरी हजर झालेला पक्या त्याला ओढून घेत सरळ आत शिरला. तेथे चार-पाच लोकांनी 'मिथुन'ला पाहिले. त्यातला एकजण म्हणाला,

''उद्या 'फिल्मिस्तान'ला जा. तेथे मिथुनजींचा सिक्वेन्स आहे. याला ट्राय देऊ.''

लोकलच्या गर्दीतून दादरला परतताना चंदूला आपण मिथुन चक्रवर्तीच्या बदली म्हणून काम करायचे म्हटल्यावर जरा विचित्र वाटले. 'डुप्लिकेट झाले म्हणून काय झाले? यामुळे निदान कॅमेऱ्याच्या समोर तरी जायला मिळेल ना!' अशी स्वत:चीच तो समजूत घालत राहिला. पक्या तर ''तू उद्या पास झाला तर तेरी तो जिंदगी बन गयी यार. मिथुनजी कसला बिझी स्टार आहे! त्यांचा डुप्लिकेट म्हणजे तुझी चांदीच चांदी रे...'' म्हणत राहिला. चंदूला हरभऱ्याच्या झाडावर चढवत राहिला.

दुसऱ्या दिवशी भरदुपारी 'फिल्मिस्तान' स्टुडिओत वाळूच्या मैदानात चंदूला उभे केले.

**(पान क्र. ८१ वर पुढे सुरू)**

२० वर्षांची वाटचाल

खोळंबतो काळ, अभिव्यक्तीसाठी।
रूपेरी जगाची, मृगजळे किती? ।।



# घर अमुचे

घर अमुचे साधेच परंतु
आमच्याशी बोलते...
कुशीत घेते, हसते, गाते,
रागेही भरते...

वस्तू-वस्तूंमधला वारा
जपतो अमुचे श्वास...
खिडकीवर येऊन भेटते
रोज नवे आकाश...

कौतुकसजल्या हसऱ्या भिंती
उत्सुक खिडक्या दारे...
उंबऱ्यात थांबतो दिवसही
तृप्त पाहुनी सारे...

कधी वाजता बेल फोनची
घर हे हरखून जाते
गोड गोजिऱ्या आठवणींनी
स्वत: सावरून घेते...

कधी दारावर टकटक अवचित
ते जाते भांबावून
अनोळखी नवख्या कोणाला
घेते मग सामावून...

आठवते ते आम्हासारखे
गेलेल्या दिवसांना
वरवर दिसले शांत तरीही
कण्हतो त्याचा कोना...

मुकेच असते तरी बोलते
सदैव ते आमच्याशी
इथेच मांडी ठोकून आमची
झेप उंच आकाशी...

**अरुण म्हात्रे**
३, श्रीनाथ अपार्टमेंटस् नवघर, मिठागर लिंकरस्ता,
मुलुंड (पू.) मुंबई 400081

**चित्रकार : राहुल देशपांडे**

या घरात वाढलो, त्याचं ऋण फेडायचंय ।
या वास्तुच्या कणांशी, नवं नातं जोडायचंय ।।

कविता

# माझ्या अंगणात गाणे

फार दिसांनी हासले
माझ्या अंगणी आभाळ
चिवचिवाट गोजिरा
चार चिमण्या खट्याळ !

त्यांच्या इलु इलु चोची
झाल्या धिटुकल्या कळ्या
फुलपंखी दंगा त्यांचा
माझ्या आठवपाकळ्या !

त्यांची न्हातीधुती स्वप्नं
नवलाईचे चांदणे
खळाळत्या उत्साहाचे
लख्ख टिपुरले गाणे !

धीट झाल्या तरी वाटे
तशा सानुल्या अजून
गेल्या दूर देशी जरी
तरी त्यांचेच अंगण !

त्यांच्या चिमण्यांनी यावे
इथे माहेरओढीने
रुजवले मी मायेचे
माझ्या अंगणात गाणे !

**– सुनील शिनखेडे**
कार्यक्रम अधिकारी, आकाशवाणी, जुना कुंभारी मार्ग,
एम. आय. डी. सी., सोलापूर 413006



# व्रत

पूर्व दिशेला
शिंपित केशर
पहाट येते
धावत भरभर.

जागी होती
चिमणी पाखरे
थंडाव्याचे
सुटते वारे.

फिकट चांदण्या
पल्याड गेल्या
काही लाजऱ्या
इथे थांबल्या.

आंबराईतून
सूर उमटले
किरण कोवळे
धावत आले.

किरणांचे व्रत
आपण घेऊ
अंधारावर
प्रकाश ठेवू.

**–विनय अपसिंगकर**
भाग्यनगर,
लातूर 413531



चित्रकार : ऋजुता घाटे

झुळझुळणारे पाणी । त्याची मन गाते गाणी ।
किती रूपांतून भेटे । त्याची अजब कहाणी ।।

Wisdom is knowing
what to do next...
Skill is knowing
how to do it...
And virtue lies
in doing it...

YOGA
ENTERPRISES

**Medical Equipments**
**Surgical Disposables**

1194/6, Jitendra Villa, off. Ghole Rd.
Nr. Ramchandra Sabha Mandap
Shivajinagar Pune-5
Tel. : (0) 25530063 / 64

यंदा दहावीची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी
महत्त्वाचे आणि आवश्यक पुस्तक

**दहावीची शाखा निवड**
लेखक – विवेक वेलणकर

तीन महिन्यात
तीन आवृत्त्या संपल्या.



— पुस्तकासाठी संपर्क —

ए. आर. व्ही. इन्फोटेक
१२००, सदाशिव पेठ,
लिमयेवाडी, पुणे ४११०३०
ई मेल :– pranku@vsnl.com
फोन नं. ९८५०६३८४८२ / ९८५००६३४८०

।। दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा! ।।

Every Challenge or Adversity
carries the seed of an Opportunity
which can be transformed
into Prosperity!

*Happy Diwali*

**Swastik Oil Products Mfg. Co. Navsari.**

Manufacturers of:
GLYCOL ETHERS, OTHER ETHOXYLATES & HYDRAULIC BRAKE FLUID HEAVY DUTY
DOT-3. DOT-4 & DOT-5 IMPORTERS & EXPORTERS

MUMBAI OFFICE : HIRJI GOVINDJI COMPOUND, TOKARSHI JIVRAJ RD.,
SEWREE. MUMBAI - 400015.
NAVSARI OFFICE : 2/810, HAEGOVAN MARG, NAVSARI, GUJRAT-396445.

**जलतीर्थ :** ठोसेघर धबधबा – ठोसेघर, जि. सातारा
अतिशय सुंदर धबधब्यांची शृंखला, काळ –जुलै ते नोव्हेंबर

# नारळातील गणपती मंदिर

विजयानंद शेंबेकर




आपण अष्टविनायक यात्रेनिमित्त गणपती मंदिरांना भेट देतो. तिथे प्लॅस्टर ऑफ पॅरिसचे नारळाच्या आकाराचे शोपीस मिळतात तेच आपण नारळामध्ये बनवू शकतो.

१) प्रथम लांबट आकाराचा नारळ घेऊन त्यावर आकृती (१) मध्ये दाखविल्याप्रमाणे स्केचपेनने मार्किंग करावे.

२) लोखंड कापण्याच्या करवतीने (हॅक्सॉने) गोल भाग कापून घ्यावा.

३) आतील खोबरे काढून आतल्या बाजूस पांढरा ऑईलपेंट लावावा.

४) कापून काढलेला भाग आकृती ३ मध्ये दाखवल्याप्रमाणे नारळाचा बेस म्हणून वापरावा.

५) खोबरे दाखविण्यासाठी १० मिलिमीटर थर्माकोलची पट्टी वापरावी. आतील बाजूस नारळाचे खोबरे दिसावे यासाठी ही पट्टी आतून चिकटवण्यापूर्वी त्यावरून लाटणे फिरवावे म्हणजे पट्टी वळविताना मोडत नाही.

६) आतमध्ये थर्माकोलची बैठक ठेवून त्यावर कोणत्याही आवडत्या देवतेची मूर्ती बसवावी.

पाणी शिंपता शिंपता आला मातीचा ग वास।
थेंब थेंब फुलू आले, झाला सुगंधी प्रवास।।

# फुले बनविणे

१) पँटचे/शर्टाचे मोठे बटण घेऊन आकृती २ मध्ये दाखविल्याप्रमाणे त्याच्या छिद्रातून तारा घालून पिळून घ्याव्या.
२) आकृती ३ मध्ये दाखविल्याप्रमाणे या बटणावर फर्निचर पॉलिशसाठी वापरण्यात येणारे मेण (फर्निचरमधील छिद्र बुजवण्यासाठी वापरतात.) घट्ट बसवावे.
३) कोणत्याही मटेरियलच्या (बांबू, सुपारीच्या पानाची विरी, रंधा मारल्यानंतर निघणारा लाकडाचा सालपा, शिंपले, माशांचे खवले, करवंटी अशा कोणत्याही गोष्टीच्या) पाकळ्या करून त्या आकृती ३ मध्ये दाखविल्याप्रमाणे मेणावर दाबून बसवाव्या.
४) एखाद्या काडीने सर्व पाकळ्यांच्या बुंध्याशी मेणावर फेविकॉल लावून ठेवावे. साधारणपणे दोन तासांत फेविकॉल सुकते.
५) आकृती ४ मध्ये दाखविल्याप्रमाणे करवंटीचा/सुपारीच्या पानाच्या विरीचा, पानांचा आकार काढून त्याला मेणाने तार चिकटवावी आणि त्या मेणावर फेविकॉल टाकावे म्हणजे तार पानाला घट्ट बसेल.
६) फुलाच्या तारेला पानाची तार घट्ट गुंडाळावी.
७) हिरव्या कापडाच्या चिंधीने तारेवर फेविकॉलने वेष्टन करावे.

यानुसार आपण विविध प्रकारची फुले बनवू शकता.




# करवंटीची फुलांची परडी






१) शक्यतो गोल नारळ घेऊन त्याच्या शेंड्या आणि वरील भुसा काढून टाका.
२) मार्कर पेनने/स्केच पेनने आकृती २ मध्ये दाखविल्याप्रमाणे परडी व तिचे हँडल आखून घ्यावे.
३) लोखंड कापण्याच्या करवतीने (हॅक्सॉने) छायांकित भाग (दोन्ही बाजूंचा) कापून काढावा म्हणजे परडी तयार होईल.
४) आकृती ३ मध्ये दाखविल्याप्रमाणे हॅक्सॉने चौकडीचे डिझाईन काढू शकता. दुसऱ्या करवंटीचा भाग कापून घेऊन तो परडीच्या बुंध्याशी चिकटवावा. हँडलवर इतरही प्रकारचे डिझाईन करवंटीतून कापून, चिकटवून परडीचे सौंदर्य वाढवू शकता.

– **विजयानंद शेंबेकर,** आशीर्वाद, श्रीबाग नं. २, अलिबाग


SANTOOL
Solution Engineers
शुभ दीपावली !
२११/४, नवी पेठ, पुणे – ४११ ०३०.
दूरभाष क्र.: ०२०–२४३३६७६४

ललित

# बेबा भवानी
## अर्थात
## 'मी न्हाई त्यातली!'



वाच. स्वर्णलता भिशीकर

श्रावणाचे दिवस... हराळीचं साठ एकरांचं रान हिरव्या साजात शोभत होतं. नागपंचमीची सुट्टी होती. पोरं इकडे तिकडे उनाडत होती. प्रबोधिनीच्या शाळेच्या निवासी गुरुकुलात सैंपाक करणाऱ्या बायकांनी बिगी बिगीनंच भाकऱ्या आवरल्या; रात्रीचा सैंपाक केला. मग बरोबर आणलेल्या ठेवणीतल्या जरीच्या साड्या काढल्या. त्या टुकीने नेसून, पावडर कुक्कू करून त्या फेर धरायला अंगणात आल्या. पोरीबाळींनी हौसेनं मातीचा नागोबा केला होता. त्याला दूध, लाह्या वाहिल्या होत्या. काही पोरी आपल्या कानातले लांब लांब झुमके हालवीत, माना वेळावीत कायबाय गुपित बोलून हसत होत्या. मोठ्या बाया फुगड्या – झिम्म्यासाठी पदर कसत होत्या. तेवढ्यात सुताराची अंबी आनंदाने किंचाळली,

"आग्गं बया! ती बगा, बेबा भवानी आली! आता लय मज्जा! ती आस्सं डोळं करनार! आस्सं लांब लांब बोलनार! हिला चिमटं काडनार नि तिला गुदगुल्या करनार! लई हशिवनार!"

त्यावर पन्नास पावसाळे काढलेल्या आबूमावशी फणकाऱ्याने म्हणाल्या, "व्हय, व्हय तर! हशिवनार आन् फशिवनार!"

येवढा विश्वास आबूमावशींना ज्या बेबा भवानीवर होता ती पाठोपाठ पदराचे फलकारे मारत, लगालगा चालत, आपल्या शेंबड्या पोरीचं बोट धरून मेळ्यात सामील झाली! बायकांनी एकच कलकलाट केला. बेबा भवानीने लईच थाट केला होता. पिवळी जर्द इरकल, कोपरापर्यंत हिरवी बांगडी नि पायात पैंजनं. बाकी दागिने नव्हते; पण भरपूर काजळ घातलेले हिरवे – घारे डोळे चेहऱ्यावर उठून दिसत होते. सारखं नाक उडवायची सवय असल्याने नाकातली पातळ नथनीही त्याबरोबर उडत होती! आल्या आल्या तिचं लक्ष सुसाकाकूच्या गळ्यातल्या नव्या डागिन्याकडे गेलं. ती ठसक्यात म्हणाली,

"माय वो! तुझ्या गवऱ्या मसनात जायाची येळ आली नि लईच नटाया लागलीस की!"

या अनपेक्षित हल्ल्याने सुसाकाकू भडकली नि तावून बोलली,

"व्हय! एक नाय धा डाग

तुमचं बोलणं तुमचा उच्चार, यातून सच्चेपण कळतं।
तुमच्या मनाचं अंगण; तुमच्या नजरेतून दिसतं।।

**व्यक्ती तितक्या 'प्रकृती', हा वाक्प्रचार तुम्हाला माहिती असेलच. आपल्या आसपासही खूप सारे लोक असतात. वर्गात, शाळेत, शेजारी-पाजारी...**

**या लेखातही एका ठिकाणी काम करणाऱ्या तऱ्हेतऱ्हेच्या व्यक्ती, त्यांचे स्वभाव आपल्याला कळतील. ग्रामीण ढंगातल्या या अस्सल प्रसंगातून इरसाल बेबा भवानी आपल्याला भेटेल...**

घालीन! तुज्या बाचं काय गेलं म्हन्ते मी!''

आता चमचमीत भांडण ऐकायला मिळणार म्हणून सगळ्या सरसावून ऐकू लागल्या. पण विजयावैनीला म्हैस घेऊन घरला जायची घाई होती. शिवाय ती सर्वांत वडीलधारी होती. त्यामुळे तिने दोघींना दोन बाजूला ढकलत म्हटलं,
''आत्ता ग बया! पंचिमीचं गानं ऱ्हायलं बाजूला अन् ह्यो तमाशा कशापायी? चल गं जयाबाई, म्हन तुझं – सन आला पंचिमीचा, डोळं माझं ओलं!'

त्याबरोबर बायांनी हातात हात गुंफून आणि भांडण ऐकायची हौस आवरून फेर धरून नाचायला सुरुवात केली. जयाबाईने किनऱ्या आवाजात एकापाठोपाठ एक गाणी म्हटली. फुगड्या-झिम्म्याची धमाल उडली. लाह्यांचा प्रसाद नि हळदीकुंकू घेऊन सगळ्या आपापल्या घरला गेल्या. पण बेबा भवानी नंतर बराच वेळ सखूशी खुसखुस काहीतरी बोलत होती. शेवटी ती म्हणाली,

''तुजी शेजारनी व्हनारच बग मी!''

ज्ञान प्रबोधिनीच्या हराळीच्या फळबागांमध्ये दोन हजार लिंबांचा एक मोठा मळा आहे. त्यात मध्यभागी राखणदारांसाठी एक शेतघर आहे. त्याच्या एका अंगाला बेबा भवानी आणि तिची पोरगी राहायची नि दुसऱ्या अंगाला संकरू नि त्याची लहानगी बायको राहायचे. ती नुकतीच माहेराला गेली होती. दुसरं शेतघर होतं रोपवाटिकेत. तिथे सखू नि तिचा नवरा एका अंगाला राहायचा; दुसऱ्या अंगाचं घरकुल मोकळं होतं. त्यावरच बेबा भवानीचा डोळा होता. रोपवाटिकेतलं शेतघर म्हणजे लईच मजेचं होतं. तिथे तांबड्यालाल चेरीच्या फळांचा खच असे. कोवळी मेथी-कोथिंबीर, मिरची खुणावीत असे. बांधावर कवळ्या काकड्या नि केशरी पपया असत. शिवाय हिरवागार घेवडा केव्हाही तोडून शिजवावा किंवा कच्चा खावा; अमृतासारखा लागे. पण लिंबाच्या मळ्यात मात्र लिंबं नि चिंचा असल्या आंबट गोष्टींखेरीज काहीच नसायचं! म्हणून बेबा भवानीला रोपवाटिकेतलं घर पाहिजे होतं. पण हराळीतले कर्ते पुरुष अण्णा यांनी ते नव्या माळीबुवांसाठी राखून ठेवलं होतं.

बेबा भवानी एकदा तक्रार करत त्यांच्याकडे आली,

''आसं बगा अण्णा, तुमी मला थोरल्या भावासारकं. माजा तरास दुसऱ्या कोनाला सांगू? तो संकऱ्या कुटं उलथलेला आसतो कोन जानं! त्याची बाईल म्हायेराला चिकटलेली! मी येकली बाई! मला लई भ्या वाटतं!' (बेबा भवानीचा नवरा तिच्या करवादण्याला कंटाळून पळून गेला होता. पोरगी पण पळून गेली असती पण ती लहान होती!) बेबानं विनवणी केली,
''अण्णा मला सखूबाईपाशी ऱ्हाऊ द्या की!''

अण्णांवर असल्या नाटकांचा अजिबात परिणाम होत नसे. शांतपणे पण करड्या आवाजात ते म्हणाले, ''ज्याला जिथे नेमलं आहे तिथे त्यानं राहायचं. जा आता!'' बेबा भवानी नाइलाजाने धुसफुसत निघून गेली.

या गोष्टीला दोनच दिवस झाले असतील. बेबा भवानीची पोरगी मामाच्या गावाला गेली होती. सैंपाकघरातल्या बायकांच्या दुपारच्या चपात्या आटपल्या होत्या. त्या जरा

सेंट्रल पेन्शनवर मोफत सल्ला, पुरोहित, ज्ञान प्रबोधिनी
**प्रायोजक – शैलेंद्र केशव म्हसकर** (दूरभाष – २४४५१३१९)

निवांत टेकल्या होत्या तर लांबून बेबा भवानीचा चिरक्या आवाजातला आरडा त्यांच्या कानी आला. दचकून लगालगा साऱ्याजणी लिंब मळ्यातल्या शेतघराकडे धावल्या; तर काय! बेबा भवानी जमिनीवर कपाळ आपटत रडत-ओरडत होती. तिच्या घराच्या खिडकीच्या काचा फुटल्या होत्या. कपडे इकडेतिकडे फेकलेले होते. डबे आडवेतिडवे लोळत होते. दार सताड उघडं होतं. बेबा कर्कश आवाजात गागत होती,

''कुणी ग दावेदारानं दावा साधला! नशीब फुटलं गं माजं! कुटं जाऊ वो माय? आबाळ फुटलं बाय! कुटं सहारा मागू?'' सगळ्या बायका थबकून समोर पाहात राहिल्या.

विजयावैनी नेहमीच्या वडीलधारेपणाने पुढे सरसावल्या. बेबा भवानीच्या पाठीवर हात फिरवीत समजुतीच्या सुरात म्हणाल्या,

''उगी, उगी! रडू नगस. आसं आक्रित भर दिसा झालं कसं म्हनते मी! चोराची बी मोठ्ठी हिम्मत म्हनायची!''

यावर आकाशाला भिडणारा आवाज काढत बेबा भवानी सांगू लागली, 'काय सांगू माय, चार घास खाऊन लिंबाचं कुपन नीट कराया चालली व्हती मी! घटका दोन घटका नाय झाल्या तर संकरू सांगाया आला की तुजं घर चोरांनी लुटलं! चटका बसल्यागत उटली नि हितं धावली तर हे ऽऽऽ रामायेन! आता कसं करू गं माय! माजं दोन हज्जार रुपयं गेलं – कानातलं सोन्याचं झुमकं बी गेलं ग माऽऽ य!''

सैंपाकघरातल्या बायांना पण चटका बसला. रतनमावशी हळहळून म्हणाली,

''बाये, तू चल अण्णाकडं. समदं सांग त्येला. आमी बी येतो तुज्यासंगं.''

सगळ्या बायका कालवा करीत अण्णांकडे आल्या. बेबा भवानीने रडत भेकत आपल्यावर गुदरलेल्या संकटाची कहाणी त्यांना सांगितली. त्यांनाही सहानुभूती वाटली. दोन जाणती माणसं त्यांनी लिंबातल्या शेतघराकडे पाठवली. बेबाबाईला चार पैसे दिले पाहिजेत, अशा विचारात ते असतानाच संकरू गालातल्या


'मनुष्य घडण' या विषयावर राष्ट्रीय शिक्षण परिषद

**ज्ञान प्रबोधिनी – सुवर्ण महोत्सव आणि मातृमंदिर विश्वस्त संस्था – रौप्य महोत्सव**
यानिमित्त ज्ञान प्रबोधिनी, निगडी येथे राष्ट्रीय स्तरावरील शिक्षण परिषदेचे आयोजन केले आहे.

**कालावधी : दि. ६ ते ८ डिसेंबर**

★ पहिल्या दिवशी चर्चासत्र योजले आहे. **'२१ व्या शतकातील 'मनुष्य घडण'** या विषयावरील चर्चेमध्ये देशभरातील विविध शैक्षणिक प्रवाहांचे प्रतिनिधी मांडणी करतील.
★ दुसऱ्या दिवशी **मनुष्य घडणीतील अनुभव** आणि प्रयोग या विषयावर परिसंवाद होणार आहे. परिसंवादात आठ उपविषयांवर शिक्षक, मुख्याध्यापक, शिक्षण-संस्था चालक यांचे निबंध वाचन होईल.
★ तिसऱ्या दिवशी **खुले अधिवेशन** असून त्यात नामवंत शिक्षणतज्ज्ञ आपले विचार मांडतील, तसेच काही समांतर कार्यशाळांचे आयोजनही केले जाईल.

या परिषदेचे नोंदणी शुल्क तीनही दिवसांसाठी मिळून रु. ६०० असून त्यात निवास व भोजन व्यवस्थेचा समावेश आहे.
**अधिकाधिक शिक्षणप्रेमींनी या परिषदेत सहभागी व्हावे, हे जाहीर आवाहन.**

**संपर्क – ज्ञान प्रबोधिनी** ५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०
दूरभाष (०२०) २४२०७०००, २४२०७१९४ विवेक पोंक्षे – ०९४२०४८१२३३ आदित्य शिंदे – ०९९७०६३३०००
E-mail: educon@jnanaprabodhini.org
Website : www.erc-pune.org/conference


२० वर्षांची वाटचाल

जीवनाचिया वाटेवरती, क्वचित भेटली हिरवी झाडे ।
छायेमध्ये दाट जयांच्या, घेत विसावा बसलो थोडे ।।



गालात हसत समोर येऊन उभा राहिला. त्याला हसताना पाहून बेबा भवानी भडकून म्हणाली, ''माज्या समदया सौंसाराचा इस्कोट झाला नि हा मुडदा हासतुया!''

संकरू आणखीच हसून म्हणाला, ''आता हासू नको तर काय करू बेबामावशी? तुमाला सांगून मी हिरीवर निगालो. पन वाटेत ध्येनात आलं की प्याच्या पाण्याची बाटली घेतली न्हाई. म्हनून अर्ध्या वाटेतून परत आलो शेतघराच्या मागल्या रस्त्यानं. पाहातो तर काय, तुमी तुमच्या खोलीची शेवटची खिडकी फोडत व्हता! मंग तुम्ही कपड्याची गाठुडी इस्काटून टाकली! डबे बी तुमीच फेकले न्हवं! मी लपून पाहात होतो आन पैशाचं म्हनाल तर कालच तुमी मला पाचशे रुपये ठिवाया दिले होते. आन सोन्याचं झुमकं तुमच्याकडं कदी होतं हो?

बेबामावशी, दोन दिसापल्याड तुमी बंडाप्पाला बोलला होता की तुमाला सखूबाईच्या शेजारी, रोपवाटिकेत ऱ्हायाला यायचं म्हनून. लिंबातल्या शेतघरात चोरी झाली म्हनल्यावर अण्णा तुमाला सखूबाईशेजारी पाठिवनार! मंग काय, लाल फळं, कांदापात, घेवडा, मिरची, पपया नि समदी चैनच की! हाच तुमचा हिशोब न्हवं? येवड्यासाठी हा सगळा तमाशा! मंग सांगा, हसू नको तर काय करू? काय बी म्हना बेबामावशी, आपल्याच हातानं आपल्या घराच्या काचा फोडायच्या म्हंजे लईच भारी!''

सैंपाकघरातल्या मावशा थक्क होऊन संकरूचं बोलणं ऐकत होत्या. पहिल्या आश्चर्याची जागा आता चिरडीने घेतली. पहिला पुढाकार घेतला आनूमावशींनी. पदर कमरेला खोचत त्या पुढे सरसावल्या आणि एक दणका त्यांनी बेबा भवानीच्या पाठीत घातला! बाकीच्या बाया तिच्या झिंज्या ओढायला पुढे सरसावल्या. आपलं बिंग फुटलेलं पाहून बेबा भवानी पळ काढायला लागली. पुढे बेबा भवानी आणि मागे सैंपाकघरातल्या मावशा; अशी तुफान शर्यत सुरू झाली!

विजयावैनी एरवी मऊ आणि

दाखवायचे वेगळे, नि खायचे वेगळे दात।
करून सवरून सारे, कसे झटकाल हात।।



त्यांची म्हैसही तशी गरीबपैकीच! पण बेबा भवानीचा हा अजब तरीका पाहून विजयावैनी खवळल्या नि त्यांची म्हैसही खवळली! त्या दोघी दातओठ खाऊन बेबा भवानीच्या मागे धावू लागल्या!

म्हशीने शिंगं रोखली होती, डोळे तर्रावले होते, ती चांगली गरजतच धावत होती. म्हशीच्या चार पायांपेक्षा बेबा भवानीचे दोन काटकुळे पाय जास्त वेगाने धावत होते. बेबा दूरवर जाऊन थांबली. आपले हिरवे - घारे डोळे म्हशीवर आणि सैंपाकघरातल्या बायांवर रोखत ती किंचाळली-

''उगा माज्यावर आळी घिऊ नगा! मी न्हाई त्यातली!''

हे बोलणं बायकांना ऐकू आलं; पण खवळलेल्या म्हशीला बहुधा ऐकू आलं नाही अन् कळलं पण नाही! ती जीव खाऊन, शिंग रोखून बेबा भवानीचा पाठलाग करतच राहिली. रस्त्यातली उनाड कुत्री आ वासून टकाटका ही शर्यत पाहात होती.

बेबा भवानी शिव्या देत, धापा टाकत पळतच राहिली!...

**- स्वर्णलता भिशीकर**
ज्ञान प्रबोधिनी, हराळी, डाक तोरंबा,
ता. लोहारा, जि. उस्मानाबाद

**चित्रकार : निलेश जाधव**

बनवाबनवी करून, निभेल किती काळ? ।
कधीतरी होईलच, निरभ्र आभाळ ।।




**पाहा :** http://www.cooperhewitt.org
गंमतीदार संग्रहालयांची घरबसल्या सफर

# चिंब भिजल्या रानात



चिंब भिजल्या रानात
वाहे तृप्ततेची लाट
तोल सावरत गेली
दूर शिवारात वाट
पेरणीच्या धाकापायी
पाय वाटेनं चालती
बैल गळ्यातील माळा
बोल सुखाचे बोलती
जाते आभाळ सांडून
गाव सामसूम होते
माणसांची कारागिरी
जग नवे अंकुरते
जुन्या झाडांना पालवी
नवा पाऊस सोबती
थेंब अडले पानाशी
हळूवार ओघळती
दूर वडाच्या पोटात
एक हुंकारतो पक्षी
त्याची मोहतुंबी साद
फुले काळजाची नक्षी...
चिंब भिजल्या रानात
वाहे तृप्ततेची लाट
खेळ खेळतो हा आम्ही
इथे रेखले ललाट!

**सदानंद देशमुख**
जानेफळ, ता. मेहकर
जि. बुलडाणा 443304

**चित्रकार : राहुल देशपांडे**




ज्ञान प्रबोधिनीच्या शैक्षणिक प्रणालीच्या व प्रयोगांच्या विस्ताराचे,
प्रसाराचे व संघटनेचे एक प्रभावी माध्यम – छात्र प्रबोधन

कथा



# मायाजाल

जयंत नारळीकर

राजाने हात पसरवत जांभई देत डोळे उघडले. शेजारी राणी पहुडली होती. टक्क जागी; छताकडे पाहात. राजाने कुत्सित स्वरात म्हटले.

''पुन्हा तीच तक्रार का? झोप येत नाही हेच सांगणार ना काल्पनिक काळज्यांची सबब सांगून? खरं म्हणजे सामान्य स्त्रीपेक्षा तुझी स्थिती कितीतरी सुधारलेली नव्हे का? कौटुंबिक गाडा हाकण्याची जबाबदारी नाही तुझ्यावर...''

''पण कुटुंब आहे ना?'' राणी म्हणाली.

''म्हणजे? मी नाही समजलो!'' – राजा

''अहो विसरलात की काय आपल्याला एक वीस वर्षांची मुलगी आणि बारा वर्षांचा मुलगा आहे...'' राणी शांतपणे म्हणाली.

''नाही विसरलो बरे! पण दोघांचे उत्तम चालले आहे. त्यांना ना कोणा दुष्ट परीने शाप दिला किंवा ना त्यांच्या मागे एखादा राक्षस लागला. परिकथेतल्या पात्रांच्या तुलनेत त्यांची परिस्थिती किती तरी उत्तम आहे.'' राजा अर्धवट थट्टेनं म्हणाला.

''राजा म्हणून तुम्ही राज्याचे गहन प्रश्न सोडवता; पण जवळ उद्‌भवलेला आणि दिवसेंदिवस गहन होत चाललेला प्रश्न मात्र तुम्हाला दिसत देखील नाही! मी तो सोपा करून सांगते. सांगा, मायाचे वय काय?''

''तूच म्हणालीस ना २० म्हणून?'' राजा उत्तरला.

''नशीब, मी बोललेले ऐकून लक्षात ठेवलेत! मुलगी २० वर्षांची झाली. तिच्या लग्नाचा कधी विचार केलात? त्या







ज्ञान प्रबोधिनीची औपचारिक शिक्षणातील सर्वांगीण प्रयोगाची केंद्रे
– पुणे, निगडी, सोलापूर, साळुंब्रे, हराळी

२० वर्षांची वाटचाल

चिंतेने माझी झोप उडाली तर माझीच थट्टा करता,'' राणीला वाटले, आता तरी राजा सहानुभूती दाखवेल.

पण राजाला तिच्या बोलण्यातले गांभीर्य पटले नाही. तो हसत म्हणाला,

''ते माझ्या लक्षात आहे. मी प्रधानजींना सांगितले आहे की मायाचे स्वयंवर करायचे तर दोन गोष्टींचा विचार करा. एक म्हणजे योग्य वरांची यादी आणि दुसरी म्हणजे शारीरिक कर्तबगारीचे आव्हान.''

''जसे शिवधनुष्य रामायणात आणि मत्स्यवेध द्रौपदीच्या स्वयंवरात होते तसे?''

आता राणीच्या बोलण्यात उत्साह संचारला. ती पुढे बोलणार इतक्यात दारावर थपथप झाली आणि मायानेच प्रवेश केला. आपल्या खणखणीत सुरात ती उद्गारली,

''माझ्या लग्नाचे नियोजन करता? मग मला विचारा की! नाही तरी स्वयंवरात मलाच पती निवडायचा असतो, नाही का?''

राजा-राणी एकमेकांकडे पाहू लागले. मायाचे म्हणणे बरोबर होते. अखेर राजा उत्तरला, ''मग तुला काही बदल सुचवायचा आहे?''

तो मनातल्या मनात घाबरला होता कारण कधीकधी माया अतिशय अवघड शर्ती घाली.

''ते रामायण-महाभारतातले दिवस गेले! आता महत्त्व आहे मेंदूच्या कामगिरीला. स्वयंवराच्या वेळी मी पाच प्रश्न घालीन... जो ते सोडवेल त्यालाच मी वरेन.''

मायाचे विधान ऐकून राजाचे थोडे समाधान झाले, पण अजून एक शंका त्याच्या मनात होती ''माया, हे तुझे प्रश्न... गणितातले तर नव्हेत?'' त्याने विचारले. कारण त्याला मायाचे गणितप्रेम माहीत होते.

''अर्थातच!'' स्मित करत माया उद्गारली.

पण राजा-राणींच्या चेहऱ्यावर स्मिताला जागा नव्हती. गणिताचे उच्च शिक्षण घेतलेली त्यांची कन्या फार अवघड प्रश्न तर विचारणार नाही! तसे झाले तर तिला जन्मभर कुमारी म्हणून राहावे लागेल.

''घाबरू नका... मी फार अवघड प्रश्न विचारणार नाही!'' माया त्यांच्या मनातले ओळखून म्हणाली.

***

**गणितातला (किंवा इतर कोणत्याही शास्त्रातला) कूट प्रश्न सोडवायचा असेल तर त्यातल्या सर्व गोष्टींचा तर्कशास्त्र वापरूनच सर्वांगांनी विचार केला पाहिजे. प्रत्येक गोष्टीचा सारासार विचार आणि शक्यता पडताळून पाहिल्या तरच त्याचे उत्तर सापडते.**
**या कथेतले कूटप्रश्न सोडविण्यासाठी आपणही ते प्रश्न सोडवण्याचा नक्की प्रयत्न करा...**

आधी सांगिल्याप्रमाणे माया गणिताचे उच्च शिक्षण घेऊन विद्यापीठातून बाहेर पडली होती. त्यासाठी तिने दिलेल्या परीक्षेत पहिल्या वर्गात उत्तीर्ण झालेल्यांना वादविशारद म्हटले जाई. सर्वोच्च स्थान पटकावणाऱ्याला ज्येष्ठ वादविशारद या नावाने सन्मानित केले जाई. माया ही चौथ्या क्रमांकावरील वादविशारद होती. वादविशारदात गणितातले कूट प्रश्न सोडवणे, नवे प्रश्न निर्माण करणे किंवा गणिती विधाने तपासणे आदी (इतरांना किचकट वाटणारी) कामे करायचे कौशल्य अपेक्षित होते. तेव्हा स्वयंवरात माया अवघड प्रश्न विचारणार हे त्यासाठी आलेले पाहुणे जाणून होते.

तरीपण स्वयंवरात लग्नेच्छु राजपुत्रांची संख्या ७५ होती. प्रत्येकाबद्दल एक पानी माहितीपत्र छापले असून, त्याच्या प्रतिकृती प्रेक्षकांत वाटल्या होत्या. स्वत:च्या माहितीत बहुतेकांनी आपण कोणती शक्तीची कामे केली,

कुठले भूभाग जिंकून आपले साम्राज्य वाढवले; याचे रसभरित वर्णन केले होते. अशी वर्णने वाचून मायाचा चेहरा पडला. आपले प्रश्न या महाभागांच्या डोक्यावरून जाणार हे तिने ओळखले; पण अखेर तिच्या चेहऱ्यावर स्मिताची लकेर उमटली. एका तरुणाने स्वत:च्या माहितीत एवढेच लिहिले होते –

''मला शारीरिक कसरतीपेक्षा बौद्धिक आव्हाने आवडतात. मी विद्यापीठात तिसरा वादविशारद होतो.'' 'ठीक आहे... आता दिसेलच!' माया म्हणाली.

मायाचे स्वयंवर सुरू झाले. प्रथम तिने सर्व निमंत्रितांना अभिवादन करून घोषणा केली की, ती एका पाठीमागे दुसरा मग तिसरा असे क्रमाने प्रश्न विचारणार आहे. पहिला प्रश्न बरोबर सोडवणाऱ्यांनीच दुसरा सोडवायला घ्यावा. तो ज्यांना यशस्वीरीत्या सुटेल त्यांनी तिसऱ्या प्रश्नाचे आव्हान घ्यावे. अशा तऱ्हेने पाच प्रश्न पूर्ण झाल्यावर मग पुढचे पाहू.

''इथे कागद, पेन आहेत.. पण कॅल्क्युलेटरची सोय नाही,'' एका राजपुत्राने तक्रार केली.

''त्याची काळजी करू नका,'' माया स्मितहास्य करत उद्गारली. ''माझ्या कुठल्याही प्रश्नासाठी तुम्हाला आकडेमोड करावी लागणार नाही. निदान कॅल्क्युलेटरची गरज भासणार नाही. मग, मायाच्या सूचनेनुसार पहिला प्रश्न पडद्यावर उमटला

***

*एका बंदरात एक बोट उभी असून, तिच्या मागच्या भागात एक शिडी सरळ खाली लोंबती आहे. ओहोटीच्या वेळी शिडीचा सर्वात खालचा भाग पाण्याला जेमतेम स्पर्श करतो. शिडी चढण्याच्या दांड्या प्रत्येकी एक फुटाच्या अंतरावर आहेत, म्हणजे पहिली दांडी पाण्याच्या स्तरापासून एक फुटावर असणार. जेव्हा भरती येते तेव्हा पाण्याची उंची अडीच फुटांनी वाढते. अशा स्थितीत शिडीच्या किती काठ्या पाण्याखाली जातील?*

प्रश्नानंतर प्रश्न सोडवायला दिलेली वेळ होती पाच मिनिटे. त्यापेक्षा पुष्कळच कमी वेळात सर्वांनी आपली उत्तरे समोरच्या बंद पेटीच्या खाचेतून आत टाकली. काही अपवाद वगळता बाकीची उत्तरे होती : ''दोन काठ्या.''

''हे उत्तर चूक आहे,'' माया म्हणाली.

ती पुढे काही बोलणार इतक्यात पाच-सहा स्पर्धक उभे राहून आपले उत्तर का बरोबर ते सांगू लागले. थोडक्यात, त्यांचा दावा असा; जर पाण्याची उंची अडीच फुटांनी वाढली तर त्या उंचीत शिडीच्या दोन आणि दोनच काठ्या बुडतील; हे साधे गणित चूक काय म्हणून?

''महाशय! जरा विचार करा.'' माया उत्तरली. जर भरतीमुळे पाण्याची उंची वाढली तर बोट तेवढीच वर उचलली जाणार आणि तिच्यावरच्या शिडीचा स्तर पण उंचावणार! नाही का? तेव्हा पूर्वीप्रमाणेच शिडीचे खालचे टोक पाण्याच्या पृष्ठभागाला स्पर्श करत राहील.''

आणि मायाचे उत्तर बरोबर होते. याबद्दल वाद नव्हता. तिच्यासारखेच उत्तर मिळवणारे आणखी सहाजण होते. बौद्धिक आव्हानांचा समर्थक तरुण त्यांत होता हे तिच्या लक्षात आले.

***

''आता पुढचा प्रश्न पाहा. हा फक्त पहिल्या प्रश्नाच्या अडसरातून पुढे आलेल्या सहाजणांसाठी आहे.'' मायाने प्रश्न वाचला तो असा होता.

*एक विक्रेता माल विकण्यासाठी घराघरांतून जात होता. एका घरी मालकीणबाई त्याचा माल पाहून म्हणाल्या,*

*''मी काही गोष्टी विकत घेईन. जर तू माझा प्रश्न सोडवलास तर!''*

*''सांगा बाईसाहेब!'' विक्रेता म्हणाला.*

*मालकीणबाई म्हणाल्या, ''माझ्या तीन मुलींच्या वयाची*

आकड्यांचा खेळ, प्रमेयांचा मेळ।
गुंतागुंत किती, त्यात सरे वेळ।।

*बेरीज १३ आहे. त्यांच्या वयांचा गुणाकार या घरनंबराइतका आहे. तर त्यांची वये सांग.''*

*विक्रेत्याने दारावरील नंबर नोट करून आपल्या डायरीत काही गणित मांडले. मग त्याच्या कपाळावर आठी उमटली. किंचित तक्रारीच्या सुरात तो घरमालकिणीला म्हणाला,*

*''बाईसाहेब! प्रश्न सोडवायला तुम्ही दिलेली माहिती पुरेशी नाही.''*

*थोडा विचार करून मालकीणबाई उत्तरल्या, ''तुझे म्हणणे बरोबर आहे. मी तुला आणखी एक माहिती देते. माझी सर्वात मोठी मुलगी पेटी (हार्मोनियम) छान वाजवते.''*

*ते ऐकून विक्रेत्याचा चेहरा फुलला आणि तो म्हणाला ''आता मी तुमचा प्रश्न सोडवू शकतो.''*

*आणि त्याने मुलींची वये बरोबर सांगितली. तर तुम्ही ती वये सांगू शकता का? प्रश्न सोडवायला वेळ तीस मिनिटे.*

प्रश्न पडद्यावरही होता आणि तीस मिनिटांचे घड्याळ टिक टिक करू लागले. वेळ संपल्यावर मायाने उत्तरे तपासली. ती उद्गारली,

''तिघांची उत्तरे बरोबर आहेत. १३ चे तीन पूर्णांकी भाग करून त्यांचा गुणाकार करून पाहा. उदाहरणार्थ जर १३ = ३ + ४ + ६ तर ३ × ४ × ६ = ७२. आणखी कुठल्याही अशाच तीन भागांचा गुणाकार ७२ पेक्षा वेगळा आहे. जर घरनंबर ७२ असता तर विक्रेत्याने लगेच उत्तर दिले असते की मुलींची वये ३, ४, ६ आहेत. दिलेली माहिती पुरेशी नाही असे विक्रेत्याला वाटले. याचा अर्थ घरनंबर असा असेल की एकापेक्षा अधिक त्रिकूटांचा गुणाकार त्या घरक्रमांकाएवढा असेल. १३ चे असे भाग पडले तर? १३ = ९ + २ + २ आणि १३ = ६+६+१. दोन्ही बाबतींत गुणाकार ३६ आहे. घरनंबर ३६ असला तर विक्रेत्यापुढे पेच येतो की दोन्हीतले त्रिकूट कुठले. पण जेव्हा त्याला कळले की दुसऱ्या त्रिकूटात दोन मोठ्या मुली आहेत, एक नव्हे. तेव्हा ते उत्तर नक्की नसणार हे घरमालकिणीच्या दुसऱ्या विधानावरून त्याला समजले. तुम्ही पूर्ण हिशोब लावलात तर तुम्हाला कळेल की अशा तऱ्हेची समान गुणाकार असलेली इतर त्रिकुटे नाहीत.'' म्हणून ९, २, २ ही वये हे उत्तर बरोबर ठरले.

बहुतेक राजपुत्रांच्या डोक्यावरून जाईल असे ते तर्कशास्त्र होते. पण ज्या तिघांनी हा प्रश्न बरोबर सोडवला त्यांच्या ते चांगल्या परिचयाचे होते. त्यांत तिसरा वादविशारदही होता.

***

त्यानंतर एका तासाचे मध्यांतर होते. त्या काळात ते निवडक तिघे सोडल्यास बाकीचे मजा मस्तीत मग्न होते. अखेर मध्यांतर संपल्याची घंटा झाली. सर्वजण स्थानापन्न झाल्यावर माया म्हणाली,

''हा प्रश्न लहानसा आणि सोपा आहे. तरीपण तो सोडवायला मी पाऊण तास देते.'' प्रश्न असा होता –

*एका जंगलात एका राक्षसाने एका राजकन्येला कैद करून ठेवले होते. कैदेची जागा गुप्त होती. पण एका हुशार राजपुत्राने ती शोधून काढली. चित्र १ मध्ये ती x येथे दाखवली आहे. ती जागा राजपुत्र होता तेथून ३०*




**चित्र क्र. १ :** राजपुत्र P येथे तर राजकन्या X येथे आहे व XP दरम्यान घनदाट जंगल आहे. XP हे अंतर ३० किलोमीटर इतके आहे.

SM

# *S. M. Electric Works*

***An ISO 9001-2000 Certified Company***

***ELECTRICAL ENGINEERS,***
***CONSULTANTS***
***& GOVT. 'A' CLASS CONTRACTOR***

***Happy Diwali !***

## *Shri Sai Floriculture*

**Site: Plot no 27, Ambi MIDC,**
**Talegaove, Floriculture Park, Pune.**

Prop : **S.M. Saraf**
Mob : 9850843094

**Head Office : Plot No. 1, 'Aishwarya',**
**Bhagya Chintamani Society, S. No. 81/5A/2,**
**Paud Road, Kothrud, Pune - 411 038.**
**Email : smelectricworks@yahoo.com**

**पाहा :** http://www.metric conversions.org
विविध मोजमापे आणि त्यांच्यातील रूपांतरे शिकण्यासाठी

२० वर्षांची वाटचाल

*किलोमीटरवर होती. राजपुत्राची जागा चित्रात P येथे दाखवली आहे. राजपुत्र अर्थातच राजकन्येला सोडवायला आला होता.*

*x आणि P मधील प्रदेशात घनदाट जंगल असल्याने राजपुत्राला राजकन्येपर्यंत पोचायला वेळ लागणार होता – कदाचित जाणे अशक्यच असावे. अशा वेळी राजपुत्राने त्याला मदत करणाऱ्या परीला बोलावले. तिने येऊन त्याला एक बुटांची जोडी दिली.*

*''हे बूट घातलेस की तुझे एक एक पाऊल १०० किलोमीटरचे पडेल. तू पटकन जाशील राजकन्येपर्यंत. ती तर फक्त ३० किलोमीटरवर आहे.'' असे म्हणून ती निघून गेली. पण राजपुत्राचा प्रश्न सुटेना. राजकन्येच्या दिशेने एक पाऊल टाकल्यावर तो तिच्यापासून ७० कि.मी. दूर गेला. अशा स्थितीत त्याने काय करावे?*

माया म्हणाली होती की, हा प्रश्न सोपा आहे. पण ते तिघे प्रतिस्पर्धी त्यावर लगेच तोडगा काढू शकले नाहीत. बाकीचे (स्पर्धेतून गळलेले) राजपुत्र तर 'ही गोष्ट अशक्य आहे,' असे ठरवून पुढे काय होते याची उत्सुकतेने वाट पाहात होते.

पण पाऊण तास संपायला आला तसे तिघे स्पर्धक स्मित करत उभे राहिले. प्रत्येकाला




**चित्र क्र. २ :** L हा बिंदू X आणि P पासून प्रत्येकी १०० किलोमीटरवर असावा. म्हणजे त्रिकोण LXP च्या तीन भुजा LX = १०० कि.मी. PX = ३० कि.मी. आणि PL = १०० कि.मी. हा त्रिकोण सहज काढता येतो.

उत्तर सापडले होते. मायाने तपासले आणि तिघांची उत्तरे बरोबर असल्याचा निर्वाळा दिला.

चित्र क्र. २ मध्ये ते उत्तर पाहा! राजपुत्राने पहिले पाऊल PL वर आणि दुसरे LX वर टाकावे. PXL हा समद्विभुज त्रिकोण आहे.

चित्रात दिल्याप्रमाणे उत्तर इतके सोपे होते हे जाणून स्पर्धेतून गळालेले राजपुत्र हळहळले.

***

''हा चौथा प्रश्न अवघड आहे आणि त्यासाठी तुम्हाला तर्कशास्त्र वापरावे लागेल हे आधीच सांगते.'' असे म्हणून मायाने प्रश्न सांगितला, तो असा–

*एका शाळेत ४० व्रात्य मुले होती. मात्र कुठल्याही पालकाला विचारल्यास त्याला स्वत:चे मूल वगळून बाकीच्या मुलांपैकी कोण व्रात्य आणि कोण सरळमार्गी हे माहीत होते. या व्रात्य मुलांना त्यांच्या पालकांनीच शासन करावे, अशा उद्देशाने शाळेच्या मुख्याध्यापकांनी त्यांच्यासाठी फतवा काढला : ''या शाळेत काही व्रात्य मुले आहेत. त्यांच्या पालकांना आवाहन केले जात आहे की त्यांना आपले पाल्य व्रात्य असल्याची खात्री झाल्यास त्यांच्या केसांचा पूर्ण गोटा करून त्यांना शाळेत पाठवावे.''*

*फतवा निघाल्यावर शाळेचे उपमुख्याध्यापक उत्सुकतेने वाट पाहू लागले की, केव्हा गोटा केलेली मुले शाळेत येतात. तीन दिवस उलटले तरी असे काही घडले नाही. तेव्हा ते मुख्याध्यापकांकडे प्रश्न विचारत आले : ''व्रात्य मुलांचे पालक अजून स्वस्थ का? त्यांना तुमचा फतवा नीट कळला असेल का?''*

''त्याची काळजी नको!

*सगळे पालक अतिशय तर्कशुद्ध विचार करतात. योग्य दिवशी ते कार्यवाही करतील,'' मुख्याध्यापक म्हणाले.*

*''योग्य दिवशी? म्हणजे केव्हा?'' उपमुख्याध्यापक चकित होऊन म्हणाले.*

*मुख्याध्यापक हसले आणि उत्तरले, ''चाळीस दिवसांनी!''*

*आणि खरोखरच ४० व्या दिवशी सगळी (४०) व्रात्य मुले गोटा केलेल्या स्थितीत शाळेत आली. तर त्यांच्या पालकांनी असे का केले? ते ४० दिवस का थांबले?*

या प्रश्नावर त्या तिघा स्पर्धकांच्या वेगवेगळ्या प्रतिक्रिया पाहून मायाला गंमत वाटली. स्पर्धक-१ हा आपल्या जागी स्वस्थ बसून होता, डोळे मिटून. तो बहुधा विचारमग्न असावा. स्पर्धक -२ बसायची जागा सोडून खोलीत येरझाऱ्या मारत होता. त्याची विचार करतानाची ही पद्धत असावी. तर स्पर्धक-३ लिहिण्याचे पॅड घेऊन त्यातील कागदांवर आडव्या उभ्या रेघोट्या काढत होता.

या प्रश्नासाठी दोन तासांचा अवधी दिला होता. तो संपता संपता स्पर्धक -१ आणि २ यांनी हात वर करून आपण प्रश्न सोडवल्याचे जाहीर केले. मायाने प्रत्येकाशी वेगळी चर्चा करून निर्वाळा दिला - दोघांनी प्रश्न बरोबर सोडवला होता. नंतर ती स्पर्धक -३ कडे गेली. त्या बिचाऱ्याला त्याच्या रेघोट्यांनी योग्य मार्गदर्शन केले नव्हते!

प्रथम आपण मायाच्या प्रश्नाचे उत्तर समजून घेऊ. समजा, त्या शाळेत एकच व्रात्य विद्यार्थी होता. त्याचे पालक सोडून बाकीच्या पालकांना त्याची माहिती होती. खुद्द त्या व्रात्य विद्यार्थ्याच्या पालकांना मात्र असे कोणी व्रात्य विद्यार्थी माहीत नसणार. पण ज्या अर्थी मुख्याध्यापकांनी शाळेत व्रात्य विद्यार्थी आहेत, असे म्हटले त्या अर्थी आपलाच पाल्य व्रात्य आहे हे सिद्ध होते! असा निष्कर्ष काढून त्या विद्यार्थ्याचे पालक त्याला गोट्याची शिक्षा देऊन पहिल्या दिवशी शाळेत पाठवतील.

आता समजा, शाळेत दोन विद्यार्थी A आणि B व्रात्य आहेत. त्यांच्या पालकांना अर्थातच प्रत्येकी एक व्रात्य मुलगा आहे असे सुरुवातीला वाटते. पण जेव्हा शाळेत एकच व्रात्य मुलगा असतो तेव्हा त्याला पहिल्या दिवशी शिक्षा होईल. A च्या पालकांना वाटते की जर A व्रात्य नसेल तर B हा एकमेव व्रात्य मुलगा! त्याचे पालक त्याला पहिल्या दिवशी शिक्षा करतील. B च्या पालकांची विचारसरणी तीच असून, ते पहिल्या दिवशी A ला शिक्षा होईल अशा अपेक्षेत असतात. अर्थातच पहिला दिवस काही न करता जातो. तेव्हा A आणि B च्या पालकांना पटते की आपला पाल्य व्रात्य आहे. म्हणून दुसऱ्या दिवशी A आणि B दोघे गोटा करून शाळेत येतील

हे तर्कशास्त्र वापरून ३, ४, ५... व्रात्य मुलांवर अशी चर्चा होऊ शकते. त्यांतून निष्कर्ष निघतो की जितके व्रात्य विद्यार्थी तितके दिवस थांबून त्यांचे पालक त्यांना शिक्षा करतील.

***

''आता आपण शेवटच्या प्रश्नाकडे येऊ. दोनच स्पर्धक उरलेत. तेव्हा कोण जिंकला हे ठरवताना केवळ प्रश्न बरोबर सोडवला हे पुरे ठरणार नाही - तर कमीतकमी वेळात कोणी सोडवला हे पण पाहिले जाईल. हा प्रश्न बरोबर सोडवायला हवा तितका वेळ घ्या! आणि प्रश्न असा आहे :-''

माया बोलता बोलता थांबली कारण दरबारी पोशाखात आलेल्या एका सेवकाने तिच्यापुढे एक चांदीची ताटली केली आणि त्यात एका कागदाकडे तिचे लक्ष वेधले.

**(पान क्र. ११४ वर पुढे सुरू)**

यश म्हणजे अपयशाची उलट बाजू असते, म्हणून चिकाटी व प्रयत्न सोडू नका; कारण तुम्हाला दूर वाटणारे यश तुमच्या अगदी जवळ असते.

# नकाशाच्या दुनियेतील जादूगार

डॉ. राहुल मुंगीकर

एके दिवशी संध्याकाळी माझा छोटा मुलगा (इ. पहिली) एका चित्रपटात एक अद्ययावत अशी गाडी भरधाव वेगाने जात असल्याचे पाहात होता. गाडीमध्ये सर्व प्रकारच्या सोयी-सुविधा होत्या. गाडीच्या डॅशबोर्डवर गाडी कोणत्या रस्त्यावरून जात आहे, कोणत्या दिशेस जात आहे, गाडीचा वेग, आजूबाजूचा नकाशा अशा सर्व गोष्टी दिसत होत्या. चिरंजीव एकदम ओरडले, 'बाबा हे तर 'गुगल अर्थ' सारखे आहे ना?' मीही क्षणभर अचंबितच झालो. परंतु ते त्याने बरोबर ओळखले होते. त्यानंतर मीही विचार करीत होतो की खरंच जग किती प्रगत होत चाललं आहे. विशेषत: आजची पिढी अगदी त्यांच्या लहानपणापासूनच संगणकावरील अनेक गोष्टींशी परिचित झालेली आहे. नकाशा पाहाणे, रस्ते शोधणे, डोंगरदऱ्या यांची माहिती घेणे अशा प्रकारची आवड अनेक मुला-मुलींना असते. पूर्वी यासाठी आपल्याकडे पुस्तके, नकाशे यांसारखे काही प्रकाशित साहित्य उपलब्ध होते. सध्याच्या युगात प्रत्येक जुन्या गोष्टीसाठी नवीन पर्याय शोधला जातो. त्यातील नकाशा किंवा भौगोलिक माहितीसाठी अत्यंत समर्पक संगणकीय पर्याय म्हणजे 'गुगल अर्थ'सारखे सॉफ्टवेअर. खरे तर या गुगल अर्थच्या तंत्राचा वापर आपल्या भोवतालच्या बऱ्याच यंत्रांमध्ये विविध प्रकाराने केलेला आहे.

गुगल अर्थ वापरण्यासाठी सर्वात आवश्यक बाब म्हणजे आपल्याकडे इंटरनेट कनेक्शन असणे आवश्यक आहे. इंटरनेटच्या माध्यमातूनच गुगल पृथ्वीवरील सर्व भूभागांची माहिती सतत आपल्यापर्यंत पोहोचवत असते. गुगल अर्थ वापरण्यासाठी ते प्रथम आपल्या संगणकावर डाऊनलोड करणे आवश्यक आहे. त्यासाठी इंटरनेटच्या earth.google.com/download-earth.html या वेबसाईटवर जाऊन ते आपल्या संगणकावर घ्यावे व वेबसाइटवर दिलेल्या सूचनांनुसार ते चालू करून घ्यावे. गुगल अर्थचा छोटा लोगो (चित्र) आपल्या संगणकाच्या डेस्कटॉपवर दिसतो. त्यावर क्लिक केले की गुगल अर्थच्या अंतरंगात आपण शिरतो. प्रथम गुगलच्या काही टिप्स् दिसतात; त्यात नवीन पर्यायांची माहिती दिलेली असते. या टिप्स् बंद केल्यावर गुगल अर्थचा मुख्य स्क्रीन आपल्यापुढे येतो. यात डाव्या बाजूस **सर्च, प्लेसेस** व त्याखाली **लेअर्स** असे तीन रकाने असतात. याशिवाय स्क्रीनच्यावरच्या भागात दोन आडव्या ओळी असतात. या सर्व पर्यायांचा वापर वेगवेगळ्या वेळी विशिष्ट प्रकारच्या नकाशांच्या संदर्भातील काम करण्यासाठी होतो. **मुख्य स्क्रीनच्या दुसऱ्या ओळीवर** अन्य काही पर्याय चिन्हांकित स्वरूपात दिलेले आहेत. यात मुख्यत्वे जागांची नोंद करणे, विशिष्ट जागांची/भागांची सीमा/नकाशे काढणे, जुने नकाशे बघणे, जागांचे मोजमाप

**घर बसल्या जगाची सफर करायचीय? खोटं वाटतंय? पण ते खरंय! जगातलं कोणतंही ठिकाण मग ते परदेशातलं, देशातलं, शहरातलं असो. (ते तुम्हाला नक्की पाहाता येईल.) तुमच्याकडे इंटरनेट आणि 'गुगल अर्थ' सॅटेलाईट मॉडेल असलं की झालं ! सफर कशी करायची ते वाचा या लेखात...**

करण्यासाठी मोजपट्टी इत्यादी पर्याय उपलब्ध असतात. मुख्य स्क्रीनच्या वरच्या डाव्या कोपऱ्यात नकाशावर एक **कालदर्शक पट्टी** दिलेली असते. याच्या मदतीने आधीच्या वर्षातील नकाशे पाहावयास मिळतात. नकाशाच्या खालच्या डाव्या कोपऱ्यात **नकाशाचे प्रमाण दाखविणारी पट्टी** दिलेली असते तर उजव्या बाजूकडील खालच्या कोपऱ्यात जगाचा **छोटा नकाशा** व त्यात आपण सध्या पाहात असलेला भाग दर्शविलेला असतो. उजव्या बाजूला वरती **दिशादर्शक गोल** असतो. त्याला लागूनच नकाशा **लहान मोठा करण्यासाठी पट्टी** दिलेली आहे. मुख्य स्क्रीनच्या सर्वात खालच्या बाजूला आडवी ओळ दिलेली असते. त्यावर आपण नकाशातल्या ज्या बिंदूवर आहोत त्या ठिकाणचे **अक्षांश-रेखांश** पाहावयास मिळतात. याचबरोबर त्या जागेची समुद्रसपाटीपासूनची **उंची** व आपण तो भाग नकाशात किती उंचीवरून पाहात आहोत हेही आपणांस बघावयास मिळते. प्रत्यक्ष वापरताना या सर्व पर्यायांची ओळख अधिक व्यवस्थितपणे होण्यासाठी या माहितीचा तुम्हाला नक्कीच उपयोग होईल. हे सगळे पर्याय कसे वापरावेत याची माहिती घेऊया.

सुरुवातीस आपण एखादे ठिकाण कसे शोधले जाते व सेव्ह कसे करून ठेवता येते ते पाहूयात. वर नमूद केल्याप्रमाणे डाव्या बाजूकडील सर्च या पर्यायाचा वापर यासाठी केला जातो. **सर्च** म्हणजे शोधणे. गुगल अर्थच्या मदतीने जगातील कोणतेही शहर, देश, भौगोलिक भूभाग, नदी, पर्वत, समुद्र इत्यादी व याशिवाय अनेक गोष्टी आपण शोधू शकतो. सर्चमध्ये तीन पर्याय उपलब्ध आहेत. यांपैकी ***फ्लाय टू*** पर्यायामध्ये आपण आपल्याला पाहिजे त्या जागेचे किंवा स्थळाचे नाव टाकल्यास गुगल अर्थ थेट त्या जागेपर्यंत पोहोचते व ती जागा मोठी करून दाखवते. जर आपण दिलेले नाव हे गुगल अर्थच्या माहितीवर नसेल तर कदाचित ते सापडणार देखील नाही. अशावेळी त्या ठिकाणच्या जवळील मोठ्या खुणेचा वापर शोध घेण्यासाठी करावा. या पद्धतीने आपण आपल्या घराचा, शाळेचा शोध गुगल अर्थच्या फ्लाय टू पर्यायाद्वारे जरूर घ्यावा.

सर्चमधील दुसरा पर्याय हा ***फाईंड बिझनेस*** असा आहे. यात प्रामुख्याने जगातील प्रसिद्ध स्थळे, हॉटेल्स, कंपनी, संग्रहालये, विद्यापीठे अशासारख्या नामांकित जागा शोधता येतात. यासाठी अशा जागा गुगल अर्थने कोठे शोधाव्यात यासाठीचा पर्यायही यात उपलब्ध आहे. समजून घेण्यासाठी आपण एक प्रयोग करूया. फाइंड बिझनेसमध्ये *व्हॉट* या पर्यायामध्ये बालगंधर्व रंगमंदिर असे टाइप करा व *व्हेअर* या पर्यायात पुणे असे लिहा व बघा तुम्हाला 'बालगंधर्व' सापडते का?

सर्चच्या तिसऱ्या पर्यायात आपणांस कोणत्याही **दोन ठिकाणांमधील रस्ता** माहीत करून घेता येतो. यातील प्रयोग म्हणून पुणे ते मुंबईमधील रस्ता सापडतो का बघा? (आपल्या घरापासून शाळेपर्यंतचा रस्ताही या पद्धतीने शोधायला हरकत नाही. परंतु यासाठी आपणास आपल्या घराजवळील किंवा शाळेजवळील मोठी खूण जी नकाशावर दिसू शकेल, नाव व स्वल्पविराम देऊन शहराचे नाव देणे आवश्यक आहे.) याशिवाय आपल्याला सर्च मधून एखाद्या जागेचे अक्षांश-रेखांश माहीत असतील तर ती जागादेखील शोधता येते. अशावेळी जागेच्या नावाची आवश्यकता नसते.

सर्चमध्ये शोधलेल्या जागा किंवा ठिकाणे ही पुढे



कै. रामचंद्र जनार्दन काळे स्मरणार्थ
**प्रायोजक - सौ. सुलभा आशिष फडके, पुणे**

आपल्याला परत परत बघायची असल्यास अशी ठिकाणे सेव्ह करणे आवश्यक आहे. सर्चमधून आपण आपल्या नियोजित जागेवर पोहोचल्यावर स्क्रीनवरील सर्वात वरच्या ओळीवर असलेल्या पर्यायांमधील डावीकडून दुसरा **ॲड प्लेसमार्क** चा पर्याय निवडा. त्यावर क्लिक केले की प्लेसमार्कचे चिन्ह आपल्याला स्क्रीनवर दिसते. माऊसच्या मदतीने आपल्याला हव्या त्या ठिकाणी आपण ते चिन्ह ठेवू शकतो व त्याला योग्य ते नाव देऊन **सेव्ह** करता येते. अशा सेव्ह केलेल्या जागा किंवा ठिकाणे आपल्याला प्लेसेसच्या रकान्यामध्ये साठवून ठेवलेल्या दिसतील. या पद्धतीने आपण वर शोधलेली सर्व ठिकाणे सेव्ह करून घेऊ शकतो. पुढच्या वेळी जेव्हा आपण पुन्हा गुगल अर्थ चालू करू तेव्हा ही सर्व ठिकाणे आपल्याला **माय प्लेसेस**च्या रकान्यात आलेली दिसतील. यावर क्लिक केले की थेट त्या जागेपर्यंत लगेच जाता येईल.

गुगलच्या मुख्य स्क्रीनवरील डाव्या बाजूच्या पर्यायांमधील सर्वात खालचा पर्याय **लेअर्स** हा असतो. नकाशांमध्ये आपण काय काय गोष्टी पाहू शकतो याची यादी यात असते. यातील जे पर्याय आपण निवडू ते आपल्याला आपल्या गुगलच्या नकाशात दिसू लागतील. या पर्यायांमध्ये रस्ते, जागांची नावे व विशिष्ट जागांची सांकेतिक चिन्हे,




**पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिर**

**शोधा :** गुगल → सर्च → फाईंड बिझनेस → व्हॉट (टाईप करा - बालगंधर्व) → व्हेअर (टाईप करा - पुणे)

The true success of
a human being
lies in hardwork.

Happy Diwali !

Padmini Enterprises

**Dealers in Pathological Instruments, Chemicals & Reagents**

**Address :** Office No. 113, Swamipuram,
Wing 'C', 2160 A, Sadashiv Peth,
Near Dandekar Bridge, Pune - 411 030.
**Phone No.:** 020-24327533 **Mobile No.:** 9822113598 / 9850652562

Envirotech

*Happy Diwali !*

**B. S. Joshi**

M-94/773, Swami Samarth Soc.,
Opp. Saubhagya Karyalaya,
Maharshinagar, Pune-37.
Phone : 020-24264685
Fax : 020-24264685
Mobile : 9422000890

* Environmental Consultants
* NH Approach Permissions
* High Explosives Clearances
* Solutions to Revenue Matters

शु भ दी पा व ली

मनमोहक, आकर्षक, रंगसंगती
कुटुंबातील प्रत्येकांना
एक वेगळा सुखद-आनंदमयी अनुभव,
अत्याधुनिक व आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त
भारतातील एकमेव वातानुकुलित पेंट शोरूम...

SINCE-1952
ग्राहकांचा विश्वास हेच आमचे यश...
भारत पेंट कंपनी
a paint showroom

पाहा : http://www.rubiks.com
रुबीकच्या घनाचे दृकश्राव्य किस्से

२० वर्षांची वाटचाल

जगप्रसिद्ध ठिकाणे, त्रिमितीय इमारती, समुद्र, वातावरणाची माहिती अशा प्रमुख व अन्य कितीतरी प्रकारच्या माहितीचे पर्याय उपलब्ध आहेत. माऊसच्या मदतीने आपण हे पर्याय निवडू शकतो. आपले नकाशे जसजसे मोठे करून पाहू तसतसे यातील निवडलेली माहिती आपल्याला दिसायला सुरुवात होते. जेवढे जास्त माहितीचे पर्याय आपण निवडू त्या प्रमाणात गुगलवर माहिती दिसण्यास अधिक वेळ लागू शकतो.

गुगल अर्थ हे कसे चालू करावे व त्याचा वापर कसा करावा हे आपण पाहिले. परंतु केवळ ही माहिती संगणकावर बघून पुरेसे नाही तर आपल्याला त्याचा वापर आपल्या अभ्यासातही करता आला पाहिजे. यासाठी काही अधिक गोष्टींची माहिती घेणे क्रमप्राप्त आहे. समजा, आपल्याला आपल्या शाळेभोवतालचा परिसर नकाशात दाखवायचा असेल तर प्रथम आपण आपली शाळा वर सांगितल्याप्रमाणे शोधून काढावी. यानंतर स्क्रीनवरील दुसऱ्या आडव्या ओळीतील **ॲड पॉलिगॉन** या चिन्हावर क्लिक करावे. याबरोबर एक छोटा चौकोन स्क्रीनवर दिसेल. माऊसच्या मदतीने तो आपणास हव्या त्या ठिकाणी हलविता येऊ शकतो.

आपल्याला शाळेचा परिसर दाखवायचा असल्याकारणाने माऊसने शाळेच्या सीमारेषेवर कोठेही एका ठिकाणी लेफ्ट क्लिक करावे. यानंतर दर ठरावीक अंतराने संपूर्ण सीमा रेषेवर क्लिक करीत जावे. या पद्धतीने शेवटी शाळेभोवती एक पॉलिगॉन तयार होईल. या पॉलिगॉनला योग्य ते नाव द्यावे व सेव्ह करावे. यात काही अन्यही पर्याय दिलेले आहेत; त्याचा वापर आपणच करून बघावा आणि काय घडते ते मला कळवावे. आता शाळेभोवतीच्या परिसरात अजून काय काय आहे त्यासाठी काही प्लेस मार्क टाकून, त्यांना नावे देऊन सेव्ह करून ठेवा. आता आपल्या शाळेचा नकाशा जवळपास पूर्ण झाला आहे. परंतु त्याची पेपरवर प्रिंट घेणे आवश्यक आहे. यासाठी एक सोपा पर्याय आहे. मुख्य स्क्रिनच्या पहिल्या ओळीवर असलेल्या फाईल या पर्यायात जावे व या ठिकाणी **सेव्ह इमेज** पर्याय निवडावा. या पद्धतीने आपल्याला हवा असेलला भाग चित्ररूपाने आपणांस कायमचा जतन करून ठेवता येईल. या चित्राची प्रिंट घेण्यासाठी पुन्हा गुगल अर्थ उघडण्याची गरज पडणार नाही. आपण आपल्या शाळेच्या नकाशाची प्रिंट घेऊन आपल्या शिक्षकांना द्या व आपल्या वहीत चिकटवा.

याखेरीज गुगल अर्थमध्ये अजूनही बरेच काही करता येते परंतु त्यासाठी आपल्याला गुगल अर्थच्या मुख्य पर्यायांची, आणखी काही सॉफ्टवेअरची व्यवस्थित माहिती असणे आवश्यक आहे. तेव्हा आपण केलेल्या प्रयोगाची माहिती, यात आलेल्या अडचणी, आपण केलेले नकाशे आम्हास जरूर पाठवा. त्यातूनच आपण पुढील भाग शिकूया.

**– डॉ. राहुल मुंगीकर**
२४/४ बालाजी पार्क ४, राव कॉलनी,
तळेगाव दाभाडे, पुणे 410506



इंग्रजी आणि मराठी दोन्ही भाषातील अभ्यासक्रमाला अनुसरून व्हिडीओ, ॲनिमेशन, चित्रे, कविता, संस्कृत श्लोक, शास्त्रातील प्रयोग आणि प्रकल्प.
सर्व साहित्य सहजरित्या विनामूल्य डाउनलोड करून घेता येते. वर्गात शिकण्या – शिकविण्यासाठी उपयुक्त.
**www.erc-pune.org**

२० वर्षांची वाटचाल
मंजिरी, मिहिका व सिमरनतर्फे दीपावली शुभेच्छा।
**प्रायोजक – सौ. मंजिरी प्रशांत भागवत, पुणे**

दिवाळीच्या
हार्दिक शुभेच्छा!




**जलतीर्थे :** जायकवाडी धरण (गोदावरी नदी)– पैठण, जि. औरंगाबाद
बांधणी – १९७६ , उंची – ४१.३० मी.

# स्केचपेनचा पेनस्टॅन्ड




(चित्र १)



(चित्र २)





(चित्र ३)

काहीतरी नवनवीन करावे असे आपल्याला सतत वाटतच असते हो ना? मग तुमचे शाई संपलेले स्केचपेन, फेविकॉल, पुठ्ठा, रंगीत पेपर, सजावटीचे साहित्य पटापट जमा करा आणि पुढील कृतीप्रमाणे पेनस्टॅन्ड तयार करण्यास घ्या बरं !

**कृतिक्रम –**

- शाई संपलेल्या स्केचपेनचा मागील टोकाकडील भाग काढून टाका. तेथून स्केचपेनच्या आतील प्लॅस्टिक पेपरची रंगीत गुंडाळी काढा. तसेच स्केचपेनचा पुढील रंगकाम करण्यासाठी वापरात येणारा पॉईंटही काढा. म्हणजे प्लॅस्टिकची मोकळी पुंगळी तुम्हाला मिळेल. या पद्धतीने सर्व वाया गेलेल्या, शाई संपलेल्या स्केचपेनच्या रिकाम्या पुंगळ्या एकत्र करा.(चित्र १)
- जुन्या वहीची पुठ्ठ्याची एक गोल चकती कापा. त्यावर रंगीत कागद चिकटवा. हा झाला पेनस्टॅन्डचा बेस तयार !
- या बेसवर स्केचपेनच्या पुंगळ्या उभ्या, एकाला एक चिकटून गोलाकार चिकटवा. (चित्र २)
- स्केचपेन्सची झाकणेही टाकून न देता तीही या पुंगळ्यांच्या बाहेरील बाजूस गोलाकार चिकटवा. (चित्र ३)
- हा झाला रंगीबेरंगी पेनस्टॅन्ड तयार.
- टिकल्या, मण्या, आरसे, लेस या टाकाऊ अशा वस्तूंतून कल्पकतेने सजावट करा. या स्टॅन्डचा वापर टूथब्रश, पेस्ट ठेवण्यासाठी किंवा ब्रश, पेन, पेन्सिल-पट्टी ठेवण्यासाठी करा.

कोणतीही कलावस्तू तयार करताना वापरलेल्या वस्तूचा उरलेला प्रत्येक तुकडा न तुकडा कसा वापरता येईल याचा विचार सतत केला पाहिजे.

रंग संपलेल्या स्केचपेनच्या पुंगळ्या व झाकणांचा वापर करून छानसे पेनस्टॅन्ड तयार झाल्यावर पुंगळीतून काढलेल्या रंगीत कापसाचा वापर करूनही तुम्ही काही गोष्टी करू शकता.

**कृतिक्रम –**

- या रंगीत कापसावरील प्लॅस्टिकचे आवरण ब्लेडने अलगद कापून घ्या. आवरणाच्या आतील रंगीत तंतूमय कापूस वेगळा करा.
- एका बशीत हा रंगीत कापूस ठेवून त्यावर थोडे पाण्याचे थेंब घातल्यास तयार रंग मिळतो. याचा वापर चित्र - रंगकामासाठी करता येतो.
- किंवा हा रंगीत कापूस थोडा ओला करून कोऱ्या कागदावर गोलाकार फिरवून रंगीत फुलांचे नक्षीकाम तयार करून त्यापासून शुभेच्छापत्रही तयार करता येऊ शकते.

चला तर मग तुमच्या मित्र-मैत्रिणींना यावर्षी स्वनिर्मित पेनस्टॅन्ड व शुभेच्छापत्र देऊन त्यांना दिवाळीच्या शुभेच्छा द्या बरं !!


**– हेमा धोत्रे**
१९, दिपाली अपार्टमेंट, विठ्ठलनगर कॉलनी,
आनंदनगर, सिंहगड रस्ता, पुणे ५१










**जलतीर्थे :** उजनी धरण (भीमा नदी) – उजनी , जि. सोलापूर
बांधणी –१९८० उंची – १८५ फूट, ५६.४ मी.



कथा

# मॉंटुकले दिवस

✍ संदेश कुलकर्णी

**अहम् ब्रह्मास्मि**

एकेदिवशी मी बाल्कनीत उभा राहून समोरच्या लोभस पिंपळाकडे पाहात होतो. नवीन पिटुकली पानं प्रौढ पानांच्या खांद्यावरून डोकावत होती आणि स्वच्छ सूर्यप्रकाशात पोपटी मशालींसारखी लवलवत होती. आकाश कच्च निळं होतं आणि समोरच्या रिकाम्या हिरव्यागार मैदानात एक आश्वासक निवांतपणा भरून राहिला होता.

तेवढ्यात माझं लक्ष बाल्कनीच्या टोकाशी असलेल्या घराकडे गेलं. मॉंटूची छोटी आकृती त्या घराच्या उंबऱ्याशी गुडघ्यावर बसून खाली वाकली होती. काहीतरी पुटपुटत त्याने तिथल्या पाय-पुसण्याला हाताने स्पर्श केला. तोच हात छातीला लावला आणि मग कपाळाला लावून त्याने वाकून उंबऱ्यावर डोकं टेकवलं. मग कमरेतून सरळ होत त्याने हात जोडले आणि डोळे मिटून घेत तो काहीतरी पुटपुटत राहिला. त्याच्या या प्रार्थनेमध्ये तो इतका गुंग होता की त्याला भोवतालचं बिलकुल भान नव्हतं.

घराच्या पुढच्या उंबऱ्याशीही त्याने प्रार्थनेच्या सर्व विधींचा 'ॲक्शन प्ले' केला. त्याच्या पुढच्या उंबऱ्याशी तो पोहोचला आणि त्याचं माझ्याकडे लक्ष गेलं. त्यानं माझ्याकडे करुणासागराप्रमाणे पाहिलं. तो काय करतो आहे, असं विचारल्यावर त्याने शांत स्वरात सांगितलं, ''मैं भगवान की प्रार्थना कर रहा हूँ।''

तो नक्कीच कोणाबरोबर तरी जवळच्या मंदिरात गेला असणार. मंदिरातही गाभाऱ्यासमोर उंबरा असतो. एखादं वस्त्र असतं; त्यामुळे त्याला प्रत्येक उंबऱ्याआड देव असणार, असं वाटत असावं म्हणूनच तो मोठ्या माणसाचं अनुकरण करत (रिती) रूढीप्रमाणे प्रार्थना पार पाडत असणार! पण तो केवळ उपचार म्हणून कोरडेपणाने प्रार्थना करत नव्हता. त्याला खरोखरच वाटत होतं या उंबऱ्यामागे देव असणार! मी गंमतीच्या मूडमध्ये होतो. मी त्याला म्हटलं,

''लहान मुलांमध्ये देव असतो; असं म्हणतात. म्हणून मी तुझ्या पाया पडतो.''

मी गंमतीनं खाली वाकलो आणि त्याच्या छोट्याशा पायांवर माझं कपाळ टेकवलं. पुन्हा वर

**मुंबईमध्ये माझ्या घराशेजारी एक छोटा दोस्त राहतो. त्याचं नाव आहे नील. पण त्याला लाडाने सगळे 'मॉंटू' किंवा 'मॉंटी' म्हणतात. मी कधीकधी गमतीने त्याला 'मॉंठ्ठू' किंवा 'मॉंठ्ठे' म्हणतो आणि तो लगेच हसतो. त्याला तो 'ठ'चा उच्चार खूप आवडतो; त्यामुळे मी नाव विचारलं की तो जोरात आरोळी ठोकतो -'मॉंठ्ठेऽऽऽ'. मला तो सरळ 'संदेश' अशी हाक मारतो. मी ३९ वर्षांचा आहे आणि मॉंटू ३ वर्षांचा; पण त्याच्या या संदेश म्हणण्यामुळे माझ्या ३९व्या वर्षांपुढचा ९ गळून पडतो आणि मी त्याच्याएवढाच ३ वर्षांचा होतो. त्याच्या माझ्या दोस्तीच्या या गमती...**

हळुच येतो, बिलगुन बसतो, घरात शिरतो पहा।
उनाड वारा, तना-मनावर बिंब तयाचे अहा !।।

येताना पाहिलं. माँटूने आशीर्वादासाठी त्याचा पंजा कृपाळूपणे माझ्या दिशेनं वळवला होता. अरे देवा! हा तर शंभर टक्के देवाच्या भूमिकेत शिरला होता!!

मला हसू फुटलं. मला परत एकदा त्याचा हा गोड अभिनय पाहायचा होता म्हणून मी पुन्हा त्याच्या पायांवर डोकं ठेवलं आणि मला खरोखरच छान वाटलं. माझ्या देवाने परत मेहेरबान होत छोटासा पंजा माझ्याकडे वळवला. स्वत: देव असणं त्याने सहजपणे स्वीकारलं होतं! मी त्याला म्हटलं, ''काही आशीर्वाद दे ना.''

भगवंत म्हणाले, ''क्या आशीर्वाद चाहिए?''

प्रत्यक्ष देव प्रकट झाल्यावरही असंच विचारतो ना, 'बोल वत्सा. तुझी काय इच्छा आहे?'

मी म्हणालो, ''मेरा सब अच्छा हो जाएगा ऐसा आशीर्वाद दो।''

माझा देव म्हणाला, ''तुम्हारा सब अच्छा हो जाएगा।''

मी माझ्या देवाचे आभार मानले आणि निघालो तर देवाने पुन्हा एकदा पाया पडण्याची आज्ञा केली. ईश्वराज्ञाच ती... कशी नाकारणार? मी परत एकदा देवाच्या पाया पडलो आणि परत एकदा देवाने आशीर्वाद दिला– ''तुम्हारा सब अच्छा हो जाएगा।'' यानंतर मी बराच वेळ देवाच्या पाया पडत राहिलो. कारण तशी भगवंताचीच इच्छा होती; अर्थात तितक्या वेळा मला आशीर्वादही मिळाला.

मग साधारणपणे दहाव्यांदा पाया पडण्यासाठी खाली वाकण्याचा आदेश झाला (टेन कमान्डमेंट्स) आणि मी त्याप्रमाणे पाया पडलो. तेव्हा प्रसन्न होऊन देवाने आशीर्वाद दिला – ''तुम्हारा सब अच्छा हो गया।''

या आशीर्वादात भविष्यकाळचे आमिष नव्हते; तू माझ्या पाया पडत राहा मग पुढे कधीतरी तुझं भलं होईल. या जन्मात नाही तर कदाचित पुढच्या जन्मात होईल, असं काहीच नव्हतं या आशीर्वादात. माझा देव वर्तमानात राहणारा होता. इथे आणि आत्ता तो म्हणाला – 'चल, झालं तुझं भलं !'

तो आशीर्वाद जसा जसा माझ्या हृदयात उतरला तसं तसं मला शांत वाटायला लागलं.



'संगणक शिका आणि थोरांना शिकवा.'
**प्रायोजक– श्री. राम महादेव गद्रे, पुणे, व श्री. शरद महादेव गद्रे, डोंबिवली**

तेवढ्यात माझा देव माझ्याच पाया पडला आणि म्हणाला, ''अब तुम भगवान!''

मी हसत हसत आनंदाने त्याला भरभरून आशीर्वाद दिले आणि भरपूर पापे घेतले.

दुसऱ्यामध्ये देव बघणं आणि स्वत: देव होणं अगदीच सोप्पं होतं!

आता मी प्रत्येक दिवसाच्या सुरुवातीला माझ्या देवाचा आशीर्वाद घेतो आणि तो प्रेमाने उदंड आशीर्वाद देतो – ''तुम्हारा सब अच्छा हो गया।''

किती सुंदर जात असेल ना माझा दिवस!!

***

**मालकी आणि भागीदारी**

माझी बायको अमृता अधून मधून गोड–गोड खेळणी घेऊन येते. तिला त्याची खूपच गंमत वाटते आणि ती त्याच्याशी आनंदाने एकटीच खेळत बसते. काही वेळा कुणीतरी लहान मूल घरी आलं आणि तिचं खेळणं घरी घेऊन जायचा हट्ट करू लागलं तर अमृताचा चेहरा कसनुसा होतो. ती त्यांच्याविषयी अंमळ 'पझेसिव्ह' आहे. पण माँटूला मात्र तिने सूट दिली होती.

माँटू आमचा मित्र झाल्यावर आमच्या घराची मालकी साहजिकच त्याच्या ताब्यात गेली. सतत लुकलुकणारे त्याचे शोधक डोळे बरोब्बर नवीन खेळणं टिपत असत. नवीन खेळण्याबरोबरचं त्याचं वागणं फार मजेशीर होतं. तो एखाद्या खेळण्याकडे आकर्षित झाला की, लगेच त्याला ते आपल्या हातात हवे असायचे. दोन्ही हातात घेऊन निरखून उलटं पालटं करून झालं की त्याच्याबरोबर तो खेळायला सुरू करायचा. काही वेळातच त्याला आसक्ती जडायची आणि अचानक तो ते उचलून घरी धूम ठोकायचा. मी ते काढून घेईन याची त्याला भीती वाटायची. नंतर कधीतरी त्याची आई ते खेळणं परत द्यायची.

हळूहळू माँटूला लक्षात आलं की, आमच्या




देव कुठे हो, उत्तर अवघड, प्रश्न जरी साधा हा।
निरागसाच्या ओठांवरती दर्शन देईल पाहा।।

घरातली कुठलीही गोष्ट तो कधीही घेऊ शकतो आणि तो आश्वस्त झाला. ती वस्तू उचलून घरी नेण्याची गरज त्याला वाटेनाशी झाली.

एक दिवस आमच्याकडे कनीस नावाची एक वर्षाची मुलगी आली होती. अमृता टीव्हीवर ज्या सिरीयलमध्ये काम करते त्यातच कनीस तिच्या मुलीची भूमिका करते. कनीसला बरं वाटत नव्हतं आणि आमच्या घराशेजारीच लहान मुलांचं हॉस्पिटल असल्याने अमृता तिला घेऊन घरी आली होती. आम्ही हॉस्पिटलमधून घरी पोहोचताच आमच्या मजल्यावर सतत पहारा करणारा मॉंटू आमच्या मागोमाग घरात शिरला.

त्या छोट्याशा बाळाला बघून मॉंटूला प्रेमाचे भरते आले. त्याने कनीसशी बोलायचा प्रयत्न केला. तिचं नाव विचारलं. छोट्या कनीसला अजून बोलता येत नव्हतं; पण तिने मॉंटूकडे पाहून एक फर्मास स्माईल केलं. मॉंटू चेकाळलाच. तो काहीसा स्तिमित होऊन आपलेपणाने कनीसकडे पाहात राहिला. मग अचानक तो त्याच्या घराकडे पळाला.

थोड्या वेळातच खेळण्यातला एक हत्ती घेऊन तो परत आला. आणि त्याने तो कनीसच्या पुढ्यात ठेवला. त्याच्या लक्षात आलं कनीसला बोलता येत नाही. म्हणून तो खुणेनेच तिला ते घ्यायला सांगायला लागला. ती खूपच लहान असल्याने तिला तो हत्ती हातात घेता येईना. मग मॉंटू तिचं मन रमवण्यासाठी हत्तीशी खेळ करून दाखवायला लागला. हत्तीवर बसून त्याने तो तिला पळवून दाखवला. कनीसच्या प्रत्येक बोबड्या बोलाने त्याला अधिकाधिक उत्साह चढत होता. त्या भरातच तो धावत त्याच्या घरी गेला आणि एक एक करून त्याच्याकडची सगळीच खेळणी घेऊन आला. त्यांची संख्या इतकी होती की छोटी कनीस त्यात बुडूनच गेली. आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे मॉंटूच्या घरातील खेळण्याचा या दिशेने पहिल्यांदाच प्रवास झाला होता.

मला लक्षात आलं मॉंटूपेक्षा लहान कुणीतरी पहिल्यांदाच आमच्या मजल्यावर आलं होतं. त्या बाळाच्या सान्निध्यात मॉंटूला खूपच शक्तिशाली वाटत होतं. त्याच्याकडील सगळं काही तो शेअर करायला तयार झाला होता, कारण त्याला वाटत होतं, त्या बाळाला त्याची गरज आहे.

आधी जेव्हा त्याला माझ्याकडची खेळणी मिळण्याची खात्री नव्हती तेव्हा तो ती पळवून नेत होता. असुरक्षित वाटल्यानेच तो दादागिरी करत होता. मालकी हक्क गाजवत होता. आता कनीसबरोबर मात्र त्याला शक्तिशाली वाटत होतं. कारण आपली तिला गरज आहे, असं त्याला वाटत होतं. आणि त्यातूनच आपल्या मालकीच्या खेळण्यांमध्ये तो तिला भागीदार करून घेत होता.

गंमतीदार होतं हे. कनीसला आपली गरज आहे, हे समजल्यावर मॉंटू आपोआप 'मोठ्ठा' झाला होता. जेव्हा कुणाला तरी सबल करायचे असते तेव्हा त्याला मदत करण्यापेक्षा त्याच्याकडून मदत घ्यावी; त्याच्या गरजा पुरवण्यापेक्षा त्याची दुसऱ्यांना गरज आहे, हे सांगावं.

वेगळाच धडा होता हा ! कनीस बाळाशी खेळणारा छोटासा मॉंटू मला एखाद्या झेन गुरूसारखा भासायला लागला. जो वेगवेगळ्या प्रसंगातून जायला लावून मला अधिकाधिक समजूतदार बनवत होता.

मला असं लक्षात आलं मॉंटूला माझी जितकी गरज आहे त्यापेक्षा जास्त मला त्याची गरज आहे.

'मला तुझी गरज आहे', हे मी अमृताला शेवटचं कधी सांगितलं; हे मी आठवायला लागलो...

**– संदेश कुलकर्णी**
६२/२७५१, विपुल सहकारी गृहरचना,
गांधीनगर, वांद्रे (पू.), मुंबई
**चित्रकार – गोपाळ नांदुरकर**

**('मॉंटुकले दिवस' या आगामी पुस्तकातील काही भाग)**

'हे माझे, ते माझे' म्हणता, वाढत गेले ओझे ।
आत्मबळाची जाणीव होता देतो जे जे 'माझे' ।।

मुलांचं पान



**या**वर्षीही तुम्हा सगळ्यांचं अगदी भरभरून साहित्य आलंय. त्यातही 'माझं जरा चुकलंच' या विषयावरचं साहित्य सगळ्यात जास्त आहे; तर व्यक्तिचित्र लिहिण्याचा प्रयत्न कमी दिसतोय. तुमचं हे साहित्य वाचून एक गोष्ट लक्षात आलीय –

तुम्हा सर्वांना खूप काहीतरी सांगायचंय, संवाद साधायचाय. 'माझं जरा चुकलंच' या विषयावरचं लेखन वाचताना तर हे प्रकर्षाने जाणवतं. आई–बाबा, मित्र–मैत्रिणी, नातेवाईक, शिक्षक यांबरोबरच स्वत:ला, देवाला, धरणीमातेलाही तुम्ही पत्रातून 'माझं जरा चुकलंच' हे कळवलं आहे. या सगळ्या वाचनातून तुमच्या अंतर्मनात काय काय चालू असेल याची काहीशी कल्पना येतेय – तुमचं निरागस मन, चुकीची (बरेचदा काल्पनिकही असू शकेल!) कबुली देण्याची प्रामाणिक इच्छा, तुमच्या बोलक्या भावना आणि या चुकांमधून शिकून, स्वत:त बदल घडवण्याची प्रामाणिक इच्छा, काहीतरी चांगलं/विधायक काम करण्याचे खरेखुरे संकल्प ! प्राची, वैष्णवी आणि अवंतीची काही प्रातिनिधिक पत्रं वाचलीत की तुम्हाला नक्की कळेल.

सिद्धार्थनी रंगवलेल्या भाजीवाल्याच्या व्यक्तिचित्रात त्यानी बारकाईनं केलेलं निरीक्षण, अचूक टिपलेल्या गोष्टी आपल्याला जाणवतात. निखिलच्या मधल्या सुट्टीच्या आनंदात, स्वच्छंदपणे हुंदडण्यात आपणही सहभागी होतो. आणि शेवट वाचताना तर आपल्याला हसू आवरत नाही, होना?

या सगळ्या साहित्याला छान चित्र काढून देणाऱ्या चैतन्य, आदित्य, अनुष्का, अजिंक्य, ईशानी या छोट्या दोस्तांचंही मनापासून कौतुक...

आणि हो... तुम्ही पाठवलेल्या साहित्यातलं निवडक साहित्य छात्र प्रबोधनच्या आगामी नित्य अंकातूनही प्रसिद्ध होणारेय बरं का! तुम्ही मुलांनी असंच 'लिहितं व्हावं', भरपूर साहित्य आमच्याकडे पाठवावंत.

## बुद्धी दे देवा

– कु. प्राची खैरे

**दे**वा, मी हे पत्र तुला लिहीत आहे. खरंच तुला प्रिय म्हणू की आदरणीय हा मोठा गहन प्रश्न मला पडला आहे.

अनेक दिवसांपासून मनात काहीतरी खटकल्यासारखे वाटत होते. मनात खूप विचारांचा गोंधळ माजल्यासारखे झाले होते. आपण चुकीची गोष्ट केली आहे किंवा चुकीच्या पद्धतीने वागलो आहोत; ही भावना सारखी मनाला बोचत होती आणि या परिस्थितीत माझ्या जिवाची खूप घालमेल होत आहे. मी एक चूक केली आहे पण ती आतापर्यंत कोणासमोरच कबूल केलेली नाही. तुला मी माझी चूक सांगणार आहे कारण माझ्या बरोबर तू आयुष्यभर राहणार आहेस. होय ना?

मला एका गोष्टीचे खूप वाईट वाटते की मी एक विद्याव्रत घेतलेली विद्यार्थिनी असूनही मला माझा नियम पाळता आला नाही. त्याचं काय झालं माहिती आहे? अरे! मी परीक्षा सुरू होण्यापूर्वी संकल्प केला होता की मी पेपरच्या वेळी अजिबात बोलणार नाही आणि पेपर अजिबात पाहून लिहिणार नाही. पण मला माझा संकल्प पूर्ण करता आला नाही.

मला माहिती आहे कॉपी करणे खूप वाईट असते पण तरीदेखील माझ्याकडून ही गोष्ट झाली म्हणजे 'कळतं पण वळत नाही,' अशीच माझी गत होती.

ही गोष्ट करताना माझ्या मनाचा आणि बुद्धीचा परस्परांमध्ये संघर्ष चालू होता. बुद्धीला ही गोष्ट पटत नव्हती पण मन त्या गोष्टीपासून परावृत्त व्हायला तयार नव्हतं आणि अशातच मी माझ्या मनालाच जणू काही श्रेष्ठत्व दिले आणि त्या मोहाच्या क्षणाला बळी पडले.




पण त्यानंतर मी विचार करायला लागले की कशामुळे मला ही गोष्ट करणे भाग पडले? माझी पहिली चूक म्हणजे मी व्यवस्थित अभ्यास करायला पाहिजे होता. त्यानंतर देखील जेवढा अभ्यास केला तेवढ्यावर पेपर लिहायला पाहिजे होता म्हणजे स्वत:ची खरी कुवत मला कळली असती.

परंतु मी माझ्या तत्त्वांशी तडजोड केली आणि माझ्या या चुकीतून मी काही गोष्टी शिकले व त्या चुका पुन्हा कधीच माझ्याकडून होणार नाहीत अशी मी पुरेपूर दक्षता घेणार आहे. कितीही अटीतटीचा प्रसंग आला तरीही भविष्यकाळात मी केव्हाच माझ्या या तत्त्वांशी तडजोड करणार नाही.

देवा, मी माझी चूक तुला सांगितली आणि ती भविष्यकाळात माझ्याकडून पुन्हा कधीच होणार नाही यासाठी मी करणाऱ्या गोष्टीदेखील तुला सांगितल्या; यामुळे आता माझे मन अगदी हलके झाले आहे.

आणि देवा मी माझे वडील-आई तसेच शिक्षकांचीदेखील खूप अपराधी आहे; त्यामुळे खूप खूप क्षमस्व.

आणि देवा, तू मला चांगले व वाईट काय, याची पारख करण्याची म्हणजे सद्‌सद्विवेकबुद्धी दे हीच तुझ्याकडे प्रार्थना. (खूप खूप खूप क्षमस्व.)

तुझीच – प्राची

**चित्रकार : चि. चैतन्य मुदगल**

**– कु. प्राची खैरे** (इ. १० वी),
श्री. दा. म. ना. पंचकोशाधारित गुरुकुल, चिखली

## हिरवेगार मन

**– चि. सिद्धार्थ साने**

''दादा, मेथी घ्या ना! अगदी ताजी आहे.'' हे आर्जवी स्वर कानावर पडले की आपली नजर पाणी शिंपडलेल्या हिरव्यागार मेथीच्या जुडीवर रेंगाळल्याशिवाय राहात नाही. आपल्याला हवी असलेली सर्व भाजी घेऊन झालेली असली तरी देखील घरात जात असताना त्या ताज्या मेथीच्या जुडीने आपल्या पिशवीत स्थान मिळवलेले असते!

रोज सकाळी नऊच्या ठोक्याला ''पालक घ्या, मेथी घ्या, गवार आहे, शेपू आलाऽऽ'' अशी आरोळी कॉलनीतल्या घराघरांतून दौडत जाते. भाजीवाल्याला थांबण्याचा इशारा करून घराघरांतून बायका खाली येतात. भाजीवाल्या काकांची नजर चौफेर फिरत असते. कोणी थांबावयास सांगितले की, 'या ना ताई' असे म्हणता म्हणता काकांना झालेला आनंद त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत असतो.

पाच फुटांच्या आत बाहेर उंची, काळा-सावळा-रापलेला वर्ण, पातळ पांढरे केस आणि मिशा, डोक्यावर गांधी टोपी, अंगात अतिशय साधा पण स्वच्छ झब्बा, लेंगा अशा वेषातले भाजीवाले काका आपली भाजीने भरलेली हातगाडी घेऊन नवाच्या ठोक्याला हजर होतात. त्यांचे तंबाखू खाऊन किडलेले दात, फाटक्या चपला आणि दुसरीकडे आकर्षक पद्धतीने मांडलेली रंगीबेरंगी

स्वप्न पाहणारे डोळे आणि साकारणारे हात दे ।
माझ्या सुंदर ध्येयाला माझ्या माणसांची साथ दे ।।
Hydrolinks



भाजी ही विसंगती चटकन जाणवते. काकडी, टोमॅटो, गाजर, कोथिंबीर, लिंबू, पालेभाज्या, नवलकोल, बीट अशा भाज्यांचे जणू संमेलनच त्या गाडीवर भरलेले असते. शिवाय एक गंजलेला तराजू, वजने, पैसे ठेवण्याचा पितळेचा डबाही गाडीवर असतो. जेवणाचा डबा मात्र कधी असतो तर कधी नसतोही!

दररोज पहिली कमाई झाली की ते पैसे कपाळाला लावून, डोळे मिटून, ''भवानीची कृपा'' असे पुटपुटण्याची त्यांची लकब थोडी निराळीच आहे. काका व्यवहारात चोख आहेत. त्यांनी त्या दिवशी जो दर ठरवलेला असेल त्यापेक्षा कमी–जास्त एकही पैसा होणार नाही. वजने–मापे, तराजूही अगदी सचोटीने वापरतात.

''ताई, आजीला बरं नाही ना? मग लिंबं न्या की थोडी! चाटण करा आणि द्या त्यान्ला. तोंडाला चव येईल.'' असे शब्द ऐकले आणि त्या माणसाची आपुलकी, वागण्यातला शुद्धपणा बघितला की घासाघीस करायची इच्छा मुळी होतच नाही. उलट थोडी भाजी जास्तच खरेदी केली जाते !

कॉलनीत राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांच्या घरी काका स्वत: इमारतीचे मजले चढून भाजी पोहोचवून येतात. क्वचित कोणी भाजी खराब असल्याची तक्रार केली तर दुसऱ्या दिवशी चांगली भाजी आणून देतात. कोणी टोमॅटो, बटाटे, ढब्बू मिरची, कांदे अशी खरेदी केली तर'' काय ताई, आज पावभाजीचा बेत दिसतो?'' असेही मिश्किलपणे विचारतात. अशावेळी त्यांच्या गाडीवर जेवणाचा डबा दिसला नाही तर काळजात चर्रर्र झाल्याशिवाय राहात नाही.

काकांचा दिनक्रम अगदी ठरलेला आहे. ते पहाटे चार वाजता गुलटेकडीला जाऊन मार्केटमधून ताजी भाजी खरेदी करतात. दिवसभर ठिकठिकाणी फिरून ती विकतात. संपूर्ण दिवस श्रम करूनही दिवस मावळला तरी त्यांच्या चेहऱ्यावरचे हसू मावळत नाही. एके दिवशी स्वत:चा टेम्पो घेऊन त्यातून भाजी विकत फिरण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा आहे. या कल्पनेला त्यांनी 'फिरते भाजी दुकान' असे गंमतशीर नाव दिले आहे.

वर्षानुवर्षे ते आमच्या कॉलनीत भाजी घेऊन येत आहेत. रोज सकाळी त्यांची ताज्या भाजीची गाडी बघितली की वाटते, त्यांची हिरवीगार भाजी जास्त सुखावणारी आहे की त्यांचे हिरवेगार मन?

**चि. सिद्धार्थ साने** (इ. १० वी)
शाळा – अक्षरनंदन, से. बापट रस्ता, पुणे – १६
**चित्रकार : चि. आदित्य घाटोळ**

त्यागाचा परिमल तो गंध वाहू दे।
सुगंधित जीवनात रंग भरू दे।।

**With Best Compliments**

***from***

**Shri. Harish Mangaokar**

# GURUVAYUR LOGISTICS

# Happy Diwali

**GURUVAYUR LOGISTICS**

Survey No. 37/1, Pisoli, Pune - 411060

Ph.: 020 26930887


**भारतातील आश्चर्ये :** खजुराहो - मध्यप्रदेश

हिंदू व जैन मंदिरे, तसेच कोरीव शिल्पांसाठी प्रसिद्ध

# नकळता काही घडले

– कु. वैष्णवी कुलकर्णी

प्रिय वैदेही,



कदाचित तुला आश्चर्य वाटेल, हे पत्र वाचताना... मी तुला या पत्राद्वारे जे काही सांगणार आहे, ते तुला खरंसुद्धा वाटणार नाही. पण जर मी तुला ते आज सांगितलं नाही, तर माझं मन मला आयुष्यभर खात राहील. सततची अस्वस्थता आणि 'स्व–चुकीची' जाणीव माझ्या मनात कायमची राहील.

नेहमीप्रमाणे आपल्या शाळेत गणेशोत्सवात बर्ची, ढोल–ताशा, ध्वज, खिरापत, आरती या सर्वांसोबत स्पर्धांची देखील लगबग सुरू झाली.

सोमवारी पहिल्या तासाला सरांनी आपल्या वर्गात 'आरती बनविण्याच्या' स्पर्धेविषयी सूचना सांगितली. त्यासाठी आपण खास आपल्या वर्गाचे 'आरती मंडळ' तयार केले. तुझ्यात असलेल्या उपजत गुणांमुळे तू या मंडळाची प्रमुख झालीस. सगळ्यांनी ही नवीन संकल्पना डोक्यावर घेतली आणि 'आम्हीही आरती करू.' अशी इच्छादेखील व्यक्त केली.

पण नव्याचे नऊ दिवस असं म्हणतात, तसं आपल्याकडे 'नव्याचे नऊ तास' अशी रीत झाली. सोमवारीच शेवटच्या नवव्या तासाला आपल्या मंडळाची कल्पना आरतीच्या स्वरांसारखी वाऱ्यावर विरून गेली. मंगळवारी व बुधवारी तुझ्या स्पर्धांमुळे तू शाळेत आली नाहीस. आणि आरतीची कल्पना वर्गातील प्रत्येकाच्या डोक्यातून जवळजवळ साफ निघून गेली.

गुरुवारी आरती देण्याचा शेवटचा दिवस होता. नेहमीप्रमाणे प्रार्थना झाल्यावर सरांनी ध्वनिवर्धकावरून प्रत्येक वर्गाच्या आरत्यांची संख्या जाहीर केली. ५.. ७..१०..१२.. वर्गाच्या संख्येबरोबर आरत्यांची संख्याही वाढत होती. एकदम सर म्हणाले, ''१०वी 'ब' आरती संख्या शून्य'' सर्व वर्गांचे आकडे वाचून झाल्यावर सरांनी पुन्हा एकदा सर्वांसमोर सांगितले, ''१०वी 'ब' ने आजच्या आज किमान एक तरी आरती द्यावी.''

सर्वांसमोर झालेली वर्गाची ही अशी खरडपट्टी पाहून आपले वर्गशिक्षकही आपल्यावर नाराज झाले. अर्थात आपली बेफिकीरी पाहून कोणीही चिडणं स्वाभाविक होतं आणि या सगळ्यात मंडळाची प्रमुख आणि जबाबदार व्यक्ती म्हणून सर तुला ओरडले.

वास्तविक तुझी काहीच चूक नव्हती, पण 'प्रमुख' या पदाखाली तुला आमच्यावाटचा ओरडा खावा लागला. पण डोळ्यांतून एक टिपूससुद्धा न काढता तू आरती करण्याच्या मागे लागलीस.

त्या दिवशीच्या पहिल्या तासापासून तू आरतीचा ध्यास घेतलास. दोन तासांच्या मधल्या वेळात, ऑफ तासाला, बुलेटिनच्या तासाला आणि मधल्या सुट्टीतसुद्धा तू आरती तयार करत होतीस. हे प्रयत्न करतेस असं तूसुद्धा कोणाला जाणवू दिलं नाहीस.

त्या दिवशी संध्याकाळी सर्वजण घरी जात असताना तू हळूच माझ्याकडे येऊन मला म्हणालीस, 'ही आरती फक्त सरांना देशील का?' मी शाळेत जास्त वेळ थांबणार असल्याने तुला लगेच होकार दिला. माझे शाळेतील काम झाल्यावर मी ती आरती घेऊन सरांकडे गेले.

आरतीचा कागद पहिल्यावर अक्षराचे व शब्दरचनेचे सरांनी कौतुक केले. आरतीच्या खाली त्यांनी वर्गातील प्रातिनिधिक स्वरूपात एखाद्या मुलीचे नाव व वर्गाचे नाव टाकण्यास सांगितले. मी अतिशय अविचारपूर्वक त्या कागदावर माझे नाव लिहिले आणि कागद देऊन शाळेतून घरी गेले. जणू काही, काहीच घडले नव्हते.

पण मनात एक अस्वस्थता राहिली. चूक केल्याची जाणीव होऊ लागली. मनात सतत विचार येत राहिले. 'का? का केलं आपण हे? हे शब्द, अक्षररचना वैदेहीची असूनसुद्धा आपण त्या कागदावर आपलं नाव का लिहिलं? प्रसिद्धीच्या मागे लागलोय का आपण?' दुसऱ्याच्या जिवावर उड्या मारून आपण खरोखरीच 'प्रबोधक' म्हणवून घेण्याच्या लायकीचे आहोत का? राष्ट्रघडणीच्या स्वप्नाकडे पाहात असताना आपण 'स्व' घडणीकडे दुर्लक्ष का करतो? का? का? आणि का?'

याच 'का'च्या वलयांमध्ये राहून मी शुक्रवारी म्हणजेच

मैत्रीच्या सुंदर क्षणांना, आयुष्यभर जपावं।
मैत्री फुलवण्यासाठी, थोडंफार आपणही खपावं।।




आज शाळेत आले. तुझ्याकडे बघण्याची हिंमतही होत नव्हती. 'हे सगळं वैदेहीला कळलं तर काय वाटेल तिला? तिचे आपल्याबद्दलचे मत कसे होईल?' यांसारख्या प्रश्नांच्या विचारात असतानाच M.P.T. च्या तासाला सरांनी आरतीचा निकाल वाचून दाखविला.

निकाल सांगताना ते आनंदून म्हणाले, ''कालपर्यंत ज्या वर्गाने एकही आरती दिली नव्हती, अशा '१०वी ब'च्या आरतीला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे. उद्या उपासनेला त्या विद्यार्थिनीला पारितोषिक दिले जाईल. ती विद्यार्थिनी आहे – 'वैष्णवी कुलकर्णी!'

ते ऐकल्यावर माझ्या पोटात गोळा आला. काळजात धस्सऽऽ झालं. मनात एकच विचार होता, 'नाही, हे बक्षीस आपलं नाही. ते फक्त आणि फक्त वैदेहीचं आहे. त्याच्यावर आपला कणभरसुद्धा हक्क नाही. हक्क नव्हता. आणि नसेलही...'

निकाल ऐकल्यावर सर्वांनी कौतुकाने वाजवलेल्या टाळ्या खरं तर तुझ्यासाठी होत्या. हे कौतुक आणि मान हा खरं तर तुझाच आहे. पण त्यावेळी कुणाला काही सांगायची, माझी चूक कबूल करायची माझी हिंमतच नाही झाली अजिबात.

पण शेवटी सत्य हे सत्यच असतं. कितीही लपवायचा आणि लपायचा प्रयत्न केला तरी, सत्य हे अटळ असतं. तुझ्या आरतीला माझं नाव देऊन कदाचित उद्या मला पारितोषिकही मिळालं तरी गणपती बाप्पासमोर, त्याच्या डोळ्यांमध्ये बघून मला ते स्वीकारता येणार नाही. कारण बाप्पालाही माहिती आहे की, ती आरती, ते पारितोषिक आणि तो मान केवळ तुझाच आहे.

आज जे काही झालं, त्याच्याबद्दल प्लिज, मला माफ कर. यापुढे असं होणार नाही. तू दिलेली कुठलीही शिक्षा भोगायला मी तयार आहे. पण कृपया मला माफ कर. मनापासून माफ कर. पुनश्च क्षमस्व !!! शेवटी तुला एक वचन देते – 'यापुढे मी स्वत: कविता, आरत्या करायला शिकेन. पण अशा चुकीच्या मार्गांनी प्रसिद्धी मिळवणार नाही.'

चुकांमध्ये जगणाऱ्याला आणि जगण्यामध्ये चुकणाऱ्याला एकदा माफी मिळते वैदेही. I am really sorry. इतकंच मनापासून म्हणून मी इथंच थांबते!!

तुझी मैत्रीण – वैष्णवी

**– कु. वैष्णवी कुलकर्णी** (इ. १० वी)
ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी.
**चित्रकार : कु. अनुष्का जोशी**

शब्दफुलं कृतज्ञतेची माझ्या ओंजळीत आली ।
इवलीशी काया माझी सगळं भरून पावली !

# मधली सुट्टी

– चि. निखिल भालेकर

त्या दिवशी शेवटचा तास इतिहासाचा होता. मुले ४०० वर्षांपूर्वीचा इतिहास ऐकून कंटाळली होती. त्यातच 'दुष्काळात तेरावा महिना' म्हणजे सरांनी सकाळी सकाळी मुलांना ३ किलोमीटर पळवले होते. मुलांच्या मनाची कधी एकदा मधली सुट्टी होते अशी अवस्था झाली होती. त्यांच्या चेहऱ्याकडे पाहिल्यावर कळायचे की त्यांच्या पोटातील कावळे कधीच मेले असतील. वर्गातील बाळू, रामू व शम्या हे मस्तीखोर त्रिकूट मुलांच्या खोड्या करण्यात व्यस्त होते. दिनू व माझे लक्ष मात्र कशातच लागेना. सर्व मुलांचे लक्ष वर्गातल्या घड्याळ्याकडे होते.

आणि एकदाचा तासकाटा आणि मिनिटकाटा दोन्हीही बारावर येऊन पोहोचले व शाळेची मधल्या सुट्टीची घंटा वाजली. मुलांचे चेहरे कमळाच्या फुलाप्रमाणे फुलले. शिक्षक वर्गाच्या बाहेर जाताच मुलांनी लगेचच आपले डबे काढले व कधीही न मिळाल्यासारखे खायला सुरुवात केली. जो तो न बोलता व न थांबता खात होता. पोट भरल्यावर शाळेपुढे असणाऱ्या मैदानाच्या दिशेने ती धावत निघाली.

पोट गच्च भरल्यामुळे मुलांच्या शरीरात ताकद आली होती. 'आता काय करूया?' या विचारात सगळी होती. तेवढ्यात राम्या म्हणाला,

'आपण शाळेमागच्या वनराईत फिरायला जाऊया का?' सर्वांना ही कल्पना आवडली व सर्वजण मागच्या वनराईत गेले. वनराईत गेल्यावर मी व दिनू पशु–पक्ष्यांचे आवाज, त्यांचा किलबिलाट ऐकण्यात गुंग झालो. राम्या, शाम्या व बाळ्या फुलपाखरांमागे धावत होते. वर्गातील काही मुलांमध्ये सूरपारंबीचा खेळ रंगला. वर्गातील राकेश; ज्याला पुस्तकातील किडा म्हणतात तो त्याच्या सवयीप्रमाणे इथेही पुस्तक घेऊन आला. अशा वातावरणातच बाळ्याने 'गवतात साप आहे,' अशी अफवा पसरवली. पण या अफवेने कोणी घाबरले नाही. मुले खेळ खेळत होती. उन्हाळ्याचे दिवस असल्याने वनराईतील झाडांना फळे लागली होती.

वनराईच्या मागे एक ओढा वाहत होता. सर्व मुले आता ओढ्याकडे गेली व मासे पकडू लागली. मुलांच्या नाकी




जुईच्या कळ्यात, हिरव्या मळ्यात।
सुरेल गळ्यात, एक सरगम मनात।।

**ARCHIVISTA ENGINEERING PROJECTS PVT LTD**

*"A leading Engineering Consultancy firm in India providing Architectural and Design Engineering services to wide range of industries like Automobiles, Ancillaries, Paper & Packaging ,Engineering Products, Textiles Pharmacy, Food, Chemicals etc."*

***Our expertise extends over:***

- *Architectural & Structural Design*
- *Authority Approvals & Infrastructure Development*
- *Electrical Engineering*
- *Fire Fighting and Safety*
- *HVAC and Dust Control*
- *Interiors and Landscaping*
- *Green Building Concept*
- *Construction Management & Site Supervision*

***Our Client includes***: *Mercedes Benz, Tetra Pack, John Deere, General Motors, Times of India, Emcure Pharmaceuticals, Mahindra & Mahindra, Schreiber Dynamix Dairy & many more.*

**Pune Office: 201/202 Sai Empire, Baner, Pune-411045.**
**Tel.: +91 20 6629 4444 Fax: +91 20 6629 4699 Chennai Office: 25/10 Ethiraj Lane Egmore, Chennai-600008. Tel.:+91 44-42145194 Fax: +91 44 42145195.**
**Visit to us at** www.archivistaindia.com E-mail: info@archivista.biz

**Happy Diwali !**

**With Best Compliments From**

**Autotec Industries**

GAT No. 1203, Vadki
Pune-Saswad Rd.
Pune - 412308

Mob.: 9422003907
email:
autotecpune@yahoo.co.in

*With Best Compliments From*

**Print-O-Tech Engineers**

**(ISO 9001 COMPANY)**

Survey No. 29, Mantri park, Shop No 16,17,
Near Natraj Gas, Kothrud, Pune - 411 029
Tel : 25384374
Email : paradkaruday@yahoo.co.in
paneha@gmail.com

**दि बारामती सहकारी बँक मर्यादित, बारामती**

मुख्य कार्यालय : भिगवण रोड, बारामती -४१३१०२
फोन नं. (०२११२) २२७७०५, २२४८६५

**शुभ दीपावली**

**ठेवी : रु ६६५.०० कोटी कर्जे : रु ४५०.०० कोटी खेळते भाग भांडवल: रु ७२७.०० कोटी**

***आकर्षक व्याज दर***

१८१ दिवस ते ३६५ दिवस - १०.३०%
१३ महिने ते २४ महिने - १०.५०%
२५ महिने ते ३६ महिने - १०.२५%
३६ महिन्यांच्यापुढे - १०.००%

(ज्येष्ठ नागरिक व ट्रस्ट यांसाठी ०.२५% जादा)

शाखा सोलापूर
(०२१७) २७२९९२६६/७७


**भारतातील आश्चर्ये** : सूर्यमंदिर - कोणार्क - ओरिसा
राजा नरसिंहदेवाने बांधलेले १३ व्या शतकातील मंदिर

२० वर्षांची वाटचाल

नऊ येत होते पण त्यांना मासे काही सापडत नव्हते. मुलांना आता शाळेची आठवण झाली व ती शाळेकडे परतू लागली.

...रस्त्यात त्यांना घंटेचा आवाज ऐकू आला. मधली सुट्टी संपल्याचे लक्षात येताच आम्ही घाबरलो. जोराने शाळेच्या दिशेने पळत सुटलो. धापा टाकत शाळेत गेल्यावर कळले की ती घंटा शाळा भरल्याची नसून शाळा सुटल्याची आहे !

**– चि. निखिल भालेकर** (१०वी)
श्री. दा. म. ना.पंचकोशाधारित गुरुकुल, चिखली
**चित्रकार : चि. अजिंक्य घाटोळ**



# माझी आजी, माझी मैत्रीण

प्रिय आजीस,

खरंच त्या दिवशी जरा चुकलंच माझं. मी असं वागायला नको होतं. परीक्षा संपल्यामुळे माझ्या सगळ्या मैत्रिणी आपल्या घरी आल्या होत्या. घरात नुसता धुमाकूळ माजला होता. तुला माहितीच आहे, मैत्रिणींबरोबर असताना मला कशाचंच भान राहत नाही. अगं काय सांगू तुला, दहावीच्या बोर्डाची परीक्षा संपल्याचा आनंद गगनात मावेनासा झाला होता !

तुझी मज्जा करायच्या हेतूनं मैत्रिणींच्या सांगण्यावरून मी तुझा चष्मा लपवून ठेवला. तुला चष्म्याशिवाय काहीच दिसत नाही हे मला माहीत होतं. पण तेव्हा मी ते समजण्याच्या बेतातच कुठे होते? चष्मा शोधता शोधता तुझी नुसती धांदल उडाली होती, पण आम्ही सगळ्यांनी मात्र चष्मा शोधायला तुझी मदत करायच्या ऐवजी फक्त तुला हसायचंच काम केलं. शेवटी चष्म्याशिवाय डोळ्यांवर खूप वेळ ताण येऊन तुझे डोळे जड झाले आणि तुला चक्कर आली. त्याला सर्वस्वी मीच कारणीभूत होते.

पण तरीसुद्धा नंतर आई–बाबांसमोर तू माझीच बाजू घेतलीस आणि तुझ्याच नजरचुकीमुळे चष्मा कुठेतरी हरवला, असे सांगितलेस. याआधी कधीच घरातल्या घरात पत्र लिहून तुझी माफी मागण्याची वेळ आली नाही कारण तू माझ्यापेक्षा माझी मैत्रीणच जास्त आहेस. आई–बाबा दोघेही नोकरीसाठी जास्त वेळ परगावी असल्यामुळे तुझाच सहवास मला जास्त लाभला आहे. 'नात ही दुधावरची साय असते' असं तूच म्हणतेस ना?

एखाद्या कुंभाराने ज्याप्रमाणे मातीच्या गोळ्याला आकार देत देत सुंदर मडकं तयार करावे अगदी तसंच तू मला घडवलं आहेस. आजपर्यंत तू माझ्यावर केलेले संस्कार, तू दिलेली शिकवण, मला लावलेल्या चांगल्या सवयी विसरून मी तुझ्याशी असं वागायला नको होतं...

मी परत एकदा तुझी माफी मागते. एव्हाना तू माझी ही चूकसुद्धा पोटात घातली असशील याची मला खात्री आहे.

तुझी लाडकी
अवंती

**– कु. अवंती प्रमोद उंडे** (इ. १० वी), अहिल्यादेवी हायस्कूल फॉर गर्ल्स, पुणे – ३०
**चित्रकार : कु. ईशानी बर्वे**

हसू गाली लेवूनी, निसर्ग रानीवनी बागडे।
पानाफुलांतून तो, हिरवे गुपित उलगडे ।।



अगोदर पिंजरा काढावा, दार उघडं असलेला
नंतर काढावं
काहीतरी छानसं
काहीतरी साधंसं
काहीतरी सुंदर
काहीतरी पाखरासाठी उपयोगी असेल असं
मग कॅनव्हास एका झाडाला टेकवून ठेवावा
एखाद्या बागेत
एखाद्या वनात किंवा एखाद्या रानात
आपण झाडामागे लपून बसावं
काही न बोलता
हालचाल न करता
कधी कधी पाखरू लगेच येते
पण येण्याचं ठरवण्यासाठी त्याला
कधी काही वर्षंसुद्धा लागू शकतात

रेषा खेळू लागल्या, रंग बोलू लागले ।
आशय फुलून आला, चित्र सजीव झाले ।।

# पाखराचं चित्र काढताना



धीर सोडू नये
वाट पाहावी
पाखराच्या तातडीनं किंवा सावकाश येण्याचा
चित्र चांगलं होण्याशी संबंध नसतो
त्यामुळे काही वर्षं लागली तरी वाट पाहावी
पाखरू येईल तेव्हा,
म्हणजे ते आलं तर,
अतिशय शांत राहावं
पाखरू पिंजऱ्यात जाण्याची वाट पाहावी
आणि ते जेव्हा जाईल
तेव्हा ब्रशने हलकेच दरवाजा बंद करावा
मग
पाखराच्या कोणत्याही पिसाला स्पर्श होणार नाही
अशा प्रकारे
एक एक करून पिंजऱ्याचे सगळे गज पुसून टाकावेत
नंतर झाडाची सर्वांत सुंदर फांदी निवडून
त्याचं चित्र रंगवावं
पाखरासाठी
हिरवी पानं आणि वाऱ्याचं ताजेपणही रंगवावं
उन्हाचे कण आणि उन्हाळ्यातल्या ऊबदार
गवतामधल्या किड्यांचे
आवाज रंगवावेत
आणि मग गाण्यासाठी
पाखराची तयारी होण्याची वाट पाहावी
पाखरू जर गायलं नाही तर ते वाईट चिन्ह
चित्र वाईट झाल्याचं चिन्ह
पण जर ते गायलं तर ते चांगलं चिन्ह
तुम्ही आता सही करू शकता असं सांगणारं चिन्ह
मग हलकेच पाखराचं एक पीस काढून घ्या
आणि चित्राच्या एका कोपऱ्यात आपलं नाव लिहा

**मूळ फ्रेंच कवी : जाक प्रेव्हेर**
विसाव्या शतकातील अत्यंत लोकप्रिय फ्रेंच कवी
व अनेक गाजलेल्या फ्रेंच चित्रपटांचे पटकथा-संवाद लेखक
**स्वैर अनु. – माधुरी पुरंदरे**, १३, रुणवाल रिजन्सी, कोथरुड, पुणे – २९
**चित्रकार : सचिन जोशी**

## ।। अमेय ।। ... वांद्रे(पूर्व)चा अभिमान

मराठी माणसाची
शून्यातून उभी राहिलेली
चार व्यवस्थापने !

मी पहिल्या पिढीचा उद्योजक 'अमेय' परिवाराचा निर्माता,
पत्नीच्या कर्तृत्वाच्या कौतुकानी प्रगतीचा सोपान चढणारा,
वयाच्या ७८व्या वर्षी चौथे व्यवसाय केंद्र उघडणारा. हे कल्पनेचं उमलणं,
प्रतिभेचं लेणं, विचारांचं देणं, देवाचं मागणं मानून, नोकरीचा राजमार्ग सोडून,
स्वयंरोजगाराची पाऊलवाट शोधून, मार्गक्रमण करणारा सामान्य माणूस

**कमलाकर त्र्यंबक देशपांडे,** बी.ए., एल.एल.बी.
गांधीनगर, बांद्रा पूर्व, मुंबई- ५१. मो.९८२१०७६२८५

**एकाच रस्त्यावर चार आस्थापने, प्रत्येकात एका इमारतीचे अंतर,**
**व्यवसाय फक्त खाद्य पदार्थांचा,**



**१. अमेय-** शाकाहारी, **२. सदिच्छा-** मांसाहारी
**३. सिद्धिविनायक उपाहारगृह-** मराठी नाश्ता-मिठाई,
**४. प्रसाद-** पोळी भाजी +स्पे. मिठाई.

**दुसरी पिढीही त्यात रमतेय. हा जीवन प्रवास आपल्या सश्रद्ध आशीर्वादाने, दिलेल्या साथीने, संगतीने, सहकार्याने होत आहे. समृद्धी-समवेत समाधान आणि लाभला सुखी माणसाचा सदरा, धन्यवाद व ऋणी.**

### साहित्य सेवा

माझ्याच पुस्तकासांठी - अमेय प्रकाशन, बांद्रा पूर्व मुंबई -५

**लेखन -**
१.'कष्टयज्ञ' - कर्तृत्ववान पत्नीचे चरित्र
२. सुखी माणसाचा सदरा
३. मनी मानसी उद्योजक बनू या.
४. मला हॉटेल काढायचंय.

**कविता -**
५. व्यावसायिकाची बालगुटी
६. सुखमय जीवनाचा यशोमंत्र

**संकलन -**
७. मूल मागतं
८. तुझं माझं जीवन गाणं

**उजाडलं बघ!**

**भाग १.** यश-उद्योग, **भाग २.** जगावं कसं? भक्ती, **भाग ३.** पुढील पिढी - इच्छा , **भाग ४.** समज-सीमा, **भाग ५.** संसार-शांती, **भाग ६.** उत्कर्ष-विकास, **भाग ७.** घ्या भरारी, **भाग ८.** उद्योजकाच्या पहिल्या पिढीसाठी, **भाग १०.** जीवन भाषा, **भाग ११.** बदल, **भाग १२.** स्वत:शी संवाद, **भाग १३.** ऊर्जा, **भाग १४.** जाणिवा, **भाग १५.** पेलणं.


**भारतातील आश्चर्ये :** जैसलमेर किल्ला - राजस्थान
राजपूत राजा - रावल जैसल बांधणी, इ. स. ११५६

# पाखराचं चित्र काढताना –

काय भन्नाट कल्पना आहे ना या कवितेतली? या आधीपर्यंत पाखराचं शेकडो वेळा तरी आपण चित्रं काढलं असेल. पण तेव्हा हे असे, एवढे विचार आले होते मनात? पण काही म्हणा, कविता वाचल्यावर 'काहीतरी वेगळं, विलक्षण' वाचलंय आपण हे जाणवलं.

कविता वाचताना त्यातल्या शब्दांबरोबर एक मस्तपैकी सुंदर (हिरवागार), मखमली हिरवळ असलेला, फुलांचे ताटवे फुललेला, सुंदरशा झाडं, वेली–झुडुपांनी डवरलेला आणि त्यातल्या एका झाडाच्या खोडाशी 'पिंजऱ्याचं' चित्र उभं करून ठेवलेला बगीचा दिसला मनात! आपणच जणू झाडामागे पक्ष्याची वाट पाहात लपून बसलोय, असंही वाटून गेलं क्षणभर!

पण वाटलं पाखराचं चित्र काढताना पिंजऱ्यापासून सुरुवात कशाला? एकदम एखादा मस्त दिलखुलास/मनस्वी पक्षीच काढला तर? तेच सोपं नाही का? मग वाटलं, कवीला या कवितेतून नक्की काहीतरी अजून सांगायचं असणार. ही कविता वाटते/दिसते तशी सोपी नाहीच मुळी.

कवीला 'प्रयत्नवाद' सांगायचाय का कवितेतून? एका पाखराच्या चित्रासाठी काय काय आणि कसं कसं सांगितलंय? सोप्याकडून अवघडाकडे जाणारा प्रयत्नवाद! आधी सराव मग प्रयत्न–कष्ट–साधना–तपश्चर्या असा हा प्रवास ! हो ना, कलेची तपश्चर्या असल्याशिवाय 'उबदार उन्हाचे कण', 'किड्यांचे आवाज', 'वाऱ्याचा ताजेपणा' कसा रंगवता येणार? बरं आणि या साऱ्या प्रयत्नात हळुवारपणा, सहजता तर इतकी की पिंजऱ्याचे गज पुसताना पाखराच्या पिसालाही धक्का लागणार नाही अशी!!

थेट विषयाला हात न घालता आधी सराव महत्त्वाचा आणि म्हणून पिंजऱ्यापासून सुरुवात केलीय का कवीनं? खरंतर पाखराचं चित्र काढताना पिंजरा आपल्या मनातही न डोकावणारा! पण पक्ष्याचं मनस्वीपण, मुक्तपण मनावर ठसण्यासाठी हा पिंजरा कवितेत आला आहे का?

का कवितेतली ही रूपकं आहेत? पिंजरा म्हणजे प्रतिभावंत कलाकाराचं मन आणि पाखरू म्हणजे 'सुचणं' असेल? म्हणून पाखरू येण्याची आणि ते पिंजऱ्यात जाण्याची म्हणजे काही सुचण्याची वाट पाहावी असं कवी कळकळीनं सांगतोय का? अशी शांत चित्ताने वाट पाहायची म्हणजे आपल्या सहनशक्तीची जणू परीक्षाच!!



कवितेचा शेवट तर कळसाध्याय ! पाखराचा मुक्ताविष्कार ! कल्पना करा ज्या पाखरात तुम्ही तुमचं सगळं स्वत्व ओतलंत, जो यावा म्हणून तुम्ही आतुरतेने वाट पाहिलीत, प्रयत्नांपासून तपश्चर्येपर्यंतचा प्रवास त्याच्या बरोबर केलात; ते पाखरू चक्क आलंय आणि ते केवळ तुमच्यासाठी गातंय. हे पाखरांचं गाणं हीच जणू तुमची ओळख बनलीय !

खूप खूप विचार दाटून आले मनात. तो बगीचा, ते पाखरू, तो पिंजरा आणि शेवटी ते पाखरांचं गाणं अगदी हृदयाला भिडलं. कवितेतली तरलता, ताजेपणा मनाच्या खोलखोल तळापर्यंत पोचला. मला 'एखादी कलाकृती सुचणं आणि आकाराला येणं; कलाकाराने आपल्या प्रतिभेनं त्यात रंग भरणं' हे रूपक वाटतंय कवितेत. तुम्हाला अजून वेगळेही काही रूपकांचे अर्थ सुचू शकतील. विचार करायला तर सुरुवात करा...

कवितेतलं हे पाखरू म्हणजे अभ्यास आणि पिंजरा म्हणजे दप्तर असू शकेल का? किंवा हे पाखरू म्हणजे माणसाचे विचार/स्वत्व आणि पिंजरा म्हणजे त्याचं शरीर असू शकेल का? किंवा पाखरू म्हणजे कोणतीही कला आणि पिंजरा म्हणजे त्यातला साचेबद्धपणा/तोचतोपणा असू शकेल का? असा या कवितेचा पाहा बरं विचार करून!

तुम्हाला माहितीय का, कवितेचे अर्थ जेवढे जास्त तेवढी ती कविता उत्तम असते! एकाचवेळी अनेकार्थ पेलण्याची ताकद तिच्यात असते. त्यामुळेच शब्दाशब्दाचा कीस पाडत, त्यातच अडकून पडायचं नसतंच मुळी ! कवितेतला जो भाव थेट हृदयापर्यंत जाऊन पोहोचतो, मनात उतरतो तो(च) खरा!! बरोबर ना?

**– जयश्री काटीकर**
jayakatikar@gmail.com

२० वर्षांची वाटचाल

नातू प्रतिष्ठान ग्रामीण विभागात कार्य करणाऱ्या संस्थांना देणगी देते.
**प्रायोजक – नातू प्रतिष्ठान, पुणे** (९४०३१३६८३७)

# गुरुजी, माझ्यावर एक कविता लिवा ना



गुरुजी, माझ्यावर एक कविता लिवा ना.
साधी, सुप्पी, सरळ
जशी जमल, तशी लिवा.
झाडा, वेली, फुलावरच्या तुमच्या कविता
वाचल्यात म्या.. बेस हाईत.
तशीच एखादी माझ्यावर पन लिवा ना.. फकस्त एक।।१।।

खरं सांगू का गुरुजी,
घरापरीस आता साळाच बरी वाटतीया
चुलांडासाठी फाटं गोळा करून,
हा जीव आक्रसलाय
मातर तुमच्या कविता, गाणी, गोष्टींतून
हा जीव फुलाया लागलाय.
या फुलणाऱ्या जीवावर, एक कविता लिवा गुरुजी।।२।।

गुरुजी, आमच्यावर कुणी सुदिक
कायबी लिवीत नाय
सदानकदा आमच्यावर दमदाटी, उठसूठ शिव्याशाप.
'आता कष्ट केल्यावर, भाकरीचा तुकडा मागितला तर...
काय चुकलं आमचं, गुरुजी?'
आमचं हे मन जगाला कळवून सांगणारी,
हरामाच्या छदामाला दूर सारणारी,
अन् खऱ्या पनावर जीव ववाळून टाकणारी
एक कविता लिवाच गुरुजी.।।३।।

गुरुजी, तुम्ही म्हणाला व्हता
'परत्येकाला आपलं जीवन फुलवण्याचा अधिकार हाय'
तुमच्या या बोलण्यानं जीव धुगधुगला... नवी उभारी
मिळाली...
या आडदांड जगात हिमतीनं उडण्याची.
पंखात नवं बळ घेऊन
म्हणूनच गुरुजी, एखादी चिमणीसारखी का व्हईना
चिमुकली कविता लिवा माझ्यावर।।४।।

गुरुजींचे डोळे लखलखले, ते म्हणाले
पोरी, तुझ्यावर काय कविता लिहू.
अगं, तूच एक कविता आहेस – जितीजागती
वाहत्या नदीच्या प्रवाहासारखी – खळाळणारी
यमक, वृत्त, मात्रांच्या साच्यात
बंदिस्त नसलेली।।५।।

**– एकनाथ आव्हाड**
ए-२०२, भाग्यवान सोसायटी,
खारदेवनगर, चेंबूर, मुंबई – ७१
**चित्रकार : ऋजुता घाटे**

चंद्राच्या उशीत स्वप्नांचे गाव।
अंधाराच्या कुशीत विश्रामाचा ठाव।।

(पान क्र. ३३ वरून पुढे सुरू)



# आकर्षण

चंदूला जाडजूड विग् घालायला देऊन त्याच्या चेहऱ्याला तेल लावले. लाल टी शर्ट, करड्या रंगाचे जॅकेट व करड्या रंगाची पँट घालून वेगवेगळ्या कोनामधून कॅमेरा चालवला. 'धाव' म्हणाले...', 'पड' म्हणाले, 'उडी मार' म्हणाले... लोळायला लावले... नंतर लाईट व पत्र्याचे रिफ्लेक्टर सोडून कॅमेऱ्यासमोर कॅमेऱ्याला पाठ करून 'चलो भागो' म्हणाले... चंदू धावला. 'कट्' म्हणाले. एकाने चंदूला बोलावून, 'कॅमेऱ्याला तोंड दाखवायला तू हीरो नाही रे, राजा... शक्य तितका चेहरा दिसणार नाही याची खबरदारी घे. तू जितका कमी चेहरा कॅमेऱ्याला दाखवशील तितका तू पास होण्याची शक्यता जास्त आहे,' असा इशारा दिला.

पुन्हा कॅमेरा सुरू... 'ॲक्शन्...' चंदू चेहरा न दाखवता धावला, उडी मारली, ड्रममध्ये लोळला, कुत्री मागे लागल्यावर धावला, दोरीवर लोंबकळला... मागे वळून न पाहाता धावणे हेच त्याचे आता मुख्य ध्येय बनले. शूटिंगच्या आधी एकदा कॅमेरा कुठे आहे ते तो नीट पाहून घेत होता. 'ॲक्शन' म्हटल्या क्षणी कॅमेऱ्याकडे संपूर्ण पाठ फिरवून धावण्याची कला त्याने थोड्याच वेळात अवगत केली. कॅमेऱ्यापासून तो जितका दूर धावेल तितका त्याचा भाव वाढत होता. कॅमेऱ्यामागचे लोक 'मुह मत दिखाना' असे ओरडतच होते... दुसऱ्या दिवशी त्याला लवकर यायलाही सांगितले. त्या रात्री दादरच्या फुटपाथवरही कॅमेऱ्यापासून दूर चंदू धावतच होता.

दुसऱ्या दिवशी सकाळपासूनच चंदूची 'ॲक्शन' सुरू झाली. चंदू कॅमेऱ्यापासून बराच दूर उभा राहिला. घोड्यावर मिथुनचा पाठमोरा, डावा-उजवा ॲंगल 'शूट' झाला. नंतर तो घोड्यावरून पडला. पाण्याच्या तळ्यातून वर आला. चिखलात दांडग्यांबराबेर मारामारी केली. मारामारीत मार खाऊन चिखलाने भरला. माकडासारखा विव्हळला. अंगातून घामाच्या धारा वाहात होत्या. जे चाललंय ते स्वप्नच वाटत होतं. बाकीच्या एक्स्ट्रांपेक्षा चंदूने उंच उडी मारली तेव्हा किंवा त्या दांडग्यांची पकड खरेच चुकवून त्यांना सपशेल खाली पाडल्यावर मिळालेला विचित्र आनंद चंदूच्या घामात वाहात होता. 'खरा आनंद कोणता? कशाला खरा आनंद म्हणायचे?' गोंधळलेला चंदू गटागटा पाणी प्याला. पुन्हा शूटिंग सुरू झाले. आता मिथुन चक्रवर्तीने थोबाडीत खाण्याचे दृश्य होते. चंदू कॅमेऱ्याकडे पाठ करून उभा राहिला. समोरच्या व्यक्तीने थोबाडीत मारली. 'एक्सलंट' असे सगळे ओरडले.

तेवढ्यात मिथुनजी आले. मिथुनजी एका मोठ्या रंगीत छत्रीखाली बसले. चंदूने सर्व अंगाचे डोळे करून आपल्या हीरोकडे पाहिले. मिथुनजी सुजल्यासारखे दिसत होते. मिथुनजींनी घातलेले कपडे पाहून चंदू दचकला. आपलेच कपडे! तोच लाल टी शर्ट, करड्या रंगाचे जॅकेट आणि करड्या रंगाची पँट!! चंदूला आपणच तेथे बसल्यासारखे वाटून गेले. मुकादमाने 'आपका नया डबल' अशी चंदूची ओळख सांगितली. मिथुनजी चंदूला पाहून काहीतरी विनोदाने बोलले. सगळे हसले. आपण व मिथुन चक्रवर्तीनी एकाच

२० वर्षांची वाटचाल

झगमगाटामध्ये, एक मंद दिवा।
माझा माझ्यासाठी, आनंदाचा ठेवा।।

# रंगगंध कलासक्त न्यास, चाळीसगाव

(केवळ नाट्यचळवळ नव्हे एक सर्वंकष सांस्कृतिक यात्रा) आयोजित

**पूज्य पुरुषोत्तम दारव्हेकर स्मृती**

**अखिल भारतीय साहित्य अभिवाचन महोत्सव - २०१३** (वर्ष अकरावे)

**दिनांक : ०९ व १० फेब्रुवारी २०१३**

*'एका वेगळ्या प्रकारचा, साहित्य आणि नाटक यांना जोडणाऱ्या वाचिक अभिनयाचा कस पाहाणाऱ्या स्पर्धात्मक अशा महाराष्ट्रातील एकमेव साहित्य अभिवाचन महोत्सवाचे उद्‌घाटन करतांना मला विशेष आनंद होत आहे.'*

–सुप्रसिद्ध नाट्यचित्र अभिनेते डॉ. गिरीश ओक

गेल्या दहा वर्षांपासून या स्पर्धात्मक कार्यक्रमाचे आयोजन दरवर्षी फेब्रुवारी महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी व रविवारी केले जाते.

**महोत्सवाची वैशिष्ट्ये :** (१) आजवर डॉ. गिरीश ओक, आविष्कार, वीणा देव, रंजन दारव्हेकर, सुधीर मुंगी, लक्ष्मीकांत धोंड, अनिरूद्ध खुटवड, डॉ. अजय जोशी, धीरेश जोशी, अशोक शिंदे वगैरे मान्यवरांची उपस्थिती. (२) आजवर स्पर्धेमध्ये पुणे, नागपूर, सोलापूर, औरंगाबाद, नाशिक, जळगांव, गोवा आणि इंदौर येथील मान्यवर संस्थांचा दर्जेदार सहभाग. (३) २ ते ५ कलाकारांचे ४० ते ५० मिनिटांचे कथा, कविता, नाटक, आत्मवृत्त लेख, वैचारिक वगैरे कुठल्याही साहित्याचे नाट्यात्मक अनुभूती देणारे वाचन अपेक्षित. (४) प्रवासासाठी रेल्वे सवलतीची सोय उपलब्ध. (५) दिग्दर्शन, अभिनयाची वैयक्तिक तसेच सांघिक घवघवीत पारितोषिके.

**अधिक माहितीसाठी संपर्क : डॉ. मुकुंद करंबेळकर –९८२२२६३२७९, श्री. राजेंद्र चिमणपुरे – ९४२०६६६१२९**

Celebrating 25 Years

# Happy Diwali !

# Venky's (India) Limited

**Regd. & Corporate Office**

**Venkateshwara House,**

**S.No. 114/A/2, Pune -Sinhagad Road, Pune - 411 030.**

**Tel. No. - 020- 24251530 to 24251541 Fax No. - 020-24251077**


**जलतीर्थ :** माणिकडोह धरण (कुकडी नदी) – जुन्नर, जि. पुणे
बांधणी – १९८४, उंची – ५१.८ मी.

प्रकारचे कपडे घातलेले पाहून चंदूला विलक्षण मजा वाटत होती.

नंतर क्लायमॅक्स् दृश्याचे शूटिंग सुरू झाले. चंदूचे हात बांधून त्याला एका व्हॅनच्या मागे बांधले. पोट जमिनीवर घासू नये म्हणून भिक्षेकऱ्यांच्या छोट्या गाडीच्या चाकासारखी फळी त्याच्या पोटाला बांधली. 'जरा जपून' असे म्हणत चटकन व्हॅन चालू केली. चंदूला फरफटत व्हॅन निर्जन स्थळी मोकळ्या जागेत पळू लागली. चंदूच्या मांड्या खरचटल्या. जमिनीवरचे बारीक खडे उडून चेहऱ्यावर मारा करू लागले. एक बाटली चाकात अडकून आता आपण खाली पडणार असे वाटल्याने सर्व शक्ती एकवटून, तोल सांभाळून चंदूने दोरी घट्ट पकडली. तो बचावला. एका वळणावर व्हॅन जोरात वळली तेव्हा त्याने दोनदा पलटी मारली. आता आपण पाठीवर पडणार असे वाटले तेव्हा कसेबसे पुन्हा पालथे झोपून त्याने स्वत:ला वाचवले. 'हे कधी संपणार?' अशी चिंता करत बसण्याचीही त्याला उसंत नव्हती. इतका तो धाडसाचा क्षण होता. शॉट संपल्यावर सगळ्यांनी कानठळ्या बसतील अशा टाळ्या वाजविल्या. चंदू आनंदाने बेभान झाला. मिथुनजी या कशाशी काडीचाही संबंध नसल्यासारखे आरशात पाहून आपल्या भुवया नीट करत होते. चंदूने आता जमिनीवरच कडेला बसकण मारली.

आता तीच फळी मिथुनजींच्या पोटाला बांधली व कॅमेरा जवळ धरून मिथुनजींच्या चेहऱ्यावरील हावभावाचे 'क्लोज अप्' घ्यायला सुरुवात झाली. मिथुनजी चेहऱ्याच्या स्नायूंचा चढउतार करून अभिनय करत होते. तोच लाल टी-शर्ट, तेच बूट, हातात तेच कडे आणि गळ्यात चेन. 'मिथुन चक्रवर्ती, माझे अनुकरण करत आहे.. मी खरेच जिंकलेल्या धाडसाचे क्षण हे निर्जीवपणे आपलेसे करत आहेत.' असे चंदूला वाटायला लागले. मिथुनजी त्याला पांगळ्यासारखे दिसू लागले. चंदूला फार अस्वस्थ वाटू लागले.

पॅक-अपनंतर मुकादमाला भेटण्याचा उत्साहदेखील त्याला राहिला नाही. तो दादरला परतला, म्हाताऱ्याच्या दुकानात जाऊन त्याने पाच-सहा स्टोव्ह दुरुस्त करून दिले. नंतर फुलाच्या दुकानातील मतकरीला सोबत घेऊन शिवाजी पार्कच्या समुद्र किनाऱ्यावर गेला. अंधारात लकलकणाऱ्या समुद्राने त्याला आकर्षित केले.

चंदू खूप दूरवर पोहत गेला. दूर गेला तितके दिवसभराचे दमणे कमी झाल्यासारखे त्याला वाटले. बरेच लांब गेल्यावर पाण्यावर उताणे पडून त्याने आकाशाकडे नजर टाकली. तारे शांतपणे लुकलुकत होते. खाली दूरवर दिव्यांच्या गुच्छाप्रमाणे संपूर्ण शहर पाण्यावर तरंगल्यासारखे दिसत होते. या तरंगणाऱ्या शहरात कमरेला फळी बांधलेला मिथुन चक्रवर्ती कुठे आहे? आपण मृत्यूजवळ जाऊन अत्यंत धाडसी क्षण जगून आलो. त्याचा मागमूसही नसलेला मिथुन असहाय आहे. त्याला स्टोव्ह लावायला येतो का? किंवा दहीहंडीच्या दिवशी मानवी पिरॅमिडच्या पाचव्या मजल्यावरील हंडी फोडता येते का? किंवा एका क्षणात समतोल साधून मृत्यू जिंकायला जमते का? शहरापेक्षा उंचावर आपण तरंगत असल्याचा चंदूला भास झाला. धाडसाच्या सोनेरी क्षणांपेक्षा दुसऱ्या कशातही आनंद नाही, असे त्याला वाटले. असेच पोहत पोहत कोणाही पोहणाऱ्याला आपण मागे टाकू शकू, अशा स्वप्नाला कवटाळल्यासारखा तो किनाऱ्याकडे धावला. एव्हाना मतकरी परतला होता. मध्यरात्र असल्याने किनाऱ्यावर लोक नव्हते. नवा जन्म झाल्यासारखा चंदू वाळूवरून धावू लागला... एखादा पक्षी जमिनीवर धावल्यासारखा...

**मूळ कन्नड लेखक : जयंत कायकिणी**
**स्वैर अनुवाद : मीना वांगीकर**
'सरस्वती' १२०४/२८, डेक्कन जिमखाना, पुणे 411004
**चित्रकार - पुंडलिक वझे**

शुभ दीपावली

धनंजय चंद्रकांत

दिवाळी अंकातर्फे हार्दिक शुभेच्छा

छात्रप्रबोधनच्या युवा वाचकांना आवडतील अशा
चंद्रकांतमधील दोन कादंबऱ्या अवश्य वाचा

- अद्भुताच्या शोधात - उल्हास राणे
- रारंगढांग नंतर - श्रीकृष्ण सवदी

राजेंद्र प्रकाशन, धनंजय कार्यालय, महाराजा बिल्डिंग,
पोर्तुगीज चर्चसमोर, गिरगांव, मुंबई ४००००४.
फोन : २३८२ ३५४८ / २८३३ २४०६



।।शुभ दीपावली।।

परांजपे इस्टेट्स
Everything in Real Estate

फ्लॅट नं–८, प्लॉट नं.१५,
युनायटेड वेस्टर्न को. ऑप. सोसा.,
कर्वेनगर, पुणे– ४११ ०५२.
फोन : २५४४८४२४,
मोबाईल : ९८२२०९६५७०



With
Best Compliments

Vishal Engineers Pvt. Ltd.
Manufacturers of
Specified Turned Components

**Regd. Office :**
A/15, Amar Ashiyana, Behind Tatya Tope Hsg. Society, Wanwari, Pune 13

**Works & Admn. Office :**
S.No. 19, Gondhale Nagar, Pune Saswad Road, Pune 28

Ph. : 91-20-26990426 Telefax : 91-20-26992751
e-mail : vishafenggpitd@vsnl.net


पाहा : http://www.puzzlesolver.com/index.php
काही गंमतीदार कोडी आणि ती सोडवण्याच्या क्लृप्त्या

## जरा गणिती डोके चालवा

एका व्यापाऱ्याने ५०० आंबे आणले, त्याच्याकडे ९ खोकी होती. त्याने आपल्या नोकरांना सांगितलं, या ९ खोक्यांत आंबे अशा पद्धतीने भरा की एखाद्याने १ पासून ५०० पर्यंत कितीही आंबे मागितले तरी एकही खोका न उघडता आंबे देता आले पाहिजेत. नोकरांना प्रश्नच पडला पण त्यांच्यात एक बिरबल होता. ९ खोक्यांतून आंबे कसे भरायचे हे त्यानं समजावून सांगितलं. तेव्हा या बिरबलानं आपलं डोकं कसं लढवलं असेल? आपल्यालाही प्रश्न पडला असेलच. समजा, कुणी ९ आंबे मागितले, ११५ मागितले, ३६० मागितले तरी खोका न उघडता हे आंबे देता आले पाहिजेत. हे कसं काय जमणार?

– **वसुंधरा पर्वते,** vgparvate@yahoo.com

## हे करून पाहा



खुर्चीवर बसून उजवा पाय जमिनीपासून जरा उंच उचला आणि हवेत पाय घड्याळाच्या दिशेने गोलगोल फिरवा. एक-दोन फेरे झाल्यावर उजव्या हाताने हवेत 6 ची (इंग्रजी सहा) आकृती काढा, त्यावेळी पाय गोल फिरवणे चालूच ठेवा. जमतेय का? पाहा बरं करून! मला खात्री आहे 6 ची आकृती काढताक्षणी पायाची फिरायची दिशा आपोआप बदलेल. तुम्हाला यापाठीमागचे कारण काय वाटते? जरूर कळवा.

**श्रीरंग गोखले,** skg2743@gmail.com


## जरूर वाचा

### जिद्दीची लोभस रूपं

संपादन : बागेश्री पोंक्षे
पृष्ठ संख्या : ११२
किंमत : ₹ ६०
छात्र प्रबोधन प्रकाशन




प्रस्तुत पुस्तकात आपल्याला भेटणार आहेत प्रतिकूल परिस्थितीतही शिक्षणाची आस असणारी, त्यासाठी धडपड करणारी छोटी मुलं आणि मोठी माणसंही! त्यांच्या प्रखर प्रयत्नांचे महत्त्व वेगळेपणाने सांगणारे हे लेख. ही आहेत सर्वसामान्य माणसं. आपल्या आजूबाजूला जगणारी– आपल्यातलीच; पण प्रखर इच्छाशक्ती असलेली; सशक्त मनाची, विलक्षण जिद्दीची! परिस्थितीच्या मर्यादांनी मर्यादून न जाता ही बावनकशी मुलं अंकुरली, फुलली आणि म्हणूनच त्यांच्या कहाण्या इतरांना प्रेरणादायी ठरतील.

कुमारांसाठी 'छात्र प्रबोधन' प्रकाशित इतरही अनेक पुस्तके या दिवाळीत जरूर खरेदी करा व वाचा. यादी पृष्ठ क्र. २२ वर पाहा.




कै. श्री. शंकर दत्तात्रय गोडबोले – स्मृतिप्रीत्यर्थ
**प्रायोजक – श्री. नितीन शंकर गोडबोले, पुणे**

# *BOOST YOUR PROFITS*

*Do Not Panic in this world of* **GLOBALISED ECONOMY**

*Fight the onslaught of low priced goods using*
**'PRABODH'** ***brand*** **SPECIAL PURPOSE MACHINES**

*These machines are designed & built to give you*
**Quality goods at high productivity :**
**eliminating the need of skilled**
**operator and supervision.**



*We design and supply tailor - made machines of following categories*

Automation for **MASS PRODUCTION** of components

Automation for high speed **ASSEMBLY OF COMPONENTS**

Electro-Mechanical **COMPONENT ELEVATORS & CONVEYORS**

On line and Centrifugal **INDUSTRIAL WASHING MACHINES**

**TEST RIGS** for Assemblies and products

Ergonomic **WORK STATIONS** for manual assembly of parts

Conveyorised **AUTOMATION SCHEMES** for components & assembly.

*For further details please Contact*

## PRABODH NIRMAN

A-79, First Floor, Pawana Industrial Premises Co-op Society Ltd.
T-204, M.I.D.C. Bhosari, Pune-411026.
Phone No. - 020 - 27111788, 27111450
Telefax - 020-66111928
E - mail : prabodhnirman@vsnl.com
Visit our site at - www.prabodhnirman.com


**जलतीर्थे :** भातसा धरण (भातसा नदी) – शहापूर जि. ठाणे
बांधणी – १९८३, उंची – २८८.५ मी.

## कुतूहल — दुर्गंध येणारी फुलं ?

सुगंधीत फुलांविषयी आपल्याला बरीच माहिती असते. पण आपण काही दुर्गंध येणाऱ्या फुलांची माहिती घेऊ. कधी कधी ह्या वासानी डोकं दुखायला लागतं. पण ह्या दुर्गंधामुळे काही कीटक, किडे झाडाकडे आकर्षिले जातात आणि कळत नकळत परागीभवनाचं कार्य होतं. काही उदाहरणं –

**रॅफलेशिया** – परोपजीवी, वनस्पती जगातलं सर्वात मोठ्ठ फूलं, ३ फूट व्यास, १५ पौंड वजन, केशरट-तांबडं, बोर्निओ, सुमात्रा देशात.

**स्टॅपेलिया** – कॅक्टस, कुंडीतही लावता येतं. आपल्याकडे येतं. खूप ऊन असेल तर फुलं येतात. फुलांचा रंग कुजलेल्या मांसासारखा दिसतो.

**हिडनोरा ऑफ्रिकाना** – आफ्रिकेमध्ये मूळ स्थान आहे. परोपजीवी आहे. झाड जमिनीत येतं पण लुसलुशीत लाल फुलं जमिनीवर येतात. शेणासारखा घाण वास येतो.

ह्याशिवाय जंगली बदाम, बदकवेल, ड्रगनलिली, वेस्टर्न स्कंक कॅबेज, वाईल्ड अॅरम (अळू), क्रिसेन्शिया कुजेटे ही फुलेही दुर्गंधीयुक्त आहेत. त्यांच्या प्रतिमाही जरूर पाहा.

– **डॉ. कांचनगंगा गंधे,** kanchan.gandhe@gmail.com


रॅफलेशिया


स्टॅपेलिया


हिडनोरा ऑफ्रिकाना

## ‘क्युरिऑसिटी’– कोणता अभ्यास करणार?

मंगळावरील हवामान आणि भूगर्भाचा अभ्यास करण्यासाठी ‘क्युरिऑसिटी रोव्हर’ हे यान मंगळाच्या पृष्ठभागावर ६ ऑगस्ट २०१२ रोजी उतरले. त्यानंतर ते तिथे ६८६ दिवस (९८ आठवडे) फिरणार आहे.

* ‘क्युरिऑसिटी’ ऑक्टोबरमध्ये अभ्यासास सुरुवात करेल. * लेझर झोतांचा वापर करून २३ फुटांपर्यंतच्या खोल भागाचा अभ्यास, रासायनिक घटकांचे विश्लेषण करता येणार आहे. * मंगळावरच्या वाऱ्यांची गती, दिशा, हवेचा दाब, आर्द्रता, तापमान, धुळीची वादळे, हिवाळा, अल्ट्राव्हायोलेट किरणांच्या नोंदी ठेवता येतील. * मंगळावरच्या मातीतल्या रासायनिक घटकांचे, मिनरलचे विश्लेषण करण्यात येणार आहे. * खडक आणि मातीतल्या कार्बनी संयुगांचे विश्लेषण करेल. * मंगळावर जीवसृष्टीचे, सूक्ष्मजीवांचे अस्तित्व होते का किंवा आहे का ह्याचा अभ्यास करेल. * कार्बन, नायट्रोजन, फॉस्फरस, सल्फर, प्राणवायू मंगळावर किती प्रमाणात आहे, पाण्याचे अस्तित्व आहे का किंवा होते का ह्याचा शोध घेईल. * पृष्ठभागाखालील नमुन्यांचे विश्लेषण करेल. * पृथ्वीवर परत येताना मंगळावरचे मातीचे नमुने आणेल.



२० वर्षांची वाटचाल

वृत्ती बदलू, कृती बदलू, समाज बदलू, निर्भिडपणे जबाबदारीने वागू. **प्रायोजक – डॉ. विनायक देसूरकर, पुणे**

कविता

# हवे काळीज संतजनांचे...



रे मिळोत मजला बाहू विज्ञानाचे
परि काळिज राहो सदैव संतजनांचे ।।धृ।।

जरि झेप घेऊनी नभात स्थानक केले
परि पाय असावे मातीमध्ये मळले
जरि आम्हा मिळाले पंखच संगणकांचे ।।१।।परि...

जरि पाडू शकलो पाऊस कृत्रिम आम्ही
जरि बांधू शकलो अस्त्रांमध्ये वन्ही
वेगावर होऊन स्वार, खोलले दार जरी मेघांचे ।।२।। परि...

जरि यंत्रमानवा गुलाम अमुचा बनवू
जरि आकांक्षा गगनावर नेऊन भिडवू
सागरी बांधले सेतु जरी लोहाचे ।।३।। परि...

जरि कठोर पालन करू नित्यनियमांचे
तरी मोल कमी ना होवो कधी अश्रूंचे
जरि खंडुनि टाकू हात दुष्टदैत्यांचे ।।४।। परि...

जरि समृद्धीने भरले खजिने अमुचे
कारागृह राहो सदा रिकामे अमुचे
फडकोत विविध क्षेत्रांत जयध्वज अमुचे ।।५।। परि...


**संजीवनी बोकील**
ए-४/७०३ आदित्य-शगुन
पाषाण मार्ग, बावधन
पुणे 411021


**चित्रकार : ऋजुता घाटे**

कोणी करी संशोधन, कोणी मैदान गाजवी ।
त्यांच्यासाठी आनंदाने, टाळी तरी वाजवावी ।।


प्रायोजक - श्री. आशुतोष गुळाणीकर, पुणे

# देवकण आणि सत्येंद्रनाथ बोस

विनोदिनी अळवणी



सुप्रसिद्ध ब्रिटिश शास्त्रज्ञ पीटर हिग्ज

५ जुलैच्या वर्तमानपत्रात पहिल्या पानावरील 'देवकण सापडले' ही बातमी सर्वांनी वाचली असेलच. या देवकणांच्या शोधामुळे विश्वाच्या उत्पत्तीचे गूढ उलगडण्यास मदत होईल, असा विश्वास शास्त्रज्ञांनी, वैज्ञानिकांनी व्यक्त केला आहे. देवकणांचे शास्त्रीय भाषेतील नाव 'हिग्ज बोसॉन' असे आहे. त्याचे वर्णन अतिशय दुर्मिळ, पळपुटा (elusive) मूलकण असे केले आहे. जे पदार्थाचे सूक्ष्म कण 'बोस-आइन्स्टाईन स्टॅटिस्टीक्स' चे नियम पाळतात, त्यांना 'बोसॉन' हे नाव गेल्या शतकातील भारतीय शास्त्रज्ञ सत्येंद्रनाथ बोस यांच्या गौरवार्थ पॉल डिरॅक या शास्त्रज्ञाने दिले. हिग्ज बोसॉन हा त्यांपैकीच एक प्रकारचा सूक्ष्म कण.

हिग्ज बोसॉनची कल्पना समजण्यासाठी विश्वनिर्मितीसंबंधीचा सर्वात प्रमुख असा 'सर्वसाधारण प्रारूप' सिद्धांत (The Standard Model) अभ्यासणे आवश्यक आहे. या सिद्धांतामुळे 'मूलकण विज्ञाना'च्या (Particle Physics) साहाय्याने, अत्यंत किल्ष्ट (complicated) असे विश्वनिर्मितीचे कोडे, सोप्या मूलभूत गोष्टींच्या रूपात दर्शविता येते, असे वैज्ञानिकांना वाटते. आपल्याला अणुबरोबरच प्रोटॉन, न्यूट्रॉन, इलेक्ट्रॉन या मूलकणांची माहिती आहे. विश्वामध्ये पदार्थांबरोबर, त्यावर परिणाम करणारी बलें (forces) ही असतात.



सर्नमधील लार्ज हेड्रॉन कोलायडर हे उपकरण

काही भेटेल सतेज, काही तेजहीन फिके ।
'निवडावे काय?' याचे । भान असावे नेटके ।।

# सत्येंद्रनाथ बोस



**जन्म : १ जानेवारी १८९४**
**मृत्यू : ४ फेब्रुवारी १९७४**

हिग्ज बोसॉन मधील बोसॉन शब्द भारतीय वैज्ञानिक सत्येंद्रनाथ बोस यांच्या सूक्ष्मकण- विषयक संशोधन कार्याच्या गौरवार्थ योजलेला आहे. आपण त्यांचा थोडक्यात परिचय करून घेऊ.

सत्येंद्रनाथ बोस यांचा जन्म १ जानेवारी १८९४ मध्ये कोलकता येथे झाला. सात भावंडांतील ते सर्वात ज्येष्ठ होते. त्यांचे शालेय शिक्षण हिंदू हायस्कूल, कोलकता आणि महाविद्यालयीन शिक्षण प्रेसिडेन्सी कॉलेज कोलकता येथून झाले. मेघनाथ साहा हे त्यांचे सहाध्यायी होते. विश्वविख्यात शास्त्रज्ञ डॉ. जगदीशचंद्र बोस आणि प्रफुल्लचंद्र रॉय हे त्यांचे शिक्षक होते.

बी. एस्सी. आणि एम. एस्सी. या परीक्षांत ते कोलकता विश्वविद्यालयात सर्वप्रथम आले, १९१६ मध्ये त्यांनी आपली कारकीर्द कोलकता विश्वविद्यालयात पदार्थविज्ञान विषयातील व्याख्याते म्हणून सुरू केली. १९२० च्या सुरुवातीला त्यांच्या पुंजीय यांत्रिकीतील (Quantum Mechanics) संशोधनाने ''बोस - आईन्स्टाईन स्टॅटिस्टीक्स'' आणि या ''बोस - आईन्स्टाईन कन्डेन्सेट'' या सिद्धांतांचा पाया घातला.

१९२१ मध्ये ते नवीन निघालेल्या ढाका विश्वविद्यालयात रीडर म्हणून पदार्थविज्ञान विभागात रुजू झाले. १९२४ मध्ये त्यांनी ''मॅक्स प्लँकचा नियम आणि प्रकाश पुंजीय गृहितक'' (Max Planck's law and light quantum Hypothesis) या विषयावर लेख लिहिला. त्यांनी तो विविध शास्त्रीय नियतकालिकांना छापण्यासाठी पाठविला. पण कोणीही तो स्वीकारला नाही. मग त्यांनी तो लेख विश्वविख्यात

**मनुष्याला पृथ्वीवरच्या प्रत्येक गोष्टीचे कुतुहल आणि उत्सुकता वाटते. प्रत्येक गोष्टीच्या खोलात शिरून त्याचे 'मूळ' शोधून काढायचेच हा त्याचा स्वभावधर्म, साहजिकच, विश्वनिर्मिती कशी झाली असेल या कुतुहलापोटी शास्त्रज्ञांच्या अनेक पिढ्यांनी अथक परिश्रम, प्रयोग केले. अखेर त्यांना ते गूढ उलगडले. 'देवकण' सापडले. ते कसे आहेत वाचा या लेखात.**

उपलब्ध माहिती आणि ज्ञानाच्या आधारे अनेक वैज्ञानिकांनी मिळून १९७० मध्ये सर्वसाधारण प्रारूप सिद्धांत (The Standard Model) मांडला. या सिद्धांतानुसार विश्व हे १२ वेगवेगळ्या मूलकणांनी आणि ४ प्रकारच्या नैसर्गिक बलांमुळे बनले आहे. या मध्ये ६ क्वार्कस् आणि ६ लेप्टॉन्स असे १२ मूलकण आहेत. क्वार्कस् हे अणुकेंद्रात असतात आणि ते प्रोटॉन आणि न्यूट्रॉन यांचे बनलेले असतात. तर लेप्टॉन्स हे अणुकेंद्रकाबाहेर असून ते इलेक्ट्रॉन आणि न्यूट्रीना (विद्युतभाररहित इलेक्ट्रॉन) यांनी बनलेले असतात. शास्त्रज्ञांच्या मते क्वार्क आणि लेप्टॉन यांची अजून लहानकणांत फोड होऊ शकत नाही. म्हणजेच क्वार्क आणि लेप्टॉन हे मूलकण आहेत. या मूलकणांबरोबरच त्यावर परिणाम करणारी चार प्रकारची बले : गुरुत्वीय बल, विद्युतचुंबकीय

विज्ञानाच्या शिखरावरती, प्रगतीच्या वहिवाटा।
सत्यशिवाच्या सुंदर- मंगल, खुणावती मज लाटा।।

शास्त्रज्ञ अल्बर्ट आईनस्टाईन यांच्याकडे पाठविला. आईन्स्टाईन यांना तो लेख इतका आवडला की त्यांनी स्वत: तो जर्मन भाषेत भाषांतर करून प्रसिद्ध जर्मन नियतकालिक 'झाइट श्रीफ्ट फ्यूर फिजिक '(Zeitschrift fuir physik) यामध्ये बोस यांच्या नावे छापण्यासाठी पाठविला आणि तो छापून प्रसिद्ध झाला. या लेखाकडे जगातील शास्त्रज्ञांचे लक्ष वेधले आणि त्यांनी त्याची खूप प्रशंसा केली. याचेच पुढे ''बोस आईन्स्टाईन'' सिद्धांतात रूपांतर झाले. त्यानंतर दोन वर्षे त्यांनी युरोपियन एक्स रे आणि क्रिस्टलोग्राफी प्रयोगशाळेत संशोधनाचे काम केले. त्या काळात त्यांना लुई-द-ब्रॉग्ली, मेरी क्यूरी आणि अल्बर्ट आईन्स्टाईन यांच्याबरोबर काम करायला मिळाले. त्याचा परिपाक म्हणजे ''बोस आईनस्टाईन स्टॅटिस्टीक्स'' आणि ''बोस आईन्स्टाईन कन्डेन्सेट'' या सिद्धांताची निर्मिती होय.

बोस यांचे हे संशोधन कार्य हे प्लँट, बोहर, आईन्स्टाईन यांचा जुना पुंज सिद्धांत (Old Quantum Theory) आणि श्रॉडिंजर, हायझेन्बर्ग, बॉर्न, डिरॅक यांचे नवे पुंज यांत्रिकी (New Quantum Mechanics) यामधील दुवा बनले.

१९२६ मध्ये ते पदार्थविज्ञान विभागात प्रोफेसर झाले. १९४५ मध्ये ते ढाक्याहून कोलकत्याला, कोलकता विश्वविद्यालयात प्रोफेसर म्हणून परत आले, आणि १९५६ मध्ये निवृत्त झाले. १९५९ मध्ये ते राष्ट्रीय (National) प्रोफेसर झाले आणि त्यांची नियुक्ती राज्यसभेवर सभासद म्हणून झाली. त्यानंतर ते शांतिनिकेतन येथील विश्वभारती विश्वविद्यालयाचे कुलगुरू झाले. भारत सरकारने त्यांच्या कार्याचा गौरव 'पद्मविभूषण' किताबाने केला.

ते स्वशिक्षित (Self Educated) आणि बहुभाषिक होते. त्यांना मातृभाषा बंगालीबरोबर संस्कृत, इंग्रजी, फ्रेंच, जर्मन या भाषा अवगत होत्या. त्यांना विज्ञान, गणिताबरोबर रसायनशास्त्र, जीवशास्त्र (Biology), खनिजशास्त्र, तत्त्वज्ञान, कला, साहित्य, संगीत अशा विविध विषयांत रुची होती. व्हायोलिनसारखे वाद्य ते वाजवीत असत. नोकरी करणाऱ्यांसाठी रात्रीची शाळा चालविण्यात त्यांचा सक्रिय सहभाग होता. त्या शाळेला Working Men's Institute (नोकरी करणाऱ्यांची संस्था) असे नाव होते. ४ फेब्रुवारी १९७४ रोजी ते अनंतात विलीन झाले. हिग्ज बोसॉनच्या शोधाच्या निमित्ताने त्यांचे हे पुण्यस्मरण !

बल, तीव्र (strong) बल, क्षीण (weak) बल ही आहेत. तीव्र बल अणुकेंद्रात प्रोटॉन आणि न्यूट्रॉन यांना एकत्र ठेवतात, तर किरणोत्सर्गता (radioactivity) हा क्षीण बलाचा परिणाम आहे. या चार मूलगामी बलांसंबंधी, त्या बलांचे वाहक (carrier) मूलकण असले पाहिजेत आणि ते पदार्थावर क्रिया(action) करतात, असे गृहितक (assumption) मांडण्यात आले. बलासंबंधीच्या या सूक्ष्म वाहक मूलकणांना 'बोसॉन' असे नाव दिले गेले. यापैकी विद्युतचुंबकीय क्षेत्रासंबंधीचा मूलकण 'फोटॉन' हा पदार्थावर क्रिया करून पदार्थाला विद्युतचुंबकीय बलाद्वारे शक्ती देतो. हे प्रयोगाद्वारे सिद्ध झालेले आहे. तसेच w बोसॉन आणि z बोसॉन हे क्षीण बलासंबंधी कार्य करणारे मूलकण असल्याचेही प्रयोगाने सिद्ध झाले आहे. 'ग्लूऑन' हा तीव्र बलाचा वाहक मूलकण आहे. पदार्थाला वस्तुमान कसे प्राप्त होते? हा विश्वातील अनेक गूढ प्रश्नांपैकी एक आहे, असे शास्त्रज्ञांना वाटते.

वैज्ञानिकांच्या मते हिग्ज बोसॉनच्या कार्यामुळे पदार्थाला वस्तुमान प्राप्त होते. १९६४ मध्ये सुप्रसिद्ध ब्रिटिश शास्त्रज्ञ 'पीटर हिग्ज' यांनी या कणांच्या अस्तित्वाची कल्पना मांडली. म्हणून त्याला त्यांचे नाव दिले गेले. आज ते ८३ वर्षांचे आहेत. ४ जुलै २०१२ च्या जीनिव्हा येथील परिषदेला ते हजर होते. ४८ वर्षांपूर्वीच्या आपल्या कल्पनेला आज प्रत्यक्ष पुरव्याने मूर्त स्वरूप प्राप्त झाल्याचे ऐकून त्यांच्या

# सोलापूर सिद्धेश्वर सहकारी बँक लि., सोलापूर

मुख्य कार्यालय - २०५, पूर्व मंगळवार पेठ, १ ला मजला, सोलापूर

फोन नं. (०२१७) २६२६८११, २७४२९१० Email ID : solapursiddheshwar@hotmail.com

**मुख्य कार्यालय व १५ शाखांसह कार्यरत,**
**सर्व शाखांचे संगणकीकरण**

दि ३१.०३.२०१२ अखेर बँकेची आर्थिक स्थिती

* ठेवी - रु. २७४ कोटी
* कर्जे - रु. १७४ कोटी
* खेळते भांडवल - रु. ३२३ कोटी
* भाग भांडवल व निधी- रु. ३० कोटी
* गुंतवणूक - रु. १३१ कोटी
* नफा - रु. ३.११ कोटी

बँकेच्या मंगळवार पेठ, होटगी रोड, पुणे - सातारा रोड व हडपसर शाखेत एटीएम सुविधा उपलब्ध.

लातूर व उदगीर शाखा लवकरच ग्राहकांच्या सेवेत रुजू होत आहेत.

| श्री. सुभाष बं. मुनाळे | श्री. प्रकाश सं. वाले | श्री. रामलाल ब. शर्मा |
|---|---|---|
| चेअरमन | व्हा. चेअरमन | सरव्यवस्थापक |

✼ समस्त संचालक मंडळ व सेवक प्रतिनिधी ✼

# Anupam Enterprises

**Manufacturers of VSAT Antenna Mounts, Transformer/Machinery Spares, Fabrications**

**Office and Works**
B-25, Salim Compound,
Marol Naka, Andheri (East),
Mumbai - 400 059.
(M) 9820104492
Email : anuengin@rediffmail.com

*Happy Diwali*


अब्जावधि तारकापुंज अन् अनंत अंतर त्यांत।
अमर्याद संसार तुझा हा, तेजाची खैरात ।।

डोळ्यांत आनंदाश्रू आले.

हिग्ज बोसॉनच्या भोवतालचे क्षेत्र म्हणजे हिग्ज क्षेत्र. हिग्ज क्षेत्राची कल्पना, दृश्य विश्वाच्या विस्तारण्याचे सैद्धांतिक स्पष्टीकरण (Observed Expansion of Universe) देण्याचे प्रभावी साधन म्हणून मांडली गेली. हिग्ज क्षेत्र हे विश्व निर्मितीच्या वेळी निर्वात पोकळीच्या शक्तीने निर्माण झालेले क्षेत्र असून, त्याची शक्ती विश्व विस्तारण्याने कमी होत नाही (It is nonthermal). जेव्हा विश्व निर्मितीच्या सुरुवातीला निर्वात पोकळीतून नवे पदार्थ (matter) तयार झाले ते नेहमीच्या सामान्य पदार्थांपेक्षा वेगळे होते. पण ते अल्पायुषी असल्याने लगेचच त्यांचे रूपांतर सामान्य पदार्थात झाले. हेच ते हिग्ज क्षेत्र. हे गुरुत्वीय बलापेक्षा वेगळे असून, ते पदार्थांना दूर सारणारे (repeling) आहे. (दोन पदार्थांतील गुरुत्वबल हे आकर्षणारे (attractive) असते.

सर्वसाधारण प्रारूप सिद्धांतानुसार (The Standard Model) सर्व मूलकणांवर हिग्ज क्षेत्र निरनिराळ्या पद्धतीने कार्य करते. फोटॉनवर हिग्ज क्षेत्रांचा कोणताच परिणाम दिसत नाही, त्यामुळे ते प्रकाशाच्या वेगाने जातात. w बोसॉन आणि z बोसॉन ना हिग्ज क्षेत्रातून जाताना वस्तुमान प्राप्त होते. या अतिशय शक्तिमान (powerful) अशा हिग्ज क्षेत्राने सर्व विश्वाला व्यापून टाकले आहे. त्याच्या प्रभावातून, कचाट्यातून कोणीही सुटू शकत नाही. इतर बलांप्रमाणे हिग्ज बोसॉन हा हिग्ज क्षेत्राचा वाहक मूलकण मानला गेला आणि त्याच्या शोधाची मोहीम चालू झाली.

हिग्ज बोसॉनच्या निर्मितीनंतर लगेचच विघटन होऊन नष्ट होण्याच्या त्याच्या गुणधर्मामुळे, त्याच्या शोधात अनंत अडचणी होत्या. हिग्ज बोसॉन सापडण्यासाठी अतिउच्च ऊर्जा आवश्यक होती. या मूलभूत संशोधनासाठी स्वित्झर्लंडमधील जगातील सर्वात मोठी आणि सुसज्ज प्रयोगशाळा – सर्न – (Centre European De Recherche Nuclear - CERN) वापरली गेली. जीनिव्हा शहराजवळ भूपृष्ठापासून १०० मीटर खोलीवर २७ किलोमीटर लांबीचे वर्तुळाकार भुयार खणून, त्यात लार्ज हेड्रॉन कोलायडर (Large Hadron Collider) हे उपकरण बसविण्यात आले. या उपकरणात $१०^{१२}$ ev(Gve) या पातळीवर ऊर्जा देण्याची सोय आहे. तसेच यात नॅनोमीटर ($१०^{-९}$ मीटर) अंतरामध्ये घडणाऱ्या वैज्ञानिक घटनांचे निरीक्षण करण्याची आणि संगणकाद्वारे त्या नोंदण्याची सोय आहे. हिग्ज बोसॉनला शोधण्याच्या प्रयोगात प्रोटॉन या मूलकणांचे $१०^{१२}$ कण, दोन गटांमध्ये, दोन निर्वात नळ्यांमधून, परस्पर विरुद्ध दिशेने LHC मध्ये वर्तुळाकार दिशेत फिरविले जात होते. फिरण्याची वर्तुळाकार दिशा ठरविण्यासाठी - २७१ °C अशा अत्यंत थंड वातावरणात ठेवलेल्या हजारो विद्युतचुंबकांची योजना केली होती. सर्न येथील प्रयोगशाळेत या प्रयोगांचे सर्व प्रकारे नियंत्रण करण्यासाठी कक्ष आहे. प्रत्येक फेरीत या कणांची ऊर्जा ३.५ Gev ने वाढत होती; त्यामुळे त्या कणांचा वेगही वाढत होता. त्या दोन गटांची टक्कर घडवून आणली त्यावेळी त्यांचा वेग प्रकाशाच्या वेगापेक्षा सूक्ष्मांशानेच कमी होता. $१०^{१२}$ कणांपैकी अगदी थोडे कण एकमेकांवर आपटून आगीच्या सूक्ष्म शलाका निर्माण करायचे. त्यात एखादा हिग्ज बोसॉन तयार व्हायचा आणि क्षणार्धात (within $10^{-8}$ sec) नाहीसा व्हायचा. असा हा हिग्ज बोसॉनसारखा सूक्ष्मकण शास्त्रज्ञांना सापडल्याची आणि त्याचे वस्तुमान १२५ ते १२६ Gev च्या दरम्यान आहे. म्हणजेच तो प्रोटॉनपेक्षा १३४ पट जड आहे. ही माहिती ४ जुलै २०१२ रोजी प्रसारमाध्यमांना देण्यात आली. अजूनही हिग्ज बोसॉनसाठी पुष्टीदर्शक पुरावे गोळा करण्याचे काम चालू आहे. दुर्मीळ असल्याने त्याला देवत्व बहाल केले असावे; त्यामुळे देवकण (God Particle) हे त्याचे सामान्य जनांसाठीचे नाव ठरविले आहे.

**– विनोदिनी अळवणी**
५, मिलन सोसायटी, कोथरूड, पुणे – ३८

२० वर्षांची वाटचाल
जेव्हा अडचणी व अडथळे येतात, तेव्हा जे कणखर असतात ते पुढे जातात. **प्रायोजक – डॉ. चंद्रशेखर चितळे, पुणे**




पाहा : http://www.madehow.com
आपल्या आजूबाजूच्या वस्तू कशा बनतात? शिकूयात

(चित्र १)



(चित्र २)



(चित्र ३)



(चित्र ४)



(चित्र ५)



(चित्र ६)



# हातपंप

आज आपण हातपंपाची एक प्रतिकृती बनवणार आहोत. हातपंपाचे कार्य कसे चालते हे यावरून अतिशय उत्तम प्रकारे समजते.

**साहित्य –** फोटो रोलची एक पांढरी पारदर्शक डबी व तिची २ झाकणे, सायकलचा एक स्पोक व त्याचे दोन निपल नट, एक रुपयाचे नाणे, जुन्या रबरी चप्पलचा एक तुकडा, हा झाकणापेक्षा थोडा मोठा हवा. जुन्या रिफीलचा तुकडा, कात्री, कटर इ. फेविबॉण्डची एक ट्यूब.

**कृती –** ● एका धारदार कात्रीने, सुट्ट्या झाकणाची बाहेरील बाजूची गोलाकार कड व्यवस्थित कापून घ्या. (चित्र १) खर कागदावर घासून ती कड नीट गुळगुळीत करा. हे झाकण आपल्या डबीच्या आत अतिशय नीटपणे बसतं. या झाकणाचा उत्कृष्ट दट्ट्या बनू शकतो.

● या दट्ट्याच्या मध्यभागी २ मिलिमीटर व्यासाचे एक छिद्र पाडा. तसेच डिलीव्हरी व्हॉल्व्हसाठी ६ मिलिमीटर व्यासाचे एक छिद्र पाडा. ही छिद्रे टोकदार कात्रीने व छोट्या खिळ्याने पाडता येतात.

● आता सेलोटेपचा एक ३ सेंटीमीटरचा तुकडा घ्या. त्यातील एक सेंटीमीटर भाग दुमडून, चिकट भागावरच चिकटवा. (चित्र २) आता हा चिकटवलेला भाग ६ मिलिमीटर भोकावर येईल असा झाकणाच्या आतील बाजूस चिकटवा. ही आपली डिलीव्हरी व्हॉल्व्ह झाली.

● सायकलच्या स्पोकमधून एक १२ सेंटीमीटर लांबीचा तुकडा कापा. सायकलच्या स्पोकवर एक निपल नट असतो. तसाच आणखी एक निपल नट घ्या. प्रथम एक निपल नट स्पोकच्या आट्यावर चढवा. मग स्पोक झाकणाच्या आतील बाजूकडून आरपार आत घुसवा. बाहेरील बाजूने दुसरा निपल नट घट्ट बसवा. दोन नट नसल्यास एक निपल नटचे छोट्या हॅकसॉच्या साहाय्याने दोन भाग करा व त्यामध्ये झाकण घट्ट बसवा. (चित्र ३)

● चित्र ४ मध्ये दट्ट्या, डिलीव्हरी व्हॉल्व्ह व दट्ट्याची दांडी यांची एकत्रितपणे केलेली जुळणी दाखवली आहे.

● आता डबीचे दुसरे झाकण घ्या. त्याला आतील बाजूने एक मोठे छिद्र पाडा. या छिद्राचा व्यास एक रुपयाच्या नाण्याच्या व्यासापेक्षा ४ ते ५ मिलिमीटरने कमी ठेवा. रुपयाचे नाणे या छिद्रावर ठेवल्यास; नाण्याने छिद्र पूर्णपणे झाकलेले हवे. ही आपली सक्शन व्हॉल्व्ह. येथे रुपयाचे नाणे हे व्हॉल्व्हचे काम करील.(चित्र ५)

● डबीच्या तळाच्या मध्यभागी ३ मिलिमीटरचे एक छिद्र पाडा. यातून सायकलचा स्पोक सहजपणे आत बाहेर व्हावयास हवा. रबराचा डबीच्या मापाचा गोल कापून डबीवर बसवा. डबीच्या वक्र पृष्ठभागावर, तळाच्या जवळ एक लहान छिद्र पाडा व त्यामध्ये रिफीलचा किंवा फ्रुटीच्या स्ट्रॉचा एक लहान तुकडा बसवा. (चित्र ६) यातून पाणी बाहेर येईल. आता पंपाची जुळणी करूया.

● प्रथम दट्ट्याचा स्पोक डबीच्या आतून त्याच्या तळाच्या भोकातून बाहेर

कधी वाटते, ताऱ्यांचे नभ अमुचे व्हावे।
चांदण्यात नकळत आम्ही हळूच, चांदणे होऊन जावे।।

(चित्र ७)



काढा. डबीच्या झाकणावर रुपयाचे नाणे डबीच्या झाकणाच्या भोकावर ठेवा व झाकण डबीवर घट्ट बसवा. हा पंप पाण्याने भरलेल्या भांड्यात धरा. एका हाताने डबी धरून दुसऱ्या हाताने स्पोक खालीवर करा. डबीत पाणी चढताना दिसेल आणि थोड्याच वेळात पाणी पंपातून बाहेर पडेल. रुपयाचे नाणे व डिलीव्हरी व्हॉल्व्ह यांची उघडझाप नीटपणे पाहा.
पण पाणी पंपात कसे चढते? का चढते? विचार करा व सांगा.
सक्शन व्हॉल्व्हसाठी नाण्याऐवजी आपण डिलीव्हरी व्हॉल्व्हसाठी केलेली रचनाही वापरू शकतो. (चित्र ७)

**प्रा. उल्हास टुमणे**, १४७३, सदाशिव पेठ, टिळक रस्ता, पुणे ३०

## छोटेखानी शिल्पे बनवा !







'लमासा' नावाच्या पद्धतीने आपण छोट्या-छोट्या शिल्पाकृती बनवू शकतो. छोट्या शिल्पाकृती -M-SEAL किंवा प्लास्टर ऑफ पॅरिसपासूनही बनविता येतात; पण दोन्हीही माध्यमांमध्ये काही त्रुटी आहेत; ज्या या 'लमासा' मेथडने केलेल्या मटेरियलमध्ये दूर होतात. यासाठी लागणारे साहित्य खालीलप्रमाणे...

१ कप कॉर्नफ्लोअर, १ कप फेव्हीकॉल, १ चमचा ग्लिसरीन (टेबलस्पून), १ टीस्पून लिंबाचा रस, २-३ चिमटी बोरिक पावडर.

हे सर्व जिन्नस एकत्र करून एखाद्या ॲल्युमिनियमच्या भांड्यात मंदाग्नीवर लाकडी वस्तूने ढवळत ठेवावे. थोडासा पाण्याचा हपका मारावा. १०-१२ मिनिटांत एकजिनसी गोळा होतो व भांड्यापासून सुटून येतो. हा गोळा मळून सील असलेल्या प्लॅस्टिक पिशवीत ठेवून ती पिशवी घट्ट झाकणाच्या डब्यात ठेवावी. हवे तेव्हा त्यातील मटेरियल काढून त्यावर काम करता येते.

एखाद्या मॉडेलिंग क्ले सारखे हे काम करते. छोटासा गोळा काढून, हाताला व्हॅसलिन लावून त्यापासून छोट्या वस्तू करता येतात. छोटी फळे, प्राणी-पक्षी, मनुष्याकृती किंवा भेट द्यायला वेगवेगळ्यश वस्तू तयार करता येतात. या वस्तू दोन-चार दिवसांत वाळल्यावर त्यांना fericryl किंवा acrylic रंगांनी रंगविता येते. एकच रंग हवा असेल तर छोट्या गोळ्यात एखादा खायचा रंग टाकला तर रंग जास्त तजेलदार होतो. संगणकावर ठेवता येणारी छोटी शिल्पे याने चांगली करता येतात. मटेरियल मऊ असल्याने आकार देणे सोपे असते. पिना, खिळे वगैरे वापरून मटेरियल ओले असताना कोरीव कामही करता येते. वाळल्यावर व रंग दिल्यावर कृती खूप उठावदार होते कारण याचा पृष्ठभाग गुळगुळीत असतो.

आपल्या कल्पनाशक्तीला वाव देणारे हे मटेरियल तयार करून, हवे तेव्हा कृतीत आणून तुम्ही भेटवस्तू, पाने-फुले-फळे, सुव्हेनीर्स, पक्षी-प्राणी असे अनेक प्रकार करू शकता. ही स्पॅनिश कला आहे.

**- सुंनदा अभ्यंकर,** स्वस्तिक, जुना कोसाड रस्ता, अमरोली, सुरत

साधना जेथे कलेची आर्तता जेथे मनाची ।
अर्चना तेथेच चाले, सत्य, शिव अन् सुंदराची ।।


Enriching Lives
शुभ दीपावली
आणि नववर्षाभिनन्दन
KIRLOSKAR BROTHERS LIMITED
Corporate Office: "YAMUNA", S. No. 98 (3 7), Baner, Pune - 411 045, India | Phone: 020 - 2721 4444
www.kirloskarpumps.com | kblin@kbl.co.in







संस्कृत संशोधन, समृद्ध ग्रंथालय, अर्थपूर्ण संस्कारांची पुनर्मांडणी,
पौरोहित्य प्रशिक्षण इ.चे केंद्र – संस्कृत–संस्कृति–संशोधिका

२० वर्षांची वाटचाल

# एक दिवस

– रेणू पाचपोर

आईनं जाताना मला कितीदा तरी सांगितलं. पुन्हा पुन्हा तेच. ‘दार चांगलं लावून घे. बाहेर कुठं घर मोकळं सोडून जाऊ नकोस. कुणी दार वाजवलं तर नीट खात्री करून घे. मगच दार उघड. जेवण कर आणि सारं परत झाकून ठेव.’ तेच तेच ती कितीदा तरी सांगत होती. मला काही समजत नाही की काय कुणास ठाऊक! आई म्हणजे फारच काळजी करते. जसं काही आजच काही घडणार आहे. मी एकटी पाहून कुणी चोर येईल. मला बांधून ठेवील. कपाटातील काही घेऊन जाईल, किंवा दुपारी दूध तापवणं झाल्यावर फ्रिजमध्ये ठेवायचं राहून जाईल. मग मांजर खिडकीतून आत येईल. सारं दूध पिऊन घेईल. किंवा पुस्तक वाचता वाचता मला झोप लागेल. दार उघडं, गॅस सुरू... अशा कितीतरी गोष्टी ज्या घडणार होत्या आणि त्या घडू नयेत म्हणून मला आई जणू सांगत होती.



२० वर्षांची वाटचाल

पाणी, ऊर्जा, हाताला काम। संख्या, शिक्षण, संघटित ग्राम।।
यांमध्ये खोरे पातळीवर काम – ज्ञा. प्र. ग्रामविकसन प्रभाग


दिपोत्सवाच्या तेजात अनुभवा
शाही वस्त्रांचा झगमगाट!
पेशवाई
क्रिएशन
श्रीमंत
कलेक्शन

खरं तर ती संध्याकाळी येणार होती परत. शहराच्या दूरच्या टोकाला मावशीचं घर. तिच्या घरी काहीतरी कार्यक्रम होता. तिच्या घरी जायचं म्हणजे पूर्ण दिवस जातो. जाण्या-येण्यात दोन तास आणि तिथं जेवणं आणि गप्पा. सुट्टीत तिच्याकडे गेले की, मला एक दिवसाच्या वर करमत नाही. माझ्याबरोबरीची कुसुम आणि कॉलेजला असलेला धीरजदादा असतो तिथं. शाळेतले विषय संपले की, मला घरची आठवण येते. आई आजूबाजूला नाही म्हणून हुरहूर लागते. धीरज इकडचं तिकडचं बोलतो आणि त्याच्या त्या लॅपटॉपच्या खळाळत्या विश्वात हरवून जातो. सारखं काय शोधत असतो कुणास ठाऊक ! एकीकडं ती धिंगाणा गाणी सुरूच असतात. शब्द कळत नाहीत, नुसता संगीताचा मारा. हा आपला डोकं हलवत राहातो तालावर.

दोन-तीन दिवसांपासून बाबा मुंबईला गेलेले. अजून दोन दिवस लागणार म्हणे परत येण्यासाठी. बाबा घरी असले की, किती छान अभ्यास घेतात माझा. त्यांनी समजून सांगितलेलं समजतं पटकन आणि एवढं लक्षात राहातं की, विसरूच शकत नाही. शांतपणे बोलतात. उदाहरणासह सांगत असतात. वर्गातले सर तर नुसताच धडा वाचून दाखवतात. आम्हाला येत नाही का वाचायला?

पण मी नुसता विचार करत बसले. आई, बाबा, कुसुम, धीरज माझ्या मनात येऊन गेले. कपबश्यांचा आवाज आला स्वयंपाकघरातून. बापरे, मांजर आली की काय खिडकीतून? धावत गेले आत. बरं झालं, मांजर नव्हती आली. एक चिमणी खिडकीतून गेली भुर्रर आवाज करत. ओट्यावरचं दुधाचं पातेलं केव्हाच फ्रिजमध्ये ठेवलं होतं. काळजी खूप असली की, असंच होत राहातं. ओट्यावर आहे की नाही पाहायची काहीच गरज नव्हती. परत सोफ्यावर येऊन बसले.

ती चिमणी एकटीच होती. किती दिवसांनंतर पाहिलं चिमणीला. तिच्या सोबत कुणी नाही. बिच्चारी. आई सांगते, पूर्वी एवढ्या चिमण्या होत्या म्हणे. समोरच्या अंगणात काही वाळवण ठेवलं की भुर्रर आवाज करत घोळका यायचा. चिवचिवाट अंगणभर. थोडे ज्वारीचे दाणे भिरकावले की चिमण्या हजर. आता नाहीत एवढ्या. कुठं गेल्या असतील... शहरापासून दूर खेड्याकडे... जिथं मोबाईलचे मनोरे नाहीत.

**'एक दिवस' तुमच्या या मैत्रिणीच्या-सायलीच्या मनात जणू रेकॉर्डर बसवला आहे. तिचा तिच्याशी जो संवाद चाललाय, तोच जणू आपल्याला कळतोय... या लेखातून... मराठी साहित्यात अशा प्रकारच्या लेखनप्रकाराला (जसे विचार मनात येतात तसे एकापुढे एक लिहीत जाणे) 'संज्ञाप्रवाही लेखन' म्हणतात; त्याच्या जवळ जाणारा हा लेखप्रकार आहे बरं !**

मोबाईलचा वापर कमी आहे. शांतता आहे. त्यामुळं तर आता त्या दिसत नाहीत? काही खायला मिळतं का, म्हणून तर ती आलेली नव्हती? आता पुन्हा जाईल दुसरीकडे. शोधत राहील. या घरी नाही तर दुसरीकडे. काही मिळालं तर खाईल. बसेल मग आडोशाला. माझ्यासारखी एकटी.

पुन्हा मी उडून गेलेल्या चिमणीचा विचार करीत बसले. हे असं साध्या साध्या गोष्टींचा विचार करणं सोडून द्यायला पाहिजे. खरं म्हणजे कुणाच्या तरी मनात उडून गेलेली चिमणी परत आली असती का बरं? पण माझी सवय सुटत नाही. काहीतरी मनात रुततं आणि त्याचा विचार करत बसायची



आपल्यालाही आहेत हात, डोकंसुद्धा खांद्यावर ।
स्वत: मिळवू हवं ते, एकदा निश्चय केल्यावर ।।

जणू सवयच जडली आहे माझ्या जीवाला. आता भूतकाळातून वर्तमानकाळात जगायला शिकलं पाहिजे. आत्ताचा क्षण महत्त्वाचा. यावेळी आपण काय वेगळं करू शकतो, हे पाहिलं पाहिजे.

मन झटकलं मी. पलंगाच्या खालची हार्मोनियम काढली. मागच्या उन्हाळ्यात बाबांनी मला ती घेऊन दिली आहे. नुकतीच मी गाण्याच्या क्लासला जायला लागले होते. माझी गाण्याची आवड आणि शिकण्याची धडपड पाहून एके दिवशी बाबा संध्याकाळी आले ते लाकडी खोकं घेऊनच. बाबांनी आवाज देऊन मला बोलावलं. झाकण काढायला सांगितलं. आत पाहाते तर नवी कोरी हार्मोनियम! किती आनंद झाला मला. पाचेक मिनिटं तर काहीच सुचत नव्हतं.

तर ती हार्मोनियम आता काढली मी. बऱ्याच दिवसांपासून माझी बोटं स्वरांच्या पट्ट्यांवर फिरकली नव्हती. शाळा, अभ्यास, होमवर्क, परीक्षा, घटक चाचण्या, खेळ, नुसती चक्रात गुरफटलेली होते. आज एकदम आठवण झाली. क्षणभर हार्मोनियमकडं पाहात राहिले. देहभान विसरायला लावणारी ही जादूची पेटी. भात्याचं हूक काढलं. डाव्या हातानं भाता हलवला. क्षणात बोटं सराईतपणे फिरू लागली. घरभर पेटीचे स्वर घुमू लागले. मी आता एकटी नव्हते. स्वरांचे झोके होते सोबत! गाण्याच्या लकेरी होत्या अवतीभवती!!

सुरुवातीला सरगम. आरोह– सा रे ग म प ध नि सा. नंतर अवरोह– सा नि ध प म ग रे सा. दोन दोन स्वर– सासा रेरे.. असं करत करत तेरा प्रकारांची उजळणी केली. स्वर चांगला लागला होता माझा. माझं मलाच ऐकायला छान वाटत होतं. किती गोडवा आहे संगीतात आणि स्वरांची नावं तरी किती नादमय. षडज्, रिषभ, गंधार, मध्यम, पंचम, धैवत, निषाद. हार्मोनियम हलू देत नाही गळ्यातल्या स्वराला. एकेका पायरीवरून घट्ट बिलगून फिरवत राहाते गळ्यातल्या स्वरांना. खूप दिवसांनंतर म्हणत असल्यानं उत्साह वाढत होता. त्यावर आधारित गीत म्हटलं. नंतर काफी रागावरचं, 'आज खेलो शामसंग होरी...' हे गीत. गाण्यात एवढं समरसून जायला होतं हे गीत गाताना! मग्न होऊन जातं मन. संगीत क्लासमध्ये जेवढं शिकवलं होतं तेवढं पुन्हा तीन–चार महिन्यांनंतर म्हणताना खूप मजा आली.

मला लतादिदींचं एक गीत फार आवडतं. 'मोगरा फुलला...' मंगेशकर कुटुंबाचं संगीताच्या क्षेत्रात खूप मोलाचं योगदान आहे. दिदींचं कुठलंही गाणं मनाला प्रसन्न करून जातं. हृदयनाथ मंगेशकर यांची कितीतरी गाणी अजरामर झालेली आहेत. ज्ञानेश्वरांचं पसायदान, 'पैल तो गे काऊ कोकताहे', 'मोगरा फुलला' ही गाणी तर मला खूप खूप आवडतात. 'मोगरा फुलला' हे गीत म्हणून झाल्यावरच मी नेहमी हार्मोनियम बंद करते. त्याशिवाय समाधान वाटत नाही. हे गाणं आहेच तसं. गाणं ऐकताना आपण शांत, प्रसन्न अशा वातावरणात जातो. बासरीचे गोड स्वर, दिदींचा मधुर आवाज आणि माऊलींचे सहज सुंदर शब्द,

*'मोगरा फुलला, मोगरा फुलला*
*फुले वेचिता बहरू कळीयांसी आला...*
*इवलेसे रोप लावियले द्वारी*
*तयाचा वेलू गेला गगनावेरी...'*

गाण्यात पूर्णपणे समरस झाले होते मी. हार्मोनियमच्या स्वरांमध्ये माझा आवाज एकजीव झाला होता. 'मनाचिये गुंती गुंफीयला शेला' ही ओळ म्हणताना खूपच छान वाटत होतं. माझे डोळे मिटलेले. सारं विसरलेली मी. ओठांवर आणि मनात फक्त माझं प्रिय गाणं...

अचानक दारावरची बेल वाजली. भानावर आले मी. हार्मोनियमचा भाता बंद केला.

''कित्ती कामे... वेळ न पुरतो... येतो कंटाळा ।''
हळुच पहा, ही फुले...पाखरे, पळवून लावतील त्याला ।।

आत राहिलेल्या हवेला दोन-तीन पट्ट्या एकत्रित दाबून ठेवत जाऊ दिलं. दोन-तीन स्वरांचा सरमिसळ आवाज करत हार्मोनियम मूक झाली. तीवर झाकण ठेवलं. वरती तिच्यासाठी खास तयार केलेला मऊ कपडा टाकला आणि पलंगाच्या खाली अलगद तिला सरकवलं. कोण असेल, असा अंदाज मनात बांधत दार उघडण्यासाठी निघाले.

बाबांच्या कंपनीचं काहीतरी पाकीट कुरीयरनं आलं होतं. त्यानं दिलेल्या पेननं सही केली- 'सायली साने.' सहीच्या खाली दिनांक टाकायचा तर लक्षातच येईना. गाण्यातून अजूनही बाहेर नव्हते पडले. त्यानं सांगितलेली तारीख लिहिली. दार परत बंद करून सोफ्यावर येऊन बसले. आता काय करावं?

भूक लागली. हे आत्ता लक्षात आलं आपल्या. उठून स्वयंपाक घरात जायला वळले तर बाथरूममधून पाण्याचा आवाज येत होता. तोटी अर्धवट उघडी राहिली होती. घाईत निघून गेली आई. एवढा वेळ कसा आवाज आला नाही? मनात दुसरे विषय असले की, असं होतं. सतत विचार करत राहते मी. तोटी पूर्ण बंद केली. बाजूला स्नानानंतरचे कपडे पडलेले दिसले. आई हे विसरली बहुधा. दिवसभर असेच राहिले आणि संध्याकाळी आल्यावर आईनं धुतले तर उद्यावर छान सुकणारच नाहीत. अनायासे बादली पाण्यानं भरून गेलेली होती. आईलाही तिचं राहिलेलं काम मी पूर्ण केल्यानं आनंद वाटेल.

केली मी सुरुवात. अगोदर सर्व कपड्यांना साबण लावून घेतला. मग एक एक करीत ब्रश वापरत, आपटत, खंगाळत सर्व कपडे धुवून टाकले. पिळून घेताना लहान लहान कपड्यांचं काही वाटलं नाही. आईची साडी मात्र हातात मावेना. पदर गोळा करून थोडा थोडा भाग पाण्याबाहेर काढत पूर्ण साडी घेतली पिळून. आईनं पंधरा मिनिटांत जे काम केलं असतं; मला पाऊण तास लागला. अंगणातल्या दोरीवर एकेक पीळ उकलत, झटकत, अंगावर तुषार झेलत सर्व कपडे वाळत टाकले. चांगलीच दमले. एकदम थकवा आला. भूकही जोराची लागली...

आई तर हे काम रोजच करते. मी काय तिनं तयार केलेलं जेवण जेवते, तिनं दिलेला डबा सोबत नेते, तिनं धुतलेले कपडे घालते. खरी मेहनत तीच करते.

श्वास संथ होईपर्यंत सोफ्यावर बसले होते. लगेच स्वयंपाकघराकडं धावले. आईनं करून ठेवलेल्या पोळ्या होत्या. पातेल्यात भाजी होती. झाकण काढताच खमंग वास आला. ताट घेतलं वाढून मनातल्या मनात आपल्याशीच बोलत जेवण करू लागले. आता दुपार आहे. संध्याकाळी येईल आई. आजचा हा दिवस आईशिवायचा. पण तिच्या आठवणीसोबतचा. उद्या सोमवार. शाळेसाठीची घाई नेहमीप्रमाणे. पण आता आई यायला हवी. लवकर. जेवण केलं. हॉलमध्ये आल्यावर वाचून झालेलं इकडं तिकडं पडलेलं वर्तमानपत्र व्यवस्थित टिपॉयवर ठेवलं. टीव्ही सुरू केला. एक एक करत सर्व चॅनल बदलले. कुठंच थांबून बघत राहावं असं वाटलं नाही. त्यापेक्षा टीव्ही बंद करून आईचं एक काम करावं म्हणून टीव्हीवरची, टेबल खुर्च्यांवरची, कपाटातल्या पुस्तकांवरची धूळ झटकण्यासाठी कपडा शोधू लागले...

आईला आल्याबरोबर बदल पाहून, स्वच्छता पाहून एकदम आनंद वाटला पाहिजे. आजचा हा दिवस वेगळा होता हे तिच्या लक्षात येईल. एक दिवस असा हा माझ्याही मग स्मरणात राहील!!

**- रेणू पाचपोर**
पाकळ्या, रचनानगर,
परभणी 431401

**चित्रकार : गिरीश सहस्रबुद्धे**

२० वर्षांची वाटचाल
भरपूर खेळा आणि सुडौल व सुदृढ व्हा.
**प्रायोजक - डॉ. श्रीकृष्ण चिंचणीकर, पुणे**

# गोष्ट माझ्या शाळेची
# शाळेपलीकडल्या प्रबोधिनीची !!

॥ राष्ट्रदेवाः भवेम ॥
५०
ज्ञान प्रबोधिनी सुवर्ण महोत्सव

**ज्ञान प्रबोधिनीच्या औपचारिक/अनौपचारिक शिक्षण प्रणालीतून बाहेर पडलेल्या कुणाही विद्यार्थी कार्यकर्त्यांचं हे प्रातिनिधिक मनोगत या कथानकाद्वारे तुमच्यासमोर मांडत आहोत. ज्ञान प्रबोधिनीच्या सुवर्ण महोत्सवानिमित्ताने ज्ञान प्रबोधिनीची ही गोष्टीरूप ओळख... तुमच्यासाठी आणि तुमच्यामार्फत अनेकांपर्यंत पोचण्यासाठी...**

लहान असताना अंतराळवीर व्हावं, असं माझं स्वप्न होतं आणि माझ्या शाळेत मला शिकवलं गेलं की, स्वप्न कितीही भव्य असलं तरी ते साध्य करता येऊ शकतं. शाळेच्या याच संस्कारांमुळे भविष्यात, मी अंतराळवीर झाले नाही, तरी वैज्ञानिक मात्र नक्की झाले. मी माझ्या कामाच्या बाबत पूर्णत: समाधानी आहे. पण जोपर्यंत माझं हे संशोधन माझ्या देशबांधवांच्या प्रगतीसाठी उपयुक्त ठरत नाही तोपर्यंत त्याचं मूल्य शून्य! जगण्याची ही शिकवण, आयुष्याचं हे सूत्र माझ्या शाळेनं मला दिलं. ध्येयनिश्चिती, स्वप्नपूर्ती आणि चारित्र्यसंपन्न वाटचाल हे सारं काही प्रत्यक्षात आमच्या शाळेच्या संस्थापकांच्या रूपात आमच्या डोळ्यांसमोर आदर्शवत उभं होतं. आमच्या शाळेचे संस्थापक विनायक विश्वनाथ पेंडसे, अर्थात आप्पा पेंडसे. त्यांनीही स्वप्न पाहिलं होतं; पण आपल्या स्वप्नांपेक्षा खूपच भव्य दिव्य स्वप्न! विविध क्षेत्रांत समर्थ नेतृत्व निर्माण करून त्या नेतृत्वाच्या संघटित कामातून भारताचं रूप पालटण्याचं, भारताला समृद्ध बनवण्याचं स्वप्न! हे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी आप्पांनी 'ज्ञान प्रबोधिनी' या संस्थेची स्थापना केली आणि या संस्थेच्या कामाची सुरुवात झाली ती बुद्धिमान विद्यार्थ्यांच्या शाळेने.

आमच्या शाळेत दिवसाची सुरुवात व्हायची ती उपासनेनं... आज सिंहावलोकन करताना मला जाणवतं की 'स्व'च्या पलीकडे बघायची ताकद मला या उपासनेतूनच मिळते.

आमच्या शाळेत फक्त पुस्तकी शिक्षणावर भर नव्हता. आमच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीनं अभ्यासक्रमाची आखणी केलेली होती; त्यामुळेच इथे स्वयं-अध्ययनावर भर आहे आणि यात प्रबोधिनीच्या भव्य ग्रंथालयानं मोलाची भूमिका पार पाडली आहे. आमचं ग्रंथालय तेव्हा आणि आजही खजिनाघर आहे, अलिबाबाच्या गुहेसारखं. फक्त पाठांतरापेक्षा स्वत: काही ना काही करून शिकण्यावर आणि प्रकल्प पद्धतीनं स्वत: प्रयोगाद्वारे ज्ञान मिळवण्यावर... इथे भर असल्याने आमच्या व्यवहार कौशल्यांचा आणि नेतृत्व गुणांचा विकासही नकळत होत गेला. ज्ञान तंत्रज्ञानाच्या आकलनाबरोबरच भाव -अभिव्यक्तीच्या अधिकाधिक संधी देणं हा प्रबोधिनीच्या शिक्षणाचा अविभाज्य भाग आहे.

प्रबोधिनीचा आणखी एक उपक्रम म्हणजे दीक्षाग्रहण. म्हणजेच विद्याव्रत संस्कार- स्वत:चं व्यक्तिमत्त्व विकसित होण्यासाठी काही संकल्प करणं. मला आठवतं... साधारण मी आठवीत असताना शाळेमध्ये, शारीरिक, मानसिक, बौद्धिक आणि आत्मिक विकासावर व्याख्यानं आयोजित केली होती. त्यावर आमच्या चर्चाही व्हायच्या.

निर्भयता बळ आस्था यांचे, एकी हे दैवत समजावे ।
जे जे वंचित त्यांच्यासाठी, संघटना हे सूत्र बनावे ।।

त्यातलं सगळं काही मला कळलं असं नाही पण हळूहळू वय वाढत गेलं तसं तसं त्याचं महत्त्व समजत गेलं. वैयक्तिक आणि सामाजिक विकासासाठी स्वत:ला कटिबद्ध करण्याचा हा संस्कार होता. खरंतर हा संस्कार समाजातील प्रत्येक व्यक्तीचा अधिकार आहे. म्हणूनच इथे जात, पात, धर्म, लिंग असा कोणताही भेद नाही.

ज्ञान प्रबोधिनीने विशेष क्षमता असणाऱ्या बुद्धिमान मुलांपासून सुरुवात केली असली तरी प्रत्येकाच्या बुद्धिमत्तेचा विकास होणं हे प्रबोधिनीचं उद्दिष्ट आहे. ते गाठण्यासाठी प्रबोधिनीनं पुण्याबाहेर आपली क्षितिजं विस्तारली आणि प्रबोधिनीच्या निगडी, सोलापूर आणि ग्रामीण भागात शाखा सुरू झाल्या. निगडीची शाळा म्हटलं की माझ्या डोळ्यांसमोर येतं ते तिथलं विस्तीर्ण पटांगण... जागतिक दर्जाचे क्रीडापटू घडवणारं बारा तासांचं आगळं-वेगळं क्रीडाकुल. परिपूर्ण खेळाडू घडविण्यासाठी क्रीडा कौशल्यांच्या प्रशिक्षणाबरोबरच मन:शक्तीच्या विकसनाचे आणि आरोग्य संवर्धनाचे प्रयत्न क्रीडाकुलात केले जातात.

पंचकोषांच्या विकसनावर आधारित गुरुकुल प्रकल्प हे निगडीचे आणखी एक वैशिष्ट्य ! इथं योगाभ्यासापासून ते भजन-कीर्तनापर्यंत आणि कलाशास्त्राच्या साधनेपासून ते निसर्गाशी एकरूप होण्यापर्यंत अनेक शैक्षणिक उपक्रमांची आखणी करण्यात आली आहे.

प्रबोधिनीच्या सोलापूरच्या शाळेत शिशुवर्गापासून दहावीपर्यंतचे वर्ग आहेत. इथल्या शिशुवर्गातलं दृश्य जरा वेगळंच असतं. नेहमी दिसते तशी मुलांची रडारड इथं दिसत नाही. शिवाय इथे शिशु अध्यापिका विद्यालयही आहे. शिक्षकांना विविध खेळ, कविता, गाणी यांच्या माध्यमातून मुलांचं रंजन करत करत त्यांना कसं शिकवायचं याचं प्रशिक्षण मिळतं. त्यामुळेच मुलं इथं मस्त मजेत राहतात, सहज शिकतात. इथं शिकणं हा एक आनंददायी अनुभव आहे.

सोलापूरच्या शाळेत आल्यावर हराळीच्या शाळेत



**कै. वि.वि. तथा आप्पा पेंडसे**

न जाऊन कसं चालेल? उस्मानाबाद जिल्ह्यातलं हराळी हे छोटंसं गाव. १९९३ च्या भूकंपात या जिल्ह्यातली गावंच्यागावं उद्ध्वस्त झाली. प्रबोधिनीनं या भागात पुनर्वसनाचं काम सुरू केलं आणि नंतर ग्रामस्थांच्या आग्रहाला मान देऊन हराळीत शाळा सुरू केली. या शाळेतील गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी देणग्या- अनुदानावर अवलंबून राहावं लागू नये यासाठी शाळेनं सुमारे ४० एकरांवर फळबाग लागवड केली आहे. या बागेत काम करता करता मुलांनाही शेतीतल्या आधुनिक तंत्रज्ञानाचं, विक्री कौशल्यांचं प्रशिक्षण नकळत मिळत जातं.

हराळीच्या शाळेप्रमाणेच पुणे जिल्ह्यात साळुंब्रे येथेही प्रबोधिनीची आणखी एक ग्रामीण शाळा आहे. या दोन्ही ग्रामीण शाळांमध्ये मुलांची शेतीप्रधान कौटुंबिक पार्श्वभूमी लक्षात घेऊन त्यांना क्रमिक शिक्षणाबरोबरच शेतीला आवश्यक असे अनुभव आवर्जून दिले जातात. या अनुभवांसाठी पशुपालन, गांडुळखत निर्मिती, बायोगॅस, रोपवाटिका व्यवस्थापन, फुलशेती अशा पद्धतीचे प्रकल्प प्रत्यक्ष राबवले जातात. आजची बदलती आर्थिक परिस्थिती आणि समाजाच्या बदलत्या गरजा लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना शेतीव्यतिरिक्त इतरही अनेक तांत्रिक कौशल्यं शिकवली जातात. पुणे जिल्ह्यातील शिवापूरच्या तांत्रिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना संगणकावर आधारित मशिन्स् वापरायचं प्रशिक्षण दिलं जातं.

गुणवत्ता असूनही संधी किंवा योग्य मार्गदर्शन न

मिळाल्यामुळे मागे राहणारी ग्रामीण भागातली प्रज्ञावंत मुलं आणि ग्रामीण किशोरींच्या सर्वांगीण विकासासाठी काम करणं हे प्रबोधिनीचं कामच आहे. सोलापूर आणि पुण्याजवळील अनेक खेड्यांमध्ये समुचित शैक्षणिक उपक्रम प्रबोधिनीतर्फे चालवले जातात. भारताचा चेहरा-मोहरा बदलण्याची ताकद या विद्यार्थ्यांमध्ये आहे. यातून विकसित नेतृत्व या भागातून तयार होत आहे.

असं असलं तरी शिक्षणापासून सर्वथा वंचित असा फार मोठा समाज भारतात आहे. उदाहरणच द्यायचं झालं तर ऊसतोडणी कामगारांची मुलं! सुगीच्या दिवसांत मराठवाड्यातून रोजगारासाठी हे ऊसतोडणी कामगार महाराष्ट्रात येतात. येताना कुटुंब कबिलाही बरोबर घेऊन येतात. साहजिकच या प्रवासात मुलांची शाळा सुटते. प्रबोधिनीत महाविद्यालयीन तरुणांचा गट आहे... 'प्रचीती'! या गटानं या मुलांच्या शैक्षणिक गळतीवर तोडगा काढला 'साखरशाळेचा!' मी आठवी-नववीत असताना आम्ही या शाळेत शिकवायला जायचो. या शाळेत वर्षभराचा अभ्यासक्रम काही दिवसांत शिकवायचा असतो, तेही मुलांना कंटाळा येऊ न देता! यासाठी प्रबोधिनीनं वेगळ्या प्रकारे अभ्यासक्रम आखला. अशा प्रकारच्या साखरशाळा आता महाराष्ट्राच्या अनेक भागांत चालवल्या जातात. प्रबोधिनी आता या प्रकल्पात सल्लागाराची भूमिका पार पाडत आहे, शिक्षकांना प्रशिक्षित करत आहे. मी कधीतरी ज्या कामात स्वयंसेवक म्हणून सहभागी झाले होते, तो प्रकल्प आज हजारो मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहाशी जोडून ठेवण्यासाठी पथदर्शी ठरला आहे. आज मागे वळून बघताना या सगळ्याचा मला फार अभिमान वाटतो.

या सगळ्या शिक्षण प्रवासात प्रबोधिनीकडे आणि तिच्या विविध शाखांकडे शैक्षणिक क्षेत्रातला फार मोठा अनुभव आणि संचित जमलंय... प्रबोधिनीच्या विद्यार्थ्यांबरोबर महाराष्ट्रातल्या जवळजवळ ५० हजार मुला-मुलींपर्यंत 'छात्र प्रबोधन' या मासिकातून हे अनुभव-संचित पोचतंय. 'छात्र प्रबोधन'चा दिवाळी अंक तर विशेष संग्राह्य असतो. प्रबोधिनीचे 'स्पर्धा परीक्षा केंद्र'सुद्धा आहे. 'उत्तम प्रशासक हवेत. तेही भ्रष्टाचार न करणारे! मनुष्यबळ, पैसा, अधिकार यांचा योग्य वापर करून देशाच्या विकासासाठी झटणारे!', यासाठी स्पर्धा परीक्षांच्या उत्तम तयारीबरोबरच अशा वृत्तीची जोपासना व्हावी म्हणून केंद्राद्वारे विशेष प्रयत्न केले जातात.

मी शाळेत असताना पुण्याच्या वास्तूत शाळेशिवाय इतरही विभाग आहेत हे तेथे वावरताना जाणवायचं. या विभागांमध्ये नेमकं काय चालतं हे तेव्हा मात्र काही कळत नव्हतं. पण आज कळतं आहे.

विविध विषयांतल्या संशोधनाशी निगडित असं फार मोठं काम इथे चालतं. प्रबोधिनीच्या कोणत्याही कामाची सुरुवात ही संशोधनानं होते, किंबहुना संशोधन हा प्रबोधिनीच्या कामाचा पायाच आहे.

प्रबोधिनीत तीन संशोधिका आहेत. बुद्धिमत्तेच्या विविध पैलूंच्या अभ्यासाबराबेरच माणसाच्या भावनिक आणि सामाजिक क्षमतांचा विकास करण्यासाठी विविध उपक्रमांची आखणी करणारी प्रज्ञा मानस संशोधिका! पारंपरिक आयुर्वेद पद्धतींवर संशोधन करणारी आयुर्वेद औषधी संशोधिका! आणि आधुनिक काळाला सुसंगत अशा नवीन धार्मिक संस्कार पद्धती शोधून त्यांचा प्रसार करणारी संस्कृत संस्कृती संशोधिका! आज देशातच नव्हे तर जागतिक पातळीवरही जनसामान्यांपासून तज्ज्ञांपर्यंत प्रबोधिनीच्या संशोधन प्रभागाच्या कामाची दखल घेतली जाते. प्रबोधिनीच्या स्थापनेपासूनच्या विचारांमध्ये असलेली शास्त्रीय बैठक या संशोधन प्रभागांमुळे अधिकाधिक विस्तृत होते, असं वाटतं.

हीच वृत्ती विद्यार्थ्यांमध्येही जोपासली जावी यासाठी सुट्ट्यांच्या काळात वेगवेगळ्या शिबिरांचं आयोजन केलं जातं. त्यातील ग्रामीण भागात झालेली शिबिरं आजही मला आठवतात. या ग्रामीण शिबिरांमुळे आम्हाला ग्रामीण जीवन/तिथल्या



प्रबोधिनीत यायचे समर्थ व्हावया
समर्थ मायभूमीला जगी करावया

अडचणी, समस्या जवळून अनुभवता यायच्या.

१९६२ मध्ये प्रबोधिनीनं पुण्यातील शिवगंगा-गुंजवणी नद्यांच्या खोऱ्यात आपलं काम सुरू केलं. गावाच्या विकासकार्यात कार्यकर्त्यांना गावकऱ्यांचं सहकार्य अपेक्षित होतं. पण प्रत्यक्षात बहुतांशी गावकरी दारूच्या आहारी गेले होते. जोपर्यंत यातून ते बाहेर पडत नाहीत तोपर्यंत इथे कितीही काम केलं तरी ते टिकणार नाही; हे लक्षात आलं आणि म्हणून दारूबंदीचं काम प्रबोधिनीनं सुरू केलं.

दारूच्या भट्ट्या उद्ध्वस्त करून, दारूबंदी आणून हा प्रश्न सुटणार नव्हता. त्यांच्या मानसिकतेत बदल घडवून आणणं आवश्यक होतं. यासाठी कार्यकर्त्यांनी जाणीव जागृती कार्यक्रम सुरू केले. हळूहळू कार्यकर्त्यांच्या प्रयत्नांना यश आलं. लोकांनी संपूर्ण गावासमोर दारू न पिण्याची शपथ घेतली. यानंतर मात्र गावकरी गावाचे प्रश्न सोडवण्यासाठी कार्यकर्त्यांबरोबर उत्साहाने सहभागी होऊ लागले. गावाच्या इंधन समस्या सोडवण्यासाठी बायोगॅस प्लँट उभारले गेले. विविध छोटे-मोठे बंधारे बांधून पाण्याचा प्रश्न बऱ्यापैकी सोडवला गेला. यातूनच मावळ भागातील शेतीला सुगीचे दिवस आले. शेतीतज्ज्ञांनी गावांमध्ये जाऊन शेतकऱ्यांना शेतीतील नवनवीन प्रयोगांची माहिती दिली. यातून योग्य ते बदल घडून गावांमध्ये आर्थिक समृद्धी आली. या खेळत्या पैशाला वाटा फुटण्याआधीच त्याचं नियोजन करणं गरजेचं होतं. मग महिला बचत गट उभारले गेले. बचत गटाच्या माध्यमातून महिलांना स्वयंरोजगाराचं प्रशिक्षण दिलं. विविध गृह-उद्योगांची माहिती करून दिली गेली. बाई शिकली तर कुटुंब सुधारतं, घर सुधारतं ! महिला बचत गटांनी एक पुढचं पाऊल टाकलं. ग्रामीण अर्थव्यवस्थेलाच एक पाऊल पुढे नेणारे उद्योग सुरू केले. या आर्थिक बदलांना एक सामाजिक आणि राजकीय परिमाणही लाभत गेलं. बचत गटांमुळे महिला पुढे जाऊ लागल्या.

आतापर्यंत गावामध्ये जरी आर्थिक स्थैर्य आलं असलं तरी साध्या साध्या आरोग्य सुविधासुद्धा दूर दुर्गम गावापर्यंत पोहोचल्या नव्हत्या. आरोग्यविषयक जागृतीसाठी प्रबोधिनीनं ग्रामीण महिलांना हाताशी धरून त्यांना प्रथमोपचार, दाईकाम आणि आरोग्य चाचण्यांचं प्रशिक्षण दिलं.

ज्ञान प्रबोधिनी मेडिकल ट्रस्टच्या दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या मार्गदर्शनाखाली या ग्रामीण प्रशिक्षणाची सोय करण्यात आली.

ज्ञान प्रबोधिनीच्या एकत्र आलेल्या माजी विद्यार्थी डॉक्टरांनी ज्ञान प्रबोधिनी मेडिकल ट्रस्ट स्थापन केला आणि या मेडिकल ट्रस्टच्या कामाची सुरुवात संजीवन रुग्णालय चालविण्यात झाली. पुढे विस्तृत जागेवर दीनानाथ मंगेशकर रुग्णालय सुरू झालं. या रुग्णालयात सर्व प्रकारची आधुनिक उपचार यंत्रणा आहे. पण याच रुग्णालयातल्या रुग्णांपुरतं हे ज्ञान, ही सेवा मर्यादित न ठेवता, जी लोकं आर्थिक, सामाजिक, भौगोलिक अंतराच्या कारणांमुळे पुण्यापर्यंत येऊ शकत नाहीत अशांपर्यंत प्रबोधिनी स्वत: पोचते. सातारा जिल्ह्यातील शिरवळचं 'कमला नेहरू नेत्र रुग्णालय' हे याचं एक उदाहरण !

नागरी वस्त्यांमध्ये जाऊन, तिथल्या वस्तीतील महिलांना हाताशी धरून वस्तीच्या आरोग्याच्या बाबतीत प्रबोधिनी काम करते.

प्रबोधिनीच्या आरोग्य, ग्रामविकसन, शिक्षण या सर्वच क्षेत्रांतल्या प्रकल्पाचं नेतृत्व करण्यात प्रबोधिनीचे माजी विद्यार्थी आणि कार्यकर्ते मोलाची भूमिका सांभाळताना दिसतात. कारण कर्तृत्वाच्या वेगळ्या वाटांचा शोध घेण्याची बीजं आम्ही शाळेत असतानाच आमच्या मनात रोवली गेली. पुढे शाळा संपल्यानंतरही आमचं शाळेत येणं बंद झालं नाही. तर आम्ही वेगळ्या भूमिकेतून शाळेत यायला लागलो. विविध संघटनात्मक उपक्रम, शिबिरं यांची आखणी आम्ही स्वत: करू लागलो. आमच्यात रुजवले गेलेले नेतृत्वगुण प्रत्यक्षात वापरण्याची संधी आम्हाला यातून मिळत गेली. शाळेतल्या

क्षितिज नवे मज सतत बोलवी, साथीला सन्मित्र हवे ।
आज एकटा, अनघड जरि मी, मनात अंकुर हा उगवे ।।

उपक्रमांबरोबर प्रबोधिनीच्या इतर सर्व केंद्रांवरच्या उपक्रमांत आम्ही मदतीलाही जायचो.

ग्रामीण भागातले मेळावे, 'छात्र प्रबोधन'ची शिबिरे, गावोगावची विस्तार शिबिरे; यातून पुढे प्रबोधिनीचं काम महाराष्ट्रात वाढलं. गावोगावी उपक्रम केंद्रे सुरू झाली. डोंबिवली, बोरीवली, अंबाजोगाई, सांगली येथे विस्तार केंद्रे जोमाने कार्यरत झाली.

वर्षभरातल्या उपक्रमांचा कळस व्हायचा तो क्रीडा प्रात्यक्षिकांनी! दिवस-रात्र सराव करून पूर्ण कौशल्यानं, नियोजनानं विविध क्रीडाप्रकार प्रात्यक्षिकांच्या दिवशी पार पडले की सर्व कष्टांचं सार्थक झाल्यासारखं वाटायचं.

शिस्तीचा बडगा आमच्या शाळेनं आम्हाला कधीच दाखवला नव्हता. पण शिस्त आणि राष्ट्रभक्ती आमच्यात आपोआप, न कळत रुजली होती. म्हणूनच राष्ट्रावर जेव्हा जेव्हा कुठल्याही प्रकारची संकटं कोसळली, नैसर्गिक आपत्ती ओढवली तेव्हा तेव्हा आम्ही हातातली कामं टाकून मदतीला धावलो. देशाला भेडसावणाऱ्या परिस्थितीचा, समस्यांचा अभ्यास करण्यासाठी विविध अभ्यासदौरे आखले. यातून आमची देशस्थितीची जाणीव समृद्ध होत गेली. त्या-त्या वेळी नि:स्वार्थ बुद्धीनं काम करणारे प्रबोधिनीचे ज्येष्ठ कार्यकर्ते आमच्यासोबत असायचे. त्यांच्या सहवासात आम्हालाही एक नवचैतन्य मिळायचं.

प्रबोधिनीच्या विद्यार्थी आणि कार्यकर्त्यांमधील हे सळसळतं चैतन्य केवळ समाजसेवेतच नाही तर सणासुदीच्या काळातही विशेष दिसून येतं. याचं उत्तम उदाहरण म्हणजे गणेशोत्सव! गणेशोत्सव हा महाराष्ट्रातल्या एकूणच सामाजिक जीवनाचा उत्कर्षबिंदू. पण याचं रूप अत्यंत बीभत्स आणि सुमार होत असताना, सर्वांसमोर एक आदर्श घालून देण्याचं काम प्रबोधिनीनं ४० वर्षांपासून अत्यंत समर्थपणे केलं.

गेल्या काही वर्षांमध्ये पुण्यातील नागरीवस्ती अभ्यासगटाचं काम विस्तारत आहे. शैक्षणिक



बर्चीनृत्य

उपक्रमांच्या विस्तारासाठी प्रबोधिनीचे 'शैक्षणिक उपक्रम व साधन केंद्र' कार्यरत झालं आहे. विविध प्रकल्पांना धुमारे फुटत आहेत.

मी जेव्हा जेव्हा प्रबोधिनीत येते, इथल्या उपक्रमांमध्ये सहभागी होते तेव्हा तेव्हा इथून परत जाताना मला एक अनामिक बळ मिळतं. माझ्या जगण्याचं प्रयोजन मला नव्यानं कळतं आणि याच सकारात्मक, विधायक धारणेतून मी पुन्हा माझ्या कामाला लागते.

आपला अनुभव आणि ज्ञान समाजासाठी उपयोगात आणून समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्याचं आम्हा साऱ्यांचं ध्येय आहे. ते प्रत्यक्षात आणण्यासाठी सारेचजण जिद्दीने कार्यरत आहेत.

१९६२ मध्ये आप्पांनी पाहिलेलं बलशाली, समृद्ध भारताचं स्वप्न आज हजारोंचं जीवनध्येय ठरलं आहे. अनेक योजना प्रत्यक्षात आल्या आहेत; पण तरीही आज प्रबोधिनीच्या या विस्तृत विशाल कर्तृत्वाला आता नवीन आव्हानं खुणावताहेत. विविध क्षेत्रांत स्थानिक व राष्ट्रीय पातळीवरचं नेतृत्व विकसित करण्यासाठीची शिक्षण प्रक्रिया तयार करणं हे येत्या १०-१५ वर्षांतलं महत्त्वाचं काम असणार आहे.

**कथानक लेखन : तनुजा रहाणे, विक्रम वाळिंबे**

('माझी शाळा, माझा देश' या ज्ञान प्रबोधिनीच्या चित्रफितीच्या कथानकावर हा लेख आधारित आहे. आपण ती चित्रफीतही अवश्य पाहावी.)

आव्हानांच्या गगनामध्ये मुक्त आम्ही फिरणार।
कर्तृत्वाचे पंख आमुचे कधीच ना थकणार ।।

# ‘द बॉय इन द स्ट्राइप्ड पायजामाज्’

पाहिलेच पाहिजे असे काही...

– शैलजा देशमुख




२००८ साली मार्क हर्मन दिग्दर्शित ‘द बॉय इन द स्ट्राइप्ड पायजामाज्’ हा दुसऱ्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवरील चित्रपट म्हणजे केवळ नाझींच्या अमानुष क्रौर्याचं दर्शन घडवणारा चित्रपट नाही. आतापर्यंत या विषयावर अनेक कादंबऱ्या, चित्रपट आले; मग या चित्रपटाचं वेगळेपण नेमकं कशात आहे? यातना?? कैदेत असलेला एक ज्यू मुलगा आणि ज्यूंवर अत्याचार करणाऱ्या नाझी राजवटीतील एका उच्चपदस्थ अधिकाऱ्याचा मुलगा दोघांची दोन भिन्न विश्वं एका काटेरी कुंपणाने विभक्त झालेली! ही कुंपणं तोडून हे दोन कोवळे जीव मैत्रीच्या नात्याने कसे जवळ येतात व त्या मैत्रीचा हृदयद्रावक शेवट कसा होतो याची ही कथा!

दुसऱ्या महायुद्धाचा काळ! बर्लिनमधील विविध दृश्यांनी चित्रपटाची सुरुवात होते. नुकतीच शाळा सुटलीय. शाळेतील मुलांचे थवे मुक्तपणे विहरत घरी निघालेयत. उच्चभ्रू जर्मन स्त्री-पुरुष हॉटेलमध्ये आनंदाने खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतायत. पण या आनंदी वातावरणात बर्लिनचा काळा चेहरा दाखवणारे दृश्यही मधेच येते. कुठल्यातरी ज्यू वसाहतीतील स्त्री-पुरुषांना पकडून नाझी सैनिक गाडीत भरून यातनातळाकडे नेतायत. सात-आठ वर्षांच्या शाळकरी ब्रूनोला या वास्तवाची जाणीव नाही. शाळा सुटल्यावर घरी पोहोचतो तर तिथे भल्या जंगी पार्टीची तयारी चालू आहे. ब्रूनोच्या वडिलांना बढती मिळालेली आहे. म्हणून ही पार्टी.

ब्रूनो, आता आपण दुसरीकडे राहायला जाणार आहोत, दूर खेड्यात! खूप छान घर असेल आपलं!'' आई म्हणते.

''पण ममा, माझे मित्र? मार्क, लिओ, झालंच तर पीटर... ते नसणार ना तिकडे!'' आई म्हणते.

''मिळतील नवे मित्र! आपण काय कायमचे थोडेच जाणार आहोत? पपांचं तिथलं काम संपलं की येऊच परत!''

ब्रूनो उदास. त्याला नवीन गावी जायची कल्पना अजिबात मान्य नाही. मित्र नसले तर कसली आलीय मजा?

पण शेवटी जायला तर लागतंच. मित्रांचा निरोप घेऊन ब्रूनो आपली बहीण ग्रेटेल, ममा, पपा यांच्यासह नवीन घरी निघतो...

घराचं प्रथमदर्शन ब्रूनोला अजिबात आवडत नाही. घर छान प्रशस्त आहे. पण सर्वत्र सैनिकांचा वावर, आसपास इतर घरं नाहीत, माणसं दिसत नाहीत. ममा त्याची समजूत घालते.

खेळगडी नाहीत, बहिणीबरोबर - मुलींबरोबर कसलं खेळायचं? ब्रूनो एकटाच बुद्धिबळाचा डाव मांडतो. खेळताखेळता त्याचं लक्ष खोलीच्या छताला लागून असलेल्या खिडकीकडे जातं. ब्रूनो टेबलावर चढून बाहेर पाहतो. दूर काहीतरी शेतासारखं दिसतं. तिथे माणसं, मुलं वावरतायत, काम करतायत पण थोडी विचित्रच! असलेकसले त्यांचे कपडे? सगळ्यांनी पट्ट्यापट्ट्यांच्या कापडांचे एकसारखे कपडे घातलेत. शर्ट आणि पायजमा! असेनात का विचित्र कपडे... खेळायला मित्र तर मिळतील -ब्रूनो खूश होतो. ममाला विचारतो.

आई खिडकीतून डोकावून बघते. तिला वस्तुस्थिती समजते. ''ब्रूनो, विक्षिप्तच दिसतायत ती मुलं... हे बघ, मागच्या बाजूला अजिबात जायचं नाही हं!''


२० वर्षांची वाटचाल

कै. अविनाश रघुनाथ फडके स्मरणार्थ
**प्रायोजक – आशिष अविनाश फडके, पुणे**

हे संभाषण चालू असतानाच तसेच पट्टया पट्टयांचे कपडे घातलेला एक नोकर भाजीचा ट्रे घेऊन येतो. ब्रूनोच्या चौकस नजरेतून ते सुटत नाही.

आई नवऱ्याजवळ कुरकुरते, ''तुम्ही म्हटला होता, आपलं घर दूर असेल कॅम्पपासून; पण मागेच तर आहे कॅम्प!''

''अगं, प्रत्यक्ष इथे येईपर्यंत मला तरी काय माहीत? मुलांना तिकडे जाऊ देऊ नकोस!''

जेवणाच्या टेबलावर ब्रूनोची कुरकुर... 'हे बघ ब्रूनो, उद्यापासून तुम्हांला शिकवायला शिक्षकच घरी येतील!'' दुसऱ्या दिवशी सायकलवरून शिक्षकांचं आगमन... ते सर ब्रूनोला मुळीच आवडत नाहीत!

दुसऱ्या दिवशी कंटाळलेला ब्रूनो झाडाखाली पसरलेला! वरती गर्द झाडांची पानं, त्यातून दिसणारं खुलं आकाश! टायरला दोऱ्या बांधून ब्रूनोसाठी छानसा झुला बनवला जातो. आई बाजारात गेलेली असताना ब्रूनो नादात उंच झोका घेतो आणि हात निसटून खाली पडतो. घरचा म्हातारा नोकर (पट्टेरी पायजम्यातला) पळत येतो. त्याला उचलून घरात नेतो आणि सफाईदारपणे बॅण्डेज बांधू लागतो. ब्रूनो घाबरतो, ''आता ममा मला डॉक्टरांकडे नेणार... ते इंजेक्शन देतील...''

तो नोकर म्हणतो, ''बाळा, काही नाही झालं एवढं! लहानशीच तर जखम आहे...''

''तुम्ही थोडेच डॉक्टर आहात हे समजायला..! तुमचं नाव?''

''मी पावेल! मी खरंच डॉक्टर आहे... म्हणजे इथे येण्यापूर्वी होतो.''

''आता तर तुम्ही बटाटे सोलताय...''

''ते जाऊ दे, पाय टेबलावर पसरून जरा विश्रांती घे...'' पावेल मान खाली घालून आपल्या कामात मग्न!

इतक्यात ममा येते, ब्रूनोच्या जखमेवरचं सफाईदार ब्रॅण्डेज पाहून तिला न सांगताच पावेल डॉक्टर असल्याचं समजतं... तिचे 'थँक्स' हे उद्गार



खूप काही सांगून जातात.

एक दिवस ब्रुनो सर्वांची नजर चुकवून गॅरेजमधल्या खिडकीतून मागे पळ काढतो. छान जंगल, झुळझुळता मुक्त झरा आणि अचानक एक तारांचं कुंपण! अरेच्या, हेच ते शेत! तारांपलीकडे ब्रूनोच्या वयाचाच एक मुलगा एकटाच बसलेला... ब्रूनो त्याच्याशी संभाषण साधतो - मध्ये तारांचं कुपण - त्याचं नाव श्मूल!

''तुम्ही इथे काय करता?''

''नव्या झोपड्या बांधतोय!''

श्मूल विचारतो, ''काही खाऊ आहे का तुझ्याकडे?''

ब्रूनो दुसऱ्यादिवशी खाऊ घेऊन यायचं कबूल करतो.

''तुझे बाबा काय करतात?'' ब्रूनोचा प्रश्न.

''सुतार आहेत ते!''

''माझे बाबा सैनिक!''

कधी ब्रूनो बॉल घेऊन येतो. कधी बुद्धिबळ! दोघांचा खेळ सुरू होतो; मधल्या तारांच्या कुंपणाच्या अलीकडे-पलीकडे राहून!

दोघांची मैत्री दिवसेंदिवस सर्वांच्या नकळत बहराला येते. एक दिवस ब्रूनोच्या घरी मोठी पार्टी असते. काचेचे निमुळते नाजूक ग्लास पुसण्यासाठी श्मूलला आणलं जातं. त्याला पाहून ब्रूनो चकित! दोघे गप्पा मारतात. पार्टीसाठी तयार केलेल्या खाद्यपदार्थांतले काही ब्रूनो श्मूलला देतो. इतक्यात

देणे घेणे उदात्तभाव। स्वार्थांधतेचा तिथे अभाव ।।
देणे घेणे सुंदर लेणे । मानव्याचे मंगल जीणे ।।

कामावर देखरेख करणारा लेफ्टनंट तिथे येतो. श्मूलला खडसावतो. घरातलं अन्न चोरल्याचा आरोप करतो.

''नाही सर, हा माझा मित्र आहे त्यानेच मला हा खाऊ दिला.''

लेफ्टनंट आता ब्रूनोकडे मोर्चा वळवतो, ''काय, खरं आहे का हे?'' लेफ्टनंटच्या भेदक नजरेने आणि कठोर आवाजाने भेदरलेला ब्रूनो घाबरून म्हणतो ''छे! मी आताच भेटलो याला! मी नाही त्याला काही दिलं!''

अधिकारी श्मूलला ओरडतो, ''काम संपूदे बघतोच तुझ्याकडे. कळेल चोरी केली तर काय होतं ते!''

ब्रूनो आपल्या खोलीत जातो. आपल्या वागण्याने तो शरमिंदा - स्वत:वरच चिडतो. 'काय केलं हे आपण? घाबरून आपली मैत्री नाकारली?'

दुसऱ्या दिवशी ब्रूनो श्मूलला भेटायला जातो. तो नेहमीच्या ठिकाणी भेटत नाही. एक-दोन-तीन असे ५-६ दिवस जातात. शेवटी एक दिवस श्मूल तिथेच बसलेला - चेहऱ्यावर माराच्या खुणा!

ब्रूनो त्याची क्षमा मागतो. ''माझं चुकलंच - खूप मार बसला का रे?''

श्मूलचं मौनच खूप बोलकं.

एके दिवशी ब्रूनोच्या घरी मोठमोठे अधिकारी जमतात. त्यांना एक फिल्म दाखवली जाते. त्यातून कॅम्पवर कसं छान वातावरण आहे. खेळण्याच्या सुविधा, पुरेसं काम, खाणंपिणं, कॅफे, बाग असं खूप काही छान चित्रण केलेलं असतं; लोकांची फसवणूक करण्यासाठी! ब्रूनो ती फिल्म दरवाजाच्या वरच्या तावदानातून चोरून पाहातोय. त्याला वाटतं, 'आपले पपा किती छान काम करतायत; कॅम्पवरच्या लोकांची काळजी घेतायत.' यातनातळावरील अमानुष कृत्यांची त्याला काहीच माहिती नाही. मधूनमधून गॅसचेंबरमध्ये कोंडून मारलेल्या ज्यूंची प्रेते जाळली जातायत, त्याचा धूर चिमणीतून जाताना दिसतो. दुर्गंध पसरतो. ब्रूनोची समजूत तेथे कचरा जाळला जातोय. यातनातळावर राहणाऱ्या श्मूललाही मधूनमधून तिथली माणसं नाहीशी होतात, त्यांचं काय होतं हे माहीत नाही.

ब्रूनोच्या आईला आपली मुलं अशा क्रूर वातावरणात वाढावीत हे आवडत नाही. नाझींच्या क्रूर कृत्यात आपला नवरा सहभागी आहे, हे सहन होत नाही. पती-पत्नींच्या वादात वडिलांची पक्षनिष्ठा भारी ठरते. मुलांना व पत्नीला तेथून हलवण्याचा निर्णय ते घेतात. सुरुवातीला या घरात नाराज असलेला ब्रूनो आता परत जायला नाखूश आहे; कारण त्याला आता श्मूलसारखा जिवाभावाचा मित्र भेटलाय' - पण जावं तर लागणारच!

ब्रूनो नेहमीप्रमाणे श्मूलला भेटायला जातो. श्मूलचा चेहरा उदास!

ब्रूनो विचारतो, ''काय झालंय रे?''

''माझे पपा कालपासून कुठेच सापडत नाहीयत.''

''मला पण एक वाईट बातमी सांगायचीय. उद्या आम्ही इथून जाणार... कायमचे.''

''मग आपण कधीच भेटणार नाही?''

''तू आमच्या घरी ये. इथलं काम संपलं की!''

गप्पा मारताना ब्रूनो हाताने जमीन खणतोय - त्याला एक कल्पना सुचते ''श्मूल, आपण इथे खणूया - या तारांखाली, मग मी तिकडे कॅम्पवर येतो. आपण तुझ्या पपांना शोधूया दोघं मिळून. पण माझ्याकडे तुमच्यासारखे कपडे नाहीत. मला वेगळं ओळखलं तर सैनिक पकडतील.''

''ब्रूनो, त्याची काळजी नको. आमच्या स्टोअरमध्ये शेकडो पट्ट्याचे पायजमे, शर्ट पडलेत. त्यातला एक आणीन तुझ्यासाठी! मग तुला कुणी ओळखणार नाही.''

''मग ठरलं तर. उद्या दुपारी....''

दुसऱ्या दिवशी ब्रूनो एक मोठ्ठं सँडविच श्मूलसाठी शर्टात लपवून घेतो. आई अडवते,

२० वर्षांची वाटचाल

भारतमाता एकच दैवत येत्या दिवसांचे।
**प्रायोजक - अनय गायत्री राहूल साठे, बोरीवली**

cyronics

Driven by Vision, Powered by Technology

PHILIPS HEALTH CARE BUSINESS

T M I BUSINESS

MEDICAL ELECTRONICS BUSINESS

cyronics

ELECTRICAL & POWER BUSINESS

TEST, MEASUREMENTS & CALIBRATION

ENGINEERING BUSINESS

Business Partners - Brands we represent ... are Global Leaders...

BOSCH | BEISSBARTH | Atlas Copco | PHILIPS | CHAUVIN ARNOUX | Tektronix Enabling Innovation

FLUKE | AMETEK | BREEZE | AVOXIMETER Whole Blood Oximeter | NORMA | Pomona | GOSSEN METRAWATT

DRANETZ | Tyco Electronics | Ambu | TERRY | Precision Modular Instrumentation

Voltech | HEMOCHRON | ITC | metrix | TRUPOINT Portable Blood Gas Analyzers | EXTECH | EMCO

| PUNE | AHMEDABAD | DELHI | CHENNAI | BANGALORE | MUMBAI |

For more details please contact -

Nitin Bhonge M +91 99229 98220 E : nitinbhonge@cyronics.com Girish Mathkar M +91 99229 98170 E : girishmathkar@cyronics.com

cyronics

CYRONICS INSTRUMENTS PVT. LTD.

Corporate office:
#11, Electronic Co-op. Estate,
Pune-Satara Road, Pune: 411 009.
Maharashtra INDIA
Tel.: +91 20 2420 8200 Fax : +91 20 2420 8202

www.cyronics.com

**जलतीर्थे :** वजराज धबधबा – कासपठार, सातारा.
उंची ५६० मी. (भारतातील सर्वात उंच)



''अरे, आता कुठे निघालायस?''

''ममा, जरा झोपाळ्यावर खेळून येतो, शेवटचं!'' आई त्याचं मन मोडत नाही.

ब्रूनो पळतपळत नेहमीच्या जागी! येताना खणायला फावडं आणलेलं. श्मूलने त्याच्यासाठी एक युनिफार्म आणलेला असतो; अंगात एकावर एक घालून. ब्रूनो ते कपडे घालतो. अंगातले कपडे तिथेच काढून ठेवतो. आणि खणलेल्या खड्ड्यातून सरपटत तारांच्या पलीकडे कॅम्पवर जातो. दोघं हातात हात घालून पळतायत. 'आपण प्रथम सगळ्या बराकींमध्ये शोधूया.' ते आत जातात. श्मूल हाका मारतोय, ''पपा, कुठे आहात तुम्ही?''

अचानक शिट्टी वाजते. सैनिकांची धाड येते, सगळ्या प्रौढ कैद्यांना एकत्र करून अक्षरश: हाकलत गॅस चेंबरकडे नेलं जातं. त्या गर्दीत ब्रूनो आणि श्मूलही ढकलले जातात. बाहेर पाऊस पडतोय. ब्रूनो श्मूलला म्हणतो घाबरू नकोस, अरे पाऊस पडतोय ना म्हणून आपल्याला या आडोशाला थांबवलं असेल.''

सगळ्या मोठ्या कैद्यांना काय घडणार याची कल्पना आहे. भीतीने सर्वत्र हाहाकार – क्षणात दरवाजा बंद होतो. गॅस सोडला जातो. पडद्यावर एक क्षण अंधार... दुसऱ्या क्षणी चिमणीतून धूर येताना दिसतो.

इकडे घरी ब्रूनोसाठी शोधाशोध सुरू होते. गॅरेजची मागची खिडकी उघडी – त्याखाली स्टूल... ब्रूनो नक्कीच तिकडे गेलाय. जिवाच्या आकांताने शोध सुरू. तारेच्या कुंपणाअलीकडे ब्रूनोचे कपडे पडलेले... तारांखाली खड्डा खणलेला काय घडलं असावं हे सर्वांच्या लक्षात येतं... ब्रूनोचे पपा कॅम्पवर धावत पोहोचतात. तोपर्यंत गॅस चेंबरचं दार बंद! चिमणीतून धूर! क्रूरकर्मा असलेल्या त्या अधिकाऱ्यातल्या वत्सल पित्याचा आपल्या मुलाच्या नावाने आगतिक आक्रोश!

गॅस चेंबरच्या दरवाजाआड एवढं क्रूर नाट्य घडून जातं. चित्रपटाच्या शेवटी त्या बंद दरवाजाचे स्थिर दर्शन क्षणभर आणि संपूर्ण पडदाभर रिकामा अंधार! त्या पार्श्वभूमीवर प्रकट होणाऱ्या श्रेय नामावलीने सुन्न प्रेक्षकांना चित्रपट संपल्याच्या वास्तवाचे भान येते.

चित्रपटात अनेक व्यक्तिरेखा असल्या तरी ब्रूनो आणि श्मूल ही दोन ९–१० वर्षांची मुलं ही या चित्रपटातील प्रमुख पात्रं!

दोघांची व्यक्तिमत्त्व भिन्न! ब्रूनो हा एका श्रीमंत घरात मोकळ्या वातावरणात वाढणारा मुलगा! तर श्मूल हा क्रूर नाझींच्या तुरुंगात बंदिस्त त्यामुळे दडपणाखाली वावरणारा, वास्तवाच्या कठोर अनुभवांनी संवेदना बोथट झाल्यासारखा, केविलवाणा! अॅसा बटरफिल्ड (ब्रूनो) व जॅक स्कॅनलॉन (श्मूल) या दोन मुलांचा सहज अभिनय मनाला भिडणारा!

परस्परविरुद्ध वातावरणातील दृश्यं, वेगळ्या निष्ठा असणारे ब्रूनोचे आई-वडील त्यांच्यातील संघर्ष, यामुळे वातावरणात भरून राहिलेला ताण!

युद्धाच्या काळ्या इतिहासालाही माणुसकीची, रुपेरी कडा असते. मुलांची निरागसता, त्यांची आपापसातील निष्पाप मैत्री यांना दुष्ट प्रवृत्ती स्पर्श करू शकत नाहीत, याचं अतिशय नाट्यपूर्ण दर्शन ह्या चित्रपटात अनुभवायला मिळते.

**– शैलजा देशमुख**
सी-१०२, पाटे संस्कृती,
सहकारनगर क्र. १, पुणे 411009
sgdeshmukh50@gmail.come

# मायाजाल

(पान क्र. ५४ वरून पुढे सुरू)

मायाने त्या कागदावरचा निरोप वाचला. क्षणभर तिच्या कपाळावर एक आठी उमटून गेली. उपस्थितांना संबोधून ती म्हणाली,

''एक महत्त्वाचा निरोप आहे. मला पाच मिनिटांकरिता जावे लागणार आहे. या व्यत्ययाबद्दल क्षमा करा.''

असे म्हणून माया त्या सेवकामागोमाग बाहेर गेली. स्वयंवराच्या वेळी व्यत्यय आणणारी अशी कोणती घटना असेल याबद्दल निमंत्रित-उपस्थित लोक अटकळी बांधू लागले.

इकडे पाच मिनिटे उलटली. १०, १५ ... वेळ जाऊ लागला पण मायाचा पत्ता नाही. आसपास चौकशी सुरू झाली. इतक्यात एका बाजूने पळत पळत वर्दी चढवलेले दोन शिपाई आले.

''घात झाला... घात झाला... चौघा हल्लेखोरांनी राजकुमारींना पळवून नेले...'' एक शिपाई म्हणाला.

तेवढ्यात दुसऱ्याने एक कागद दाखवला. ''हा कागद ते मागे टाकून गेले.''

तोपर्यंत राज्याचे सेनापती तेथे आले होते. त्यांनी तो कागद घेऊन वाचला. त्यांच्या चेहऱ्यावर राग आणि नंतर चिंतेचे भाव उमटले. त्या कागदावर लिहिले होते -

*''काळजी करू नका. राजकुमारी मायावती माझ्या निवासात सुखरूप आहे, पण तिला परत घेऊन जायला तुम्हाला शक्तीपेक्षा युक्तीची गरज आहे...''* **मैनाक जादूगार**

''अरे बापरे!'' राजा राणी उद्‌गारले. ''हा जादूगार गेले काही महिने आपल्याकडे वेडेवाकडे संदेश पाठवीत होता. पण धमक्या शब्दापर्यंत मर्यादित असतील, असे वाटले होते.''

''आम्ही समाचार घेतो त्याचा, महाराज. आपण काळजी करू नका.'' सेनापती म्हणाला.

''थांबा!'' त्या स्पर्धकांपैकी एक म्हणाला, ''त्या संदेशात मैनाकने शक्तीपेक्षा युक्तीला महत्त्व दिले आहे. सैन्याची तुकडी नेण्यापेक्षा निवडक विचारवंतांनी गेलेले बरे.''

''हा म्हणतो ते बरोबर आहे. मी यायला तयार आहे.'' स्पर्धक -२ म्हणाला. तेव्हा स्पर्धक -१ त्याचे समर्थन करीत म्हणाला, ''मी पण येतो... पाहूया आमच्या दोघांच्या डोकेबाजपणाचा काही फायदा होतो का.''

***

अखेर शोधत शोधत ते मैनाकच्या घरापुढे आले. तिथे गेटवर पोस्टकार्डच्या आकाराचा कार्डबोर्डचा कागद टांगला होता. त्यावर लिहिले होते -

*''या कार्डात भोक करून त्यातून चालत या! माया तुमची वाट पाहते आहे.'' - मैनाक.*

पोस्टकार्डचा आकार १० सेंटिमीटर × १५ सेंटिमीटर असेल. त्याला भोक पाडले तरी ते आकाराने मूळ कार्डापेक्षा लहानच असणार. त्यांतून अख्खा माणूस कसा चालत जाईल? सर्वांच्या मनात हाच विचार होता. स्पर्धक -२ ने येरझाऱ्या घालायला सुरुवात केली, तर स्पर्धक -१ डोळे मिटून विचार करत होता.

''हा सगळा मैनाकचा फाजीलपणा आहे. मी शिकवतो त्याला धडा. या कार्डातून मांजरसुद्धा जाणार नाही... माणूस जाणे शक्यच नाही,'' सेनापती चिडून म्हणाला. इतक्यात मैनाकच्या घरातून एक बाण येऊन त्याच्या पायाशी पडला. त्याला जोडलेल्या कागदावर लिहिले होते -

*''शक्तीऐवजी युक्ती वापरा...''* **माया**.

सेनापतीने त्या दोन स्पर्धकांकडे सहेतुक पाहिले. तासभर असाच गेला. स्पर्धक-२ च्या येरझाऱ्या चालू होत्या. पण त्यांत आता दुबळेपणाची छाप

तार्किकांचे थवे थकले, शास्त्रज्ञांनी हात टेकले ।
अज्ञाताचे गूढ कोडे, कोणीच नाही स्पर्शू शकले ।।

होती. इतक्यात स्पर्धक-१ एकदम ‘शुद्धीवर’ आला आणि उड्या मारू लागला.



**चित्र क्र. ३ :** पोस्टकार्डावर काढलेल्या रेषांवरून ते कापावे. त्यामुळे मोठे भोक तयार होते.



मायाजाल

‘‘काय... वेड तर नाही लागले तुला?’’ सेनापतीने चकित होऊन विचारले.

‘‘युरेका... युरेका, ...कात्री आणा कात्री.’’ स्पर्धक -१ उत्तरला.

सुदैवाने एका सरदाराकडे कात्री मिळाली. किंचित विचार करून स्पर्धक -१ ने त्या पोस्टकार्डाच्या आतल्या भागात कात्री वापरायला सुरुवात केली. चित्र क्रमांक ३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे त्याने कार्ड कापले आणि खरोखर त्या कापलेल्या कार्डातून माणूस सहज जाऊ शकत होता.

त्याचा हा पराक्रम संपता संपता घराचे दार उघडले आणि तेथे मैनाक आणि माया उभे दिसले.

‘‘माझ्या झोपड्यात तुमचे स्वागत असो.’’ मैनाक वाकून म्हणाला.

‘‘आणि माझ्या शेवटच्या प्रश्नाला आवश्यक ती वातावरणनिर्मिती केल्याबद्दल मैनाक काकांना धन्यवाद !’’ माया उद्गारली.

‘‘म्हणजे? हे सगळे नाटक होते?’’ सेनापती आश्चर्याने म्हणाले.

‘‘होय! बाहेरच्या दबावाखाली प्रश्न सोडवण्याचे कसब आहे का ते मला पाहायचे होते. स्पर्धक -१ ने ते दाखवले आणि स्पर्धा जिंकली.’’

मायाचे स्वयंवर यशस्वी झाले. वादविशारद ४ ने वादविशारद ३ च्या गळ्यात वरमाळ घातली.

**– जयंत नारळीकर**
६ खगोल, पंचवटी,
पाषाण, पुणे 411008

**चित्रकार : ऋजुता घाटे**

महन्मंगले ज्ञान देवते, प्रणाम तुज माउली।
युगायुगांची प्रकाशगंगा, उदे तुझ्या पाउली।।

# • E-GURU INSTITUTE, PUNE •

## COMPREHENSIVE TRAINING PROGRAMS FOR IN-SERVICE TEACHERS

* We train teachers in speaking, reading and writing skills in English - including phonetics, grammar, vocabulary, spellings etc.
* We give demo lessons in all subjects for selected units in the syllabus
* We conduct a workshop for preparation of Teaching Aids
* We focus on teaching methods for grammar, essay writing, poetry etc. and provide free lesson notes
* We deal with INNOVATIVE teaching techniques based on Multiple Intelligence, Experiential Learning, Brain-Based Learning, Computer - Aided Learning etc.
* We cover all aspects related to education like Evaluation, Morning Assembly, Singing, games, competitions, Dance, Music, Art, Craft, Celebration of important days and festivals and P.T.

A team of dedicated trainers, we provide training in your school premises, anywhere in Maharashtra.

* Reasonable Charges * Free Follow-up Sessions * Free booklets of guidelines

Phone - 020-25395214, 9890955880
email - eguru60@ymail.com mailme.tusharika@rediffmail.com






*Happy Diwali !*

**SHREE PLASTICS**

Manufactures of all kinds of Plastic Injection Moulded Parts & Specialised in Brake fluid Resercoirs

29/9, D-2Block, Behind KSB Pump, Telco Road, M.I.D.C. Chinchwad, Pune 411019
Ph. 020-66111871, 32538706
Cell 9822294440, Telefax : 020-27477285,
E-mail : shreepla@vsnl.net


**जलतीर्थे :** वैतरणा धरण (वैतरणा नदी) – इगतपुरी, जि. नाशिक
बांधणी – १९७३, उंची –४१मी.

(पान क्र. ११ वरून पुढे सुरू)

# राजेसाहेबांचे भूत

योग्य वातावरण आणि मंत्राद्वारे आवाहन केल्यानंतर त्यांच्या इच्छेप्रमाणेच मृतात्मे प्रकट होतात-दिसतात! कृपा करून कोणी शंका मनात ठेवू नका! शंका असेल तर ते येत नाहीत!''

त्यावर मग डॉ. गरुड काही बोलले नाहीत. ते शांतपणे वर पाहात राहिले. पूजेला सुरुवात झाली. धूर वाढू लागला. मंत्रोच्चार वाढू लागले. कंदिलाचा मंद प्रकाश आणखी मंद झाला. वेळ मंदपणे पुढे सरकत राहिला. आमच्या सर्वांच्याच मनावर विचित्र दडपण वाढलं. थोडी भीती वाटू लागली. कोणी काही बोललं नाही. फक्त मंत्राचे आवाज, वाढता धूर, मंद प्रकाश आणि वातावरणातील उत्सुकता. दूरवर बाराचे टोल पडत राहिले. आमच्या नजरा वर गॅलरीवर खिळून राहिल्या आणि मग अचानक कुणीतरी ओरडलं. मग आम्ही 'ते' पाहिलं... अंधूक प्रकाशात... भव्य लाल पगडी, पांघरलेला लाल शेला, मोठ्या मिश्या, मेणबत्तीचा प्रकाश चेहऱ्यावर पडलेला... भेसूर दिसणारी आकृती. राजेसाहेब-नाही, राजेसाहेबांचं भूत दिसायला लागलं होतं. राजेसाहेबांनी गंगाधरपंतांकडे बोट दाखवलं आणि लगेचच मेणबत्ती विझली. राजेसाहेब दिसेनासे झाले. पाठोपाठ गंगाधरपंतांनी एक किंकाळी फोडली व ते जमिनीवर पडले. त्यांच्या तोंडातून फेस यायला लागला. ते हातपाय झाडू लागले. बाकीचे सगळे त्यांच्याभोवती गोळा होऊन त्यांच्याकडे पाहत राहिले. पाठोपाठ खोलीतून घोगऱ्या आवाजात शब्द ऐकू आले,

''संदूक! संदूक उघडा!''

गंगाधरपंतसुद्धा हाच संदेश पुन: पुन्हा उच्चारू लागले. आणि आमची कामगिरी इथून या क्षणी सुरू झाली. श्यामने हळूच मला ओढलं. आम्ही अक्षरश: दोन क्षणांत पायऱ्या चढून वर गॅलरीत पोहोचलो. जिथं भूत दिसलं होतं तिथं तत्काळ जायला सांगितलं असतं तर एरवी भीती वाटली असती, पण आता मात्र आम्ही दोघांनी वेळ दवडलाच नाही. कोणाला दिसू नये म्हणून आम्ही खाली वाकलो. जवळजवळ रांगायलाच लागलो. आणि आमच्याकडे खालून कोणाचं लक्षही नव्हतं. श्यामने पेन्सिल टॉर्च पेटवला आणि गालिच्यावर प्रकाशझोत टाकला. तो कुजबुजत म्हणाला,

''मघाशी दोन मिनिटांसाठी मी गायब झालो होतो! मी इथे येऊन लाल गालिच्यावर कुंकू पसरून ठेवलं होतं! पाहा इथे, लाल कुंकवावर पायाचे ठसे स्पष्ट उमटले आहेत! भुताचे पाय उमटतील का?''

''नाही!'' मी म्हटलं.

''हा मोत्याचा हार अजून हलतोय! आपल्या राजेसाहेबांचं भूत इथूनच आत गेलेलं दिसतं आहे! या चित्रातूनच दरवाजा असणार!''

मी म्हटलं,

''हा बहुतेक रिव्हॉल्व्हिंग दरवाजा असेल! म्हणजे एका बाजूने दाबलं की, दुसरी बाजू पुढे येते!''

आणि खरं तसंच होतं. आम्ही थोडी खटपट केली आणि दरवाजा उघडला. मी आणि श्याम, दोघांनी आत प्रवेश तर केला. आत मिट्ट काळोख होता. कुबट वास होता. मी खरंतर कराटेचा अभ्यास करणारा. मी असं गाफील राहायला नको होतं. कुणीतरी मागून माझ्या डोक्यावर फटका मारला. त्यानंतर काही समजलंच नाही. डोळ्यांसमोर पूर्ण अंधार. मी बेशुद्ध झालो!!

***

**१०. अडकलो!**

मला जाग आली तेव्हा आपण कुठे आहोत, हे मला समजलंच नाही. भोवताली फक्त अंधारच होता. पण नंतर डोळे सरावले आणि थोडं थोडं दिसू लागलं. माझ्या लक्षात आलं की, आपण

खुर्चीवर बसलेलो आहोत. आपले हात व पाय खुर्चीच्या मागे बांधून ठेवलेले आहेत. डोक्याच्या मागे थोडंसं दुखत होतं. मला राग येऊ लागला, बेसावध राहिल्याबद्दल स्वत:चा आणि फटका मारणाऱ्याचाही. पण लगेचच कुंग-फू आणि कराटे शिकवणाऱ्या माझ्या गुरुजींची मला आठवण झाली. 'रागावर ताबा मिळवून मन एकाग्र करून परिस्थितीचा अंदाज घ्या,' असं मला त्यांनी सांगितलं होतं. मी दीर्घश्वसन करू लागलो आणि हातापायाचे दोर कसे सैल होतील, हे पाहू लागलो. शेजारच्या खुर्चीवर श्याम असणार. कारण तेथेही कोणाला तरी बसवलं होतं. तो श्यामच होता. त्याने कुजबुजत विचारलं,

''जागा झालास?''

''हूं!''

''किती वाजले आता?''

मला राग आला. हातपाय बांधलेले, अंधार, आणि हा घड्याळ पाहायला सांगतो आहे. पण श्यामने कुजबुजत पुन्हा तोच प्रश्न केला आणि माझ्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. 'घड्याळ!' माझ्या घड्याळाच्या पट्ट्याला आम्ही एक पोलादी व धारदार असं पातं लावून घेतलं होतं. आम्ही त्याला 'माशाचा दात' असं म्हणत असू. घड्याळासह मागे हात बांधून ते कसे सोडवता येतील याचा प्रयोग आम्ही शंभर वेळा तरी केला असेल. मी आता तोच प्रयोग सुरू केला. दोन सेकंदांतच मनगटावरच्या दोऱ्या कापल्या गेल्या. लगेचच मी पाठीवरच्या माझ्या 'करामती पिशवी'तून छोटासा चाकू बाहेर काढला व पायसुद्धा सोडवले. लगेचच मी श्यामलासुद्धा सोडवलं. पलीकडे खुर्चीवर आमच्यासारखंच अजून एक मुटकुळं बांधून ठेवलं होतं. त्याचं तोंड बांधलेलं असणार. ते मुटकुळं धडपड करत होतं. पण ती व्यक्ती कोण आहे, हे आम्हाला ओळखता आलं नाही. समोर घुमटाकार छोटा दरवाजा होता. त्यातून एक माणूस अधूनमधून



डोकावून जातो आहे, हे आम्ही पाहिलं. श्याम आमच्या सांकेतिक भाषेत म्हणाला,

''मी डॉक्टर अंकलना मोबाईल लावतो! तू त्या माणसाला बोलतं कर! आपण कुठे आहोत, हे त्यालाच विचारलं पाहिजे!''

आता आमचे हातपाय सुटले होते. तरी अंधारात आम्ही खुर्च्यांवर बसून होतो आणि कराटेची किक मारण्यासाठी माझे हातपाय सळसळू लागले होते. मी मोठ्याने हाक मारली,

''काकाऽ, अहो काकाऽ!''

***

**११. मोबाईलची करामत - आणि सुटका!**

धपाक् धपाक् पावलं वाजायला लागली तेव्हा श्यामने घाईनेच शर्टाच्या बाहीत लपवलेला मोबाईल सुरू केला; कुजबुजत बोलणंही सुरू केलं. बहुतेक त्याने डॉक्टर गरुडांनाच फोन लावला असावा. तिकडून सुद्धा कुजबुजत उत्तर आलं. बहुधा डॉक्टर अंकल हेडफोनवरूनच हळूच बोलत असावेत. तिकडे पण काहीतरी

नाही घड्याळ, गजर; वेळी उगवतो सूर्य ।
मिळे नित्य ही प्रेरणा, काही करण्या सत्कार्य ।।

'गडबड' असावी वाटतं. लगेचच त्या कमानदार दारात मघाचा माणूस दिसायला लागला.

''का हाक मारता पोरांनो आणि कुजबुजून काय बोलता?''

''काही नाही! अहो, आम्हाला सोडा नां !''

''तसा हुकूम न्हाई!''

''मग?''

पलीकडून डॉ. गरुड हे सगळं ऐकत असणारच, तेव्हा मला धीर येत होता.

''काकाऽ आपण कुठे आहोत?''

''दुर्गादेवीच्या मंदिरासमोरच्या विहिरीत! ...इथे लई पायऱ्या आहेत आणि खोल्या पण आहेत...''

''आम्हाला तुम्हीच मारलं ना?''

तो माणूस त्यावर मोठ्याने हसला. मग म्हणाला,

''दुसरं कोण? तुम्ही भुताच्या मागे असं यायला नको होतं!''

''पण मग भूत कुठे आहे?''

''भूत होय? शेजारच्या खोलीत बसलंय मिशी लावून आणि घाबरलंय! हाऽ हाऽ हाऽ!'' तो परत हसू लागला. मी सांकेतिक भाषेत श्यामला इशारा केला.

''का घाबरलं ते?''

''त्याला जबरदस्तीने भूत बनवलं ना, म्हणून! हाऽ हाऽ हाऽऽ!''

पुन्हा त्याचं हसणं. तेवढ्यात श्यामने म्हटलं,

''ऐकताय ना तुम्ही अंकऽल?''

पलीकडून डॉक्टर गरुडांनी म्हटलं, ''होय!''

पण त्या माणसाला वाटलं, श्याम आपल्याशीच बोलतोय. त्याने पुन्हा हसून म्हटलं,

''हांऽ! ऐकतोय ना! ...बोल!!''

''ते भूत म्हणजे वाड्याचा स्वयंपाकीच आहे नां? ...गोपाळचे वडील?''

तो माणूस एकदम हसायचा थांबला. श्यामच्या दिशेने तो आश्चर्याने पाहू लागला. मग थोडा पुढे आला. मी सावध झालो. तो म्हणाला,

''आराऽराऽ! पोरांनोऽ! ...तुम्हाला लई डिटिल माहिती आहे!... ...तुम्ही तुमचा जीवच धोक्यात आणला! ...चलाऽ, पैले तुमचं तोंड बंद करतो!''

आणि तो जवळ आला. मी एकदम उडी मारून उभा राहिलो चपळाईने, कराटेपटू जसं उभं राहतात तसं आणि मी माझी प्रसिद्ध आरोळी ठोकली,

''हाऽ ईऽऽ!''

तो माणूस विलक्षण चकित झाला आणि त्या आरोळीने घाबरलाच. कारण तो आवाज आत, भुयारात घुमून कानावर येऊ लागला. मग मात्र मी वेळ दवडला नाही. मी त्या माणसाला माझी प्रसिद्ध 'कराटे-किक्' हाणली; अगदी जोरात. तो एकदम फेकला गेला आणि दगडी भिंतीवर आदळला. मी आणि श्यामने दोन सेकंदांत त्याचा ताबा घेतला, दोऱ्यांनी त्याचे हात-पाय बांधले, त्याच्याच पटक्यानं त्याचं तोंड बांधलं आणि मग श्यामनं शांतपणे म्हटलं,

''आता, गोपाळला पण सोडवूया!''

''गोपाळ?''

''मग? ...हा गोपाळच आहे! ...ओळखता नाही आलं?'' -तो खरंच गोपाळ होता!

***

**१२. गोपाळ!**

ते शेजारचं मुटकुळं आम्ही सोडलं. गोपाळ आमच्याकडे बघून हसू लागला.

''अरे, तू?'' मी विचारलं.

''होऽ मीच! ...या लोकांनी माझी आणि बाबांची अशी हालत केली आहे! ...मी तुमचं बोलणं ऐकलं आहे! ...मला रस्ते माहीत आहेत, ..चलाऽ'' गोपाळ हळूच म्हणाला.

''तू आमच्या बाजूने आहेस ना?''

''हो तर! ...ते माझ्याकडून काम करवून घेत आणि मग इथे बांधून ठेवत! तो आवाज मीच काढत होतो... भुताचा!''

***With best compliments from***

Kaneri Industries
Shiroli, Kolhapur

**Happy Diwali !**

SE

**Smash**
**Electronics**

**Sunil Pathak** 9422031205
**Milind Gurjar** 9823121521

103, Shaniwar Peth, Kamal Bldg.,
Pune - 411 030.
Ph.: 24487525/ 24487526,
Tel Fax : 24487526
Email: smashelectronics@sify.com

**Wholesale Dealer of**
**CFR, MFR, MOR**
**Wire wound Resistors**
**APR Make & Breaking**
**Resistors & Other**
**Electronics Items**

ADD

**With Best Compliments....**

**ADD EQUIPMENTS PVT. LTD.**

***Range Of Storage Systems.......***

METAL

PIGEON

METAL


**Plot. No. 15 Gat No. 125/26/27,**
**Pirangut, Tal. Mulshi, Pune.**

GANESH INDUSTRIES

MFG.: OF TURNED
AND PRESS PARTS

**Ganesh Industries**

With best compliments

Office & Works :

Sr. No. 39, Warje Malwadi, Nr. Tiny Tots Eng. Med.School,
Off N.D.A. Road, Pune-52
Tel: 020-25291188, 25294049 Fax: 25291188
E-mail : ganesh_qc@rediffmail.com


**जलतीर्थे :** वर्धा धरण (वर्धा नदी) – ता. मोर्शी, जि. अमरावती
बांधणी – १९९३, उंची – ४६.२ मी.

''दुष्ट कुठचे! ...मग आता?''

''चला! मी रस्ता दाखवतो! ...पण आधी बाबांना सोडवू!''

श्यामने पेन्सिल टॉर्च चालू केला. आम्ही तिघे डोकं वाकवून भुयारातून भरभर धावत-पळत राहिलो. गोपाळ आमच्या पुढे होता. शेजारच्या एका अंधाऱ्या दगडी ओवरीसारख्या खोलीत मघाचं 'भूत' बांधून ठेवलेलं होतं. मी लगेचच चाकूने दोरी कापून त्याला सोडवलं. गोपाळने तोपर्यंत बाबांना सगळं सांगितलं. बाबा आमच्याकडे पाहून हसले. श्यामने म्हटलं,

''बाबा! अजूनही तुम्ही भूतच आहात! ...माझी योजना सांगतो!... ...तसं करा!'' आणि श्याम त्याची योजना सांगू लागला! ...काय होती त्याची योजना?

***

**१३. योजना आणि भूत!**

योजनेप्रमाणे मेणबत्ती घेतलेलं 'भूत' पुढे, गोपाळ त्यामागे आणि मग आम्ही दोघं त्या मागे, असं आम्ही हळूहळू पळत राहिलो. मोबाईल चालूच होता. श्याम त्यावर कुजबुजत म्हणाला,

''ऐकताय ना?'' मग डॉक्टर गरुडांचा कुजबुजता आवाज,

''हो, ऐकतोय! ...शाब्बास! ...पण जपून! ...इकडे पण प्रॉब्लेम आहे!''

तेवढ्यात आम्ही पहारेकऱ्यांची पावलं ऐकली. दोन-तीन पहारेकरी इकडे येत असावेत. त्यांनी माझी आरोळी ऐकली असणार. श्याम पटकन म्हणाला,

''ते भुताचं सिक्रेट कोणा-कोणाला माहीत आहे?''

गोपाळ म्हणाला, ''सगळ्यांना नाही! ...या पहारेकऱ्यांना तर नाहीच!''

गोपाळने पत्र्याचा कर्णा तोंडाजवळ धरला आणि खोल आवाजात बोलायला सुरुवात केली,

''इकडे येऊ नका! इकडे आम्ही आहोत! ...आमचा हुकूम आहे!''

लगेच ती पावलं थांबली. आणि मग एकदम घाबरून ते पहारेकरी जसे आले त्यापेक्षा वेगाने धावत निघून गेले. त्याही अवस्थेत आम्हाला हसू येत राहिलं. पण मग श्यामने डोकं थंड ठेवून म्हटलं,

''गोपाळ आणि बाबा! आता चला लवकर! डॉक्टर गरुड संकटात आहेत! ...तिकडलं बोलणंही मला ऐकू येतं आहे!''

आणि आम्ही भुयारातून धावत राहिलो!

***

**१४. दुर्गादेवीचं मंदिर – आणि भूत!**

गोपाळने आम्हाला थांबवलं, अगदी वेळेवर. अंधारात दिसलंच नसतं. पुढे पाणी होतं.

''ही बारव, म्हणजे विहीर! ...आता पायऱ्या चढून वर गेलं की दुर्गादेवीचं मंदिर! हळूहळू या!''

आम्ही आता पुढे झालो. आम्हाला एक विचित्र दृश्य दिसलं. सुरेंद्रप्रतापसिंह आणि डॉ. गरुड एका बाजूला उभे होते. समोर ती संदूक उघडी होती आणि त्यात एक तेजस्वी (बहुधा रत्नजडित) चकाकणारी मूर्ती होती. दुसऱ्या बाजूला महेंद्रप्रतापसिंह, दिवाणजी, कारभारी आणि गंगाधरपंत उभे होते. त्यांच्या चेहऱ्यावर विकट हास्य दिसत होतं. एका शिपायाने डॉ. गरुडांवर बंदूक रोखली होती!

मला आश्चर्य वाटू लागलं आणि राग पण येऊ लागला. वाटलं, धावत जावं आणि- पण श्यामने मला हळूच खूण केली, मागे ओढलं आणि मी पाहू लागलो- ऐकू लागलो. सुरेंद्रप्रतापसिंह म्हणत होते,

''अरे महेंद्र! मला मागितली असतीस तर ही मूर्ती मी तुला आनंदाने दिली नसती का? ...त्यासाठी बंदूक रोखायची काय गरज?''

''ते काही नाही! या कागदावर सही कर आणि डॉ. गरुड- तुम्ही साक्षीदार म्हणून मुकाट्याने सही करा! नाहीतर तुम्ही काही इथून जिवंत परत जात नाही!'' महेंद्रप्रतापसिंह म्हणाले.



नको सोन्याचा मुकुट, नको चांदीचा देव्हारा।
देव म्हणे, सचोटीने आचर तू व्यवहारा।।


प्रा.- मे. श्री. गुरु सेवालाल कन्स्ट्रक्शन, भरणे, जि. रत्नागिरी

माझ्या बाजूने लपून डोकावणाऱ्या श्यामने मोबाईलवर कुजबुजत डॉ. गरुडांना इशारा केला. योजनेप्रमाणे ते आता बोलू लागले,

''मला तुमच्या वादात पडायचं नाही! पण राजेसाहेब स्वत: असते तर त्यांना हा सगळा प्रकार आवडला नसता! या गडावर आणि या वाड्यात राजेसाहेबांचा आत्मा भटकत असेल तर तुमचं कारस्थान त्यांनीही पाहिलं असणार! कोणत्याही क्षणाला ते इथे येऊन तुम्हाला अडवू शकतील!''

डॉ. गरुडांचं वाक्य संपताच श्यामने गोपाळला इशारा केला आणि ठरल्याप्रमाणे गोपाळने पत्र्याचा कर्णा तोंडाला लावून खोल आणि घोगऱ्या आवाजात बोलायला सुरुवात केली. विहिरीच्या- बारवेच्या- अरुंद वास्तूतून, जणू जमिनीतून आल्याप्रमाणे घुमत येणारा तो आवाज त्या अंधाऱ्या रात्री भयाण वाटला.

''जाऽ! निघून जा इथून! आम्ही येतो आहोत! आमचा हुकूम आहे, जा निघून जा!''

सर्वांनी दचकून अंधारात बुडालेल्या बारवेकडे पाहायला सुरुवात केली आणि पाठोपाठ मेणबत्ती घेतलेलं राजेसाहेबांचं भूत एक-एक पायरी चढून अचानक वर येऊ लागलं, जमिनीतून उगवल्याप्रमाणे! भव्य लाल रंगाची पगडी, मोठमोठ्या मिशा, लाल रंगाची पांघरलेली शाल... मेणबत्तीचा चेहऱ्यावर पडणारा मंद प्रकाश, अगदी भेसूर आकृती. सगळे पहिल्यांदा अवाक होऊन, दचकून त्या अभूतपूर्व दृश्याकडे पाहात राहिले. मित्रहो, नंतर काय घडलं असेल, असं तुम्हाला वाटतं?

***

## १५. काय पाहिलं होतं त्यांनी?

तुम्हाला वाटतं तसंच घडून गेलं. पहिल्यांदा शेंदाड शिपायाच्या हातातली बंदूक गळून पडली. पाठोपाठ अंधश्रद्धाळू, भोळे असे ते भोवताली जमलेले चार-पाच शिपाई भयभीत होऊन थरथर कापू लागले आणि नंतर त्यांनी, त्या सर्वांनी तेथून अगदी पलायन केलं. त्यांनी ज्या महाराजांची कोणे एके काळी सेवा केली होती ते राजेसाहेब आता मरणानंतर भूत बनून त्यांच्यासमोर आले होते आणि त्यांना निघून जायला सांगत होते. हातातलं सामान टाकून त्या चार-पाच शिपाईगड्यांनी तिथून पोबारा केला. महेंद्रप्रतापसिंह त्यांना अडवू पाहात होते. ते ओरडून म्हणाले,

''अरेऽ, थांबा! हे काही भूत नाही! हा तर आपला स्वयंपाकी आहे... आणि तो आवाज गोपाळचा आहे! भिऊ नका... थांबा!''

...पण महेन्द्रप्रतापसिंहाचं ते वाक्य त्यांच्या तोंडातच राहिलं... महेन्द्रप्रतापसिंह आणि उर्वरित तिघं आश्चर्याने त्यांच्या डाव्या बाजूला, म्हणजे आमच्या विरुद्ध दिशेने पाहू लागले. त्यांच्यावर कसलासा तेजस्वी प्रकाश पडला होता. ते एकदा डावीकडे आणि नंतर आमच्या दिशेने उजवीकडे आश्चर्याने पाहात राहिले, जणू ते काही तुलना करताहेत किंवा त्यांनी काही अनपेक्षित आश्चर्याची गोष्ट पाहिली आहे! आम्ही जेथे उभे होतो त्या पायऱ्यांपासून पलिकडल्या भिंतीतला एक गुप्त दरवाजा आम्हाला इथून दिसत नव्हता. परंतु तेथे नक्कीच कोणीतरी होतं आणि तिकडूनच तो मेणबत्तीसारखा प्रकाश महेंद्रप्रताप, दिवाणजी, कारभारी व गंगाधरपंतांवर पडला होता... मला अगदी राहवलं नाही. पटकन उडी मारून वर आलो आणि धावत जाऊन मी महेंद्रप्रतापसिंहांच्या डाव्या बाजूला वाकून गुप्त दरवाजाकडे पाहिलं. मला ओझरता मेणबत्तीसारखा प्रकाश दिसला आणि मी कोणाला तरी ओझरतं निघून जाताना पाहिलं...

इकडे या चारहीजणांची अवस्था मोठी विचित्र झाली होती. भीतीने ते चौघेही थरथर कापत होते आणि 'नाही नाही' असं काही म्हणत एक एक पाऊल मागे टाकत होते. श्यामही उडी मारून माझ्या मागोमाग येऊन पोहोचला होता आणि त्याने



या स्मृतींनी प्राण माझे सर्व काळी भारलेले ।
स्पंदनांच्या कंपनांनी श्वास हे भारावलेले ।।

डॉ. गरुडांना त्या दुष्टांपासून दूर नेण्याचा प्रयत्न चालवला होता. महेंद्रप्रताप आणि दिवाणजी इतके भ्यायले होते की, त्यांना भान राहिलं नाही व विहिरीच्या पायऱ्यांना अडखळून दोघेही अंधारात, बारवेच्या पाण्यात पडले. गंगाधरपंत आणि कारभारी यांनी तर भीतीने बसकणच मारली होती आणि ते डाव्या बाजूकडे, तिथल्या गुप्त दरवाजाकडे अजूनही पाहात नकारार्थी मान हलवीत होते. काय पाहिलं होतं त्यांनी?



***

**१६. अखेर!**

गोपाळ, जबरदस्तीने भूत बनविलेले त्याचे बाबा अर्थात स्वयंपाकीकाका आणि मी अशा तिघांनी थंड पाण्यात गटांगळ्या खाणाऱ्या त्या दोघांना ओढून बाहेर काढलं आणि वाड्यात नेऊन ठेवलं. गंगाधरपंतांची तर वाचाच गेली होती आणि कारभारी अधूनमधून 'असं कसं झालं?' असं म्हणून मान हलवत होता.

आता सुरेंद्रप्रतापसिंह यांनी परिस्थितीचा अंदाज घेऊन सूत्रं हाती घेतली होती. त्यांच्या विश्वासू नोकरांकडून ती संदूक सुद्धा वाड्यावर आणण्यात आली. त्यातली ती रत्नजडित मूर्ती तूर्त अतिशय बंदोबस्तात ठेवण्याचं ठरलं. अतिशय खेदाने मान हलवत सुरेंद्रप्रतापसिंह डॉ. गरुडांना म्हणाले,

''लोभ किती वाईट असतो, पाहिलंत ना? त्यासाठी किती मोठा बनाव यांनी घडवून आणला होता! ही मुलं नसती तर आपण खरंच संकटात सापडलो होतो!''

मी आणि श्यामने गंगाधरपंतांकडे निरखून पाहिलं आणि म्हटलं,

''ते माध्यम असण्याचं प्रकरण आणि तोंडाला फेस येणे हे नाटक कसं केलं, ते सांगाल का?''

पण गंगाधरपंत पूर्णपणे हरवलेले होते आणि धक्क्यातून सावरले नव्हते. ते 'राजेसाहेब-राजेसाहेब' असं पुटपुटत राहिले. डॉ. गरुड मात्र विचारी नजरेने दूर कोठेतरी पाहात म्हणाले,

''मोबाईल फोनमुळे दोन्ही बाजूने ऐकू येत होतं आणि काय चाललंय ते कळत होतं! ...या दोन्ही मुलांच्या योजनेमुळे या चौघांचा बनाव त्यांच्यावर उलटला, आणि गोपाळने तर कमालच केली!... त्यांचे अंधश्रद्धाळू सैनिक पळून गेले, हे खरं आहे! पण, त्या चौघांनी त्यांच्या डाव्या बाजूला गुप्त दरवाजात काय पाहिलं होतं?''

डॉ. गरुडांच्या या प्रश्नाला कोणीच उत्तर दिलं नाही. त्या दुष्ट चौकडीने काय पाहिलं होतं, हे आम्हाला शेवटपर्यंत कळलं नाही. डॉ. गरुडांच्याच म्हणण्याप्रमाणे निसर्गाच्या पोटात बरंच काही अज्ञान दडलेलं असतं. कदाचित त्या चौघांनी खरंच राजेसाहेबांना पाहिलं असेल!...

डॉ. गरुडांनी गोपाळच्या पुढील शिक्षणाची जबाबदारी घेतली. तो आमच्या टीममध्ये मोठ्या आनंदाने सामील झाला आणि आमच्या बरोबरच परत आला हे सांगायला नको. खरंच निसर्गाच्या पोटात काय काय अज्ञात दडलेलं असतं!

**- भारत सासणे**
२०४, लक्ष्मी एन्क्लेव्ह, गणेशखिंड रस्ता,
शिवाजीनगर, पुणे- १६

***चित्रकार : गिरीश सहस्रबुद्धे***

२० वर्षांची वाटचाल

डोळ्यांवरचे झापड काढून, पहा पहा हे सारे।
धूसरतेचा विरेल पडदा, दिसतील अंबर, तारे।।


प्रायोजक - श्री. हेमंत धर्माधिकारी, मुलुंड

## टेनिसचा सामना चालला ११ तास

विम्बल्डन टेनिस स्पर्धेत २०१० मध्ये जॉन इस्नेर आणि निकोलस माहुत यांच्यातील सामना हा इतिहासातील सर्वाधिक वेळ चाललेला सामना होता. पुरुष एकेरीतील पहिल्या फेरीचा हा सामना तब्बल ११ तास आणि पाच मिनिटे चालला. त्यात अमेरिकेच्या जॉन इस्नेररने मानाच्या माहुतचा ६-४, ३-६, ६-७ (७-९), ७-६ (७-३), ७-६ असा पराभव केला. विशेष म्हणजे हा सामना २२, २३ व २४ जून असा तीन दिवस चालला. यात १८३ गेम खेळले गेले. यात २३ जून रोजी एकाच दिवसांत सात तास आणि सहा मिनिटांत ११८ गेम खेळले गेले. रिचमंड स्पर्धेत १९८४मध्ये महिला एकेरीतील विकी नेल्सन आणि जीन हेपनर यांच्यातील सामना सहा तास ३१ मिनिटे चालला होता. महिलांचा सर्वाधिक काळ चाललेला हा सामना होता. नेल्सनने हेपनरवर ६-४,७-६(११-९) अशी मात केली. या सामन्यातील एक रॅली ६४३ शॉट्सची होती व २९ मिनिटे चालली.

**– सुरेंद्र पाटसकर,**
surendrapatskar@yahoo.com




संकल्पना व चित्र : विवेक मेहेत्रे

**पान क्र. ८५ वरील गणिती कोड्याचे उत्तर**

आपण आता असं करूया, प्रत्यक्ष आंबे द्यायलाच सुरुवात करूया. कुणी एकच आंबा मागितला तर– म्हणून पहिल्या खोक्यात एकच आंबा भरूया, २ आंबे हवेत मग दुसऱ्या खोक्यात २ आंबे भरूया. आता ३ आंबे कुणी मागितले तर पहिला आणि दुसरा खोका दिला की ३ आंबे मिळतील. ४ आंबे हवे असतील तर – तिसऱ्या खोक्यात ४ आंबे भरू. आता ५ आंबे हवे असतील तर पहिला आणि तिसरा खोका द्यायचा, ६ हवे असतील तर दुसरा आणि तिसरा खोका द्यायचा, ७ हवे असतील तर तिन्ही खोके द्यायचे. मला वाटतं, आता तुमच्या लक्षात यायला लागलं. असेच पुढे विचार करीत चला, आपल्याला असं आढळेल की चौथ्या खोक्यात ८, पाचव्यात १६, सहाव्यात ३२, सातव्यात ६४ आणि आठव्यात १२८ आंबे भरले जातील. हे सगळे खोके जरी दिले तरी आंबे होतात २५५. आता २४५ आंबे उरले. ते शेवटच्या खोक्यात भरू. म्हणजे सगळा हिशोब हवा तसा जमेल.

उदा. समजा, ३०७ आंबे द्यायचे असतील तर नववा खोका देऊया म्हणजे २४५ आंबे. आता आणखी ६२ आंबे द्यावे लागतील. म्हणजे सातवा खोका देऊन चालणार नाही, सहावा खोका द्यावा लागेल – त्यात आंबे आहेत ३२. आता आणखी ३० आंबे द्यायचे. त्यासाठी पाचव्या खोक्यातले १६, चौथ्यातले ८, तिसऱ्यातले ४, दुसऱ्यातले २ द्यावे लागतील. म्हणजेच नववा, सहावा, पाचवा, चौथा, तिसरा आणि दुसरा इतके खोके दिले की ३०७ आंबे झाले. आता तुमच्यासाठी एक छोटासा प्रश्न –समजा, याच अटी पाळून १००० आंबे १० खोक्यांत भरायचे असतील तर कोणत्या प्रकारे भरावे?

**चिन्ह वगळाचे उत्तर –** ९८ – ७६ + ५४ + ३ + २१

झगमगती किती शहरे-गावे, लुकलुकती पाडे।
मंदिरांचे कळस झळकती, गडकिल्ले नि कडे ।।


To be Nalanda of
Technology Application
Welcome to the world of SEED Infotech,
Your Career Partners in IT Training.
• 18+ Years of Expertise in Training Students, Institutions & Corporates
• 35+ Training Locations Across India
• 600+ Highly Skilled IT Professionals and Trainers
• 300,000+ Students and Professionals Trained
• 2000+ Campus Drives Arranged Till Date
• 500+ Recruitment Partners
• Strategic Association with Global Technology Leaders
Winner of 'Microsoft Learning Solutions Partner of the Year' Award
SEED Infotech Ltd.
'Panchasheel', 42/16, Erandawana, SEED Infotech Lane,
Off Karve Road, Pune - 411004. Maharashtra (INDIA).
Tel. : +91 - 20 - 25466798 / 25467484 / 25462550
Web. : www.seedinfotech.com
seed®
beyond the obvious
Training | Staffing | Consulting

# लोकसेवा देवदर्शन समिती

आयोजित

# अष्टविनायक दर्शन

## ७०१/– रुपयांत

(सर्व खर्चासह)




- दोन दिवस प्रवास
- पहिल्या दिवशी चार गणपती
- दुसऱ्या दिवशी चार गणपती
- राहण्याची व जेवण्याची उत्तम व्यवस्था
- मुक्काम नेताजी सुभाषचंद्र बोस मुलांची सैनिकी शाळा, फुलगाव येथे.

- अष्टविनायक दर्शन नोंदणीसाठी आपले नाव, पत्ता, फोन नं. व पासपोर्ट साईज फोटो आवश्यक आहे.
- दर्शनाची तारीख व वेळ १५ दिवस अगोदर ठरेल.

**नोंदणीसाठी संपर्क**

- सचिन शिवले : ८९५६८ ५८५५४
- रमेश पवार : ९८२२८ १९७९१
- संदीप सोनवणी : ९८५०० ७३९३९
- मनिष जगताप : ९८२२९ ७०९७०

# लोकसेवा
सहकारी बँक लि., पुणे

**पाषाण शाखा**
स. नं. १२१/१/१, निरंजन कॉम्प्लेक्स, साई चौक, सूस रोड, पाषाण, पुणे ८९
☎ २५८७०५७०

**मुख्य शाखा**
४३० मंगळवारपेठ, नरपतगिरी कॉर्नर, नरपतगिरी चौक, पुणे ११. ☎ ०२०–२६११४५०० / २६१२७३२४
E-mail : loksevabank@gmail.com

**चंदननगर शाखा**
४९/२, नाणेकर बिल्डींग, फर्जे मार्केटजवळ, चंदन नगर,
☎ २६६३२१०९

**आणि आता लवकरच सिंहगड रोड येथे शाखाविस्तार...**


राष्ट्रीय स्तरावर प्रशासकीय सेवेत कार्यक्षम, समाजाभिमुख व्यक्ती जाव्यात यासाठीचे प्रशिक्षण केंद्र – स्पर्धा परीक्षा केंद्र

२० वर्षांची वाटचाल



पितांबरी परिवारातर्फे सर्वांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा !
अमूल्य वनौषधींचा, पितांबरी कल्पवृक्ष,
अभिनव उत्पादनरूपे, आरोग्य रक्षिण्यास दक्ष !
आयुर्वेदात आरोग्यदायक अशा असंख्य वनौषधींचा उल्लेख आहे. त्यांच्या साहाय्याने पितांबरीने अभिनव उत्पादनांची निर्मिती केली आहे.
Pitambari
HEALTHCARE DIVISION


HAPPY DIWALI
"SQS wishes
the readers of
'Chhatra Prabodhan'
A Safe and Prosperous
Diwali"
Our Building is now LEED Gold Certified by India Green Building Council
Address :
Plot No. 25/1
Rajiv Gandhi Infotech Park Phase I
Hinjewadi, Pune 411057, India
www.sqs.com | www.sqs.india.com | www.sqsgametesting.com
SQS
SOFTWARE QUALITY SYSTEMS


उठा! धीट व्हा! खंबीर बना,
नि:शेष उत्तरदायित्व
स्वत:कडे घ्या.
आधी स्वत:वर विश्वास ठेवा.
ध्यानात ठेवा
'तुम्हीच तर तुमचे
भाग्यविधाते आहात'!
– स्वामी विवेकानंद
1977
NICHROME
Packaging Solutions
Email: marketing@nichrome.com www.nichrome.com
Service Centres & Offices at: Delhi | Kolkata | Mumbai | Bangalore | Hyderabad | Chennai | Ahmedabad
ASEAN | MIDDLE EAST | SAARC | CIS | AFRICA | USA
Packaging Solutions For • Liquid • Grains • Powders • Seeds • Snacks • Pharma • Personal Care

का?
केव्हा?
कसे?

# ◆ निर्णयातील स्वावलंबन



'योग्यवेळी योग्य निर्णय घेता येणं' हे यशस्वी, कर्तृत्ववान माणसांचं एक महत्त्वाचं लक्षण असतं.

'निर्णय क्षमता' शालेय वयापासून विकसित करता येते, हे संशोधनाने सिद्ध झालंय. तेव्हा आत्तापासूनच 'निर्णयातलं स्वावलंबन' तुम्हाला जमावं म्हणून या दिवाळी अंकात हा स्वतंत्र विभाग! निर्णयाबाबत स्वावलंबी का व्हायला हवं? निर्णयाच्या पायऱ्या कोणत्या? महत्त्वाचे निर्णय कशाला म्हणायचे? निर्णय घेताना कोणते अडथळे पार करावे लागतात? मोठ्या व्यक्तींनी निर्णय कसे घेतले? इ. प्रश्नांची उत्तरे तुम्हाला वेगवेगळ्या लेखांतून मिळतील त्याआधारे तुम्ही तुमचे छोटे-मोठे निर्णय घ्यायला सुरुवात करावी. चुकांमधून शिकत अधिक डोळसपणे महत्त्वाचे निर्णयही योग्य रीतीने घेण्याचं बळ तुमच्यात निर्माण व्हावं यासाठी शुभेच्छा !

पुढील वर्षभर ही लेखमाला 'छात्र प्रबोधन'च्या अंकातून तुम्ही वाचू शकाल.

इच्छा
क्षमता
कौशल्य

## अनुक्रम...


- निर्णय घेण्याच्या वाटेवर...
- निर्णय घेताना...
- तूच ठरव (कविता)
- माझे निर्णय : किती महत्त्वाचे? कोण घेते?
- छापा का काटा
- छत्रपतींची अद्भुत निर्णयक्षमता
- निर्णयाचा क्षण...


हृषिकेश रानडे, उमेश झिरपे, मुक्ता पुणतांबेकर

"When you have to make a choice
and don't make it, that is in itself a choice."

# निर्णय घेण्याच्या वाटेवर...

वाच. वनिता पटवर्धन

तसा आपला दिनक्रम सुरळीत चालू असतो. शाळा, अभ्यास, परीक्षा, सुट्टी, जेवण-खाण, झोप, काम, सण-समारंभ, सहली इत्यादी. कधी कधी थोड्याफार अडचणी येतात. कुणाशी वादावादी होते, कधी काही विसरून जायला होतं, काही हरवतं, भुकेनं जीव कासावीस होतो, आजारपण येतं. हे सगळं चालू असतं. अशा या दिनक्रमाला आपल्या विचारांची जोड असते. आपण सतत काही समजून घेत असतो, लक्षात ठेवतो, आठवतो, तर्क करतो, कल्पना लढवतो, निर्णय घेतो, बरं-वाईट ठरवतो आणि कृती करत जातो. विचार करण्याचे हे विविध प्रकार म्हणजे विविध 'विचार प्रक्रिया' आहेत.

या विचार प्रक्रियांचे स्वरूप नेमके कसकसे आहे, त्या कशाकशावर अवलंबून असतात, त्यांमध्ये कोणकोणते टप्पे आहेत, विचार प्रक्रिया कशा प्रकारे सुधारता येतील, त्यांचा वापर आणखी कुठे करता येईल असा सखोल अभ्यास 'विचार कौशल्यां'बाबत केला जातो. आपल्या रोजच्या जीवनात छोट्या-छोट्या अडचणींना आपण चटकन् तोंड देऊ शकतो, पण अवघड पेचप्रसंगांना सामोरे जातांना मात्र विचार कौशल्यांचा कस लागतो ! आपण गोंधळून जातो. अशा वेळी आपण कधी कशीतरी वेळ मारून नेतो. मात्र, कधी अगदी शास्त्रशुद्ध पद्धतीने टप्प्याटप्प्याने विचार करत अवघड पेचप्रसंगावर तोडगा शोधतो, म्हणजेच निर्णय घेतो.



खरं तर पेचप्रसंग सतत सामोरे येत असतात. बघा हं, ही काही उदाहरणे-

* कोणत्या विषयाचा, कोणता क्लास लावायचा उन्हाळी / दिवाळी सुट्टीमध्ये काय काय करायचे?
* कोणता व्यायाम नियमितपणे करायचा?
* दूरदर्शनवरचे कोणते कार्यक्रम केव्हा, किती वेळ पाहायचे?
* खाऊसाठी मिळालेले पैसे कसे खर्च करायचे?
* मित्र-मैत्रिणीशी कडाक्याचे भांडण झाल्यावर काय करायचे?
* कोणत्या विषयाच्या अभ्यासाला जास्त वेळ द्यायचा?
* कोणीतरी चोरी / कॉपी करताना, खोटे बोलताना आढळले तर काय करायचे?
* दहावीनंतर कोणती विद्याशाखा निवडायची?
* कुणीतरी माझ्यावर वारंवार रागावते, ते कसे थांबवायचे?
* महाग वस्तू - सायकल, भारी कपडे, स्वत:च्या वाढदिवसाची भेटवस्तू कशी पसंत करायची?

अशा पेचप्रसंगांबाबत आपल्याला वाटू शकतं की, हे काय पेचप्रसंग आहेत? याबाबत काही निर्णय घेणं काय अवघड आहे? अगदी सहज आणि आपोआप जमतं याविषयी ठरवणं! अशावेळी आपण काय काय करतो?

"Four steps to achievement: Plan purposefully. Prepare prayerfully. Proceed positively. Pursue persistently."

* **इतर कुणी सांगतो, त्यानुसार ठरवतो.** उदा. 'आई/बाबा म्हणाले म्हणून क्लास लावला.' मला स्वत:ला त्या विषयाच्या क्लासची गरज आहे का? का आहे? तोच क्लास का? असा कोणताच विचार माझा मी केलेला नसतो.
* **कुणाचे तरी अनुकरण करतो.** उन्हाळी सुट्टीत सिद्धी त्या शिबिराला / सहलीला जाणार किंवा सगळे दहावीनंतर शास्त्र शाखेत प्रवेश घेणार, मग मीही तसे करणार. स्वत:ची आवड-नावड, क्षमता यांना काही महत्त्व दिलेले नसते.
* **कधी पूर्वी जसे वागलो, तसे वागत राहातो.** खाऊचे पैसे खाऊमध्येच खर्चायचे, मित्र/मैत्रिणीला भेट म्हणून दरवेळी फुले द्यायची, कुणी कॉपी करत असले तर दुर्लक्ष करायचे. यापेक्षा वेगळं करू आणि रंगत आणू, थोडी जोखीम घेऊ असे होत नाही.
* **कधी याबाबत मला काही करता येईल, माझ्या हातात काही आहे, हेच उमगत नाही** आणि मग आपण गप्प राहातो. वारंवार रागावणाऱ्याला मी थांबवणार कसं किंवा पैसे मी कमावलेले नाहीत, तर महाग वस्तूच्या खरेदीविषयी मी काय बोलणार, असं वाटतं.
* **काही वेळा देव, दैव यांवरही निर्णय सोपवतो.**

हे असं होताना लक्षात येतंय का, की आपण कुणाच्या तरी हातातलं बाहुलं बनलो आहे? स्वत:विषयी स्वत: फार कमी गोष्टी ठरवतो आहोत? आपले निर्णय इतरांवर अवलंबून आहेत? किंबहुना पुष्कळ वेळा 'मला माझ्याविषयी निर्णय घ्यायला हवा, घेता येईल' हेच मुळात ध्यानात येत नाही ! हे पटतंय का?

तर मग **'माझ्याविषयीचे निर्णय मी घेणार, अधिक जागरूकतेने घेणार, त्यासाठीची आवश्यक ती जबाबदारी स्वीकारणार'** असं म्हणणं, हे निर्णय घेण्याच्या वाटेवरचं **पहिलं महत्त्वाचं पाऊल** आहे.

हे पाऊल महत्त्वाचं का बरं? जरा आठवून पाहूया अगदी लहानपणीचे आपल्याविषयीचे अनेक निर्णय इतर कुणीतरी घेताना दिसतं. आपलं नाव, शाळा, कपडे, खाणे-पिणे, नातेवाईक यांविषयी कुणीतरी आधीच ठरवलेलं असतं आणि आपण त्यानुसार वागतो. शाळेचा अभ्यासक्रम आणि परीक्षा यांविषयी तर कितीही नाराजी असली तरी काहीही करता येत नाही! हो ना?

पण आता पुढील उदाहरणं नीट बघा हं - अभ्यासाविषयी - अभ्यास केव्हा, किती वेळ, कसा, कोणकोणत्या विषयांचा करायचा; स्वत:हून करायचा की कुणी मागे लागल्यावर; एकट्याने की कुणासोबत की क्लासच्या मदतीने करायचा; जोडीने अन्य वाचन, लेखन, चर्चा, प्रकल्प, कोणते कसे करायचे हे सगळं आपण ठरवू शकतो ना? कुटुंबीय, नातेवाईक, मित्र-मैत्रिणी यांच्याशी संबंध कसे सांभाळायचे, जोडायचे, याविषयी आपण निर्णय घेऊ शकतो. आपला स्वभाव कसा जोपासायचा? प्रेमळ, शांत, आनंदी की चिडका, अतिहट्टी, भित्रा, तुसडा, अबोल...? मोकळ्या वेळात कशा-कशामध्ये रंगून जायचं, कशाचा ध्यास घ्यायचा? आरोग्य राखण्यासाठी खाणे-पिणे, स्वच्छता, व्यायाम, खेळ, झोप, औषधपाणी यांबाबत वेळोवेळी कोणकोणते निर्णय घ्यायचे आणि पाळायचे? अशा प्रकारचे निर्णय आपण आता नक्की घेऊ शकतो. प्रश्न असा पडतो की 'स्वत:चे निर्णय स्वत: घेण्याचं पाऊल मुळी उचलायचं की नाही?' निर्णय चुकला तर, निराशा, इतरांची बोलणी, कटकट हे होणार. निर्णय घ्यायचा म्हणजे विचार किती करायला लागेल; विचार करण्याचा कंटाळा येतो त्याचं काय? वेळ कुणाला आहे? इतर आपल्यासाठी निर्णय घेतात ते काय मूर्ख म्हणून? असे वेगवेगळे अडथळे निर्णय घेताना येऊ शकतात.

रोहन मात्र असे अडथळे पार करू शकतो. अति आज्ञाधारकपणा, इतरांच्या हातातलं कळसूत्री बाहुलं बनणं हे तो टाळतो आणि जबाबदारीने अनेक निर्णय स्वत: घेतो. या प्रक्रियेतून त्याच्या विचारांना चालना मिळते. आपल्या निर्णयांनुसार वागतांना त्याला

मिळणारे समाधान आणि आनंद न्याराच असतो. ‘मी स्वत: महत्त्वाचे असे काही केले,’ या भावनेमुळे त्याचा आत्मविश्वास दुणावतो. ‘माझे माझ्यावर नियंत्रण, आहे.’ हे उमजल्यामुळे निश्चय, निर्धार यांकडे त्याची वाटचाल होते. वाहवत जाणे होत नाही. यांमुळे रोहन आरोग्याला घातक सवयी, व्यसने, इतरांची टिंगलटवाळी करणे यांपासून निग्रहाने दूर राहू शकतो. एखादा निर्णय बहुतांशी चुकला तर खचून न जाता त्याविषयी शहानिशा करायची तयारी ठेवतो. हे निर्णय तो टप्प्याटप्प्याने घेतो. कसा घ्यायचा असतो निर्णय?

निर्णय घेण्याच्या वाटेवर चालण्यापूर्वी निर्णय घेणे म्हणजे काय, **निर्णयाची वैशिष्ट्ये** कोणकोणती ते पाहूया.

* निर्णय घेणे ही सतत प्रक्रिया आहे. निर्णयविषय अनेकविध असतात.
* निर्णयांची साखळी असते. एकातून दुसरा निर्णय निघतो. निर्णय एकमेकांत गुंफलेले, परस्परावलंबी असतात.
* निर्णय घेण्यामध्ये आपल्या भावना, स्वभाव, प्राध्यान्ये, तत्त्वे यांचा मोठा वाटा असतो. निर्णय प्रक्रियेमध्ये अनेक पर्यायांमधून एक पर्याय निवडतांनाचे निकष त्यानुसार ठरतात.
* काही निर्णय घेणे सोपे, तर काही अवघड जाते. निर्णयांची व्याप्तीही कमी-जास्त असते. निर्णय हे व्यक्तिगत, गटांचे, संस्थांचे आणि राष्ट्रांचेसुद्धा असतात. मोठी व्याप्ती असलेले निर्णय धोरणात्मक असतात.
* व्याप्तीनुसार निर्णयांचे परिणाम कमी-अधिक जणांवर आणि कमी-अधिक काळासाठी होतात.
* अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे कधीही, कोणताही, कोणीही घेतलेला निर्णय १००% अचूक किंवा लाभदायी नसतो. प्रत्येक निर्णयाबाबत काही उणीव असते, काही तोटे असतात. आपण आपला निर्णय जास्तीतजास्त १००% नेण्याचा प्रयत्न करायचा, म्हणजे पश्चात्ताप करायची वेळ येत नाही.

**निर्णयाच्या वाटचालीमधल्या ठळक पायऱ्या अशा मांडता येतील –**

* निर्णयविषय जाणणे, नेमक्या शब्दांत मांडणे, पेचप्रसंग समजून घेणे.
* त्याविषयी माहिती गोळा करणे, त्यानुसार फेरमांडणी करणे.
* त्या अनुषंगाने स्वत:ची आवड, प्राधान्ये, क्षमता ध्यानात घेऊन निकष ठरवणे.
* निर्णय घेण्यासाठी अनेक पर्याय शोधणे.
* प्रत्येक पर्याय ठरवलेल्या निकषांनुसार अधिक-उणा तोलणे.
* वजनदार पर्यायाची निवड करणे, निर्णय घेणे.
* निर्णयाची अंमलबजावणी करणे.
* निर्णयाच्या परिणामांचा पडताळा घेणे.
* पुढील अधिक सुयोग्य निर्णयासाठी बांधणी करणे.

**‘दहावीनंतर कोणती विद्याशाखा निवडावी’** असा पेच अद्वयपुढे होता. ज्यांना पुढे शिकायचे आहे, त्या सगळ्यांनाच हा प्रश्न पडतो (खरं तर पडायला हवा). याविषयीचा निर्णय नववीमध्येच घेऊया, असे त्याने ठरवले. दहावीचा निकाल लागल्यावर बघू, असे पुढे ढकलले नाही. टाळाटाळ केली नाही; इतर कुणी सांगेल; मग त्यानुसार ठरवीन, असे म्हटले नाही किंवा चतुराईने ‘स्वत: निर्णय घेऊन तो इतर कुणाच्या तोंडून वदवून घेणे’ही नाकारले. मग आपण वर पाहिलेल्या पायऱ्यांनुसार अद्वय काय काय करील?

पेच किंवा निर्णयविषय तर नेमकेपणाने समोर आहे. त्याने माहिती मिळवायला सुरुवात केल्यावर त्याला प्रचंड गोष्टी कळतील. त्यासाठी इतरांशी बोलणे, शिक्षण संस्थांमध्ये जाणे, अभ्यासक्रम व व्यवसाय मार्गदर्शनाविषयीची पुस्तके वाचणे, इंटरनेटचा वापर करणे असे बरेच काही तो करील; प्रमाणपत्र, पदविका, पदवी यांपैकी कोणता अभ्यासक्रम करायचा आहे हे निश्चित करील. बारावीनंतरच्या, पदवीनंतर करायच्या कामाचाही त्याला विचार करावा लागेल.

"A wise man makes his own decisions, an ignorant man follows the public opinion."

याच्या जोडीने अद्वयला स्वत:ला जाणून घ्यावे लागेल. स्वत:चा कल, झेप, इच्छा; तसेच आर्थिक पाठबळ, किती वर्षे शिक्षण घेता येईल, कोणती विद्याशाखा, महाविद्यालय, सभोवतालच्या ज्येष्ठांची मते इ. यानुसार तो सर्वसाधारण निकष ठरवेल. स्वत:चा कल, महाविद्यालय ते घर हे अंतर, दर्जा, शिक्षणासाठीचा खर्च इ.

स्वत:चा कल ओळखल्यावर आता अद्वयसमोर कदाचित चित्रकला, शिल्पकला, आरेखन, भूमिती, भूगोल, इंजिनियरिंग, आर्किटेक्चर, अंतराळशास्त्र असे विषय आणि संबंधित विद्याशाखा पर्याय म्हणून असतील. मग पुन्हा स्वत:विषयी, त्या अभ्यासक्रमाविषयी आणखी माहिती मिळवता मिळवता त्यातील काही गळतील.

असे करता करता दहावीचा निकाल हाती येईल तेव्हा अद्वयचा निर्णय तयार असेल. मात्र, त्या खालोखालचे २–३ निर्णय किंवा पर्याय स्वीकारण्याची तयारी त्याला ठेवावी लागेल. कारण त्या विशिष्ट संस्थेत, त्या विशिष्ट अभ्यासक्रमाला प्रवेश मिळाला नाही तर काय हेही स्पष्ट असावे लागेल.

काही वर्षांनी आपल्या निर्णयाचा पडताळा अद्वय घेईल. त्यावेळी काही माहिती आपल्याला नीट मिळाली नाही, स्वत: कशाला प्राधान्य देतो ते नीटसे उलगडले नव्हते, असेही त्याला जाणवू शकते. ठीक आहे. असाच पुढचा महत्त्वाचा आणि दूरगामी निर्णय घेण्यासाठी ही निर्णयप्रक्रिया अधिक कार्यक्षमतेने वापरू, असेही तो म्हणेल; स्वत:च्या त्रुटी दूर करण्याची तयारी करील.

**स्वनिर्णयासाठी पोषक गुण**

निर्णय घेण्याच्या या वाटेवर अनेक व्यक्तित्वगुण पोषक ठरतात.. 'माझा मी निर्णय घेईन' म्हणताना निश्चय, स्वतंत्रपणे विचार करण्याची इच्छा, जोखीम घेण्याची तयारी, चिकाटी, अंमलबजावणीतला धीटपणा, घेतलेला निर्णय जोखून पाहण्यातला तटस्थपणा, दूरदृष्टी यांच्या आधारे अधिकाधिक फलदायी निर्णय घेणे आणि तो थेटपर्यंत पेलणे हे



सहज होते. डळमळीतपणा, धरसोड वृत्ती, विचारांचे आणि मतांचे परावलंबन, भीती, आळस, मिळमिळीतपणा यांमुळे वाट वेडीवाकडी होते. त्यामध्ये कधी दूषित पूर्वग्रह, गैरसमजुती, तर्कविसंगती यांची भर पडली तर वाट कुंठीतही होऊ शकते. घेतलेला निर्णय अगदी अयोग्य होता, असे म्हणून हताश होणे, केवळ दोष देणे किंवा चुकीच्या निर्णयाचेच वृथा समर्थन करत राहणे, यांमुळे पुढे घ्यायच्या निर्णयांबाबत सुधारणा कशी होणार? त्यामुळे हे निर्णय कौशल्य आत्मसात करत करत वाटचाल चालू ठेवायची. आपली आवड, प्राधान्य, मूल्ये, तत्त्वे यांनुसार नोकरी, शिक्षण व्यवसाय, विवाह, समाजसेवा, मैत्री, नातेसंबंध याबाबतचे निर्णय घेण्याची सततची प्रक्रिया चालू ठेवायची, या प्रक्रियेमधला आनंद अनुभवायचा!

**– वाच. वनिता पटवर्धन**
प्रज्ञामानस संशोधिका, पुणे – ३०
**चित्रकार : ओंकार इनामदार**

"Stay committed to your decisions, but stay flexible in your approach."



# निर्णय घेताना...

मनीषा मिरजकर

निर्णय घेतानाच्या पायऱ्या (सुरुवातीच्या लेखात सांगितल्याप्रमाणे) लक्षात आहेत ना? त्या पायऱ्या वापरून नेहा तिचा निर्णय कसा कसा घेईल ते आपण पाहूया.

**पेच :** नेहाला सुट्टीत ७ दिवसांच्या नाट्यशिबिराला जायचे आहे. आई-बाबांनी त्यास परवानगी दिली आहे. पण मामाने त्याच वेळेस पाच तासांच्या अंतरावरील त्याच्या गावास आजीची पंच्याहत्तरी साजरी करायची ठरवली आहे. दोन्ही गोष्टी एकाच वेळेस आहेत. या परिस्थितीत काय आणि कसा निर्णय घ्यावा?

## निर्णय घेतानाच्या पायऱ्या

(नेहा करत असलेला विचार)

**१. नेमका पेच मांडा :** मला सुट्टीत ७ दिवसांच्या नाट्यशिबिराला जायचे आहे. आई-बाबांनी त्यास परवानगी दिली आहे. मामाने गावाला आजीची पंच्याहत्तरी त्याच दिवसांमध्ये एक दिवस ठेवली आहे. या दोन्ही गोष्टी एकावेळेस आल्या आहेत. मला या दोन पर्यायांपैकी एकच निवडायचा आहे. मी काय करू?

**२. माहिती गोळा करा :** नाट्यशिबिर सोमवार ते रविवार रोज १० ते ६ आहे. आजीचा पंच्याहत्तरी समारंभ गुरुवारी संध्याकाळी ६ वाजता आहे.

**३. स्वत:ला ओळखा :** मी १३ वर्षांची आहे. मला अभिनय करायला आवडतो. मला शिबिरात येणार असणाऱ्या तज्ज्ञ व्यक्तींकडून अभिनय शिकायचा आहे. मला माझी आजीही खूप प्रिय आहे. याविषयी मला वरिष्ठांशी बोलण्याचा संकोच वाटतो.



"It's not hard to make decisions when you know what your values are."



**४. पुन्हा नेमका पेच मांडा –**

मला नाट्यशिबिरालाही जायचे आहे आणि आजीच्या पंचाहत्तरीसाठीही जायचे आहे. मी आजीची लाडकी नात आहे. जवळपास दर सुट्टीत मी मामाकडे गेल्यावर आजीने माझे खूप लाड केले आहेत. आमची खूप छान गट्टी जमली आहे. तिच्या पंच्याहत्तरीलाही मला तेवढ्याच तीव्रतेने जावेसे वाटते आहे, पण मला नाट्यशिबिरही बुडवायचे नाही. खूप दिवसांनी अशी संधी आलीय तीही मला चुकवायची नाही. मग मी काय करू?

**५ व ६. अनेक पर्याय शोधा, त्यासाठी आवश्यक ती पूर्वतयारी आणि परिणाम यांविषयी अंदाज बांधा.** (खालील कोष्टकाप्रमाणे)

| पर्याय शोधा | पूर्वतयारी/अपेक्षित कार्यवाही | परिणाम |
|---|---|---|
| १. नाट्यशिबिरास न जाता नंतर कधीतरी जाणे | अशी नाट्यशिबिरे परत कधी होतील या माहितीकडे लक्ष ठेवणे | या नाट्यशिबिरातील नामवंत कलावंतांचे मार्गदर्शन परत मिळेल का? |
| २. आजीच्या पंचाहत्तरी सोहळ्यास न जाणे. | आजीची फोनवरून माफी मागता येईल. पत्र लिहिता येईल. तिच्यासाठी स्वत:च्या हातानी काहीतरी भेटवस्तू बनवून देता येईल. शिबिर संपल्यावर तिला भेटायला जाता येईल. | आजीला वाईट वाटेल. ती समजून घेईल का? नंतर आजीला भेटायला गेल्यावर सर्व नातेवाईक भेटणार नाहीत. (मी न गेलेली). त्यांना आवडणार नाही. |
| ३. शिबिरातून सवलत घेऊन गुरुवारी दुपारी निघून संध्याकाळी समारंभाला जाणे ; पहाटेची गाडी घेऊन शुक्रवारी परत शिबिरास येणे. | आई- बाबांची आणि शिबिर व्यवस्थापकांकडून परवानगी घ्यावी लागेल. गाडीच्या वेळा बघाव्या लागतील. आई-बाबांनी एकटीस प्रवास करू दिला नाही तर कोणास सोबत घ्यावे याचा विचार करावा लागेल. | शिबिरातून सवलत मागायला संकोच वाटतो का? सवलत मिळेल का? काही महत्त्वाचे बुडेल का? एवढा प्रवास केल्यास थकायला होईल का? त्याचा परिणाम शुक्रवारच्या शिबिरातील सहभागावर होईल का? |

"The strongest principle of growth lies in human choice."

**७. निर्णय घ्या –** दोन्ही गोष्टी करायच्या. शिबिरातून सवलत घ्यायची. गुरुवारी स्वत: प्रवास करायचा. शुक्रवारी भावाबरोबर परत यायचे. दगदग झाली तरी शिबिरात मनापासून भाग घ्यायचा. जे बुडणार आहे ते इतरांकडून समजावून घ्यायचे.

**८. कृती करा –** ठरल्याप्रमाणे केले.

**९. पडताळा घ्या –** योग्य पद्धतीने परवानगी मागितली. आजीला झालेल्या आनंदाने खूप बरे वाटले. ज्या कृती बुडल्या आहेत त्या शिबिरानंतर मित्र–मैत्रिणींबरोबर करून बघणार आहे.

नेहाने घेतलेला निर्णय तुम्हाला योग्य वाटला का? तुम्ही तिच्या जागी असल्यास काय केले असते?

याचप्रमाणे निर्णयप्रक्रियेतील पायऱ्या वापरून तुमच्या आयुष्यातील एखादा निर्णय सोडवून बघा.

खाली काही पेच दिले आहेत ते सरावासाठी तुम्ही सोडवू शकता.

१. वाढदिवसाला नवीन पुस्तके घ्यावीत की सॉफ्टवेअर?

२. जुनी सायकल दुरुस्त करून वापरावी की नवीन सायकलसाठी सुट्टीत काम करून पैसे जमवावेत?

**– मनीषा मिरजकर**
ए–३, ६०२ धवलगिरी,
रामबाग कॉलनी, कोथरुड, पुणे – ३८
manishamirajkar@gmail.com
**चित्रकार – ओंकार इनामदार**

व्यंगचित्रकार – आशिष जोशी
अवश्य भेट द्या – www.usemylenses.blogspot.com







"Indecision is often worse than wrong action."

कविता

# तूच ठरव...



तूच ठरव काय ते, कुठली दिशा, कुठल्या वाटा
घोड्याला पाण्यापाशी नेण्यापुरताच माझा वाटा!

नवे वारे, नवे तारे दिसतील नव्या खाणाखुणा
पुढच्याला जर ठेच लागली, मागचा तू, होशील शहाणा!

हेच तुझे वय आहे, शिकून घे नवे नवे
‘घडा पालथा’ नसावा, हे, मी का तुला सांगायला हवे?

कळेल तुला हळूहळू, कोण आपला, कोण परका?
मैत्री कुठली, घसट कुठली, कोण ‘मामा कामापुरता?’

पारखून घे माणसाला आपलं म्हण, जवळ कर
खेळणं मात्र होऊ नकोस कोणा हातचं वरचेवर

दाखव तुझा रंग कधी, कधी मात्र दाखव रग
टक्के टोणपे खाल्ल्याशिवाय कळेल कसे तुला जग?

वाद घाल, कर भांडण, मोकळा हो, स्वच्छ हो...!
चांगल्यासाठी तावून घे, सुलाखून घे, लख्ख हो...!

गोंगाटाला घाबरू नकोस, गर्दीमध्ये हरवू नकोस
चकवा लागला, दैव फिरले... असले धडे गिरवू नकोस.

टीका झाली, सहन कर, निंदकाचा कर शेजार
‘हांजी हांजी’ पेक्षा पाहा – छाननीनेच येते धार!

⋮

नीट रहा, कळव–कधी परतणारेत तुझे पाय?
नसशील येणार, तरी कळव... क्षेम–कुशल–कसे काय?

तुझे तूच ठरवणार, तूच तर तुला जबाबदार!
तुला तूच सापडल्यावर... मलाही तू गवसणार...!!

**– आश्लेषा महाजन**
‘मंजिरी’, २३० चित्ररेखा सोसायटी,
सहकारनगर नं. १, पुणे 411009

**चित्रकार : राहुल देशपांडे**

# माझे निर्णय किती महत्त्वाचे? कोण घेते?

मनीषा मिरजकर




तुमच्या जीवनात तुम्हाला पुष्कळ निर्णय घ्यावे लागतात. काही निर्णय तुम्ही रोज घेता तर काही निर्णय कधीकधी घेता.

तुमच्या आयुष्यातील काही निर्णय खाली नमूद केले आहेत. तुम्ही १ ते ५ असे गुण देऊन हे निर्णय तुमच्या दृष्टीने किती महत्त्वाचे आहेत हे ठरवू शकता. (१ गुण – सर्वात कमी महत्त्वाचा निर्णय, ५ गुण – सर्वात जास्त महत्त्वाचा निर्णय) तसेच हे निर्णय तुम्ही स्वत: घेता का इतर (पालक, मित्र, शिक्षक) हे पण लिहायचे आहे. काही निर्णय यापैकी दोन – तीनजणांनी घेतलेलेही असू शकतील.

आधी हा तक्ता भरून मगच मागचं पान उघडा हं !

| क्र. | निर्णायक प्रश्न | महत्त्व १– ५ | निर्णय कोण घेते? |
|---|---|---|---|
| १. | मी सकाळी किती वाजता उठावे व रात्री किती वाजता झोपावे? | | |
| २. | मी कोणते कपडे घालावेत? | | |
| ३. | मी मधल्या सुट्टीत काय खेळावे? | | |
| ४. | मी कोणाबरोबर खेळावे? | | |
| ५. | मी आंतरशालेय स्पर्धेत (खेळ / इतर) भाग घ्यावा का? | | |
| ६. | मी रोज डब्यात काय न्यावे? | | |
| ७. | मी रोज किती वेळ अभ्यास करावा? | | |
| ८. | मी अभ्यासाच्या कोणत्या पद्धती वापराव्यात? | | |
| ९. | मी रोज किती वेळ दूरदर्शन बघावे? | | |
| १०. | मी दूरदर्शनवरील कोणते कार्यक्रम बघावेत? | | |
| ११. | मी रोज संगणकाचा वापर किती वेळ करावा? | | |
| १२. | मी कोणते छंद जोपासावेत? | | |
| १३. | मी वाढदिवसाला/ बक्षीस म्हणून मिळालेले पैसे कसे खर्च करावेत? | | |
| १४. | मी मे महिन्याच्या सुट्टीत काय करावे? | | |

"The more alternatives, the more difficult the choice"

**निर्णयाचे महत्त्व/महत्त्वाचे निर्णय**

या प्रश्नावलीला तुम्ही काही उत्तरं दिली असतील/गुणांकन केलं असेल/काही विचार केला असेल. आता खाली या प्रश्नांच्याआधारे विश्लेषण केले आहे. तेही काळजीपूर्वक वाचा. तुमची उत्तरे आणि इथे सांगितलेली उत्तरे पडताळून पाहा. काही प्रश्नांना २-३ गुण दिले असतील तर त्यामागचे कारण काय आहे? तुमचे उत्तर दिलेल्या उत्तराशी जुळत असेल तर इथे दिलेले कारण तुमच्या मनात आले होते का? काही वेगळा विचार होता का?

जर तुमचे उत्तर दिलेल्या उत्तरापेक्षा वेगळे असेल म्हणजेच कमी/जास्त महत्त्वाचे वाटले असेल तर दिलेल्या स्पष्टीकरणाचा जरूर विचार करा. तो विचार करून परत प्रश्नावली सोडवण्याचा प्रयत्न करा.

**महत्त्व :** साधारण २-३ गुण

प्रश्न क्रमांक २, ३, ६, १२

* रोज कोणते कपडे घालावेत हे खूप महत्त्वाचे नसून ते व्यवस्थित आहेत ना हे महत्त्वाचे आहे.
* मधल्या सुट्टीत काय खेळावे व कोणाबरोबर खेळावे याला आपण अवाजवी महत्त्व देणे गरजेचे नाही. कारण त्यातून आनंद मिळवणे हे महत्त्वाचे आहे.
* रोज डब्यात आवडते, चमचमीत असे असण्यापेक्षा सात्विक व स्वादिष्ट अन्न महत्त्वाचे आहे.
* कोणताही छंद जोपासताना आवड, वेळ व उपलब्ध असणारे साहित्य याचा विचार करावा लागतो. पण छंदातून मिळणारा आनंद महत्त्वाचा आहे.

म्हणजेच वरील प्रश्नांना आपल्या आयुष्यात खूप महत्त्वाचे स्थान देऊन त्यावर विचार करण्यात वेळ घालवण्यापेक्षा इतर महत्त्वाच्या गोष्टींकडे लक्ष द्यावे.

**महत्त्व :** साधारण ४-५ गुण

प्रश्न क्रमांक १, ५, ७, ८, ९, १०, ११, १३, १४

* तुम्ही किती वाजता झोपता, उठता, किती वेळ अभ्यास करता, कोणत्या पद्धती वापरता, दूरदर्शन, संगणक यांसाठी दिला जाणारा वेळ हे सर्व 'विद्यार्थी', म्हणून तुमच्या दिनक्रमासाठी महत्त्वाचे आहे. वेळेचे योग्य नियोजन केल्यास, अभ्यासाचे योग्य नियोजन करता येईल.
* तुम्ही कोणत्या अभ्यासाच्या पद्धती वापरता यावर तुमचा अभ्यास किती पक्का होतो, हे अवलंबून आहे.
* वाढदिवसाचे /बक्षिसाचे पैसे तसेच मे महिन्याच्या सुट्टीचे नीट नियोजन केले तर तुम्हास दीर्घकालीन उपयोगी गोष्टी शिकता येतील/करता येतील.

तुमची उत्तरे वरील गुणांशी सहमत होती का? जास्त महत्त्व असणाऱ्या प्रश्नांचे निर्णय घेताना जास्त विचार करावा लागतो का?

**निर्णय कोण घेते?**

या गुणांकनाबराबेरच पुढचा निर्णय कोण घेतं हा रकानाही तितकाच महत्त्वाचा आहे बरं ! तुमचे निर्णय कोण घेतं याची उत्तरे कदाचित प्रत्येकाची वेगवेगळी येतील, पण त्यावरून तुम्हाला खालील काही गोष्टी लक्षात येतील.

या प्रश्नाचे उत्तर देताना तुम्हाला लक्षात येईल की तुम्हाला निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य आहे का? निर्णय घेण्याची क्षमता तुम्ही वापरता का? तुमच्या विषयीचे निर्णय जास्त करून कोण घेते - तुम्ही का इतर?

जर निर्णय सर्व बाजूंनी - परिणामांचा विचार करून घेतला तर तुम्ही जास्त सक्षम व्हाल का? जरूर विचार करा. काही शंका असल्यास विचारा. 'विचारायचा' निर्णय मात्र पटकन घेऊन टाका बरं का!

**- मनीषा मिरजकर**
manishamirajkar@gmail.com

Good decisions come from experience,
and experience comes from bad decisions.

# छापा का काटा

वाच. अनघा लवळेकर

'हनुमान गल्लीविरुद्ध भवानी गल्लीची क्रिकेट मॅच चालू व्हायला काही क्षणांचा अवकाश आहे. हनुमान गल्लीचा कप्तान विश्वास आणि भवानी गल्लीचा कप्तान प्रमोद मैदानाच्या मध्यभागी उभे आहेत व आपापले मागणे नोंदवीत आहेत; कारण नाणेफेक करायची वेळ आलेली आहे. पंचांनी नाणे उंच फेकले आहे. तेवढ्यात प्रमोदने ते नाणे पडता पडता झेलले आहे. तो पंचांना निर्णय बदलण्याची परवानगी देण्याची विनंती करत आहे. विश्वासने त्याला आक्षेप घेतलेला दिसतो. पण प्रमोद हट्टाला पेटला आहे. प्रमोदचा निर्णय बदलण्याची, पंचांवर दबाव आणण्याची ही चौथी वेळ आहे...'



मित्र मैत्रिणींनो, हे धावतं समालोचन ऐकताना आपल्या मनात नक्कीच आलं असेल ना की प्रमोदचं हे वागणं चूक आहे, एकदा ठरवलेला 'छापा किंवा काट्याचा' निर्णय बदलायचाच नसतो. पण प्रमोद हे मुद्दाम करत नाही बरं का! त्याला नेहमीच कुठलीही गोष्ट मुळी ठरवणं जमतच नाही किंवा फार अवघड वाटतं. यदाकदाचित काही ठरवलंच, तर दुसऱ्याच क्षणी काहीतरी दुसरंच ठरवावंसं वाटतं. आपल्या निर्णयाबद्दल भरवसाच वाटत नाही आणि त्यामुळे 'सदैव भांबावलेला किंवा वेळकाढूपणा करणारा मित्र' अशी त्याची ख्याती आहे. हे फक्त मैदानावर नाही तर रोजच्या छोट्या छोट्या गोष्टींमध्येही जाणवतं. रोज उठल्यावर सकाळी आधी अभ्यास करावा की आवरावं, सायकलवरून जावं की चालत, कपडे कुठले घालावेत, मित्राला वाढदिवसाला शुभेच्छापत्र द्यावं की भेटवस्तू अशा असंख्य 'छापा-काट्यांनी' प्रमोदला बेजार करून सोडलेलं असतं. मग महत्त्वाचे निर्णय घेताना काय बिकट परिस्थिती असेल ना? प्रमोदला कुठलाही निर्णय घेताना एवढं भांबावलेपण का असतं?

ॲथलेटिक्समध्ये धावण्याच्या शर्यतींमध्ये एक अडथळ्याची शर्यत असते. सपाट मार्गावरून कुणीही न पडता धावेल पण त्याच मार्गावर जर अडथळे असतील तर? त्या अडथळ्यांना ओलांडल्याशिवाय शर्यत पूर्ण करता येणारच नाही.

निर्णयांच्या बाबतीतही तसंच आहे. ज्याला चांगल्या, सुयोग्य निर्णयाचं उद्दिष्ट गाठायचं असतं त्याला असेच काही महत्त्वाचे अडथळे

"It's not hard to make decisions
when you know what your values are."

पार करावे लागतात. जर ते पार करता आले नाहीत, तर धडपडायला होतं किंवा त्या भीतीनं जागच्या जागीच थबकायला होतं. निर्णय पुढे पुढे ढकलला जातो. कुठले असतात बरं हे अडथळे? पहिला महत्त्वाचा अडथळा म्हणजे **पुरेशा माहितीचा अभाव**. ज्या गोष्टीबद्दल आपल्याला काही ठरवायचं आहे, तिच्या काही तपशिलांची माहिती असणं, वेगवेगळ्या पैलूंची ओळख असणं निर्णय घ्यायला आपल्याला मदत करतं. समजा, मानसीला चित्रकलेच्या परीक्षा देण्याची इच्छा आहे, पण त्यासाठी काय अभ्यासक्रम आहे, परीक्षा कधी असते, तयारीला किती दिवस मिळतील, कुणाचं मार्गदर्शन मिळू शकेल का? अशा गोष्टींची माहिती मिळाल्याशिवाय तिला 'परीक्षेला बसायचं की नाही' हे ठरवणं अवघड आहे. जेव्हा ती याबद्दल काहीजणांशी बोलेल, चौकशी करेल तेव्हाच तिला नेमकं ठरवता येईल.

निर्णय घेताना जाणवणारा दुसरा महत्त्वाचा अडथळा म्हणजे **दोन मनांचं भांडण** – म्हणजेच द्विधा मन:स्थिती. 'उद्या घटक चाचणी आहे आणि घरी मामापण यायचा आहे. मामाला भेटायला थांबू की शाळेत जाऊ?' 'मला निळ्या रंगाचा पोशाखही आवडला आणि पिवळ्या नक्षीचाही. पैसे तर एकासाठी आहेत. काय करू?' 'शाळेत उशीर झाला म्हणून सर रागावणार आणि घरी परत गेलो तर आई कांडात काढेल याची खात्री आहे – कुठे जाऊ?' असे विचार तर आपल्या सगळ्यांच्याच मनात येत असतात. त्यात कधी दोन्ही-तिन्ही गोष्टी हव्याशा किंवा नकोशा वाटत असतात. अशावेळी मग खूप ओढाताण होते. कारण आधी काय महत्त्वाचं आणि नंतर काय कशाला प्राधान्य द्यायला पाहिजे हे समजत नाही. (आधी क्रिकेटची मॅच की आधी सबमिशन, आधी मित्रांबरोबर पार्टी की आधी काकांना दवाखान्यात भेटायला जाणं यात खाली काय ठेवायचं आणि वर काय आणायचं



तेही 'का' (त्यामागचं आपलं कारण) हे कळत नाही.) कारण त्यावर आपण पुरेसा खोलात, पद्धतशीर विचारच केलेला नसतो.

कधीकधी आपण निर्णय घेतो पण तो फसतो. कारण तो क्षणात काहीतरी **भावनेच्या भरात** घेतलेला असू शकतो. पुढचा मागचा विचार न करता सणकीपणातून घेतलेला असतो. कुठल्यातरी भलत्याच गोष्टीची जोड तिसऱ्या भलत्याच गोष्टीशी जोडून घेतलेला असतो. असे भावनिकतेतून घेतलेले निर्णय घातकही ठरू शकतात, किंवा कार्यवाही होण्याच्या दृष्टीनं अपुरे पडतात. उदाहरणार्थ नंदिताला शास्त्र शाखेची विशेष आवड नसतानाही मैत्रिणींच्या चिडवण्याला कंटाळून (९५% मार्क पडून भुक्कड कला शाखेला कसली जातेस?) तिनं शास्त्र शाखेला प्रवेश घेतला खरा; पण मग मन रमेना. पंच्याण्णव टक्क्यांचे साठ टक्के कसे झाले कळलंच नाही. वेळ वाया गेल्याचं दु:ख होतंच. तीच गोष्ट अरुणची. वडील कधीतरी अभ्यास न करण्यावरून रागावले म्हणून तो इतका चिडला की रात्री घरातून निघूनच गेला. तीन/चार दिवस

"The doors we open and close each day
decide the lives we live."

बाहेर भटकला. त्या वेळी चुकीची संगत लागली आणि अरुण व्यसनात अडकला.

थोडक्यात काय, निर्णय घेताना 'डोकं' शक्य तेवढं 'जागेवर' हवं! निर्णयाच्या परिणामांचा आणि दयायला लागणाऱ्या किमतीचा विचार केला नाही तर निर्णयाचा उपयोग प्रगतीसाठी होणार नाही. (नंदिनीला आपला निर्णय बदलण्याची, पुढचा निर्णय घेण्याची संधी तरी मिळेल; पण अरुणचं काय?)

अर्थात कुठलाही थोडा गुंतागुंतीचा निर्णय घेताना थोडा **धोका पत्करायची तयारी हवीच**. तशी नसणं हा त्यातला अजून एक अडथळा. 'ट्रेकला जायचं की नाही' हे ठरवता येत नाही कारण ट्रेकला गेल्यावर जे श्रम होतील, खाण्या-पिण्याचे नेहमीचे लाड होणार नाहीत, काही वेळा ठरल्याप्रमाणे सगळं होणार नाही; अशा धोक्यांना पत्करायची तयारी नसते. जितका निर्णय गुंतागुंतीचा तेवढे धोके जास्त! तेवढी स्वत:च्या क्षमता वाढवण्याचं आव्हान! हे आव्हानच नको म्हणजे 'आपली सुरक्षित चौकट' भली! असं करणारे लोक कधीच निर्णयाच्या बाबतीत स्वावलंबी होऊ शकत नाहीत. विद्युतप्रवाह (करंट) जोराचा असेल तर अवरोध (Resistance) सुद्धा तेवढाच असणार म्हणून कुणी विद्युतप्रवाहच नको, असं म्हणतं का? तेव्हा हा 'धोके टाळण्याचा' अडथळाही पार करता यायला हवा.

कुठलाही निर्णय घेतला म्हणजे ती प्रक्रिया पूर्ण झाली, असं होत नाही. तर प्रत्यक्ष तो **निर्णय अमलात आणण्याचाही** 'निर्णय' घ्यावा लागतो. म्हणजेच 'हातपाय हलवावे' लागतात. असं न करू शकणाऱ्या आळशी, स्थितिगत मंडळींना मग 'बोलबच्चन' म्हटलं जातं. अभ्यासाचं वेळापत्रक केलं, सहा तास अभ्यासाचा निर्णय केला पण पाळलाच नाही; मित्राला चुकीच्या गोष्टीबद्दल जाब विचारायचं ठरवलं पण पळपुटेपणा केला. किंवा 'दही खाऊ की मही खाऊ?'प्रमाणे कुठला निर्णय कधी अमलात आणायचा हेच कळलं नाही तरी त्या नुसत्या 'निर्णय जाहीर' करण्याला काही अर्थ नाही.

एकूणात चांगले 'निर्णयकर्ते' व्हायचं असेल तर काय काय असायला हवं?

सर्वप्रथम आपलं ज्ञान चहूअंगांनी वाढवायला हवं, बरेचसे निर्णय अपुऱ्या माहितीमुळे, अज्ञानामुळे फसताना दिसतात. त्यासाठी बारकाईनं निरीक्षण करणं, त्यांतून आवश्यक ते निष्कर्ष काढता येणं, निर्णयाच्या परिणामांची भली-बुरी बाजू तपासून पाहाता येणं अशा कितीतरी बौद्धिक कौशल्यांची आपण जाणीवपूर्वक जोपासना करू शकतो. पण आपल्याला माहीतच आहे की बुद्धी तरतरीत असूनही काही वेळा भावनांच्या दडपणामुळे, ताणामुळे, क्षणिक आवेगात गोष्टी ठरवल्या जातात आणि मग पस्तावायची पाळी येते; त्यामुळे एखादा निर्णय घेताना आपण भावनिकदृष्ट्या खूप जास्त उत्तेजित असू, हेलकावे खात असू तर निर्णय लांबवलेला बरा. 'डोकं थंड झाल्यावर' म्हणजेच भावनिक आंदोलने आटोक्यात आल्यावर निर्णय घेण्याचा विचार करावा.

आणि या सगळ्यांच्या शेवटी जो निर्णय घेतला तो अमलात आणण्यासाठी आळस झटकायला हवा. जुन्या पूर्वग्रहांना, अनुभवांना बाजूला सारून प्रत्यक्ष 'कार्यवाही' करायला हवी. नाहीतर - 'पहले आप-पहले आप' म्हणत राहिलं तर गाडी सुटून जायची आणि आपण मोकळ्या फलाटावर रिकाम्या हातांनी बसून राहायचो.

काय पटतंय ना? मग शुभस्य शीघ्रम!

**- वाच. अनघा लवळेकर**
प्रज्ञामानस संशोधिका, ५१४ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०
**चित्रकार - निखिल टकले**

"Yesterday is gone. Tomorrow has not yet come. We only have today. Let us begin."

# शिवछत्रपतींची अद्भुत निर्णयक्षमता

मोहन शेटे



चित्रकार : कै. प्रताप मुळीक

छत्रपती शिवराय !

हिंदुस्थानच्या पाच हजार वर्षांच्या इतिहास-प्रवाहावरील एक उत्तुंग दीपस्तंभ! अवघे पन्नास वर्षांचे आयुष्य लाभलेला हा महामानव! वयाच्या चौदाव्या वर्षी कामाला सुरुवात केली आणि चव्वेचाळीसाव्या वर्षी सोन्याच्या सिंहासनावर राज्याभिषिक्त छत्रपती झाले. इतक्या कमी काळात इतके उत्तुंग यश? या मध्ये महत्त्वाचा वाटा आहे त्यांच्या थक्क करणाऱ्या 'निर्णयक्षमतेचा'! मुळात निर्णयक्षमता म्हणजे तरी काय? तर आपल्या समोर कोणत्या समस्या आहेत, त्यावर मात करण्यासाठी कोणकोणते पर्याय आहेत, त्यापैकी योग्य पर्याय निवडणे व सर्व ताकद एकवटून यश खेचून आणणे. मात्र, या साठी अनेक गोष्टींचे भान ठेवावे लागते. निर्णय नुसता बरोबर असून चालत नाही तर तो अचूक वेळी (टायमिंग) घ्यावा लागतो. शिवाय स्वत:च्या आणि शत्रूच्या क्षमता आणि कमतरतांचा (प्लस व मायनस पॉइंट्स) अभ्यास, साधनांची उपलब्धता, स्वत:च्या निर्णयावर ठाम राहाणे व यशस्वी होण्यासाठी सहकाऱ्यांमध्ये संघटित प्रयत्नांसाठी उत्तुंग ध्येयवाद निर्माण करणे ! यामुळेच आपण घेतलेला निर्णय योग्य होता हे सिद्ध करता येते.

आता आपण शिवरायांच्या जीवनातील काही घटना, त्यावेळी त्यांनी घेतलेला निर्णय आणि त्या मागचे त्यांचे चिंतन या तीन विभागात त्यांच्या निर्णयक्षमतेचे विश्लेषण करूया.

'पन्हाळ्याच्या वेढ्यातून सुटका' हे शिवचरित्रातील एक रोमहर्षक प्रकरण म्हणून आपल्याला माहीत आहे. त्यातील शिवरायांची निर्णयशक्ती दाखवणारी ही काही उदाहरणे बघून इतर घटनांकडे वळूयात.

**पन्हाळ्याची निवड**

आदिलशहाने कर्नुलचा सुभेदार सिद्दीजौहर याला तातडीने शिवाजीराजांवर पाठवले. तसेच मोगल बादशहालाही एखादा सरदार शिवाजी राजांविरुद्ध पाठवण्याची विनंती केली. त्याप्रमाणे दक्षिणेकडून सिद्धी आणि उत्तरेकडून शाहिस्तेखान अशा कात्रीत स्वराज्य सापडले. अशावेळी शिवाजी राजे पन्हाळगडावर गेले आणि सिद्दीच्या वेढ्यात स्वत:ला अडकवून घेतले. असा निर्णय त्यांनी का घेतला?

राजे समजा राजगडकडे गेले असते तर सिद्दी त्याच दिशेने येणार आणि येताना नवीनच स्वराज्यात आलेला कोल्हापूर ते राजगड हा मुलुख बेचिराख करणार. त्यामुळे तेथील प्रजेवर अन्याय होणार. 'संकट माझ्या अंगावर आले तरी चालेल पण माझ्या मागे माझी प्रजा, माझी रयत सुरक्षित असली पाहिजे,' असा विचार करून राजांनी पन्हाळ्यावर राहून शत्रू अंगावर ओढवून घेतला.

"Your life changes, the moment you make a new, congruent, and committed decision."



दुसरे कारण म्हणजे पूर्वी शहाजीराजांनी स्वतंत्र होण्याचा प्रयत्न केला तेव्हा अदिलशहा व मोगलांनी एकत्र येऊन त्यांच्यावर आक्रमण केले होते. राजांना हा इतिहास ज्ञात होता. जर आपण राजगडाकडे गेलो तर सिद्दी आणि शाहिस्तेखान एकत्र येतील आणि युद्धात एक अधिक एक बेरीज दोन नाही तर तीन होते. हा तिसरा आकडा दोघे एकत्र आल्यामुळे त्यांच्या वाढलेल्या मनोधैर्याचा असतो. पण राजे पन्हाळ्याला राहिल्याने त्या दोन सैन्यांचे एकत्र येणे त्यांना टाळता आले.

**पावसाळ्यात पलायनाचा निर्णय**

राजे पन्हाळ्याच्या वेढ्यात अडकले तेव्हा दोन गोष्टींकडे ते आशेने पाहात होते. एक सेनापती नेताजी पालकर व दुसरा सह्याद्रीचा पावसाळा. पण राजांचे दोन्ही अंदाज चुकले. सिद्दीने नेताजींचा पराभव केला व पावसाळ्यातही वेढा विस्कळीत होऊ नये म्हणून त्याने पुरेपूर काळजी घेतली. पण अंदाज चुकले तरी राजे निराश झाले नाहीत. त्यांनी प्रचंड पाऊस कोसळत असताना पलायन केले. जर राजांनी हा निर्णय घ्यायला उशीर केला असता आणि पावसाळा निघून गेला असता तर सिद्दीने आपला वेढा पूर्वीपेक्षा अनेक पटींनी आवळून धरला असता. मग तेथून पळून जाणे अशक्य झाले असते. राजांनी पळून जाण्याची अचूक वेळ साधली हे मान्य करावे लागते.

**घोडखिंडीत शत्रूला रोखले**

राजांनी पन्हाळा सोडला. मात्र त्याची चाहूल सिद्दीला लागताच त्याने महाराजांचा पाठलाग सुरू केला. इथे लक्षात येते की सर्व सैन्य घेऊन जर राजे विशाळगडच्या दिशेने गेले असते तर तेथील सपाटीवर राजांसकट सारे सैन्य शत्रूच्या कचाट्यात सापडले असते. राजांनी घोडखिंडीत बाजीप्रभूंना थांबवण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे शत्रूसैन्य खिंडीतच थोपवता आले व राजे विशाळगडाकडे जाऊ शकले. वास्तविक हा सारा प्रदेश स्वराज्यात येऊन फारच थोडे दिवस झाले होते. तरी घोडखिंड हेच अडवणुकीसाठी योग्य स्थान आहे, हे राजांनी अचूक हेरले; तेही पावसाळ्यात. हेच राजांचे सेनापतीत्वाचे वैशिष्ट्य !

**इंग्रजांचा सूड उगवला**

राजांनी इंग्रजांशी करार करून व्यापरी सवलती दिल्या होत्या. पण राजे पन्हाळ्याच्या वेढ्यात अडकल्यावर आता 'शिवाजी संपला' असा विचार

"Everything that happens to us individually and collectively occurs because of either our decisions or a decision made by others for us."

करून इंग्रजांनी आपल्या लांबपल्ल्यांच्या दोन तोफा अदिलशाही सैन्यात पाठवल्या. शिवाय आपली निशाणे फडकवत तोफांचा मारा केला व आपल्या कृतघ्नतेचे दर्शन घडवले. राजांचा भयंकर संताप झाला; पण त्या वेळेस त्यांनी अपमान गिळला. मात्र वेढ्यातून सुटल्यावर योग्य वेळ येताच इंग्रजांवर हल्ला केला. त्यांच्या वखारी खणून काढल्या व इंग्रज कैद्यांना अंधारकोठडीची शिक्षा ठोठावली. म्हणजे गुन्हेगाराला माफ करायचे नाही; पण योग्य वेळेची / संधीची वाट पाहायची आणि हल्लाबोल करायचा. शत्रूचे आव्हान संपुष्टात आणायचे, ही वृत्ती दिसते.

पन्हाळ्यावरून पळाल्यावर आता शास्ताखान या मोगल सरदाराशी संघर्ष करावा लागणार हे राजांनी ओळखले होते. एकाचवेळी दोन शत्रू अंगावर घेणे बरोबर नाही. हे ओळखून राजांनी पन्हाळा अदिलशहाला देऊन जणू मैत्रीचा हात पुढे केला. दुर्बळ झालेल्या अदिलशहानेही पन्हाळा घेऊन शांत राहाणे पसंत केले आणि राजांच्या चातुर्याने एक संकट शांत झाले.

***

**रणांगण म्हणून प्रतापगडाची निवड**

अफजलखान आला तेव्हा राजगड, पुरंदर, सिंहगड असे प्रतापगडाच्या तुलनेत जास्त उत्तुंग व बळकट किल्ले राजांकडे होते. पण ते स्वराज्याच्या गाभ्यात होते व दुसरे महत्त्वाचे की त्यांच्या पायथ्यापर्यंत जाणे सहज शक्य होते. या उलट प्रतापगड हा सरहद्दीवर होता व त्याच्या पायथ्यापर्यंत जाण्यासाठी महाबळेश्वरचे पठार ओलांडून, रडतोंडीच्या घाटाने जावळीत उतरणे भाग होते. म्हणून राजांनी प्रतापगडाची निवड केली. उपलब्ध पर्यायांपैकी त्यातल्या त्यात सर्वात उत्तम असणारा पर्याय निवडण्याची राजांची वृत्ती दिसून येते.

अफजलखान आक्रमणाच्या वेळी सारा समाज धास्तावलेला होता. अशा वेळी राजांनी प्रत्यक्ष भवानीचा आपल्याला दृष्टांत झाला, असे सांगितले. इथे राजांनी आपल्या लोकांच्या श्रद्धेचा उपयोग प्रजेचे मनोधैर्य वाढवण्यासाठी केला.

**शाहिस्तेखानावर छापा टाकायला स्वत: जाणे**

शाहिस्तेखानावर हल्ला करण्याची योजना अत्यंत धोकादायक होती. या मोहिमेवर इतर कोणाला पाठवणे शक्य होते. पण राजे स्वत: गेले. यामध्ये त्यांचा जबरदस्त आत्मविश्वास दिसून येतो तसेच 'मृत्यूला न घाबरण्याचा संस्कार' इतरांवर करण्याची त्यांची क्षमता दिसून येते. हीच गोष्ट अफजलखानाच्या बाबतीतही. अफजलखानाला त्यांनी स्वत: ठार केले म्हणून बाजीप्रभू, तानाजी, मुरारजबाजी प्राणांची पर्वा न करता लढले होते.

**शाहिस्तेखानवरील हल्ल्याचा दिवस निवडणे**

राजांनी लाल महालावर छापा टाकला तो दिवस निवडताना त्यांनी रमजानचा महिना निवडला. मुघल सैन्याचे रोजे चालू होते. अशा वेळी रात्री त्यांना गाढ झोप लागली असेल आणि आपल्याला आपले काम साधता येईल याची महाराजांना खात्री होती. शत्रूंच्या सणाचा देखील त्यांनी स्वराज्यासाठी उपयोग करून घेतला.

**उंबरखिंड–भूगोलाचा सुयोग्य वापर**

कारतलबखान कोकण जिंकायला निघाला होता. कोकणात शत्रू शिरला तर स्वराज्याला पाठीमागून धोका निर्माण झाला असता. पुणे ते लोणावळा व पुढे कोकण या शत्रूच्या मार्गावरील सपाट प्रदेशात त्यांचा पराभव करणे अवघड होते. पण सह्याद्रीतील घाटातून कोकणात उतरताना त्याला पराभूत करणे शक्य होते. खानाने उंबरखिंडीची निवड केली. तिच्या भौगोलिक आकाराचा नेमका वापर करून राजांनी शत्रूची कोंडी केली आणि तीन हजार मावळ्यांकडून तीस हजार शत्रूंचा पराभव केला.

सेनापतीला निर्णय घेताना भूगोलाचे ज्ञान किती आवश्यक असते ते या घटनांवरून दिसते.

**राजांचा दक्षिण दिग्विजय**

राज्याभिषेकानंतर राजे दक्षिणेत गेले. तामिळनाडूतला जिंजीचा किल्ला त्यांनी घेतला. कारण राजांना हे माहीत होते की एक ना एक दिवस




विश्वसनीय नात्यातून ग्राहकांच्या जीवनात आर्थिक समृध्दी फुलविणारी बँक.

कॉस्मो
555-II
ठेव योजना

मुदत : ५५५ दिवस

ज्येष्ठ नागरिकांसाठी
९.५०%*
एकत्रित परतावा : १०.१३%*

सर्वसाधारण / संस्थांसाठी
९.२५%*
एकत्रित परतावा : ९.८४%*

योजना मर्यादित कालावधीसाठी

सर्व सभासद, ठेवीदार व खातेदारांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

Estd. 1906

कॉसमॉस बँक
दि कॉसमॉस को-ऑप बँक लि. (मल्टिस्टेट शेड्यूल्ड बँक)

मुख्य कार्यालय : कॉसमॉस हाईट्स, २६९ / २७०, शनिवार पेठ, पुणे – ३०. फोन : २४४०९१००
www.cosmosbank.com I customercare@cosmosbank.in

**भारतातील आश्चर्ये :** मीनाक्षी मंदिर – मदुराई
२००० वर्षापूर्वीचे, द्रविड शैलीचा अप्रतिम नमुना.

उत्तरेतील औरंगजेब दक्षिणेत उतरेल व ती लढाई निर्णायक असेल. अशा वेळी दक्षिणेत तामिळनाडूपर्यंत राजांनी स्वराज्य विस्तारले. पुढे औरंगजेबाच्या आक्रमणकाळात छत्रपती राजाराम महाराज आठ वर्षे जिंजीच्या आश्रयाला राहिले. यावरून राजांची दूरदृष्टी दिसून येते.

**साजरा-गोजरा किल्ल्यांची निर्मिती**

राजांनी दक्षिण भारतात वेल्लोर हा किल्ला जिंकण्याचा प्रयत्न केला. पण यश आले नाही. मग त्यांनी काय करावे? शेजारील डोंगरावर साजरा व गोजरा नावाचे दोन किल्ले बांधले.

असेच आणखी एक उदाहरण म्हणजे पश्चिम समुद्रातला जंजिरा किल्ला राजांना जिंकता आला नाही. म्हणून त्यांनी कुरटं बेटावर सिंधुदुर्ग हा किल्ला बांधला आणि समुद्रावर सत्ता प्रस्थापित करण्याचे स्वप्न साकार केले.

**पुरंदरचा तह**

राजांवर आलेल्या संकटांपैकी मिर्झाराजे जयसिंगाचे आक्रमण भयंकर होते. ज्या प्रजेचे रक्षक म्हणून राज्यकारभाराची सूत्रे हातात घेतली, ती रयत संकटग्रस्त झाल्याचे पाहून राजांचे मन हेलावले. अखेर त्यांनी माघार घेऊन तह करण्याचा निर्णय घेतला.

हा तह अपमानास्पद होता. आयुष्यभर जपलेलं स्वप्न उधळलं गेल्याचं दु:ख होतं. आपल्याच लोकांमध्ये आपला प्रयोग चेष्टेचा विषय बनेल अशी शक्यताही होती. अशा वेळी, 'उद्ध्वस्त झालो तरी बेहत्तर ! पण माघार घेणार नाही' अशा पद्धतीचा निर्णय त्यांनी घेतला नाही.

त्यांच्या या निर्णयात, पराभवातही एखादा महामानव कसे धीरोदत्त वर्तन करतो याचे उत्कट दर्शन घडते.

**कान्होजींना आलेले अदिलशाही पत्र :**

अफजल आक्रमणाबरोबर बारा मावळातल्या देशमुखांना विजापूरची पत्रे आली होती. त्यात आपल्याला येऊन मिळावे याबद्दलचे आमिष आणि नाही तर धमकी हे दोन्ही होते. ते पत्र घेऊन कान्होजी जेधे राजगडावर राजांसमोर हजर झाले. आता राजे काय उत्तर देतात हे पाहाणे उत्सुकतेचे होते.

राजांनी कान्होजींसमोर हात जोडून स्वराज्यात थांबण्याची विनंती केली नाही. उलट, 'जर तुम्हाला खानाकडे जायचे असेल तर जाऊ शकता' असे सुनावले. समोरच्या माणसाची निष्ठा किती पक्की आहे याची परीक्षा घ्यायची महाराजांची वृत्ती दिसून येते. मात्र, एकदा परीक्षेत खरे उतरल्यावर राजांनी लगेच कान्होजींना त्यांचा कुटुंब कबिला वाईहून तळेगाव ढमढेऱ्याला आणायला सांगितला सहकाऱ्यांच्या घरच्यांची कशी काळजी घ्यायला पाहिजे. याचाही जणू वस्तुपाठ घालून दिला.

या आणि अशा अनेक घटनांमधून राजांचे निर्णय कौशल्य दिसते. काही निर्णय हे रणांगणावरील सेनापती म्हणून तर काही प्रजाहितदक्ष राज्यकर्ता म्हणून अभ्यासण्यासारखे आहेत. काही निर्णय अचानक संकट आल्यावर घेतलेले तर काही प्रदीर्घ चिंतनातून आलेले. मात्र, यातला सर्वात महत्त्वाचा निर्णय 'बालवयामध्ये त्यांनी केलेल्या स्वराज्य स्थापनेच्या निश्चयाचा' होता. एकदा 'काय करायचं' नक्की झालं की 'कसं करायचं' याचा विचार सुरू होतो. ध्येय नक्की झालं की वाटा ठरवता येतात. साध्याच्या निश्चितीनंतर साधनांची जुळवाजुळव करता येते.

स्वराज्य स्थापनेचे इप्सित गाठण्यासाठी राजांनी आपले सर्वस्व पणाला लावले. त्यांच्या प्रखर ध्येयवादामुळेच निर्णय घेताना संभ्रमित अवस्था निर्माण झाली नाही. आणि म्हणूनच शून्यातून ब्रह्मांड साकार करण्याचा चमत्कार ते करू शकले.

म्हणून तर समर्थ शिवस्तुती गाताना म्हणतात,

*निश्चयाचा महामेरू । बहुत जनांसी आधारू ।*
*अखंड स्थितीचा निर्धारू । श्रीमंत योगी ।।*

**- मोहन शेटे**
४७६, नारायण पेठ, लोखंडे तालमीजवळ, पुणे 411030
mohanshete.itihaspremi@gmail.com

**चित्रकार : ओंकार इनामदार**

"Nothing is more difficult, and therefore more precious, than to be able to decide."

SuAn

SuAn digital images pvt. ltd.

2, Vinay Apartment, Behind SBI-Karve Road Br., Erandwana,
Pune 411004. Telefax.: 020 25454443,
email.: suan.digital.images@gmail.com

• Flex Printing • Signages • Large Format Inkjet Printing
• Designing & Print Production • Lamination & Mounting
• Exhibition Design-Concept to Completion

Happy Diwali !

With Best compliments from

AMG CORPORATION

Office No. 33, Tapaswi Plaza
Opp. Greaves Ltd. Chinchwad, Pune-19

पाहा : http://topdocumentaryfilms.com
जगभरातील सर्वोत्कृष्ट डॉक्युमेंटरीज

२० वर्षांची वाटचाल

# निर्णयाचा क्षण



हृषिकेश रानडे

**'अपयश ही यशाची पहिली पायरी आहे,' हे सुभाषितवजा वाक्य आपण किती सहजपणे वापरतो! पण अपयशानंतर मिळालेले यश या दोन्हींमध्ये असतो हातापाय न गाळता, कांगावा न करता पुन्हा प्रयत्न करण्याच्या निर्धाराचा-निर्णयाचा क्षण, कठोर आत्मपरीक्षण, अथक परिश्रम असं बरंच काही! आजच्या तरुण पिढीतील एक प्रथितयश गायक हृषिकेश रानडे यांच्या यशामागचा असाच निर्णयाचा एक क्षण आपण त्याच्याच शब्दांत अनुभवूया !**

वर्ष २०००. कॉलेजमधले फुलपंखी दिवस. एकीकडे डोळ्यांत नवनवीन स्वप्नं न मावणारे आणि स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी लागणाऱ्या कष्टांपासून कोसो दूर असण्याचे ते दिवस. त्यातच भर म्हणून त्यावेळी मी नुकताच झी मराठीवरील मराठी सारेगम जिंकलो होतो; हवेतच उडू पाहात होतो जणू मी ! आता आपण 'गायक' झालोच आहोत. आता आपल्याला अडवू पाहणारं/रोखू शकणारं जगात काही असूच शकत नाही, असंच वाटत होतं. आणि या (फाजील) आत्मविश्वासाच्या बळावर अति उत्साहात मी हिंदी सारेगमच्या audition साठी उतरलो. पण निकाल वेगळाच लागला. त्यामधली पात्रता फेरीही मी गाठू शकलो नव्हतो. उलट गाण्यातली 'मॅच्युरिटी कमी' आहे, असंही परीक्षकांचं मत होतं माझ्या गाण्याविषयी. हा माझ्यासाठी जबर धक्का होता. मी धाडकन् जमिनीवर कोसळलो. प्रचंड संतापही आला! माझा तर आलाच पण परीक्षकांचाही. पार्सिलिटी / favour असेही वेडेवाकडे विचार येऊन गेले मनात.

पुढच्या वर्षी परत 'सारेगम'ची audition द्यायचा निर्णय पक्का केला आणि थोड्याच अवधीत शांत झालो. माझ्या घरच्यांनी, मित्रमैत्रिणींनीही मला समजून तर घेतलंच, समजावलंही. त्याच अस्वस्थतेत परत audition देईपर्यंतचे दिवस अर्थातच 'छान' नव्हते. ते दिवस होते कठोर परिश्रमाचे, मनापासून केलेल्या अथक रियाजाचे, प्रामाणिक आत्मपरीक्षणाचे, तावून-सुलाखून सूर लावण्याचे, स्वत:तल्या स्वत्वाला अधिक गहिरं करण्याचे, झालेल्या अपमानाला तोंड देऊन ताठ मानेने परत त्याच मंचावर दिमाखदार प्रवेश करण्यासाठी झगडण्याचे !!

वर्ष २००१. हिंदी सारेगमपची audition. वर्षभरापूर्वीचा मी आणि आत्ताचा मी... किती फरक होता माझ्याच दोन रूपांत ! परत एकदा मी या audition ला आत्मविश्वासाने सामोरा जात होतो...

२००४ मध्ये जेव्हा मी हिंदी सारेगमप स्पर्धा त्यातल्या सगळ्या फेऱ्या जिंकत, अव्वल दर्जा राखत जिंकली; तेव्हाही मला एवढा आनंद झाला नाही जेव्हा हिंदीची audition मी २००१ मध्ये जिंकलो.

मित्रांनो, आज जेव्हा मी एक गायक म्हणून तुमच्यासमोर उभा राहतो, तेव्हा साधारण तुमच्या एवढा असतानाचा हा प्रसंग मला आठवतो.

एकदा पराभूत झाल्यावर नव्या उमेदीने, नव्या जिद्दीने परत त्या मंचावर उभे राहण्याचा निर्णय मी त्यावेळी घरच्यांच्या मदतीने घेऊ शकलो, हे माझं सुदैवच समजतो. तेव्हा जर डोक्यात भलत्या-सलत्या कल्पना घेऊन बसलो असतो तर आज कदाचित वेगळं चित्र असतं. तेव्हा मी असा निर्णय घेतला म्हणूनच या क्षेत्रात पाय रोवून मी उभा राहू शकलो. अजून मेहनत, अजून रियाज, अजून कष्ट घेत, स्वत:ला घडवत राहू शकलो. स्वत:च्या तयारीचा अंदाज घेऊन, स्वत:तल्या कमतरतांवर, त्रुटींवर मात करत स्वत:तल्या कलाकाराला फुलवू शकलो, प्रगल्भ करू शकलो !

**हृषिकेश रानडे**
सूरमयी, १५/२/१ ए, आनंदनगर, सिंहगड रस्ता, पुणे - ५१
**शब्दांकन : जयश्री काटीकर**

Whenever you see a successful business, someone once made a courageous decision.

To accomplish great things,
we must dream as well as act.

*With Best compliments from...*

**VINAYAK PETRPPOLY INDUSTRIES**

# 2, Vighnahar Chambers, Opp. Telephone Exchange,
Karve Road, Erandawane, Pune - 411 004

**Mobile** : 9822192885
**Phone** : 020-25459218, 32922958, 25389179, 30220916
**Telefax** : 020-25459218
**E-mail** : vinaykpolymerrindustries@yahoo.com

— with best compliments from —

LATA INDUSTRIES.

D-17, GOKULSHIRGAON,
MIDC, KOLHAPUR - 416234

MFG's of automobile components and machine tools. All type of bar turning job works. Spare capacity on CNG SLIDING HEAD & CNC TRAUB.

**Avinash Musale 9850079738**
**Akshay Musale 9011043499**

The true success
of every human being
lies in hard work

**Happy Diwali !**

**gb rubber products**

S-157, M.I.D.C., Bhosari, Pune - 411 026.
Ph - 9120-56113401-5, 27120323,
271-203666, Fax - 91-20-56113408
E-mail- gbrubber@vsnl.net.in
www.gbrubberproducts.com

पाहा : http:www.sudarshankhanna.com
सुदर्शन खन्ना या माणसाने बनवलेली भन्नाट खेळणी !

२० वर्षांची वाटचाल

# निर्णयाचा क्षण



उमेश झिरपे

**दि. १९ मे २०१२ पुण्यातील गिरिप्रेमी संस्थेच्या सदस्यांनी एव्हरेस्ट शिखर पादाक्रांत केले. मोहिमेच्या यशोगाथा ऐकताना प्रत्येक मराठी माणसाचा ऊर भरून आला. या मोहिमेचं नेतृत्व होतं श्री उमेश झिरपे यांच्याकडे! पावलापावलावर उभ्या असलेल्या आव्हानांवर मात करून नेतृत्वाची जबाबदारी पार पाडताना जोखमीचे निर्णय घेण्याचे क्षण येतात. ते घेताना मन शांत, खंबीर ठेवावं लागतं. स्वतःच्या जबाबदारीवर आयत्यावेळी निर्णय घेताना अवघ्या टीमचं भलं-बुरं पाहाण्याची जबाबदारी असते. मोहिमेची निश्चित वेळ ठरवताना मोहिमेचा नेता म्हणून श्री. उमेश झिरपे यांना कोणता विचार करावा लागला याची ही कथा !**

एव्हरेस्ट मोहिमेचे आव्हान खरोखरच माझ्या आयुष्यातील सर्वात मोठे आव्हान होते. मोहिमेचा नेता या नात्याने खूप मोठी जबाबदारी गिरिप्रेमी संस्थेने माझ्यावर सोपवली होती.

निर्णय घेताना आपण उपलब्ध पर्यायांचा, साधनांचा विचार करून पूर्व आणि पूर्ण तयारीनिशी निर्णय घेत असतो. पण काही वेळा परिस्थितीच अशी येऊन ठाकते की निर्णयासाठी तुमच्या 'आतल्या आवाजाकडे' लक्ष देणे सगळ्यात महत्त्वाचे ठरते! बरं नुसता तो आवाज ऐकून चालत नाही तर त्या आवाजाला १०० वेळा टक्कर देऊन तो खरा आहे ना याचीही सतत चाचपणी करावी लागते. कारण त्या एका निर्णयावर तुमच्यासकट तुमच्या अख्ख्या टीमचं भलं-बुरं अवलंबून असतं.

दोन अडीच वर्षांच्या अथक परिश्रमातून एव्हरेस्टची मोहीम उभी राहिली. आता मोहिमेचे शेवटचे चढाईचे काही मोजकेच दिवस शिल्लक राहिले होते. मोहीम शेवटच्या टप्प्यात आली. दरम्यान अनेक आव्हाने पार करत, कसोटीच्या क्षणांना खरे उतरत आमची आगेकूच चालू होती. अत्यंत खराब हवामानामुळे अंतिम शिखर चढाईसाठी आवश्यक असणारी 'वेदर विंडो' मिळवून म्हणजेच वादळी वाऱ्याचा वेग हा कमीत कमी होऊन ती संधी साधून शिखर सर करणे (त्यासाठी चढाई करणे) गरजेचे होते. आम्हाला भारतीय हवामान खात्याकडून (IMD, New Delhi) रोज हवामानाचे अंदाज इंटरनेटवर मिळत होते. पण ते केवळ एका दिवसाचे होते. चढाईसाठी किमान ४-५ दिवसांचा अचूक अंदाज आवश्यक होता. वातावरणातील अनिश्चिततेमुळे पुढेतर अजिबातच सरकता येत नव्हते. त्यामुळे बेस कॅम्पवरही खूपच तणावाचं वातावरण होतं.

२५ मे नंतर हवामान खूपच खराब होणार होते. त्या आधीच एव्हरेस्टची मोहीम संपवावी लागणार होती. १३ मे उजाडला तरीसुद्धा काहीच अंदाज येत नव्हता. मीही अस्वस्थ झालो. इतक्या दिवसांचे कष्ट, अनेकांचे मदतीचे हात या सगळ्या गोष्टी डोळ्यांसमोर येऊ लागल्या. हातातोंडाशी आलेला घास जातो की काय अशा परिस्थितीने क्षणभर हबकून गेलो. पण स्वत:ला सावरले. माझ्याबरोबर इतर गटबंधूंचे मनोधैर्य टिकवून ठेवणे गरजेचे होते. पुण्यातल्या टीमशी सतत संपर्क सुरू होता. त्यातूनच पुण्याच्या हवामान खात्याच्या सौ. मेधाताई खोले यांच्याशी संपर्क साधला. पुढच्या ४-५ दिवसांचा अचूक अंदाज त्वरित देण्याची त्यांना विनंती केली. या संपूर्ण मोहिमेचे यश हे त्यांच्याकडून मिळणाऱ्या हवामानाच्या अंदाजावर अवलंबून असल्याचे मी त्यांना सांगितले. या परिस्थितीचे गांभीर्य ओळखून त्यांनी तातडीने पावले





**पाहा :** http://wwwindiasurabhi.com
टी. व्ही. वर गाजलेल्या सुरभी मालिका व त्यासंबंधातले काम

उचलली. दिल्लीतील कार्यालयाशी संपर्क करून, पूर्ण अभ्यास करून आम्हाला दुसऱ्या दिवशी म्हणजे १४ मे रोजी पुढील सहा दिवसांच्या हवामानाच्या अंदाजाचे वेळापत्रक पाठविले.

त्याचा सखोल अभ्यास करून १६ मे रोजी अंतिम चढाईसाठी निघायचे असा निर्णय मी घेतला. आमच्या टीमचे शेर्पा प्रमुख कामे शेर्पा यांना मात्र माझा निर्णय योग्य वाटला नाही. कारण या मंडळींचा त्या वेळी अमेरिकन व स्विस हवामान अंदाजावर विश्वास होता. त्याने मला असे सांगितले की ‘मामाजी आप क्यों आपके मेंबर और शेर्पामेंबर के जान की रिस्क ले रहे हो। हमारी राय से १८ मे अंतिम चढाई के लिए उचित है।’ आता काय करावं?

वादळी वारे, चारी बाजूंनी गोठवणारी थंडी, मोहिमेच्या यशस्वीतेसाठी धडपड, माझे गटबंधू आणि अख्ख्या भारतातून या मोहिमेकडे डोळे लावून बसलेले तुम्ही सारे जण! प्रसंग बाका होता. निर्णय तर घ्यायलाच हवा होता.

शेवटची संधी (१८ मे ची) हातात ठेवून आधीची एक संधी मला घ्यायचीच होती. म्हणजे १६ तारखेला हवामान खराब झाले तरी अंतिम चढाईसाठी १८ तारखेची संधीही मिळू शकली असती. दुसरं म्हणजे एकंदर परिस्थिती पाहता अमेरिकन किंवा स्विस हवामान अंदाज हे खात्रीशीर मार्गाने, थेट आपल्यापर्यंत पोचत नसत. कोणाकोणाच्या मार्फतच ते जाणून घ्यावे लागे. त्यातील राजकारण, जोखीम/धोका लक्षात घेता आणि आपल्या भारतीय हवामान खात्याकडून खात्रीशीरपणे मिळालेल्या अंदाजावरच पुढे जायचे मी ठरवले. गटबंधूंचे मनोधैर्य वाढवून, शेर्पांना विश्वासात घेऊन १६ मे हीच तारीख चढाईसाठी नक्की केली.

एक वेगळे चैतन्य पसरले व १६ मे रोजी पहाटे ३.०० वाजता आमच्या संघाने ‘एव्हरेस्ट’च्या चढाईसाठी सुरुवात केली. नंतरचा इतिहास सर्वांनाच माहीत आहे. १९ मे २०१२ रोजी भारतीय गिर्यारोहणाच्या इतिहासात एक सुवर्ण पान लिहिले गेले. ‘गिरिप्रेमी’चे ८ गिर्यारोहक या उत्तुंग पर्वतावर म्हणजे ‘माऊंट एव्हरेस्ट’ उर्फ ‘चामोल्गुंमा’ अथवा ‘सागरमाथा’ वर पोचले. शिखर सर केले. भारताचा तिरंगा व महाराष्ट्राचा भगवा ध्वज त्यांनी तिथे फडकविला. आमच्या आनंदाला पारावार राहिला नाही. योग्य वेळी योग्य निर्णय घेतल्याचे समाधानही मला मिळाले.

**– उमेश झिरपे**
१२०७/बी, आपटे रस्ता,
अस्मिता सोसायटी, पुणे – ४
umeshzirpe@yahoo.co.in

---

# निर्णयाचा क्षण

**मुक्ता पुणतांबेकर**



आमच्या घरचं वातावरण इतकं मोकळं आहे की, कुठलाही निर्णय घ्यायला, तो घरी सांगायला आम्हाला कधी भीती, संकोच वाटला नाही. उलट मनात आलं की आम्ही निर्णय घेऊन टाकत असू. एक गंमत सांगते. मी आठवीत असताना मला गणित विषयाची खूप भीती वाटायला लागली. नकोच ते गणित वाटायला

*If you think you can win,*
*you can win.*
*Faith is necessary to victory.*

May this Diwali offers you a happy and safe life!

**Bestways Transport (I)**

*Happy Diwali !*

# PRABODHAN



**Avoid Electricity Board penal charges for low power factor by installing PRABODHAN make L.T. shunt capacitor.**

**PRABODHAN capacitors are available in three designs: MPP, MD, ALLPP- Impregnated with N-PCB oil.**

**PRABODHAN capacitors are tested and approved by CPRI, ERDA, Tariff advisory Committee and Electricity Boards - all over India.**

Seva Engineering Works Pvt. Ltd.

**Post Box No. 822, Deccan Gymkhana, Pune - 411 004.**
**Tel : 020-24450363, 25531347 Telefax : 020 - 24455344**

**भारतातील आश्चर्ये :** लाल किल्ला – दिल्ली. शाहजहानने बांधलेला मुघल शैलीतील १७ व्या शतकातला अप्रतिम किल्ला

**पुण्यातील 'मुक्तांगण' हे व्यसनमुक्तीकेंद्र हजारो व्यसनग्रस्तांशी, त्यांच्या कुटुंबियांसाठी आज आशास्थान ठरलं आहे. त्याच्या उभारणीमध्ये डॉ. अनिल अवचट व कै. डॉ. सुनंदा अवचट यांचं अमूल्य योगदान आहे. त्यांची कन्या मुक्ता पुणतांबेकर; आज तेच कार्य मोठ्या जोमाने पुढे चालवते आहे.**

**शालान्त परीक्षेत उत्तम यश मिळवल्या-नंतरही आपल्या आवडीची कलाशाखा अभ्यासासाठी निवडणं ते पुढे 'मुक्तांगण'च्या कामात झोकून देणं हा निर्णय सर्वस्वी तिचा स्वतःचा होता. तो घेण्याची प्रक्रिया कशी घडली, याची ही थोडक्यात ओळख !**

लागलं आणि मग नकोच ती शाळा असंही वाटायला लागलं. मी लगेच घरी माझा निर्णय जाहीर करून टाकला– 'उद्यापासून मी शाळेत जाणार नाही. मला शाळा सोडून द्यायची आहे.' आई–बाबा 'ठीक आहे' म्हणाले. मग २–४ दिवस मी बाबाबरोबर इकडं तिकडं हिंडले. पाचव्या दिवशी म्हणाले, 'मी शाळेत जाते !' यावेळीही उत्तर 'ठीक' असंच होतं! निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य आणि त्याचे परिणाम स्वीकारायच्या जबाबदारीची जाणीव आई–बाबानी करून दिल्यामुळेच मी माझा हा पहिला वहिला निर्णय 'शाळेत न जाण्याचा' आणि 'जाण्याचाही' घेऊ शकले!

नंतरचा महत्त्वाचा निर्णय दहावी नंतरची शाखा निवडतानाचा. माझे आई–बाबा दोघेही डॉक्टर. त्यामुळे मीही डॉक्टर बनावं, अशीच इतर सगळ्यांची इच्छा/अपेक्षा. पण मला व्हायचंय का डॉक्टर? माझं मन काही केल्या मला होकारात्मक उत्तर देईना. मग मला काय करायचंय पुढे ? मी त्यावेळी खूप विचार केला. अर्थातच आई–बाबाबरोबरही चर्चा केली. त्यावेळी म्हणजे १९८६ मध्ये मला ८४% मिळाले होते. कुठल्याही महाविद्यालयात विज्ञान शाखेत मला सहज प्रवेश मिळाला असता. पण मी ठरवून कला शाखेत फर्ग्युसन महाविद्यालयात प्रवेश घेतला. त्यावेळी कला शाखेत एवढे मार्क मिळून आलेली मी एकटीच होते. आज मागे वळून बघताना वाटतं की उगाच 'रॅट रेस'मध्ये न शिरता शांतपणे जगण्याचा, ग्लॅमरच्या पाठीमागे न जाता आपल्याला आवडतं ते शिकण्याचा, त्या मार्गाची निवड करण्याचा माझा निर्णय खरंच महत्त्वाचा होता. हा निर्णय घेताना माझा आतला आवाज मला काय सांगतो, मला नक्की काय व्हायचंय याचा विचार मी प्रामुख्याने केला. नववी, दहावीत असताना मला वाटत होतं आपण लहान मुलांसाठी एक छान वेगळी शाळा काढावी किंवा पत्रकार बनावं किंवा आईसारखं समुपदेशक बनावं, शिवाय कॉलेज करता करता मला इतरही काही छंद जोपासायचे होते, नवीन काही शिकायचं होतं. या सगळ्या पर्यायांचा विचार करून मी माझी कला शाखेची निवड पक्की केली.

बी. ए./एम. ए.ला मी मानसशास्त्र हा विषय निवडला. एम.ए. नंतर पीएच.डी.साठी विषय मिळावा म्हणून रोज 'मुक्तांगण'मध्ये आईच्या खोलीत येऊन बसू लागले. निरीक्षण करू लागले. खूप वेगवेगळे विषय त्यावेळी मला कळले. व्यसनाधीन रुग्ण, त्यांचे नातेवाईक, त्यांचे कौटुंबिक–सामाजिक–आर्थिक प्रश्न... आपण काम करू तेवढं कमी आहे, असं जाणवू लागलं. त्यावेळेपर्यंतची मी पुस्तकात/अभ्यासात रमणारी अशीच होते. पण आईचं काम बघताना, ती ज्याप्रमाणे सगळ्यांना धीर द्यायची, सगळ्यांना घेऊन पुढे जायची, त्यानं मी कमालीची प्रभावित झाले. आपल्या ज्ञानाचा, जोपर्यंत समाजाला उपयोग होत नाही, तोपर्यंत काही खरं नाही; हे प्रकर्षानं जाणवू लागलं. आपणही समाजामध्ये रमणारे आहोत, हे ध्यानात येत गेलं. आणि यावेळीही माझा आतला आवाज ओळखून, गरज ओळखून योग्य तो निर्णय घेऊन मी 'मुक्तांगण'ची झाले.

**– मुक्ता पुणतांबेकर**
उपसंचालिका, मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्र,
आळंदी रस्ता, पुणे – ६
**शब्दांकन : जयश्री काटीकर**



"Make the decision, make it with confidence, and the world will be yours."

## दि लक्ष्मी को-ऑपरेटिव्ह बँक लि., सोलापूर

मुख्य कार्यालय : ३१९, दक्षिण कसबा, सोलापूर

# ।। दीपावलीच्या शुभेच्छा ।।

ही दीपावली व नववर्ष आपणांस सुखसमृद्धीचे व भरभराटीचे जावो हीच शुभकामना!

बसवराज कृ. बोडा
**सरव्यवस्थापक**

प्रा. डॉ. राजकुमार ज. मोहरकर
**व्हाईस चेअरमन**

अ‍ॅड. लक्ष्मीकांत वि. कोंडा
**चेअरमन**

**आणि समस्त संचालक मंडळ**



*• Happy Diwali •*

## Premier Seals (India) Pvt. Ltd.

**Reedvalves, Oil Seals & Metal to Rubber Bonded Items**

**Works & Office**

17/8, D-1 Block, M.I.D.C., Chinchwad, Pune - 411019.
Ph. (020) 27458848/4111951/2/3/27441329/30960072
#Fax : 27477408, E-mail : pseals@vsnl.net
visit us at: www.premiersealsindia.com


**भारतातील आश्चर्ये :** नालंदा विद्यापीठ – बिहार
पाटणा शहराजवळचे खूप प्राचीन विद्यापीठ




## छात्र प्रबोधनतर्फे

**लेखक, चित्रकार, जाहिरातदार, प्रायोजक, हितचिंतक, गावोगावचे कार्यकर्ते सर्वांना**

**दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा !**

## छात्र प्रबोधन
## वीस वर्षांची वर्धिष्णू वाटचाल

– महेन्द्र सेठिया

पुणे शहरात व जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी चालू असलेल्या व्यक्तिमत्त्व विकसनाच्या उपक्रमांना नियमित संपर्काची जोड मिळावी म्हणून १९९१ साली 'छात्र प्रबोधन'चा जन्म झाला. वर्षभरानं त्याचं बारसं झालं.

मासिक काढण्याचा कुठलाच अनुभव पाठीशी नव्हता. पण हळूहळू या कल्पनेभोवती 'संपादक मंडळ' जमा होत गेलं. मग हळूहळू अनेक लेखकांच्या साहित्यातून अन् चित्रकारांच्या कुंचल्यातून छात्र प्रबोधननं बाळसं धरलं... ते खुलत गेलं... फुलत गेलं... महाराष्ट्रभरातल्या हजारो विद्यार्थ्यांनी त्याला आपलंसं केलं.

साहित्यातलं वैविध्य, दर्जा वाढवण्याची आणि नवनवीन लेखकांना लिहितं करण्याची प्रमुख जबाबदारी प्रा. शैलजाताई देशमुख यांनी (संपादक मंडळातल्या पहिल्या दिवसापासूनच्या सक्रीय सदस्या, मार्गदर्शक) स्वीकारली. त्यांच्या जोडीला कार्यकारी संपादक, संगणकीय सदस्य, कार्यालयीन सदस्य असा पसारा वाढत गेला. आज १५ जणांचा संच छात्र प्रबोधनच्या कार्यालयात अत्यंत मनापासून, जबाबदारीने व समर्थपणे छात्र प्रबोधनची वाढती धुरा सांभाळत आहे, याचा आनंद वाटतो.

मासिकाच्या २० वर्षांच्या वाटचालीत कितीतरी महत्त्वाचे टप्पे आणि त्या प्रत्येक टप्प्यातल्या शेकडो प्रसंगांनी मला आणि माझ्या बराबेर काम करणाऱ्या अनेकांना खूप समृद्ध केलंय. वाचक, सभासदही समृद्ध झाले असतील अशी आशा आहे.

नुसतं मासिक छापून ते अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत नियमितपणे व दर्जेदार स्वरूपात पोचवत राहाणं इतकं मर्यादित उद्दिष्ट डोळ्यांसमोर नव्हतं; तर या सगळ्या विद्यार्थी वाचकांना अधिकाधिक कृतिप्रवण करावं; यासाठी गोवोगावी मेळावे व्हायचे, वेगवगळ्या स्पर्धा जाहीर व्हायच्या. विविध प्रकारची शिबिरे, साहस सहली, अभ्यासपूर्ण सहली व्हायच्या आणि या सगळ्यातून महाराष्ट्रभरातले विद्यार्थी एकत्र यायचे. स्वत: अनुभवसंपन्न होत होत अनेकांसाठी उपक्रम घेण्यासाठी पुढाकार घ्यायचे. गावोगावी प्रौढ कार्यकर्ते या कामासाठी पुढे आले आणि मग ८–१० गावांमध्ये नियमित उपक्रमांना प्रारंभ झाला. तपपूर्ती वर्षातील कुमार मेळावे–संमेलने–महोत्सव आणि ईशान्य भारत मैत्री अभियान यांनी या सर्वच उपक्रमांचा संस्मरणीय टप्पा गाठला. मासिकाइतक्याच किंबहुना त्यापेक्षाही अधिक आठवणी या सर्व उपक्रमांशी जोडल्या गेल्या आहेत.

शेकडो विद्यार्थ्यांनी व त्यांच्या पालकांनी माझ्यावर, छात्र प्रबोधनवर भरभरून प्रेम केलं. २० वर्षांच्या वाटचालीत हजारो व्यक्तींनी स्वत:चा वेळ, पैसा, अनुभव, तज्ज्ञता, संपर्क छात्र प्रबोधनच्या वर्धिष्णू वाटचालीसाठी आपणहून आनंदाने दिला. म्हणूनच आज एका भक्कम पायावर छात्र प्रबोधन उभे आहे; भविष्यात मोठी भरारी घ्यायला!

मराठी बरोबरच इंग्रजी, हिंदी व भारतातल्या विविध स्थानिक भाषांमध्ये छात्र प्रबोधनच्या आवृत्त्या निघाव्यात व त्यातून छात्र प्रबोधन हे अखिल भारतीय व्हावे, असे स्वप्न डोळ्यांसमोर आहे. शालेय वयोगटाबरोबरच महाविद्यालयीन आणि पदव्युत्तर युवक–युवतींसाठी छात्र प्रबोधनच्या 'युवोन्मेष' आवृत्त्या निघाव्यात अशी कल्पना आहे. शाळाशाळांमध्ये छात्र प्रबोधन मासिकाचा पूरक वाचनासाठी, भावनिक–वैचारिक पायाभरणीसाठी वाढता उपयोग व्हावा व अनौपचारिक स्वरूपात गावोगावी प्रबोधक मंडळे सुरू व्हावीत, अशी कल्पना आहे. महाराष्ट्रातल्या आणि देशभरातल्या, शहरातल्या आणि खेडेगावातल्या लाखो मुलामुलींच्या घडणीमध्ये छात्र प्रबोधनने महत्त्वाची भूमिका बजावावी व त्यातून सामर्थ्यवान, देशभक्त युवक–युवती संघटितपणे या देशाच्या विकासासाठी कटिबद्ध व्हावेत; यासाठी प्रयत्न करायचे आहेत. त्यासाठी गावोगावच्या छात्र प्रबोधनवर प्रेम करणाऱ्या शेकडो विद्यार्थी–युवक–युवती–प्रौढांना मी आवाहन करतो की त्यांनी आपापल्या गावात, राज्यभर आणि देशभर हे काम वाढावे यासाठी पुढाकार घ्यावा, वेळ दद्यावा. आपण सगळे एकत्र मिळून परमेश्वरी आशीर्वादाने हा संकल्प सिद्धीस नेऊया...

कै. लक्ष्मी–नारायण स्मृतिप्रीत्यर्थ
**प्रायोजक – श्री. काशिनाथ कुलकर्णी, पुणे**

# माझ्या नजरेतून 'छात्र प्रबोधन'

'...चित्रकलेसह विविध कला आणि शास्त्र यांच्याविषयीची जिज्ञासा 'छात्र प्रबोधन'ने जागवली. महाराष्ट्रातील प्रभावान लेखक–कवींचा स्नेह आणि योगदान दोन्ही मिळवलं आणि प्रबोधिनीतील महत्त्वाचे उपक्रम आणि संकल्पना समर्पक रीतीने किशोरांपर्यंत पोचवल्या. ...गेल्या वीस वर्षांत जी व्यवस्था, यंत्रणा आणि प्रेरणा या कामात उभी राहिली त्यामागच्या अपरंपार परिश्रमांची जाणीव आहे; कल्पकतेला दाद आहे! पुनश्च शुभेच्छा !

**– मा. व. सी. तथा अण्णा ताम्हनकर, वाच. स्वर्णलता भिशीकर, हराळी** (ज्ञा. प्र. ज्येष्ठ मार्गदर्शक)

...'छात्र प्रबोधन'चा अन् माझा संबंध, प्रथम पालक म्हणून आणि नंतर संयोजक म्हणून आला. संयोजक म्हणून काम करतानाही 'छात्र प्रबोधन'नं मला समृद्ध केलं. वेगवेगळे अनुभव घेता आले. मग ते छोटे मोठे उपक्रम आयोजित करणं असेल, दिवाळी अंकाच्या नोंदणीनिमित्त गावोगावी संपर्कासाठी फिरणं असेल, शाळेतली मुलांची शिबिरं असतील किंवा दिवाळी अंक वितरणाची व्यवस्था असेल. मुलांचं आणि युवक युवतींचं भावविश्व जवळून अनुभवता आलं... 'छात्र प्रबोधन' ही मुलामुलींच्या व्यक्तिमत्त्व विकसनाची चळवळ व्हावी. हे स्वप्न प्रत्यक्षात उतरवण हेच आपल्यापुढचं मोठ्ठं आव्हान आहे असं मला वाटतं...

**– श्री. सतीश कुलकर्णी, सातारा** (केंद्रप्रमुख)

...खरंतर कुमारवयीन मित्रांसाठी 'छात्र प्रबोधन'च्या माध्यमातून आपण कधी काही लिहू (शकू) असं वाटलं नव्हतं. तुमच्या सर्वांच्या पाठपुराव्यामुळं माझ्या या प्रकारच्या लेखनाला बळ मिळालं... इ. नववीच्या वाचनपाठ या पाठ्यपुस्तकात 'छात्र प्रबोधन'मधला 'मनपसंत ऋतु वसंत हा' लेख निवडला, ही आनंदाची गोष्ट आहे. त्याचबरोबर जबाबदारीची जाणीव वाढवणारा हा भाग आहे. असं वाटतं. आपल्या लेखनाकडे रसिकांचे, जाणत्यांचे असे निरपेक्षा लक्ष आहे ही भावनाच मोहरून टाकणारी आहे.

**– श्री. सुनील शिनखेडे, सोलापूर** (लेखक)

...यंदा छात्र प्रबोधनला २० वर्षे पूर्ण झाली. त्याबाबत महेन्द्रभाई व सहकाऱ्यांचे कितीही आभार मानले तरी थोडेच आहेत. बोलक्या संवादापासून मुखपृष्ठापर्यंत ओळन्–ओळ ज्ञान देते. कथा असोत, चरित्रे असोत, ललित असोत किंवा कविता असोत हा अंक सर्वांगाने मराठी साहित्याचा चविष्ट आस्वादच आहे. हा नुसताच मुलांपर्यंत मर्यादित नसून पालकांनासुद्धा याची गरज भासते. आजच्या धकाधकीच्या (मुंबई) जीवनात दुरावलेल्या आजी–आजोबांच्या गोष्टी, गाणी तसेच फावल्यावेळातील आमचा हा जणू सखाच...

**– केवल मुळे, मुंबई** (सभासद)

...'छात्र प्रबोधन'च्या मासिकात येणाऱ्या तळटीपा खूप छान असतात. त्यांचा उपयोग लिहिण्यासाठी, भाषणासाठी होतो. अंकातील माहितीपर लेखांचा उपयोग निबंध लिहिण्यासाठी, वक्तृत्व स्पर्धेसाठी चांगला होतो. सध्याचे ज्वलंत चर्चेचे विषय सोप्या आणि छान पद्धतीने मांडलेले असतात. अंकाच्या प्रेमात आम्ही एवढे आहोत की मुलांच्या मित्र–मैत्रिणींना भेट द्यायची असेल तर या अंकाच्या वर्गणीची पावती त्यांना देतो. असेच मुलांना सृजनांचे पंख देणाऱ्या छात्र प्रबोधनला आम्हा सर्वांकडून खूप शुभेच्छा...

**– डॉ. अनिता कुलकर्णी, नाशिक** (पालक–वाचक)

...सध्याच्या युगात आजूबाजूला चांगले आदर्श आढळत नसताना, 'छात्र प्रबोधन' मुलांना चांगल्या आदर्शांची ओळख करून देत आहे. त्यामुळे मुलांना मोठी स्वप्ने बघून, त्या स्वप्नांच्या पूर्ततेसाठी प्रेरणा छात्र प्रबोधन निश्चितच देत असते. महेन्द्रभाई अत्यंत अनौपचारिक पद्धतीने 'संवाद' साधून मुलांना वर्तमानाबद्‌दल जागरूक करतातच पण नवीन विचार करायला प्रवृत्त करतात...

**– श्री. संतोष साटम** (सिद्धी गॅस, जाहिरातदार)

## ‘छात्र प्रबोधन’द्वारा आयोजित नावीन्यपूर्ण राज्यस्तरीय स्पर्धा

# ‘तुम्हीच संपादक व्हा !’

## राज्यस्तरीय हस्तलिखित स्पर्धा : २०१२-१३ (पृष्ठमर्यादा ४८ ते ५४)

दिवाळीच्या सुट्टीचा या स्पर्धेच्या पूर्वतयारीसाठी पुरेपूर वापर करा. एकाच शाळेतील अथवा वेगवेगळ्या शाळांतील मित्रमैत्रिणींचा गट करून मोठ्यासंख्येने या स्पर्धेत भाग घ्या. आणि तुमच्यातल्या कल्पकतेला, लेखन, चित्रकला यांना व्यक्त होण्याची संधी द्या.

**स्पर्धेचा तपशील –** • स्पर्धा इ. ७ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी आहे.

- स्पर्धा सांघिक असून त्यासाठी ५ ते ८ जणांचा गट असावा.
- स्पर्धेत प्रवेश नि:शुल्क आहे. तथापि **३१ डिसेंबर २०१२** पर्यंत पत्राद्वारा/ई-मेलद्वारा नावनोंदणी आवश्यक आहे. नोंदणीपत्रक संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
- **खालील विषयांचा समावेश हस्तलिखितात असणे आवश्यक आहे.**

**१. प्रतिभाशाली लेखन –** अ) गुप्त संदेश कविता * आ) कल्पनाप्रधान गोष्ट *
इ) निर्जीव वस्तूंमधला संवाद

**२. कल्पक विचार –** नित्य वापरातल्या कोणत्याही वस्तूमध्ये ५० सुधारणा सुचवा *

**३. कला –** कोलाज तयार करून चिकटवा*

**४. मुलाखत –** आपल्या परिसरातील एका उद्योजकाची मुलाखत*

**५. वर्षविशेष –**१) राष्ट्रीय गणित वर्षानिमित्ताने एका गणितज्ज्ञाचा थोडक्यात परिचय
२) स्वामी विवेकानंदांच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने त्यांच्या कोणत्याही एका विचाराचे रसग्रहण/विवेचन/उदाहरणांसह स्पष्टीकरण

- वरीलपैकी * अशी खूण केलेल्या साहित्य प्रकारासाठी उपयुक्त तंत्रे सहभागी सदस्यांना ‘छात्र प्रबोधन’च्या संकेतस्थळावर पाहता येईल.
- याशिवाय अन्य कोणत्याही विषयावरील कोणत्याही प्रकारच्या साहित्याचा समावेश (कथा, कविता, ललितलेख, माहितीपर लेख, कोडी, विनोद, कलाकृती, पत्रलेखन, प्रवासवर्णन, पुस्तक-चित्रपट परिचय इ.) तुम्ही हस्तलिखितात करू शकाल. हस्तलिखिताला विषयांचे बंधन नाही. जास्तीत जास्त लेखन सहभागी विद्यार्थ्यांनी लिहिलेले असावे. त्यात आकर्षक चित्रांची जोड द्यावी. संकलित पाने १० पेक्षा जास्त नको.
- **बक्षिसे –** **प्रथम क्रमांक –** रु. १०००/-**द्वितीय क्रमांक –** रु. ८००/-
**तृतीय क्रमांक –** रु. ६००/- **उत्तेजनार्थ तीन बक्षीसे प्रत्येकी –** रु. ३००/-

**विशेष संधी –** क्रमांक प्राप्त हस्तलिखितात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना परस्पर सोयीनुसार कोणत्याही एका महिन्यातील ४ दिवस ‘छात्र प्रबोधन’ अंकाच्या संपादकीय कामाचा अनुभव घेण्याची संधी मिळेल.

**हस्तलिखिते पाठविण्याचा अंतिम दिनांक – ५ फेब्रुवारी २०१३**

स्पर्धेचा निर्णय २५ मार्च २०१३ रोजी जाहीर होईल.

अधिक माहितीसाठी ‘छात्र प्रबोधन’च्या संकेतस्थळाला (www.chhatraprabodhan.org) जरूर भेट द्या अथवा मुख्य कार्यालयाशी संपर्क साधा.

कै. माधव सोलापूरकर स्मृतिप्रीत्यर्थ
**प्रायोजक – श्रीमती नलिनी सोलापूरकर, पुणे**

दीनानाथ मंगेशकर सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलतर्फे
छात्र प्रबोधन च्या वाचकांना
दिवाळीच्या आरोग्यपूर्ण शुभेच्छा !




दीनानाथ मंगेशकर सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल ची
नवी इमारत अत्याधुनिक वैद्यकिय तंत्रज्ञाना समवेत
लवकरच सुरू होत आहे.

**निरोगी रहा ! आनंदी रहा !!**

DMH

*लता मंगेशकर मेडीकल फाउंडेशनचे*
*दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटर*
**एरंडवणे, पुणे ४११ ००४.**
☎ २० ४०१५१०००/६६०२३००० , फॅक्स - २५४२०१०४ ,
इ मेल: info@dmhospital.org , वेबसाईट: www.dmhospital.org



सौर कार्तिक, शके १९३४/ नोव्हेंबर २०१२, पंजीकृत नियतकालिक (Registered Newspaper) ISSN 2279-0691 Chhatra Prabodhan
पंजीकरण क्रमांक (RNI NO.) MAHMAR /2000/5636 घोषणापत्र क्रमांक : (PHM/SR/201/VIII/2001)
L-2 / RNP / PNW/M / 94 / 2012 - 2014, Posted at S.P. Post Office On 1st of Every Month.




सर्व देणगीदार, जाहिरातदार, प्रायोजक यांना मनापासून धन्यवाद ! त्यांच्या अर्थसाहाय्यामुळे हजारो विद्यार्थ्यांना हा अंक ४० रुपयांमध्ये देता आला.
मुख्य कार्यालय : छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ, पुणे ४११०३० दूरभाष : ०२०-२४२०७१७४/१७९
संकेतस्थळ : www.chhatraprabodhan.org ई-मेल : www.chhatraprabodhan@jnanaprabodhini.org
प्रकाशन दिनांक : राष्ट्रीय सौर ९ कार्तिक शके १९३४, (३१ ऑक्टोबर २०१२) मासिकाची वार्षिक वर्गणी ₹ १८०/- या अंकाची किंमत ₹ ६०